म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २८५१

REFBK-0022689

प्रपंच प्रकाशन

# चिंतामुक्त जीवन

निबंध
२२६८९
२०५९१

REFBK-0022689

यशवंत भागवत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 OCT 1979

31 OCT 1979

21 NOV 1979

1 JUN 1980

6 DEC 1981

3 APR 1983

22 MAY 1983

(क्रु. मा. प.)

निबंध

प्रपंच प्रकाशन

# चिंतामुक्त जीवन

निबंध
२२६८९
२०५९१

REFBK-0022689

यशवंत भागवत

प्रपंच प्रकाशन ११२

प्रकाशक :

माधव रा. कानिटकर
१९४५, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

© लेखक :
यशवंत भागवत
'राधा' टिळक रोड,
९९८ शुक्रवार, पुणे २.

मुखपृष्ठ : जयंत ताडफळे

आवृती पहिली : १५ ऑगस्ट १९७९

मुद्रक :

प्रमोद वि. बापट
प्रमोद प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४२१ ०३०.

मल्य सोळा रुपये पन्नास पैसे

संदर्भ विभाग
निबंध
२७५१
२२६८९
२५।९।७९

कराडच्या

इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य

श्री- विद्यानंद गणेश दाढे

यांना सविनय सादर

## अनेक व्याधींचं मूळ– काळजी

या जीवसृष्टीमध्ये परमेश्वरानं फक्त मानवालाच अतिशय तीक्ष्ण असा मेंदू देऊन ठेवलाय. पण त्याबरोबरच त्याला अतिगर्व होऊ नये म्हणून ' काळजी ' या नावाचा एक रोगही देऊन ठेवला आहे. काळजी एखाद्या किडयासारखी माणसाला हळूहळू पार नामशेष करून टाकते. कितीतरी शारीरिक व्याधींचं मूळ काळजी हे आहे. पण दुर्दैव असं की, इतक्या या भयानक आणि जीवघेण्या विषयावर एखाद्या मोठ्या लायब्ररीमध्ये हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीसुद्धा पुस्तके उपलब्ध नसतात. पण इतर कमी महत्वाच्या किंवा फालतू विषयांवरची शेकडो पुस्तके सहज सापडू शकतात.

बालवय कसं मजेचं असतं ! काळजी म्हणायची थोडीसुद्धा असत नाही. जसा जसा माणूस तारुण्यांतून आयुष्याची वाटचाल पुढे करू लागतो तसा तसा त्याच्यापुढे कमी-अधिक प्रमाणात काळजी हा एक फार मोठा भेडसावणारा प्रश्न आयुष्यभर उभा रहातो. शिक्षणक्रमामध्येसुद्धा काळजी न करता आयुष्य सुखानं कसं जगावं याविषयी थोडासुद्धा नामनिर्देश नसतो. या धकाधकीच्या जीवनात दिवसेंदिवस माणूस काळजीनं गांजत चालला असून हसरे आणि तजेलदार चेहेरे काही वर्षांनी प्रदर्शनातच पहावयास मिळतील असं वाटतं.

## उद्याची चिंता कशाला ?

काळजी करण्याची घातक खोड काढून टाकणं प्रयत्नांती निश्चितच जमू

## अनेक व्याधींचं मूळ– काळजी

या जीवसृष्टीमध्ये परमेश्वरानं फक्त मानवालाच अतिशय तीक्ष्ण असा मेंदू देऊन ठेवलाय. पण त्याबरोबरच त्याला अतिगर्व होऊ नये म्हणून 'काळजी' या नावाचा एक रोगही देऊन ठेवला आहे. काळजी एखाद्या किडयासारखी माणसाला हळूहळू पार नामशेष करून टाकते. कितीतरी शारीरिक व्याधींचं मूळ काळजी हे आहे. पण दुर्दैव असं की, इतक्या या भयानक आणि जीवघेण्या विषयावर एखाद्या मोठया लायब्ररीमध्ये हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीसुद्धा पुस्तके उपलब्ध नसतात. पण इतर कमी महत्वाच्या किंवा फालतू विषयांवरची शेकडो पुस्तके सहज सापडू शकतात.

बालवय कसं मजेचं असतं ! काळजी म्हणायची थोडीसुद्धा असत नाही. जसा जसा माणूस तारुण्यांतून आयुष्याची वाटचाल पुढे करू लागतो तसा तसा त्याच्यापुढे कमी-अधिक प्रमाणात काळजी हा एक फार मोठा भेडसावणारा प्रश्न आयुष्यभर उभा रहातो. शिक्षणक्रमामध्येसुद्धा काळजी न करता आयुष्य सुखानं कसं जगावं याविषयी थोडासुद्धा नामनिर्देश नसतो. या धकाधकीच्या जीवनात दिवसेंदिवस माणूस काळजीनं गांजत चालला असून हसरे आणि तजेलदार चेहेरे काही वर्षांनी प्रदर्शनातच पहावयास मिळतील असं वाटतं.

## उद्याची चिंता कशाला ?

काळजी करण्याची घातक खोड काढून टाकणं प्रयत्नांती निश्चितच जमू

शकतं. अर्थात तशी ती खोड काढण्यापेक्षा न लागू देणंच फार अगत्याचं आहे. मी एकदा एक वाक्य वाचलं होतं– 'आपला मूळ उद्देश दूरवर अस्पष्ट असलेलं पहाण्यापेक्षा अगदी जवळ जे काही आहे ते पहाण्याचा आहे.' वरील वाक्यात फार मोठा अर्थ साठवलेला आहे. उद्या काय होणार आहे. पुढील वर्षी काय होणार आहे याची वृथा काळजी करून अंगात आहे ती शक्ति गमावून बसण्यापेक्षा, आज मला काय करता येईल आणि ते करता येत असेल तर आत्मविश्वासानं ते कसं पार पाडता येईल हे पहाणं फार अगत्याचं आहे.

## एक दिवसाचा विचार करा !

म्हणून असे म्हणता येईल की ' फक्त एक दिवसाचा विचार करा.' भूतकाळाचे दरवाजे बंद करा. अजून जन्मालाहि न आलेल्या उद्याचा विचार करू नका. मग तुम्ही आजच्यापुरते अगदी सुरक्षित आहात ! गतकाळात केलेल्या चुकांची टोचणी सारखी मनात धरून अनोळखी उद्याची काळजी करत तुम्ही जर जीवन कंठणार असाल तर त्या ओझ्यामुळं ' आजच ' काम करायचा तुमचा आत्मविश्वास निश्चितच कमी होणार आहे. सुखी जीवन जगण्याची इच्छा असणाऱ्याच्या मार्गातला हाच तर खरा अडसर आहे. म्हणून एक दिवसाचा विचार करण्याची सवय लावून घ्या. कदाचित तुम्हाला हे म्हणणं जरा चमत्कारिकपणाचं वाटेल. तुम्ही म्हणाल, ' मग माणसानं काय उद्याचा विचार, उद्याची तयारीच करायला नको असं म्हणा की !' छे, छे ! मला असं बिलकूल म्हणायचं नाही. ' एक दिवसाचा विचार करा ' याचा बारकाईनं जर तुम्ही विचार केलात तर त्यावरनं तुम्हाला असं वाटणार नाही का की आजच्या कार्यावर इतकं आत्मविश्वासानं तुटून पडा की हीच उद्याची तयारी होणार आहे. थोडक्यात आजचं काम उत्कृष्टपणानं करणं हाच उद्याच्या कामाचा पाया आहे. ' कसं ' काय होणार आहे माझ्या धंद्याचं इथून पुढं !' किंवा ' यंदा पाऊस झाला नाही. पुढच्या वर्षी काय भयानक दुष्काळ पडणार आहे.' असं झालं तर ' मग मला माझी भाकरी कशी मिळेल ?' असली काळजी बिलकूल करू नका. फक्त आजचा विचार करा. उद्याच्या विचारांची काळजी घ्यायचं ' उद्या ' स्वतःच पाहील.

तुम्ही कशाला त्याची चिंता करता ? तुम्ही कदाचित हसाल यावर म्हणाल, ' मूर्खासारखं आहे हे सांगणं. आम्हाला तर प्रत्येकजण म्हणतो, अरे बाबा, प्रत्येक पाऊल टाकताना भविष्यकाळाचा विचार कर. उद्या तू मेलास तर तुझ्या पोराबाळांचं काय होणार आहे ? तू विमा उतरला आहेस का ? म्हातारपणासाठी काही तरतूद केली आहेस का ?' बरोबर आहे तुमचं म्हणणं ! उद्याची तरतूद जरूर करा. उद्याचा विचार करा. पण उद्याची काळजी करू नका. हे फार महत्त्वाचं आहे.

## योग्य दिशा

युद्धकाळात सेनाधिकारी उद्याची रचना निश्चित करत असतात. पण ते उद्याची काळजी बिलकुल करत नाही. कारण त्या धुमश्चक्रीत ते जर काळजी करत बसले तर खलास होऊन जातील आधीच ! एखादं प्रचंड जहाज बुडायला लागलं तर त्याचा कप्तान त्याला वाचवू शकत नाही. जर ते बुडणार असेल तर बुडणारच. कुणीही ते थांबवू शकणार नाही. मग ते कसं बुडालं, का बुडालं यामुळं खंतावून न जाता, आहे हा वेळ शांत मनानं त्यातून काय मार्ग काढता येईल यावर जर कप्तानानं घालवला तर काही-तरी कार्य होईल. न पेक्षा जर कप्तान 'आपल्या चुकीमुळं हे झालं,' असं सारखं मनाशी उगाळत बसला तर त्याचं आयुष्य काळजीनं निम्मं होऊन जाईल. योग्य विचारसरणी आणि अयोग्य विचारसरणी किंवा योग्य मार्गानं विचार करण्याची पद्धत आणि अयोग्य मार्गानं विचार करण्याची पद्धत यांतला फरक आपण समजावून घेतला पाहिजे. योग्य विचारसरणीमुळं, एखादी गोष्ट का घडली त्याची कारणं व त्यामुळं होणारे परिणाम लक्षात घेऊन पुढील गोष्टींची तर्कशुद्ध आखणी करता येते.

परंतु अयोग्य विचारसरणीमुळं मानसिक ताण, थकवा, दौर्बल्य मात्र येते. कामाच्या ओझ्याखाली दबून एकजण आजारी पडला. एका डॉक्टरानं त्याला सांगितलं, 'अस पहा, ही काळजी करून तू अकाली का मरून जातोस ? त्यापेक्षा माझा सल्ला ऐक. तू जाळेत वाळूचं घड्याळ पाहिलं आहेस ना ? त्यात असंख्य वाळूचे कण असतात. ते हळूहळू एका छोट्या, अरुंद जागेमधून खाली पडत असतात. त्या छोट्या जागेतून एकापेक्षा अधिक

कण तुम्ही घालवू शकणार नाही. आपण सारेजण त्या वाळूच्या घड्याळासारखे आहोत.' प्रात:काळी आपल्यापुढं हजारो कामं उभी रहातात. आज विजेचं बिल भरायचंय, आज मुलांची पुस्तकं आणायची आहेत, धोब्याकडे कपडे टाकायचे आहेत. एक ना दोन हजार कामं ! पण तुम्ही जर त्यातलं एक-एक घेऊन त्याचा फडशा पाडला तर सर्व कामं व्यवस्थित होतील. सर्व कामं एकदम घेऊन सर्वच अर्धवट पडतील. सर्व वाळूचे कण त्या घड्याळा-खाली पाठवू पहाल तर ते काचेचं घड्याळ फुटून नाही का जाणार ? सर्व कामं एकदम हातात घेतलीत तर ताण, थकवा येऊन सर्वच्या सर्व कामं तर अर्धवट पडतीलच पण प्रकृतीहि बिघडेल. तेव्हा ' प्रत्येक वेळी वाळूचा एकच कण ' तसे ' प्रत्येक वेळी एकच काम ' असा नियम केला पाहिजे.'

## एका वेळी एकच काम !

मी परवा एका ऑफिसात गेलो होतो. अधिकारी अगदी कामाच्या ओझ्याखाली दबून गेलेला दिसत होता. तो एखादं वाक्य माझ्याशी माझ्या कामाचं बोलायचा. मग माझ्या शेजारी बसलेल्याशी त्याच्या कामाचं थोडंसं बोलायचा, मग हातातल्या फाईलमधले कागद वाचून ती प्रकरणं निकालात काढायचा. मध्येच आठवण आली की, एखाद्या कारकुनाला बोलावून घेऊन आणखी कुठल्यातरी कामाचं सांगायचा. तासाभरात कुणाचंच काम झालं नाही. तो मात्र थकून गेला. या उलट मी एक अधिकारी पाहिला. त्याच्या खोलीत एका वेळेला एकच माणूस शिरायचा. त्याचं काम पूर्ण होई तो दुसऱ्या माणसाला तो आत येऊच द्यायचा नाही. एका वेळी फक्त एकच काम ! तसंच दैनंदिन जीवनाचं आहे. कितीहि कठीण काम असलं तरी ते सकाळपासून संध्याकाळपर्यंत करावं. सूर्य बुडाला की आपण त्या कामाचा विचार सोडून द्यावा. हीच तर सुखी जीवनाची गुरुकिल्ली आहे. मागचा पेपर अवघड गेला, त्यात पास होईल किंवा नाही याची काळजी करीत बसलांत की पुढचा पेपर हमखास अवघड जाणार हे प्रत्येकानं लक्षात ठेवलं पाहिजे.

## प्रत्येक दिवस– नवं आयुष्य !

एका कर्तबगार महिलेचं आयुष्य फार उद्‌बोधक आहे. तिच्या वयाच्या तिसाव्या वर्षी तिचा नवरा गेला. त्याच्या औषधपाण्याचं कर्ज झालं. बाईला शिक्षण नव्हतं. तिनं एक सायकल भाड्यानं घेऊन जवळपासच्या खेड्यात जाऊन वस्तू विकायचा धंदा सुरू केला. रात्रीच्या शाळेत जाऊन ती एस् एस सी. झाली. मग पुढं बी. ए. सुद्धा झाली. तिनं एकदा सांगितलं, माझा नवरा अकाली गेल्यामुळं माझं कसं होणार या काळजीनं मी पार खंगून गेले. एक दिवस माझ्या वाचनात असं आलं की, 'शहाण्या माणसाला प्रत्येक दिवस हा नवीन आयुष्यासारखाच असतो.' मला एकदम दिव्य दृष्टि मिळाली त्या वाक्यावरून. ते वाक्य मी मोठ्या अक्षरात माझ्या बिछान्याशेजारी लावलं. सकाळी उठले की माझं लक्ष त्या ओळीकडे जायचं. आजचं जीवन हे माझं नवीन आयुष्य आहे.' असा विचार माझ्या मनात यायचा. आपण नेहमी म्हटलं पाहिजे, 'आजचा दिवस हा केवळ माझा आहे, उद्या माझ्यावर कसली का आपत्ती कोसळेना आज मी अतिशय सुखानं जगलोय म्हणून मी खरा सुखी माणूस आहे.' मानवाची एक शोकांतिका अशी आहे की, तो स्वत:जवळ असलेल्या सुखाकडे पाठ फिरवून दूरवर दिसणाऱ्या काल्पनिक सुखामागं धावून स्वत:चं जीवन दु:खी करून घेतो.

## अडचणीतला माणूस

कितीतरी वेळा असं होतं की, अडचणीत सापडलेला माणूस अगदी भांबावून जातो. असं झालं की त्याची विचार करण्याची शक्ति नष्ट होऊन जाते. तो भावनेच्या आहारी जातो. नुसतीच काळजी करायला लागतो. त्याच्या हातनं कुठल्याहि तऱ्हेचं, अडचण निवारण करण्याच्या दृष्टीनं काहीहि होत नाही. अशा वेळी भांबावून, गोंधळून न जाता शांतपणानं आपल्या पुढील समस्येबाबत टप्प्याटप्प्यानं जर विचार केला तर त्यातून मार्ग तरी सापडू शकतो. आता आपण एकादं उदाहरण घेऊ.

तुम्ही एकादं फार मोठं काम हातात घेतलं आहे. उदा. तुम्ही ज्या

कंपनीत इंजिनिअर म्हणून काम करीत आहात. त्या कंपनीने ड्रेनेज पाइप जमिनीखाली टाकायचं लाखो रुपयांचं कंत्राट घेतलेलं आहे. त्याचे तुम्ही मुख्य इंजिनिअर आहात. सर्व जबाबदारी तुमच्या डोक्यावर आहे. कामात मध्येच मोठी अडचण आली आहे. त्यामुळं असंही होण्याची शक्यता निर्माण झाली आहे की, कंपनीचं लाखो रुपयांचं नुकसान होणार आहे. कदाचित हे काम तुमच्या कंपनीकडून काढूनही घेतलं जाण्याची शक्यता आहे. आता यात वाईटात वाईट काय घडू शकेल ? तुम्ही स्वतः विचार करा. मला कुणी फाशी देईल काय ? नाही. खचितच नाही. असल्या गुन्ह्याला निश्चितच कुणी फाशी देत नाही. मग काय होईल ? समजा मला अपयश आलं तर कंपनी मला नोकरीतून काढून टाकेल. कंपनीचं फार मोठं नुकसान होईल.

अगदी अशाच एका प्रसंगात मी सापडलो होतो. मी विचार करू लागलो. वाईटात वाईट घडलं तर त्याला मला तोंड द्यावं लागेल. त्याची मी मानसिक तयारी ठेवली; समजा माझ्या अपयशामुळे कंपनीनं मला काढायची तयारी केली तर मी शांतपणानं त्यांना पटवून देईन की अपयश हे माझ्या कुवतीबाहेरच्या गोष्टींमुळं आलेलं आहे. त्यांना पटलं ठीक. न पटलं आणि त्यांनी मला नोकरीतून काढून टाकलं तर काय होईल ? मला काय उपाशी मरावं लागेल ? थोडे दिवस फार तर घरी बसावं लागेल. चांगली नोकरी गेल्याचं दुःख होईल. पण नवी कदाचित् पूर्वीपेक्षा हलक्या दर्जाची, कमी पगाराची नोकरी मला मिळेल. मग काय झालं ? या विचारानं माझं डोकं थोडंसं शांत झालं. माझे काळजीनं ताणलेले स्नायू थोडेसे ढिले झाले. जे काय वाईट घडणार आहे ते मान्य करायची मनाची तयारी मी करून ठेवल्यामुळं...मी काळजी करायचं पार सोडून दिलं आणि शांतपणानं माझ्या कामावर लक्ष केंद्रित करू लागलो मी जे वाईट घडणार आहे ते मी टाळू शकेन काय ? त्या दृष्टीनं मी पावलं टाकू लागलो. पुढं त्यातून मला मार्ग सापडला. नशिबानंही मला हात दिला. मी सहीसलामत सुटलो. वर दिल्याप्रमाणं कित्येक उदाहरणं घडलेली आहेत. माणूस एकदा का काळजी करायला लागला की लक्ष केंद्रित करायची त्याची शक्ती पार संपुष्टात येते. मग कार्याचा आणखीनच नाश होतो.

## प्रतिकूल तेच घडणार !

माणूस चिंता करायला लागला की त्याची निर्णय घेण्याची पात्रता पार नष्ट होऊन जाते. विचार करा, काही अपघात घडून तुमच्या घरी कुणी बेशुद्ध पडलं आहे; अशा वेळी डोकं शांत ठेवून अँब्युलन्स बोलावणं, डॉक्टरांना बोलावणं हे करायला हवं आहे. गडबडून गेलात आणि डोक्याला काही सुचत नाही म्हणून हात लावून बसलांत की काहीतरी वाईट घडून येईल हे निश्चित ! घडणार असेल ते टळणार नाही. पण तुम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करा. वाईट घडणार असेल तर ते सहन करण्याची तयारी ठेवा. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून असं सांगितलं जातं की, असं काही प्रतिकूल सहन करण्याची मनाची तयारी ठेवली की, आत्मविश्वास येतो. परिस्थितीशी टक्कर द्यायची मनाची तयारी होते. आणि आता यापलीकड आणखी काही वाईट घडणारं नाही म्हणून मनाला दिलासा मिळतो. मानसशास्त्रातही हेच म्हटलं ' प्रतिकूल गोष्ट सहन करायची तयारी करा, कारण जे घडलं आहे ते मान्य करणं ही त्यामुळे पुढे होणारे दुष्परिणाम टाळण्याची पहिली पायरी आहे.' यात किती अर्थ साठवलेला आहे ! पण हे किती लोक व्यवहारात उपयोगात आणतात ? घरातली एकादी चांगली मौल्यवान वस्तू कुणाच्या हातनं फुटली तर माणसं किती आदळ-आपट करतात ! एकाद्याला नोकरीत बढती न मिळता खालच्या जागेवर येऊ लागलं तर तो दुःखी होऊन त्याचा राग घरच्या लोकांच्यावर, इतरांच्यावर काढतो ! आपल्या नशिबाला आलेली गोष्ट तो मान्य करायची टाळाटाळ करायला लागतो आणि सारखी कुरकुर करून स्वतःला तर दुःखी करतोच पण इतरांनाही गांजून टाकतो.

## खोट्या चिंतांचं जाळं !

एका प्रमुख उद्योगपतीच्याबाबत घडलेली गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. त्याचा वनस्पती तूप तयार करण्याचा मोठा कारखाना होता. एके दिवशी रात्री एक गृहस्थ त्याच्या घरी आला आणि त्याला म्हणाला, ' तुमच्या तुपात फार मोठ्या प्रमाणावर भेसळ, तुमच्या कंपनीमधले लोक

तुम्हाला नकळत करीत असून, हा फार मोठा गुन्हा आहे.' तो माणूस आरोग्य खात्याकडचा अधिकारी होता. तो पुढं म्हणाला, ' हे साठे आम्ही पकडले की तुमची बेअब्रू होईल आणि तुमचा धंदा पार बसेल ! ' मग काय केलं पाहिजे ?'

' मग काय केलं पाहिजे ?'

' मला दहा हजार रुपये द्या. मी मिटवून टाकतो हे प्रकरण.' त्या उद्योगपतीच्या तोंडचं पाणी पळालं. पैसे न द्यावेत तर धंदा पार बसला असता. बरं, द्यावेत तर हा माणूस परत–परत पैसे मागणार... त्यानं ती रात्र पार जागून काढली. अगदी पहाटे–पहाटे त्यानं मनाशी निर्धार केला की, ठीक आहे, येईल त्या प्रसंगाला तोंड द्यायचं. मग दोन-तीन तास झोपून तो कंपनीत गेला. त्यानं पटापट तयार तुपाचे नमुने घेऊन स्वतःच तपासले. त्या दिवशी काही भेसळ सापडली नाही. पण बाहेर गेलेल्या मालात असली तर ? तो स्वतः मुख्य अधिकाऱ्याकडे गेला आणि त्यानं ही खरी परिस्थिती त्यांना नमूद केली. तिथं असं निष्पन्न झालं की, तो उद्योगपतीच्या घरी गेलेला माणस कोणीही अधिकारी नसून तोतया होता. मग त्याला पोलिसांकडून सापळा लावून पकडण्यात आलं !

## आशेचं औषध

एक गृहस्थ अगदी वयाच्या तिशीत खूप आजारी पडले. सहा महिने अंथरुणाला खिळून होते. डॉक्टरांनी सांगितलं, दुखणं पुष्कळ पुढच्या पायरीला गेलं आहे. रोग्याची जगण्याची इच्छा फार दुर्दम्य होती. त्यानं डॉक्टरांना विचारलं,' मी जर हालचाल करू लागलो तर काय होईल ?' यावर डॉक्टरांनी त्याला सांगितलं, ' तू तडकाफडकी मरून जाशील.' ' हात्तिच्या, एवढंच ना ?' त्या माणसानं विचार केला, एवीतेवी मरणारच आहे ना मी. मग मला चार दिवस तरी जग पाहू दे. त्याचा एक नातलग सिलोनला होता. त्यानं बोटीचं तिकीट काढलं आणि तो बोटीत बसला. सर्वांनी त्याला मूर्खात काढलं. बोटीच्या कप्तानाला सांगितलं, ' हा जर मेला तर पुढची सर्व व्यवस्था नीट लावा.' बोटीवर चढल्यावर डेकवर बसून त्या माणसानं अथांग सागर

पाहिला. निळंनिळं आकाश पाहिलं. त्याचं मन भरून आलं. त्या दवाखान्यात राहून त्याच्या डोक्यात निराशेनं थैमान घातलं होतं. घराबाहेर पडल्यावर त्याची जगण्याची इच्छा प्रबळ झाली. मनानं उभारी धरली. शरीरात हळूहळू नवी शक्ती येऊ लागली. थोड्याच दिवसांनंतर तो माणूस किंचित हालचाल करायला लागला. शक्ती वाढल्यावर रोग पळून गेला. औषधं तर नियमानं तो घेत होताच. काही महिन्यांतच तो खडखडीत बरा झाला. कधी कधी अशा अद्भुत गोष्टीही घडू शकतात. वरचं उदाहरण काय दर्शवितं ? तो माणूस मरणार असता तर दवाखान्यातही मेला असता किंवा बोटीवरही मेला असता. ही वाईट गोष्ट त्यानं मान्य केली. नशिबानंही त्याला साथ दिली. माणसाला दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणींकडे त्यानं याच दृष्टिकोनातून का पाहू नये ?

## काळजीचा परिणाम– अल्सर !

डॉक्टरांच्याकडे उपचाराला जाणाऱ्या रोग्यांपैकी ७५ टक्के रोगी खरे तर स्वतःचे स्वतःच बरे होण्यासारखे असतात. पण हे केव्हा शक्य होईल ? जर रोग्यांनी काळजी करायचं सोडून दिलं तर ! तुम्ही कदाचित यावर म्हणाल की, जर रोगी स्वतःचे स्वतःच बरे होऊ शकतील असे असतील तर मग त्यांचे आजारच खरे नसतील. तसं नाही. त्यांचे आजार खरे असतात. अगदी १०० टक्के खरे असतात. पण कित्येक वेळा त्या रोगांचं मूळ काळजीत सापडतं. हृदयरोग, अल्सर, रक्तदाब ही प्रामुख्यानं काळजीमुळं होणारी दुखणी आहेत. त्याचबरोबर पोटदुखी, दातदुखी, हीसुद्धा काळजीमुळे उद्भवणारी दुखणी आहेत हे वाचून नवल वाटेल. भीतीमुळं माणूस काळजी करायला लागतो. काळजीमुळं माणसाच्या मनावर ताण निर्माण होतो, त्यामुळं आतड्यावर त्याचा परिणाम होऊन पचनासाठी निर्माण होणारे निरनिराळे आंत्ररस कमी-अधिक दर्जाचे तयार होऊ लागून आतड्यांना क्षतं पडतात. थोडक्यात सांगायचं म्हणजे तुम्ही जे अन्न खाता त्यामुळं अल्सर होत नसून तुम्हाला जी काळजी खाते तीमुळं तुम्हाला अल्सर होतो ! डॉक्टरांना विचारून पहा, तेसुद्धा तुम्हाला सांगितील की, तुम्ही

भयंकर काळजी करायला लागलात की तुमचं अल्सरचं दुखणं वाढेल. तुमची काळजी कमी झाली की दुखणं आपोआप कमी होईल. ही गोष्ट प्रत्यक्ष निरनिराळ्या चाचण्या घेऊन सिद्ध करण्यात आलेली आहे. भीती, काळजी, मत्सर, तिरस्कार, स्वार्थ त्याचप्रमाणं परिस्थितीशी जमवून घेण्याची नसलेली इच्छा ही सर्व कारणं पोटदुखी, अल्सर निर्माण करतात हे आता सिद्ध झालेलं आहे. अल्सर हा रोग इतका घातक आहे की त्यामुळं रोगी मरूसुद्धा शकतो.

## ताण आणि जाण

खाजगी धंद्यात वरच्या जागांवर काम करणारे लोक अगदी तरुणपणीच मरतात. वकिलांना हटकून ब्लड-प्रेशर किंवा हृदयविकार होतो. त्याचं कारण यशाच्या मागं माणूस लागला की त्याला अतोनात कष्ट करावे लागतात. बरं, हे कष्ट काळजीविरहित नसतात. वरच्या जागांवर काम करणाऱ्या लोकांना अतोनात काळजी करावी लागते. निरनिराळ्या अडचणींना तोंड द्यावं लागतं. यश मिळतं पण चांगल्या तब्येतीचं वाटोळं होतं. बरं, एवढा पगार मिळवून त्याचा उपभोग घेण्याचं दूरच असतं. धंद्यातली काळजी त्या माणसाची झोप घालवून टाकते. मग हे मिळवायचं कशासाठी ? त्यापेक्षा माती उकरणारा वडारी बरा की ! दिवसभर काबाडकष्ट करतो, खूप जेवतो. रात्री सुखानं झोपतो. त्याला काळजी कसली ती असतच नाही. एका वकिलानं इतका जबरदस्त धंदा केला, की अल्पावधीत त्यानं लाखो रुपये कमावले. रात्रंदिवस धंद्याचा ताण सहन केला. शेवटी वयाच्या केवळ पंचावन्नाव्या वर्षी ते हृदयविकारानं मरून गेले. त्यांच्यापेक्षा त्यांचे एक सहकारी जीवनात जास्त यशस्वी ठरले. वयाच्या ७५ व्या वर्षी वार्धक्यानं मेले. फक्त त्यांच्याजवळ पैसा नव्हता. पण त्यांनी आयुष्य सुखानं काढलं. प्लेटोनं म्हटलं आहे की, 'डॉक्टर रोग्याचं नुसतं शरीर बरं करू पाहतात. त्याच्या मनाकडे लक्षसुद्धा देत नाहीत.' रोगी नुसता काळजी करत बसला तर त्याच्या शरीरावर औषधांचा काडीचाही उपयोग होत नाही. वैद्यकीय क्षेत्रात रोज नवी नवी औषधं शोधली जात आहेत.

पण काळजीमुळं निर्माण होणारे रोग औषधानं बरं करणं कठीण आहे. भीतीमुळं, काळजीनं आणि अति दुःखानं माणूस वेडा होऊ शकतो हे आता सर्वांना माहीत झालेलं आहे. पण याचा विचार करतो कोण ?

## तुमचं काम ' आत ' जाऊ देऊ नका

एका व्यापाऱ्यानं शेअर्समध्ये खूप पैसे गुंतवले होते. एकाच कंपनीचे खूप शेअर्स त्यानं घेतले होते. त्याच्या अंदाजानुसार भाव खूप वाढणार होते. मग ते सर्व विकले असता खूप फायदा झाला असता. पण प्रत्यक्षात पार उलटंच झालं. बजेटमध्ये मोठी करवाढ होणार म्हणून एक अफवा शेअर बाजारात पसरली. भाव पडले. हा एकदम आजारी पडला. त्याचं डोकं भयानक दुखू लागलं. त्याला अन्न जाईना. सध्याच्या भावानं त्याला चांगला एक लाख रुपये तोटा होणार होता. त्याला रात्रभर झोप आली नाही. दुसऱ्या दिवशीही तो अंथरुणात पडून होता आणि त्याला ब्रोकरकडून फोन आला की भाव परत सुधारले आणि त्याचे शेअर्स फायद्यात विकले गेले. ही बातमी ऐकताच तो अंथरुणांतून बाहेर पडला. त्याच्या मनानं उभारी धरली. त्याचा आजार पळून गेला. ज्या क्षणी त्याची काळजी, मनावरचा ताण कमी झाला त्या क्षणी तो बरा झाला हेच यावरून दिसत नाही का ? अतिशय काळजी करण्यासारखी घटना घडली की मधुमेहाच्या रोग्याची. लघवीतील आणि रक्तातील साखर झपाट्यानं वाढते. काळजीचं कारण कमी झालं की ती आपोआप कमी होते. तेव्हा सांगायचं तात्पर्य, कुठलंही काम ' हातात ' घ्या ते तुमच्या हृदयात, आतड्यात किंवा फुफ्फुसात जाऊ देऊ नका. भरपूर खा, खूप कष्ट करा, व्यायाम घ्या, दिवसाकाठी एकदा तरी खूप हसा. खूप झोपा, परमेश्वरावर श्रद्धा ठेवा. चांगली करमणूक पाहा. जीवनाच्या चांगल्या बाजूची फक्त आठवण ठेवा. दुःख उगाळत बसू नका आणि असं केलंत की तुमचं जीवन निश्चित सुखी आणि आनंदी होणार आहे. एखादा तरुण माणूस अचानक म्हाताऱ्यासारखा दिसायला लागतो. चार-सहा महिन्यात त्याचे बरेचसे केस पांढरे होतात, त्याच्या डोळ्यांभोवती वलयं दिसायला लागतात, चेहरा ओढलेला दिसतो. तो

बोलला जरी नाही तरी तुम्ही जाणून घ्यावं की तो कसल्यातरी काळजीनं ग्रासला आहे. हृदयविकार शेतकऱ्यांना, हमाली कामं करणाऱ्यांना फारसा होत नाही. याचं कारण काय ? एकच ! ते म्हणजे हा एक अति काळजी करणाऱ्यांचा रोग आहे. शहरातल्या धकाधकीच्या वातावरणात जर एकाद्या धंद्यातला एक्झिक्युटिव्ह आपलं दैनंदिन जीवन अति काळजी करत घालवायला लागला तर समजून घ्यावं की हार्ट अॅटॅकमुळं याचा मृत्यू निश्चित होणार आहे. दैनंदिन जीवनात मानापमानाचे कितीतरी प्रसंग रोज घडत असतात. त्याचं शल्य सारखं मनात असतं. ते आत कुठंतरी तुम्हाला कुरतडत असतं. मन कितीतरी वेळा अन्यायाविरुद्ध आतल्या आत बंड करीत असतं. या असल्या प्रकारांमुळं तुमची मनःशांती ढळू देऊ नका. कितीही अस्थिर वातावरणात, घाईगर्दीत किंवा धकाधकीत आपण जणू कुणी त्यातले नाहीतच असं वागणं ठेवा. तुमचं जीवन निश्चित सुखी होईल. तुमचा तुम्ही नीट विचार करा. वर दिलेल्या गोष्टी अगदी वैद्यकीय, मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून तपासून पाहून सिद्ध झालेल्या आहेत. तेव्हा कायमचं लक्षात ठेवा– काळजीमुळं तुम्ही आजारी पडणार आहात. तेव्हा तुम्हाला जगायचं असेल तर निग्रहानं ' काळजी ' न करता, ' विचार ' करा आणि दीर्घायुषी व्हा.

## विचारपूर्वक निर्णय घ्या

आपल्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडीअडचणींचा आपण कित्येकदा कधी शांतपणानं विचारच करत नाही. आपल्यापुढं एखादी समस्या जर उभी राहिली तर आपण गडबडून जातो, गोंधळून जातो. आयत्या वेळेला स्वतःला सुचेल तसा किंवा कुणी दुसऱ्यानं सांगितल्याप्रमाणं तत्काळ निर्णय घेऊन टाकतो व त्याप्रमाणं कृतीही करतो. अशी अपुऱ्या विचारानं केलेली कृती कित्येक वेळा आपल्याला गोत्यात आणते. अशी कृती केली म्हणजे काळजी लागते. त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले म्हणजे नकोत त्या आणखी काळज्या उत्पन्न होऊन जीवन उगाचच दुःखी होते. मग त्या वेळी वाटतं कृती करण्यापूर्वी जर नीट विचार केला असता तर काळजी करण्याची.

पश्चात्ताप करण्याची पाळी आली नसती. तेव्हा निर्णय घण्यापूर्वी नीट विचार करणं हे फार महत्त्वाचं आहे. एखाद्या गोष्टीचा निर्णय घ्यायचा असला म्हणजे सूत्रबद्ध रीतीनं त्याचा विचार व्हायला पाहिजे. त्यासाठी सर्व माहिती नीट मिळवून त्या माहितीचं विवरण करून मग निर्णय घ्यायला हवा. आता हेच पहाना– मंगळवेढ्याच्या रामभाऊंचा मुलगा एस्. एस्. सी. परीक्षेत प्रथम श्रेणीत पास होईल याची त्यांना खात्री होती. मुलाच्या पुढच्या शिक्षणाचा रामभाऊंनी आधी विचार करायला नको होता का ? पण त्यांनी काय केलं ? निकाल लागेतोपर्यंत स्वस्थ झोपून राहिले. प्रथमश्रेणीत पास झाल्यावर पेढे वाटण्यात त्यांनी दोन दिवस फुकट घालवले. नंतर त्यांनी मुलाला सहज विचारलं, ' तू कोणत्या प्रकारचे उच्च शिक्षण घेणार ?' मुलगा म्हणाला, ' इंजिनिअरिंगचं. ' मग रामभाऊंना तिथल्याच एका फारशी माहिती नसलेल्या गृहस्थानं सांगितलं की, ' द्या त्याला आय. टी. आय.मध्ये घालून. तिथं तो डिप्लोमा पास होईल, मग इंजिनिअर बनेल. ' रामभाऊंनी बेधडक त्या मुलाला आय. टी. आय.मध्ये घालून टाकला. तिथं त्यांना कळलं की, इथं डिप्लोमा कोर्सचं शिक्षण दिलं जात नाही. दरम्यान पॉलिटेक्निकमध्ये डिप्लोमा कोर्सला अर्ज करायची मुदत टळून गेली होती. अपुऱ्या माहितीवर आधारित, घाईगडबडीनं निर्णय घेतल्यामुळं रामभाऊंच्या हुशार मुलाला एका आणखी चांगल्यापैकी कोर्सला मुकावं लागलं. आपल्या मुलाचं आपण नुकसान केलं. आता त्याचं पुढं कसं होईल म्हणून त्यांनी नंतर खूप काळजी केली पण त्याचा उपयोग नव्हताच. त्याचं एक वर्ष असंच जाऊन पुढील वर्षी त्यांनी त्याला पॉलिटेक्निकमध्ये घातलं. हेच जर आधी व्यवस्थिपणानं सर्व कोर्सेसची माहिती मिळवून ठेवली असती तर नुकसान टळलं असतं आणि त्यामुळं उगीचच काळजी करावी लागली नसती.

## अपुऱ्या माहितीमुळे अविचार

अशीच तऱ्हा रामरावांची झाली. त्यांच्या समोर राहणाऱ्या वसंतावर त्यांचा भलताच राग होता. एक दिवस त्यानं टेपरेकॉर्डर आणल्याचं त्यांना

समजलं. त्यांच्या मते वसंता हा एक लफंगा मुलगा होता. त्यांनी कुतूहलानं तो टेपरेकॉर्डर जाऊन पाहिला. त्यांना तो अगदी स्वतःच्या टेपरेकॉर्डर-सारखा वाटला. ते घाईनं घरी आले. घरी त्यांना आपला टेपरेकॉर्डर कुठंहि सापडला नाही. त्यांनी सरळ पोलिसांकडे तक्रार नोंदविली. तक्रारीमध्ये चक्क 'वसंतानं चोरून माझा टेपरेकॉर्डर नेला' असं नमूद केलं. आणि दुसऱ्या दिवशी त्यांचा मुलगा गावाहून आला. त्यानं तो टेपरेकॉर्डर त्याच्या एका मित्राला वापरायला दिल्याचं त्यांना कळल्यावर खोटी फिर्याद दिली म्हणून आता पोलिस आपल्यालाच पकडणार म्हणून ते काळजीत पडले! घाईनंजमवलेल्या अपुऱ्या माहितीवर केलेली कृति असा गोता देऊ शकते. पुष्कळ लोकांना एकांगी माहिती मिळवून त्यावर निर्णय घेण्याची सवय असते. आपल्या इच्छेला पोषक असलेली माहिती तेवढी खरी; त्याविरुद्ध माहिती मात्र खोटी असंच कितीतरी लोक धरून चालतात. अण्णासाहेबांना बराच तांदूळ कुठल्यातरी गावातून आणायचा होता. त्यांनी कुणाला तरी नियम विचारले. कुणी म्हणाले, पाच किलो आणता येतो, कुणी म्हणाले, त्यावर कसलीहि बंदी नाही. अण्णासाहेबांना 'बंदी नाही, वाटेल तितका आणा हेच खरं असेल असं वाटलं. कारण ते त्यांना पोषक होतं. खरा नियम काय आहे ते जाणून न घेता त्यांनी भरमसाठ तांदूळ बेकायदेशीरपणानं आणला. मग आले गोत्यात आणि लागले काळजी करायला. तेव्हा मिळालेली माहिती अपुरी नाही ना, त्याचप्रमाणं खरी आहे ना याची नीट खात्री करून घेणं महत्वाचं आहे. त्या माहितीकडे निःपक्षपातीपणानं पाहून त्या माहितीची छाननी करायला हवी. आपणास पोषक असलेलीच माहिती मिळवून स्वस्थ न बसता आपणाला मारक अशी माहिती मिळवून त्याची छाननी व्हायला हवी. निर्णय घेताना आपण विरोधी पक्षाचे वकील आहोत अशा पद्धतीनं मिळालेल्या माहितीचं पृथःकरण करायला हवं. असं रामरावांनी केलं असतं आणि विचारलं असतं— स्वतःला— की, 'कशावरून वसंतानं तुमचा टेपरेकॉर्डर चोरला आहे? तुमचा स्वतःचा टेपरेकॉर्डर तुमच्या घरच्यांपैकी कुणीतरी मित्राला वापरायला दिला नसेल कशावरून? 'काय पुरावा आहे तुमच्याजवळ चोरीबाबत?' पण रामराव करतात कशाला हा साधकबाधक विचार? ते उठले आणि पूर्वग्रहावर भर देऊन

गेले पोलीस चौकीत ! आपल्या टेपरेकॉर्डरसारखा टेपरेकॉर्डर दिसताक्षणीच वसंताच्या बाबतीतल्या पूर्वग्रहानं उचल खाल्ली आणि रामराव भावनेच्या आहारी गेले. त्यांनी शांतपणानं भावनाविरहित दृष्टिकोनातून विचार केला असता तर ही चूक घडली नसती. माहिती मिळवताना, ही माहिती आपण स्वत:साठी मिळवत नसून दुसऱ्यासाठी मिळवत आहोत, अशा विचारानं जर मिळवू लागलो तर आपण कदाचित भावनाविरहित दृष्टिकोनातून ती नीट मिळवू शकू.

## कॅशियरची काळजी

काही काही वेळा मनातल्या मनात विचारांचा गोंधळ माजवण्यापेक्षा चक्क एका कागदावर आपल्याला कसली काळजी आहे आणि त्यावर काय मार्ग काढता येईल असं लिहावं. एकदा एका कॅशिअरला घरी गेल्यावर असं वाटलं की, तिजोरीला कुलूप लावायचंच राहिलं. आत तर चार हजार रुपये होते ! तो भलताच घाबरून गेला. पैशापरीनं पैसे जायचे आणि त्याबरोबर आपली नोकरीही जायची ! मग तो घरी टेबलाजवळ बसला. त्यानं एक कागद काढून त्यावर लिहिलं–

'ऑफिसमध्ये तिजोरीला कुलूप लावायचं राहून गेलं.' यावर काय करता येईल ? ही काळजी दूर कशी करता येईल ?

१) ताबडतोब अधिकाऱ्याच्या घरी जाऊन त्याला सांगणं, त्याला घेऊन ऑफिस उघडणं. तिजोरी उघडी असल्यास कुलूप लावणं. असं केलं असतं तर त्याच्या गलथान कारभारावर अधिकारी भयंकर भडकला असता. त्याचप्रमाणे तिजोरी बंद सापडली असती तर त्यानं उगीचच त्रास दिला म्हणून शिव्या दिल्या असत्या. त्याच्या मनातून आपण कामाला ढिले आहोत म्हणून उतरून गेलो असतो.

किंवा

२) काय घडलं आहे हे न सांगता, 'माझे घरचे काही कागद चुकून ऑफिसात राहिले आहेत' असं सांगून किल्ल्या मागून आणून ऑफिस

उघडणं. कदाचित त्या चाक्षाण अधिकाऱ्याला संशय आला असता. तसंच ऑफिसात घरचे कागदपत्र का आणले म्हणूनहि तो रागावला असता. आणि तो स्वतःच आपल्याबरोबर आला तर ?

किंवा

३) मुकाट्यानं बसणं. ऑफिसला बाहेर कुलुपाला सील असतं. आपल्या कपाटात तिजोरी आहे. ऑफिसपैकी कोणी तिजोरी उघडी राहिली आहे हे समजलं तरच असा चोरीचा प्रयत्न मुद्दाम करेल. पण बहुतेकजणांना अशी तिजोरी उघडी राहिली आहे हे माहिती होणारच नाही. कारण तिजोरीचं झाकण बंद केलेलं असून फक्त अंगचं कुलूप लावायचं राहिलेलं आहे.

त्या कॅशिअरनं तिसरा पर्याय स्वीकारला, त्याच कारण ऑफिसच्या मुख्य दरवाज्याला सील असतं. ते जर फुटलं असतं आणि पैसे गेले असते तर घरफोडी होऊन तिजोरीला किल्ल्या लावून पैसे पळवले गेले असं तो म्हणू शकला असता, पण तसं काहीही झालं नाही. हा मुकाट्यानं दुसऱ्या दिवशी ऑफिसात गेला. तिजोरीचं दार लोटलेलं होतं. फक्त अंगचं कुलूप लावायचं राहिलेलं होतं. ते कुणाच्याच लक्षात आलं नव्हतं पैसे जसेच्या तसेच होते! सारांश एकदा एक निर्णय विचारपूर्वक घेतलात तर त्याची तत्काळ अंमलबजावणी करा, मग स्वस्थ रहा. नशिबानं साथ दिली तर तुमची फत्ते होईल. नाही दिली तर तुम्ही त्याला काय करणार ? पण निर्णय तर तुम्ही साधकबाधक विचार विचार करून घेतला होतात ना !

## नसती भांडणं !

मोठमोठ्या उद्योगधंद्यांमधले अधिकारी निरनिराळ्या संघटनांचे प्रमुख उद्योगपती आणि तत्सम कूप कामाचा बोजा असलेल्या लोकांच्यावर वाजवीपेक्षा जास्त मानसिक ताण पडतो. वर्षानुवर्ष ते अशा ताणाखालीच काम करतात. कधी विचार करत नाहीत की, आपल्या कामाची पद्धत आपण बदलली नाही तर आपण लवकर निकालात निघू. घाईगर्दीनं चार घास पोटात ढकलतात. जेवतांना त्यांचं लक्ष पदार्थ, त्यांची चव याकडे बिलकूल

नसतं. काळजी सदैव धंद्याचीच असते. कोणत्या मीटिंगला जायचं आहे, त्याची तयारी त्यात उद्भवणाऱ्या निरनिराळ्या वादविवादाला तोंड कसं द्यायचं याकडेच सारं लक्ष असतं. सभेमध्ये निरनिराळे लोक जमतात. ही मीटिंग धंद्याची असल्यामुळं निरनिराळे अधिकारी आपल्या मूळ समस्येविषयी वाद-विवाद करायला लागतात. मग त्यातून खडाजंगीही कित्येकदा होते. रक्त तापण्याचे प्रसंग निर्माण होतात या वादावादीमध्ये मुख्य मुद्दा, मुख्य समस्या बाजूलाच राहते. प्रत्येकजण आपल्या अडचणीचा डोंगर पुढे उभा करायला लागतो. मी त्यातूनही कसा नेटानं मार्ग काढतोय याची फुशारकी मारायला लागतो. मीटिंगला येण्यापूर्वी प्रत्येकजण मुद्देसूद माहिती जमवून येतोच असं नाही. शुष्क चर्चा होते, वैयक्तिक हेवेदावे, उखाळ्या पाखाळ्याच मनावर लक्षात राहतील असे प्रहार करून जातात. अपुऱ्या माहितीवर आधारित, अपुऱ्या तयारीवर विसंबून राहून प्रतिष्ठेपायी फोल वाद घातल्यामुळं वरिष्ठ अधिकारी आपल्यावर कुठंतरी सूड उगवतील याची काळजी लागून राहते. तरी मुलामाणसांतही त्याचे पडसाद उठतात. पर्यायानं संपूर्ण कुटुंबाचं स्थैर्य नाहीसं होतं.

## कामाला शिस्त हवी !

वर्षानुवर्ष असं वागल्यामुळं एका फार मोठ्या उद्योगसमूहातल्या अधि-काऱ्याची फार दुर्दशा होऊन गेली. मग त्याला एक सद्गृहस्थानं सल्ला दिला.

'तुमच्या व्यवसायाविषयी मी तुम्हाला काही सल्ला देऊ का ?' तो म्हणाला. त्यावर अधिकारी उत्तरला, 'मी या व्यवसायात दोन तपं काढलीत तुम्ही काय मला सल्ला देणार आहात ? मी असाच काम कसंतरी ओढत शेवटी निवृत्त होणार.'

'तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. मी फक्त तुम्हाला काही सूचना देणार आहे. तुमच्या कामाची पद्धत शिस्तशीर ठेवा. तसं केल्यानं उगाच होणारी धावपळ, वाया जाणारी निष्फळ वक्तव्यं कमी होतील.

'प्रत्येक मीटिंगची तारीख कळल्यापासून लगेच हाताखालच्या लोकां-

चि...२

कडून मुद्देसूद माहिती जमा करून घ्या. तिची नीट छाननी करा आणि मग प्रत्यक्ष सभेमध्ये तुम्ही कसे चमकता ते पाहा.'

'तुम्ही म्हणता त्यात काही तथ्य दिसतं आहे.' 'आहेच मुळी. हाताखालचे लोक एकदा तयार झाले म्हणजे पुन्हा पुन्हा त्यांच्यापुढं उरस्फोड करावी लागणार नाही.' एखाद्या धंद्यात, नोकरीत माणूस शिरला म्हणजे आपणच सर्व कामं करावीत, सर्व गोष्टी आपल्याला माहीत असल्याच पाहिजेत, त्याचप्रमाणं आपण जर गैरहजर राहिलो तर या कामाचं वाटोळं होईल अशा भूमिकेतून किती तरी लोक वागतात. त्या अधिकाऱ्याला असं दाखवून द्यायचं असतं की, मी आहे म्हणून हा धंदा आहे. त्याच्या सल्ल्याशिवाय तो कुठलाही निर्णय कुणाला घेऊच देत नाही. त्यामुळं प्रत्येक गोष्ट त्याच्यासाठी अडून राहते. बारीक-सारीक गोष्टीही त्याला विचारल्या जाऊ लागतात. त्याचा महत्त्वाचा वेळ अशा फडतूस गोष्टींवर खर्च झाल्यामुळं त्याच्या हातून इतर महत्त्वाचं काम होतच नाही. एका बाजूनं तो सर्वांना म्हणत असतो.

'एकट्यानं किती मरायचं ? इथं बाकीचे काहीच काम करत नाहीत.' असा हा गृहस्थ दिवसभर अतिशय गर्दीत असतो. सायंकाळी अतिशय थकून जातो. पण त्याला एक गोष्ट जर कुणी समजावून सांगितली तर कदाचित पटतेही. 'बाबारे, हाताखालचे तावून सुलाखून घेतलेले लोक तयार कर आणि बारीकसारीक गोष्टी त्यांच्यावर सोपव. त्यात तू लुडबूड करू नकोस. तुझं महत्त्व थोडं कमी होईल. पण अशा खोट्या आणि स्वस्त प्रसिद्धीच्या मागं लागू नकोस. अतिशय महत्त्वाचे निर्णय फक्त तू घे. पण हे न ऐकता प्रत्येक गोष्टीत तू लक्ष घालायला लागलास तर तूही थकून जाशील आणि कार्याचा नाश होईल.

## अनुभवाची शिदोरी

कुठल्याही संघटनेमध्ये, कंपनीमध्ये, योग्य जागांवर योग्य माणसं लावून त्यांच्यावर जबाबदाऱ्या तोडून दिल्या आणि त्या त्यापुरते त्यांनीच निर्णय घ्यावेत असं ठरवलं तर फार फायदा होतो. एक तर त्या गृहस्थाला असं वाटतं की माझ्या क्षेत्राचा मी राजा आहे, कारण मी काही निर्णय घेऊ

शकतो. त्याच्याप्रमाणं निर्णय घेण्याचा अधिकार त्याला मिळाल्यामुळं तो जागृतपणानं काम करू शकतो त्याउलट 'सर्वच कामं मी करणार' असं वागणारा एखादा असला म्हणजे हाताखालचे लोक होयबा किंवा सांगकामे बनतात. त्यांना कसलीच जबाबदारी घ्यावी लागत नाही. कारण जबाबदारी घेणारा एकखांबी तंबूतल्या एका खांबासारखा हजर असतो ना! काम सोपवायच्या वरील पद्धतीमुळं प्रत्येकाच्या मागची काळजीही अर्थात कमी होते. कंपन्यांचे तयार होणारे माल, वस्तू वगैरे खपविण्याचं एक शास्त्र आहे. निरनिराळ्या माणसांना त्या वस्तू दाखवून त्यांच्याकडून ऑर्डर्स मिळवणं एक कला आहे. विम्याच्या पॉलिसी खपविणं हीसुद्धा एक अवघड कलाच आहे. याबाबतच्या मागील अनुभवाचं विश्लेषण न करता तसंच काम पुढं रेटत नेलं तर प्रगती फारशी होत नाही. अपयश मात्र येऊ लागतं. समजा मालाच्या ऑर्डर्स मिळविण्याचं काम तुमच्याकडे आहे. प्रथम मालाचा सॅंपल एकाद्या ठिकाणी जाऊन तुम्ही दाखवलात, त्यांचं मन तुम्ही वळवू शकलात, त्याचप्रमाणं त्यांना फार जरुरी असली की लगेच ऑर्डर मिळते. नाहीतर ते सांगतात 'या पुढच्या आठवड्यात.' मग पुढच्या आठवड्यात ते आणखी पुढचा वायदा करतात. मागील अनुभव जमेस धरला तर अशाबाबत एक गोष्ट ध्यानात येते. एका एजंटानं खूप ठिकाणी प्रयत्न केले. परत परत हेलपाटे देणारे व ऑर्डरशिवाय परत पाठवणारे कितीतरी लोक होते. त्यामुळं फुकट हेलपाटे पडून, ऑर्डर्स फारशा मिळत नव्हत्या. मागील अनुभवावरून त्यानं असा निष्कर्ष काढला की, दोनपेक्षा जास्त वेळा ऑर्डर मिळविण्याच्या उद्देशानं एखाद्या ठिकाणी जाण्यापेक्षा नवीनच गिऱ्हाईक गाठणं फार फायद्याचं पडतं. कारण दोनदा बोलावलेला माणूस 'पुन्हा या' असं म्हणण्याची खूपच शक्यता असते. त्यापेक्षा नव्या ठिकाणी पहिल्या भेटीतसुद्धा ऑर्डर मिळण्याचीही शक्यता असते. आणि तसं त्यानं केल्यावर त्याच्या लक्षात आलं की, त्याचा धंदा सुधारला. 'या उद्या' म्हणणाऱ्यामुळं त्याचा धंदा फार व्हायचा नाही आणि तो चिंतेत जो असायचा, ती त्याची चिंता त्या नव्या पद्धतीनं पार कमी झाली. सारांश, आपल्या समस्येवर विविध दृष्टिकोनातून जर आपण साधकबाधक विचार केला आणि निर्णय प्रत्यक्ष अंमलात आणलं तर कार्य सुधारतं आणि मागची काळजी कमी होते.

## वाढतं वय– वाढत्या चिंता

माणूस जन्माला आला की त्याला लाखो प्रसंगांना तोंड द्यावं लागतं. काही प्रसंग चांगले असतात. काही वाईट असतात. ‘सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे’ या उक्तीप्रमाणं दुःखाच्या प्रसंगांनाच फार वेळा तोंड द्यावं लागतं. तसं पाहिलं तर सुखाच्या क्षणाला तोंड देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्या प्रसंगामुळं आपल्याला आनंदच होतो. काळजी अशी नसतेच. पण वाईट प्रसंग, दुःखं ही जर क्षणोक्षणी वाढून ठेवलेली आहेत तर काळजी ह्रीही त्याबरोबर आलीच की ! त्या काळजीला दाद न देता तुम्ही आयुष्य कसं काढताय त्यावर तुमच्या जीवनातलं यश अवलंबून आहे. माणसाचं साधारणतः २०–२५ वर्षांपर्यंतच जीवन चिंताविरहित असतं. असल्याच काळज्या तर त्या थोड्या असतात. जसं वय वाढत जातं, तशा जबाबदाऱ्या अंगावर पडायला लागतात. निरनिराळ्या प्रसंगांना, खर्चांना तोंड द्यावं लागतं. मनानं खंबीर असलेला माणूस डगमगत नाही. धीरोदात्त असतो. विचार करतो, काळजी करत नाही. कित्येक सुखवस्तू माणसं उगाच काळजी करताना दिसतात. त्यांचं सगळं चांगलं चाललेलं असतं. घर असतं, चांगला धंदा किंवा नोकरी असते, मुलंबाळं असतात, सुस्वभावी बायको असते. पण गृहस्थाला झोपेच्या गोळ्यांशिवाय झोप येत नाही. कुठली तरी फडतूस काळजी त्याला छळत असते. काळजी करण्याची त्याला सवयच लागलेली असते. कारण असलं तर फडतूस असतं. कुठं अधिकारी काहीतरी बोलतो, रागावतो म्हणून हे सारखे धास्तावलेले असतात. धंदा असला तर तो बसेल अशी निष्कारण काळजी त्याला लागलेली असते. ही माणसं असा विचार करत नाहीत, की यापेक्षा भयानक परिस्थितीत इतर धीरोदात्त माणसं कशी नेटानं पुढं जात असतात. एका गृहस्थाची अत्यंत शोकांतिका झाली. त्याला दोन मुलगे होते. बारा आणि सहा वर्षांचे. अत्यंत सुदृढ. त्यानं संततिनियमनाचं ऑपरेशन करून घेतलं. पुढं पाच-सहा वर्षांनी थोरला मुलगा अपघातानं वारला. त्या गृहस्थाला आणि त्याच्या बायकोला दुःखाच्या खाईत लोटून गेला. मग त्याला खूप काळजी वाटायला लागली की, आता हा राहिलेला एकुलता एक जगेल ना ? तो सदैव चिंतेत

असायचा. घराजवळ जरा गर्दी दिसली की याला वाटायचं माझा मुलगा तर नाही ना अपघातात सापडला! जरा तो आजारी पडला की हा भीतीनं अर्धमलेला व्हायचा. मुलाला कुठं ट्रिपला पाठवायचा नाही नि काही नाही. दुर्दैव या गृहस्थाच्या अगदी हात धुऊन मागं लागलेलं होतं. एकदा ताप आल्याचं निमित्त झालं. मुलाला मेनिनजायटिस झाला आणि तडकाफडकी मुलगा दगावला. आई-वडील अगदी वेडेच व्हायचे बाकी राहिले. आपल्याकडे एक पद्धत आहे. असं कुणी गेलं की नातलगांना परगावी घेऊन जायचं. तिथं त्यांना विरंगुळा वाटेल असं नातलगांना वाटतं. ते चूक असतं. काळ हाच यावर एक उपाय असतो. माझी आई आजारी असायची. मी परगावी असायचा. माझ्या घराजवळ एखादा तारवाला दिसला की मी हबकून जात असे. अपरात्री बेल वाजली की मला वाटायचं आईचं काही बरंवाईट झालं नसेल ना? असा मी वर्षानुवर्षे काळजी करत होतो. दुर्दैवानं आई अचानक गेली आम्हाला दुःखांत लोटून. त्यानंतर मी जेव्हा सावरलो तेव्हा आता आई जाईल ही काळजी माझ्या मागची गेली होती. हे माझ्या लक्षात आलं. पण मला हे समजलं नाही की जाणारा माणूस केव्हातरी जाणारच आहे. ते काही आपल्या हातचं नाही. मग काळजी कशाला करा? पण मला हे कधीच उमजलं नाही. मी खूप काळजी केली आणि ही साधी गोष्ट लक्षात न आल्यामुळं उगीचच जीवन दुःखी करून घेतलं. वर म्हटल्याप्रमाणं कुठल्याही दुःखावर काळ हा एक उपाय आहे पण तो एकच एक नाही, दुसराही उपाय आहे. तो म्हणजे सततोद्योग. सतत उद्योगासारखं काळजी या रोगावर दुसरं औषध नाही. या जीवनातली काळजीमुक्त होण्याची फार मोठी युक्ती आहे.

## कार्यमग्न राहा

ज्या वेळी आपण एखाद्या कार्यात गुंतलेले असतो त्यावेळी आपल्या डोक्यात काळजीचं वातावरण नसतं, हे शास्त्रज्ञांनी, डॉक्टरांनी अनुभवानं सिद्ध केलेलं आहे. माणूस ज्या वेळी रिकामा असतो त्या वेळी त्याच्या डोक्यात निरनिराळ्या शंका, कुशंका, काळज्या ठाण मांडून बसलेल्या

असतात. एक गृहस्थ अधिकाऱ्याशी भांडून घरी येऊनच बसले. अधिकारी चमत्कारिकच होता. उगीच त्याला त्रास देत होता. घरी आल्यावर त्या गृहस्थाचं कशातच लक्ष लागेना. बायको 'फिरायला चला' म्हणाली. यांनी नकार दिला. मुलगा मागं लागला, 'दिवाळीचा आकाशकंदील करून द्या.' यांचं कशातच लक्ष लागेना. मुलाला हे काळजीत आहेत याची काहीच जाणीव नव्हती. हे आपलं डोकं खाजवत बसून राहिले. त्यांना काळजी वाटायला लागली, आता आपली नोकरी जाणार. मुलगा खनपटीस बसला. त्यानं आकाशकंदिलाला लागणाऱ्या काड्या वडिलांपुढं आणून टाकल्या. वडील मुकाट्यानं बसून राहिले. हा गळ्यातच पडला. मग त्यांनी आकाशकंदिल करायला घेतला. सहा वाजल्यापासून रात्री बारापर्यंत बाप-लेक काम करत बसले. वडिलांच्या डोक्यातली काळजी ते या कामात गुंतले होते म्हणून पार गेली. मुलाच्या तोंडावरचं समाधान पाहून ते खूष झाले. रात्री थकून झोपले...तेव्हा मन कशात तरी गुंतवा. काळजी पळून जाते. दुसऱ्या दिवशी त्या गृहस्थांनी ठरवलं, बस झाली ही काळजी. आपण कामात व्यग्र असलो की काळजी नसते. मग त्यांनी मुलाला शिकवायला सुरुवात केली. बायकोला मदत करायला सुरुवात केली. मुलाला हस्त-व्यवसाय शिकवले. स्वतःमध्ये वाचनाची आवड निर्माण केली. काळजी आपोआप टळली. ब्रिटनच्या पंतप्रधानपदी विन्स्टन चर्चिल होते. दुसरं महायुद्ध अगदी जोरात चाललं होतं. ब्रिटन रसातळाला पोचण्यासारखी अत्यंत वाईट परिस्थिती होती. दुसरा कुणी पंतप्रधान असता तर काळजीनं खंगून मरून गेला असता. चर्चिल चिरूट फुंकत अठरा अठरा तास काम करीत होते. विमानं, बाँब, सुरुंग इत्यादींचे प्रचंड आवाज होत होते. तरी ते निश्चल होते. एकानं त्यांना विचारलं, 'तुम्हाला काळजी कशी नाही वाटत?' ते उत्तरले 'काळजी करायला वेळ आहे कुणाला?' आपण एखादी आवडीची कादंबरी वाचत असलो म्हणजे मध्ये कोणी बोललेलं आपल्याला आवडत नाही, इतकं आपलं मन त्यात गुंतलेलं असतं. आपली कुठली काळजी त्यावेळेला आपल्याला भेडसावत नाही. एखादा उत्तम सिनेमा आपण पाहात असलो म्हणजे आपली काळजी 'तात्पुरती का होईना, दूर झालेली असते. याचाच अर्थ हा की तुम्ही एक काम करत असलात की

दुसरी गोष्ट (म्हणजे काळजी) तुम्ही करूच शकत नाही. म्हणून सतत उद्योगात राहा म्हणजे काळजी तुमच्या मनाला शिवणारच नाही.

## पोकळी वाईटच !

युद्धातून माणसं जेव्हा मनोरुग्ण म्हणून बाहेर येतात तेव्हा त्यांची मानसिक स्थिती अतिशय धक्कादायक असते. जवळजवळ ती माणसं वेडीच असतात. कारण युद्धभूमीवरचे अनुभव भयानक असतात. मानसशास्त्रज्ञांनी त्यावर एकच उपाय काढलाय, 'त्यांना सतत कामात गुंतवून ठेवा.' जर एखाद्याच्या मनाला शॉक बसला असेल तर त्याला सतत कुठल्या ना कुठल्या छंदात, उद्योगात गुंतवून ठेवलं तर आतल्या आत कुढत बसायची त्याची प्रवृत्ती नष्ट करता येते व तो बरा होतो. लग्नानंतर काही वर्षांत एका गृहस्थाची पत्नी वारली. तीसुद्धा भाजून. तो इतका वेड्यासारखा वागू लागला की काही विचारू नका. पण खरं तर त्याच्या दोन छोट्या मुलांनी त्याला मार्गावर आणलं. त्यांचं सारं संगोपन यालाच करावं लागलं. काळजी करायला, दुःख करायला याला वेळच नव्हता. दुःख विसरला बिचारा. युद्धात लढणाऱ्यांच्या नातलगांना एक भयंकर मोठी काळजी वाटत असते. हे उदाहरण मी स्वतः डोळ्यांनी पाहिलं आहे. माझा मित्र मिलिटरीत लेफ्टनंट कर्नल आहे. युद्ध सुरू झालं की इकडे आई, वडील, भावंड, बायको सारखी काळजीत असतात. घरात चोवीस तास रेडिओ वाजत असतो. हे प्रथम पाहतात काय. तर कोण मेल्याची बातमी आली आहे. यांचा लेफ्टनंट कर्नल तिथं व्यवस्थित लढत असतो. त्याला काडीचीही काळजी वाटत नसते. पण इकडे घरच्या लोकांना वाटतं हा पकडला तर नाही ना, बेपत्ता तर नाही ना, जखमी तर नाही ना ! ही माणसं युद्धाच्या बातम्यांपेक्षा कुठल्या तरी दुसऱ्या गोष्टीत मन रमवायला शिकली की यांची काळजी दूर पळते. पण फार थोडे लोक असं करतात. बहुतेक काळजीनं खंगलेलेच दिसतात. रिकामं मन हे जणू एखाद्या लोड नसलेल्या इंजिनासारखं असतं. इंजिन मोकळंच फिरू लागलं की त्याचा वेग इतका भयंकर वाढतो की ते फुटण्याचीही शक्यता असते. मनाचं तसंच असतं. सुशिक्षित माणसानं नीट विचार

केला तर त्याला एक गोष्ट निश्चित पटेल. कितीतरी वेळा असं दिसतं की सुखवस्तू माणसालाच खूप काळज्या व त्यामुळं खूप आजार असतात. या उलट जो माणूस खूप कष्ट करत असतो, जो सारखा या ना त्या गोष्टीत गुंतलेला असतो त्याला काळज्या कमी असतात. डेल कार्नेजीनं फार सुंदर उपमा दिलेली आहे. तो म्हणतो, कुठल्याही तऱ्हेची पोकळी, निर्वात प्रदेश वाईटच. निसर्गालासुद्धा ती आवडत नाही. विजेचा दिवा आतून निर्वात असतो. तो फोडला की बाहेरून हवा ताबडतोब आत घुसते. रिकामं मन (किंवा मनाची निर्माण झालेली पोकळी) असंच सूड, तिरस्कार, मत्सर, राग इत्यादी गोष्टींनी ताबडतोब भरलं जातं. अशा भावनांमुळं आपलं सुख, स्वास्थ्य ताबडतोब हिरावून घेतलं जातं. जॉर्ज बर्नार्ड शॉनं म्हटलं आहे, आपलं जीवन जर दुःखी करून घ्यायचं असेल तर आपला फावला वेळ आपण सुखी आहोत का दुःखी आहोत यावरच सारखा खर्च करा !

## ते तीन तास !

मलायाच्या जंगलात घडलेली ही गोष्ट आहे. एक युरोपियन माणूस काथ्यानं विणलेल्या एका बाजेवर झोपला होता. सकाळी त्याला जेव्हा जाग आली त्यावेळी पोटावर काहीतरी जड पदार्थ असल्याची त्याला संवेदना झाली. त्यानं डोळे किलकिले करून पाहिलं. बाप रे ! एक अतिविषारी आणि महाभयंकर असा सात-आठ फूट लांबीचा साप त्याच्या पोटावर वेटोळं घालून बसलेला होता. त्या सापाची निद्रा चालू होती. त्याच्या अंगावर जे खवलं होतं त्याच्या रंगावरून, आकारावरून तो तिथला विषारी साप आहे हे त्या माणसानं लगेचच ओळखलं. जराशी हालचाल केली असती तर तो साप त्या माणसाला चावला असता आणि तीन-चार मिनिटांत त्याला मृत्यू आला असता. अशा महाभयानक अवस्थेत हळूहळू श्वासोच्छ्वास घेणं आणि पुढं काय होतं आहे हे पाहण्याशिवाय त्याला दुसरं काहीच करता येईना. त्याचं सर्व अंग घामानं डबडबून गेलं. त्याला परमेश्वराची आठवण आली. त्यानं देवाचा धावा सुरू केला. त्याला आपली (युरोपात असलेली) बायको-पोरं आठवली. त्याच्या येण्याची आतुरतेनं वाट पाहात

असलेल्या त्याच्या बायकोचा आणि मुलांचे चेहरे सारखे त्याच्या नजरेसमोर येऊ लागले. तिच्या हातून झालेल्या क्षुल्लक चुकांवर रागावून आपण तिच्यावर काढलेलं वाभाडं त्याला आठवलं, त्याच्या सहकाऱ्यांशी क्षुल्लक कारणावरून केलेली भांडणं त्याला आठवली. तो दुःखी झाला. तो परमेश्वराला म्हणाला, ' हे देवा, मला तू यातून सहीसलामत सोडव. मी सर्वांशी मिळून मिसळून वागेन.' माणूस अडचणीत सापडला की, त्याला हे सारं काही आठवतं. इतर वेळा त्याची मिजास चालते. तो कितीतरी वेळा क्षुल्लक गोष्टीवरून वाद वाढवतो, प्रतिष्ठेचा प्रश्न करतो. त्या वादातून निष्कारण काळजी उत्पन्न होते. तीन तास हा गृहस्थ असा निश्चल पडून होता. उन्हं वर आली. साप तसाच पडून होता. याच्या घशाला कोरड पडली. आजूबाजूला लोक जमले. त्यांनी त्याच्या कॉटखाली धूर केला. त्या धुरानं सापाला जाग येईल असं त्यांना वाटलं. वरून सूर्याची उष्णता, खालून धूर अशा स्थितीत तो माणूस सापडला होता. मग कुठं त्या सापाला जाग आली आणि तो तिथून हळूच निसटून गेला ! दुसऱ्या महायुद्धातल्या अनेक प्रसंगांपैकी हाही एक प्रसंग वाचा. एका इमारतीत जर्मन सैन्य घुसलं. तिथं त्यांचा तीन-चार तास मुक्काम होता. शिरल्या-शिरल्या त्यांनी तिथल्या राहाणाऱ्यांचा फडशा पाडला. पण त्यात एक गृहस्थ पोटमाळ्यावर असलेला कुणाच्याच लक्षात आला नाही. तिथंच खाली ही माणसं बसून आपलं काम करत होती. ती इमारत त्यांनी तात्पुरती विश्रांती घेण्यासाठी निवडली होती. हा माणूस भीतीनं अर्धमेला होऊन गेला होता. त्या अडचणीच्या जागेत गुपचूप पडून राहिला होता. तो तीन तासांचा काळ त्याला तीन युगांसारखा वाटला. त्यावेळी जरा मोठ्यानं खाकरल्याचा आवाज किंवा शिंकल्याचा आवाज आला असता तर बंदुकीच्या गोळीला तो बळी पडला असता. पण त्याच्या सुदैवानं असं काही झालं नाही. ते लोक तिथून गेले आणि हा सुखरूप खाली उतरला. पण त्या तीन तासांच्या काळात त्याला आपलं पूर्वायुष्य आठवलं. त्यानं केलेल्या लहान-सहान चुका नजरेसमोर आल्या. त्याची परिस्थिती जरी इतकी चांगली नव्हती तरी तो ज्या पद्धतीनं कुरकुर करत आयुष्य कंठत होता तितकी ती वाईटही नव्हती. म्हणजे आहे त्या परिस्थितीत सुखानं दिवस कसे काढावेत हे त्याला माहीतच

नव्हतं. वर उल्लेख केलेल्या दोन्हीही व्यक्तींनी नंतर सांगितलं की, त्या क्षुल्लक काळज्यांचा त्यांना पूर्वीइतका बाऊ वाटायचा की काही विचारू नका. पण त्या काळज्या अतिशय कठीण प्रसंगात सापडल्यावर त्यांना इतक्या क्षुल्लक वाटू लागल्या की त्यानंतर त्यांनी काळजी करायचं सोडून दिलं.

## क्षुल्लक गोष्टींचं भांडवल करू नका

माणूस कसा चमत्कारिकपणानं वागतो त्याचं हे उदाहरण पाहा. एका शहरात प्रचंड शक्तीच्या ऑइल इंजिनांच्या सहाय्यानं वीजनिर्मिती करून त्या शहराला पुरवली जात होती. त्या पॉवर हाऊसचा धडधडाट फार प्रचंड होता. रविवारची गोष्ट होती. त्या पॉवर हाऊसशेजारी एक बंगला होता. त्यात राहणारे एक गृहस्थ आपल्या मुलाला चोपून काढत होते. कारण काय तर यांची झोप त्याच्या बडबडीमुळं आणि किंचाळण्यामुळं मोडली होती! गंमत पाहा. त्या पॉवरहाऊसचा धडधडाट त्यांच्या एवढा अंगवळणी पडलेला होता की ते तो विसरून गेले होते. मुलगा सांगूनही आपलं ऐकत नाही आणि आवाज करतो हे त्यांना खपलं नाही. म्हणजे मोठा आवाज ते सहन करू शकत होते पण त्यांना मुलाचं दंगा करणं सहन होत नव्हतं. तीच गोष्ट दुसऱ्या एका गृहस्थांची. त्यांचं लग्न झाल्यावर त्यांच्या लक्षात आलं की आपली बायको चहा भुरकून पिते आणि जेवताना मचमच आवाज करते. त्यांचं तिचं एक दिवस खूप भांडण झालं. त्या दिवशी त्या गृहस्थांची १५० रुपयांची टेरिलिनची पँट आणि मॅनिला चोरीला गेला. त्यांनी ही गोष्ट मुकाट्यानं सहन केली. पण जेवताना बायको मचमच आवाज करते म्हणून तिला फैलावर घेतलं. आहे की नाही गंमत! घरी, दारी सर्वत्र असंच होतं. क्षुल्लक गोष्टींचे भुंगे आपल्या मनाच्या शांततेला पोखरून टाकत असतात. बाबी अगदी क्षुल्लक असतात. पण आपल्या इच्छेविरुद्ध त्या होतात म्हणून आपल्याला त्यांचा संताप येतो. वरच्या मजल्यावर राहाणारे गंगाधरराव जोरानं पाय वाजवतात व तुमच्या घरात त्याचा आवाज येतो म्हणून तुम्ही रागावता. तुमची धुणंभांडेवाली नऊच्या ऐवजी दहाला कामाला येते. तुमची गैरसोय मुद्दाम करते म्हणून तुम्ही चिडता. घंटा वाजवूनही

लाल पट्टेवाला तुमच्यापुढं फार उशिरा आला म्हणून तुम्ही भडकला. या सर्व गोष्टी तुम्ही विसरत नाही. त्याला भयंकर महत्त्व देता. मनाची शांतता घालवून देऊन उगीच काळजी करत बसता. आमच्या समोरचं मशीन दिवसभर चालू असतं, त्याचा सारखा दणदण असा आवाज कानांवर आदळत असतो. मी खवळतो आणि एक दिवस त्यांना सुनवायला म्हणून जातो. त्यांच्या शेजारी एक गृहस्थ घोरत पडलेला असतो. वास्तविक माझ्यापेक्षा त्याला याचा त्रास अधिक नाही का ? कारण हा अगदी जवळ आहे याच्या. मग याला का त्रास होत नाही ? मी कुतूहलानं त्याला विचारलं. तो म्हणाला, ' अहो, वर गच्चीवर इतका सुंदर बगीचा केलाय. मी सकाळ-पासून माती उकरत होतो. अशी मस्त फुलं आली आहेत. त्या आनंदाच्या वातावरणात हे यंत्र चालू आहे हे मला जाणवतच नाही. ' तेव्हा क्षुल्लक गोष्टींचं भांडवल करू नका आणि त्या विसरायला शिका म्हणजे जीवन अधिक सुखी होईल.

## अज्ञात भयाचा गंड

मानवी मनाची खूप वेळा गंमत वाटते. त्यात चांगल्या विचारांबरोबर वेडेवाकडे विचार नित्य येत असतात. ते विचार काळज्या उत्पन्न करतात. खोटचा काळज्या निर्माण करणारे हे विचार म्हणजे कशाची तरी भीती. ही वाईट सवय माणसाला बालवयापासून लागते. प्रत्येकजण यातून गेलेला असतो. पण आपण त्याचं विश्लेषण करत नाही. त्याप्रमाणं आपल्या मुलांना तसं शिक्षण देत नाही. लहानपणी मला माझ्या शाळेतल्या गुंड मुलांची फार भीती वाटायची. नेहमी वाटायचं की, एखादा गुंड मला चोपून काढून मारून टाकेल. शाळेमध्ये गुंडगिरी करणारी खूप मुलं असतात. काही कारण नसताना खोडी काढतात. मारतात पण ती काही कुणाचा जीव घेत नाहीत. प्रत्येक मुलाला ही भीती थोडीफार ग्रासत असते. पण अशी उदाहरणं (म्हणजे खून करण्याची) अगदी क्वचित घडतात. काही विद्यार्थ्यांना अशीच कसली तरी भीती वाटते. एकाला सारखं असं वाटायचं की, शाळेचं सीलिंग आपल्या डोक्यावर पडून आपण मरणार. आपण मोठे झालो तरी असल्या

अनेक किरकोळ गोष्टी आपल्याला भेडसावत असतात. मला तरुण वयात नेहमी वाटायचं, आपलं लग्नच व्हायचं नाही. आपल्याला कुणी मुलगीच पसंत करणार नाही. समजा, लग्न झालं तर आपल्याला मुलं होतील का नाही ? समजा झाली तर ती जगतील की नाही ? मुलगा होईल की नाही ? कालांतरानं माझ्या असं लक्षात यायला लागलं की या सर्व काळज्या अगदी खोटचा असून असं काळजीसारखं काहीही आपल्या जीवनात घडलेलं नाही. मला लहानपणी मुलं त्रास द्यायची, पण माझा कुणी खून केला नाही. शाळेचं छप्पर कधीचं पडलं नाही. अजूनही वीस वर्षांनंतर ते शाबूत आहे. विशेष म्हणजे मला कुठल्याही मुलीनं नापास केलं नाही. लग्नानंतर मुलं होणार नाहीत ही भीती खोटी ठरली. मुलं झाली. संसार व्यवस्थित चालू आहे. म्हणजे याचा अर्थ असा की काल्पनिक काळज्यांनी माझं खूपसं स्वास्थ्य कुरतडलं गेलं होतं. कित्येक माणसांना आणखी एक भीती ग्रासून टाकत असते. वर्तमानपत्रात एखादी बातमी ते वाचतात. ‘ पाच वर्षांच्या मुलाचा मोटारीखाली सापडून मृत्यू.’ ते लगेच काळजी सुरू करतात. तसाच आपला मुलगाही अपघातात मरेल का ? समजा, मुलगा ट्रिपला गेला असला तर त्यांच्या डोक्यात काळजी चालू असते की, तो पाण्यात तर बुडणार नाही ना ? तो दरीत कोसळून पडणार नाही ना ? त्याच्या अंगावरून मोटार तर जाणार नाही ना ? तो मुलगा तिकडे मजेत असतो. ट्रिपचा आनंद लुटत असतो. आणि पालकांचं स्वास्थ्य काळजी लुटत असतो. काही लोकांच्या बाबतीत ही भीती अगदी पराकोटीला गेलेली मी पाहिली आहे. आपला मुलगा घरातच असतो. कुठंतरी बाहेर रस्त्यात कर्रर्र असा मोटारच्या ब्रेकचा आवाज ऐकू येतो. मुलाचे वडील आपलाच मुलगा सापडला असेल अशा धास्तीनं बाहेर धावत जाऊन पाहतात. मुलगा कुठंतरी सुरक्षित जागेत खेळत असतो. पती घराबाहेर पडल्यावर पत्नीलाही अशीच काळजी वाटते. जरा उशीर झाला तर ते कुठं अपघातात तर सापडले नसतील ना ? असं सारखं डोक्यात चालू असतं. काही बायका अगदी पराकोटीचं वागणं ठेवतात. लगेच ठिकठिकाणी फोन करतात. माणसं पाठवतात. स्वतः जातात आणि दरम्यान पती घरी आलेले असतात. तुम्ही म्हणाल, मग बायकोनं मख्खासारखं राहायचं का ? असं नाही मला म्हणायचं. त्या गृहस्थाला जर भयंकर

उशीर झाला तर मग तुम्ही जरूर तपास करा. पण हे काय ! आपल्या लहानग्या मुलाला स्त्रिया शाळेला पोचवायला जातात. पुष्कळवेळा रस्ता मोकळा असतो. पण त्या मुलांना बोट सोडून मोकळं चालू देत नाहीत. सतत काळजी की, समोरची गाडी माझ्या लाडक्याचा जीव घेणार. तुम्हाला वाटेल हे वरचं लिहिलेलं सारं एकांगी आहे. नाही, तसं नाही. मी निष्काळजीपणानं वागा असं सूचित केलेलं नाही. काळजीनं वागा, पण काळजी करू नका असं मला म्हणायचं आहे. दर खेपेला तारतम्य वापरा. असं पाहा, नवऱ्याला कामानिमित्त उशीर झाला तर त्यात ' तो अपघातात सापडला ' असं वाटायचं काय कारण ? मोकळा रस्ता दिसला तर मुलाला जरा मोकळा सोडा की ! तो स्वतः जबाबदारी कधी शिकणार ? मुलगा ट्रिपला गेला तर त्याला नीट सूचना द्या. पण मग काळजी का करता ? त्या काळजीनं अपघात व्हायचा असेल तर तो तुम्ही थांबवणार आहात का ? नाही. मग का काळजी करता ? ठिकठिकाणी अपघात घडत असतात हे खरं आहे. पण असं पाहा, शाळेच्या सहलीला अपघात झाल्याची बातमी मोठ्या भडक स्वरूपात आपण वाचतो. पण अशा शेकडो सहली निर्विघ्न-पणानं पार पडलेल्या असतात त्याचा आपण विचारसुद्धा करत नाही.

## भ्रामक चिंता

' सरासरीचा नियम ' असा एक नियम आहे. गावात देवीची साथ आली की घबराट उडते. दहा लाखांच्या शहरात दहा लोकांची लागण झालेली असते. गावात प्लेग किंवा कॉलऱ्याच्या ३०-४० केसेस झालेल्या असतात. सर्वत्र जनता घाबरून जाते. जरा कुणाला जुलाब झाले की झालाच आपल्याला कॉलरा असं त्याला वाटतं. भीतीनंच तो निम्मा होऊन जातो. प्रत्येकाला कॉलरा होणार आहे का ? काळजी नाही घेतली तर होईलहि. पण आता काय १८९६ च्या पुण्यातल्या प्लेगसारखी परिस्थिती आहे का ? सरळ उठा. लस टोचून घ्या. ते मात्र जरूर करा. पण घबराट आणि काळजी कशासाठी ? अशा कित्येक साथी येऊन जातात. नंतर आपल्या लक्षात येतं. अरेच्या ! कुठल्याही साथीत आपण मेलेलो नाही. मग काल्पनिक काळजी

का करता ? हरघडी अशा काळज्या माणूस करत असतो. अर्थात मीसुद्धा याला अपवाद नाही. मला आकाशवाणीचे संगीताचे, बासरीवादनाचे कार्यक्रम जेव्हा मिळू लागले तेव्हा मला सारखी भीती वाटायची की मी तिथं वेळेवर पोहोचेन ना ? मला सारखी स्वप्नं पडायची. मी तिथं वेळेवर गेलेलो नाही आणि आकाशवाणीवर जाहीर झालंय 'छापलेल्या कार्यक्रमाऐवजी आता ऐका अमुकतमुक यांचं सतारवादन.' मी ताडकन अंथरुणांतून उठायचो आणि माझ्या असं लक्षात यायचं की, कार्यक्रम आज नाही. असे चांगले १५ कार्यक्रम झाले. मी एकदासुद्धा ऐकलं नाही. 'छापलेल्या कार्यक्रमाऐवजी...' तिथं अगदी वेळेवर गेलो. पत्नीलाही पटलं की आपला नवरा काही इतका झोपाळू नाही ! तेव्हा अशा काल्पनिक काळज्या करण्याचं सोडून द्या. सरासरीच्या नियमाप्रमाणं ठळक वाटणाऱ्या घटनांचं प्रमाण लाखात एक, दहा लाखात एक असं असतं. त्यांत तुमचाच नंबर लागेल असं का वाटून घेता ? तसं असतं तर तुमच्या गल्लीतली कमीतकमी ५-१० पोरं एव्हाना मरायला हवीत. कमीत कमी ४-५ स्त्रियांचे नवरे एव्हाना मरायला हवेत. तेव्हा असं काही होत नाही. अगदीच तुमचं दुर्दैव असेल तर येईल वाट्या ते दुःख. तिथं मग ते प्रसिद्ध काव्य– 'होणारे न चुके येई ब्रह्मा तया आडवा' लक्षात घ्या. आलंच ते दुर्भाग्य तुमच्या वाट्याला तर कणखर मनानं सहन करा. मालाची ने-आण करणाऱ्या एका ट्रकवाल्याला असाच काळजीचा रोग होता. त्याच्या दहा ट्रक होत्या. त्याची माणसं विश्वासू होती. त्याला सारखं वाटायचं, आपल्या ट्रक घाटात कोसळणार. तो सदैव काळजीत असायचा. नंतर त्यानं मध्यममान (सरासरी) काढलं. त्यानं विचार केला, गेल्या दहा वर्षांच्या आपल्या धंद्यात किती वेळा आपले ट्रक कोसळले ? त्यानं पाहिलं, वर्षात दोनदा, ३६५ दिवसांत दोनदा ? मग ३६५ दिवस काळजी करायचं काय कारण ? रोज थोडेच ट्रक कोसळणार आहेत ? तेव्हा लक्षात ठेवा. पुष्कळशा काळज्या भ्रामक असतात. त्यांना आपलं जीवन कुरतडू देऊ नका.

## होणारे न चुके

आमच्या घरात कुणालाच चष्मा नव्हता. माझा मुलगा अतिशय स्मार्ट,

उंचापुरा आहे. माझ्या मनात त्यानं पायलट व्हावं असं फार होतं. त्या दृष्टीनं मी त्याला स्पर्धेच्या परीक्षेसाठी तयार करत होतो. लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, जनरल नॉलेज वगैरे सर्व बाजूंनी त्याची तयारीही अगदी भक्कम झालेली होती. आणि एक दिवस तो तक्रार करू लागला की डोळे दुखताहेत. मी एकदम हबकलो. डॉक्टरांकडे त्याला घेऊन गेलो. त्याला चांगला दीड नंबरचा चष्मा लागला. माझं स्वप्न भंग पावलं. मी खूप आदळआपट केली. त्याला डोळ्यांचे व्यायाम करायला लावले. शीर्षासन करायला लावलं. नंबर काही कमी झाला नाही. शेवटी मी हात टेकले. डॉक्टर मला म्हणाले, 'मुलाची सर्व बाजूंनी वाढ होत आहे. डोळ्यांचा नंबर कदाचित वाढेलही. कुणाचा कमी झालेला मी तरी फारसा पाहिलेला नाही.' माझी धडपड थंडावली. मी शेवटी नशिबाला आलं ते मान्य केलं. म्हणजे मला ते मान्य करण्याशिवाय दुसरं गत्यंतरच नव्हतं. मुलाला एकदा सहज विचारलं की, 'तुला चष्मा लागला याचं काही वाईट नाही वाटलं ? तो उत्तरला, 'वाटलं थोडसं पण चष्मा लावल्यावर मी अधिकच स्मार्ट दिसू लागलो.' त्यात मी समाधान मानलं. वास्तविक मला आधीच समजायला हवं होतं की जे बदलता येणं शक्य नाही ते कुरकुर न करता स्वीकारावं. पण फार किंमत देऊन शेवटी मी ते स्वीकारलं होतं. त्यानंतर एकदा माझे मित्र मला भेटले. त्यांच्या दोन वर्षांच्या गोंडस छोकऱ्याच्या बुबुळाला पतंगाचा मांजा घासून त्याचा एक डोळा बहुधा कायमचा निकामी झालेला होता. मला जेव्हा ही बातमी समजली तेव्हा मी फार हळहळलो. जणू माझ्याच मुलाचा डोळा अधू झालेला होता. मला जेव्हा ते भेटले, तेव्हा मी झाल्या गोष्टीबद्दल मला वाटणारं दुःख त्यांच्याजवळ व्यक्त केलं. त्यांनी तो दुःखाचा घाव अगदी कुरकुर न करता झेललेला होता. त्यांना काय कमी दुःख झालं असेल ? पण ते म्हणाले, 'पाहू या, पुढं ऑपरेशन करून बघू. नाहीतर प्राप्त परिस्थिती मान्य केलीच पाहिजे.' नशीब ; त्याचा हात, पाय वगैरे शाबूत आहे. डोळा गेला एक पण दुसरा आहे शाबूत.' मला माझ्या मुलाला चष्मा लागला म्हणून मी जे दुःख केलं त्याची आठवण झाली. खरचं मी अगदी खुळचट होतो. आपल्या मनात असेल तर एकादी न आवडणारी गोष्ट आपण अगदी त्वरेनं मान्य करतो आणि त्याचं दुःख

लगेच विसरून जातो. एखादी गोष्ट आपण काही हेतूनं करतो. होतं मात्र भलतंच. आपण सारखं दुःख करत बसतो. वास्तविक तिथं असं लक्षात यायला हवं की, 'आहे हे असं आहे. याशिवाय दुसरं काही होऊच शकलं नसतं. आपल्याला हे जीवन सुखमय करायचंय ना? मग त्यात येणाऱ्या दुर्घटना, आपत्ती आपण होता होईल तो टाळाव्यात. टाळता आल्या नाहीत तर मनं घट्ट करून त्यांना सामारं जावं. मी तर असं म्हणतो, आपत्तीत माणूस सापडला की त्याच्या सुप्त शक्तींचे साठे खुले होऊन तो मनात आणलं तर नेत्रदीपक असं काहीतरी करून दाखवू शकतो. दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत जर्मनी आणि जपान बेचिराख झाली. आज त्यांच्या जागी व्यापारात जगात पुढं गेलेली जर्मनी आणि जपान तुम्हाला दिसतील. आपत्तीत माणूस सापडला त्याच्या अस्तित्वाचाच प्रश्न आला तर जोमानं पुढं येऊ शकतो. मी तर म्हणतो ' संकटांनो, या असे हसतमुखानं मला सामोरे या. आपत्त्यांनो या. अशी चांगली वस्त्र परिधान करून माझ्यासमोर या. तुम्हाला हसतमुखानं तोंड द्यायला मी सिद्ध आहे. दुर्दैवी परिस्थितीवर एक तर तुम्ही मात करू शकाल, नाहीतर खंत करत, दुःख करत आणि काळजी करत स्वतःचा सर्वनाश ओढवून घेऊ शकाल? मग तुम्ही कशाची निवड करता? आपण घरातल्या नित्याच्या गोष्टीतसुद्धा पोराबाळांना कसं छळतो पहा. दुधानं भरलेलं पातेलं मुलाच्या किंवा पत्नीच्या हातून चुकून लवंडलं जातं आणि सगळं दूध सांडून जातं. आपली आदळआपट सुरू होते. वेळ पडल्यास आपण मुलाला एखादा तडाखा ठेवून देतो, शिव्या देतो. ते दूध या शिव्या देऊन परत जादूनं पातेल्यात येणार आहे का? किंवा यापुढं या बोलण्याचा परिणाम म्हणून पुन्हा केव्हाच दूध सांडणार नाही का?

## संकटामुळे प्रसिद्धी!

पंचम जॉर्जनं आपल्या राजवाड्यावर उगीच नाही लिहून ठेवलंय की, मला आकाशातल्या चंद्राची अभिलाषा न धरायचं आणि सांडलेल्या दुधाबद्दल दुःख न करायचं शिक्षण द्या. अगदी जवळचा एखादा नातलग वारला म्हणजे जे दुःख होतं ते विसरण्यावर काळ हा एकच उपाय असतो. परंतु

त्यातसुद्धा काही माणसं कशी विचारानं वागतात पहा. पोटचा एकुलता एक मुलगा अपघातात वारल्यानंतर एक गृहस्थ खंत करत, दुःख करत बसले नाही. त्यांनी एक कुटुंब असं गाठलं की त्यात नवरा-बायको दोघंही नोकरी करणारे होते आणि त्यांच्या हुषार मुलांची अतिशय आबाळ होत होती. या गृहस्थानं त्या मुलांचा उत्कृष्ट सांभाळ केला. त्यांना आपलं मानलं. त्यात त्याचं दुःख विसरून गेलं. छाती पिटून आणि ऊर बडवून कुठं गेलेलं माणूस परत येतं काय ? तुम्ही म्हणाल, हे सांगणं सोपं आहे ! प्रत्यक्ष प्रसंगाला तोंड देणं कठीण असतं. खरं आहे. पण तसा तुमचा प्रयत्न असू द्यात. या जगाचे व्यापार आपल्या नियंत्रणाखाली नसतात. निरनिराळ्या शक्ती त्यात भाग घेत असतात. आपल्या मनाप्रमाणं प्रत्येक गोष्ट होईल. फार काय आपल्या मनाप्रमाणे एखादी क्षुल्लक गोष्ट होईलच असं कधीच निश्चित नसतं. तेव्हा येणाऱ्या गोष्टीशी असहकार करू नका. ती गोष्ट मान्य करण्यातच पुढची लाख संकट टाळली जातात. आमचे एक स्नेही आहेत. त्यांना हार्ट अटॅकची भयंकर भीती वाटायची. ते म्हणायचे, काहीहि सहन करेन मी; पण कॅन्सर आणि हार्ट अटॅक नकोरे देवा ! त्यापेक्षा अपघाती मरण बरं ! पुढं त्यांची भीती खरी ठरली. त्यांना हार्ट अटॅक आला. त्यातून ते सावरले. त्यांनी ठरवलं, बस झालं हे. आता कशाची काळजी करायची नाही. त्यानी आपल्या घराजवळच्या रिकाम्या जागेत गुलाबांची बाग फुलवली. वयाच्या पन्नासाव्या वर्षी. रोझ सोसायटीनं त्यांचा फार मोठा बहुमान केला. म्हणजे हार्ट अॅटॅक येण्यापूर्वी हा गृहस्थ अगदी अप्रसिद्ध होता. अटॅकनंतर हा मेला तर नाहीच, पण शरीर धड असताना तो जो अप्रसिद्ध होता, तो अधू शरीर असूनही प्रसिद्धीस पोचला.

## मनाचा गाभारा

आजूबाजूच्या परिस्थितीशी कसं जुळवून घेता यावर ते अवलंबून आहे म्हणजे सुख हा तुमच्या मनातला एक ठेवा आहे. हवं तर तिथं तुम्ही नरकाची स्थापना करू शकाल. अतिशय सुखात लोळणारे लोक मनाची

शांतता नसते म्हणून झोपेच्या गोळ्या घेतात. आणि रोज उठून पैशाची विवंचना असणारे गरीब सुखानं झोपतात ! तेव्हा सुख हे मानण्यावर आहे आपली सगळी गात्रं जरी बधीर झाली तरी आपण आपल्या मनाच्या गाभाऱ्यात अगदी सुखानं राहू शकतो. कारण तुम्हाला पटो अथवा न पटो, आपण आपल्या मनाच्या गाभाऱ्यातच राहत असतो. माझ्या आयुष्यात कधी नव्हतं अशी एक दुर्मिळ संधी आली होती. ती मत्सरी लोकांनी घालवली. मी मुकाट्यानं ते सारं सहन केलं. कुठं कुरकुर केली नाही. माझ्यातले दडून बसलेले छंद मी बाहेर काढले आणि त्यात नात मिळवलं. घरात एखादी मौल्यवान काचेची वस्तू असते. ती आता पुन्हा कधी मिळणार नसते. आपल्या मुलाच्या हातानं ती चुकून फुटून जाते. त्या वस्तूपायी आपण त्याला मारायलाही कमी करत नाही. पण एका मानसशास्त्राच्या प्रोफेसरानं अशा एका प्रसंगात आपल्या खजील झालेल्या मुलाला सांगितलं की, ' आता आपल्याला कशाची जरुरी आहे तर हे सर्व तुकडे भरून टाकायला एका झाडूची !' संकटं ही पुरासारखी असतात. आपण ' महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती 'सारखं वागायला शिकलं पाहिजे. झाडं कठीण प्रसंगाला वाकू शकत नाहीत. मग मोडून नष्ट होतात. लव्हाळी मात्र वाकतात.

## खरा शहाणपणा

जीवनातल्या खडतर प्रसंगाला प्राणी कसे तोंड देतात पाहा. आपण त्यांच्याकडून थोडा तरी बोध घ्यायला हवा. त्यांना मन नसतं म्हणून ते असं वागतात. आपण कधी कधी समजावं आपल्याला मनच नाही. आणि ठामपणानं अटळ प्रसंगाला तोंड द्यावं. जगातल्या प्रत्येक समस्येवर इलाज किंवा उपाय एकतर असतो तरी किंवा नसतो तरी. असला तर अमलात आणा. नसला तर फिकीर करू नका. मोटारीचे टायर जर कठीण रबराचे केले तर त्यांच्या क्षणार्धात चिंध्या होतील म्हणून ते लवचिक रबराचे केलेले असतात. ते धक्के पचवतात. त्यांना विरोध करीत नाहीत. धक्के पचवणंही महत्त्वाचं आहे आयुष्यात. शेवटी एक गोष्ट शिका ! जी गोष्ट बदलता येत असेल ती अवश्य बदला. नसेल तर तिच्याशी सहकार करा आणि या दोन

गोष्टी समजून घेण्याचा शहाणपणा शिका.

## अति ताणलं की तुटतं

माझा मित्र मला एकदा म्हणाला, 'माझी बहीण स्वभावानं अतिशय दिलदार होती. तिनं आयुष्यात तिच्या स्वतःच्या प्राध्यापकी व्यवसायात खूप पैसा मिळविला. खूप पुस्तकं लिहिली. लग्न मात्र केलं नाही. तिनं मला दहा हजार रुपये तिच्या नावे गुंतविण्यासाठी दिले. वास्तविक ते पैसे मी बँकेच्या किंवा एखाद्या कंपनीच्या फिक्स्ड डिपॉझिटमध्ये गुंतवायला हवे होते. पण जास्त पैसे तिला मिळवून द्यावे म्हणून मी एक धाडस करायचं ठरवलं. ते पैसे शेअर्समध्ये गुंतवायचं मी ठरवलं. चांगल्या कंपनीचे शेअर्स घ्यायचे आणि भाव वाढले की विकून टाकायचे, फायदाच फायदा! शेअर बाजाराची मला चांगली माहिती होती. पण काही अनपेक्षित घटना घडल्या. भाव वाढायच्या ऐवजी कोसळू लागले. मला वाटलं ते परत वाढू लागतील. पण दुर्दैवानं तसं घडलं नाही. तोटा होणार हे निश्चित होतं. कमीत कमी तोटा सहन करण्याच्या दृष्टीनं ताबडतोब ते विकणं इष्ट होतं. पण मी चिकटपणानं थांबलेलो होतो, भाव फार कोसळले आणि फारच पडलेल्या भावाला ते शेअर्स विकावे लागले. ती कंपनी कधीच वर आली नाही. दहा हजारांपैकी हजार रुपये परत आले, मला अत्यंत दुःख झालं. अनुभवानं मी शिकलो ते हे की, कुठलीही गोष्ट मर्यादेपलीकडे ताणायची नाही. जीवनात हरघडी असे प्रसंग येतात की कित्येकवेळा गोष्टी मनासारख्या होत नाहीत. आपण प्रयत्न करतो आणि आपल्या मनाविरुद्ध झालं की वर्षानुवर्षे कुरकुर करत असतो.' माझ्या लहानपणीची गोष्ट मला आठवते. माझ्या वडिलांच्या एका मित्राच्या मुलीनं इतर जातीच्या माणसाशी लग्न करायचं ठरवलं. त्याच्या घरात पंधरा दिवस भांडणाचा जोर होता. मुलीनं ऐकलं नाही. घरातून पळून जाऊन त्या माणसाशी लग्न केलं. त्या गृहस्थाचा राग अनावर झाला. त्यानं डोकं बडवून घेतलं. त्या वरच्या शेअरच्या गोष्टी-सारखं त्यानं मनाशी ठरवायला हवं होतं की, झालं ते झालं, आता त्यावर उपाय काही नाही. आहे ते मान्य करावं म्हणजे स्वतःच्या जीविताची

फारशी हानी होणार नाही. पण त्यानं फार मनाला लावून घेतलं. दुसऱ्या दिवशी अब्रू घालवली मुलीनं, म्हणून सरळ गळफास लावून घेतला! आईनं तरी अक्कल शिकायला नको होती का? पण छे! पुढं जेव्हा जेव्हा मुलगी भेटायची तेव्हा तेव्हा ती पूर्वीचं सगळं उकरून काढायची. मुलीला ही कटकट सहन झाली नाही. तिनं सरळ आईला घरातून हाकलून दिलं. त्यानंतर पंधरा वर्षे आई ही हकीगत सर्वांना सांगून बेजार करून टाकत होती. अति मनाला लावून घेऊन ती ब्लडप्रेशरच्या विकारानं शेवटी मरण पावली. अति ताणलं तिनं.

## महत्त्व कशाला द्यायचं?

मला लहानपणी वाटायचं आपण प्रसिद्ध वक्ता व्हावं. मी खूप तयारी करत असे. पण प्रत्येक सभेत माझा बोजवारा वाजायचा. मी लोकांच्या आरडाओरडाचं इतकं मनाला लावून घेतलं की एका सभेनंतर मी पार आजारी पडलो. माझ्या स्वप्नाचा चक्काचूर झाला. मग मी मनाला आवर घातला. ठरवलं, अशीच काळजी करत बसलो तर मरून जाईन. मग मी गायनाच्या क्षेत्राकडे वळलो. बासरीवादक म्हणून प्रसिद्धी मिळवली. मी जर वक्ता होण्याच्या माझ्या अपयशामुळं खचून गेलो असतो आणि काहीच केलं नसतं तर कुणीतरी सामान्य कारकून झालो असतो. मी निष्ठापूर्वक प्रयत्न करूनही वक्ता होणं ज्या अर्थी मला जमत नव्हतं त्या अर्थी मी तो नाद सोडणचं इष्ट नव्हतं काय? हरघडीच्या व्यवहारात काही गोष्टी म्हटलं तर अशाच तापदायक होतात. माझे एक नातलग आहेत. ते जेवायला बोलावलं तर चुकून वेळेवर येत नाहीत. आम्ही तयारी करून ठेवतो. बाराला जेवायला या म्हटलं तर यांचा दीड वाजेपर्यंत पत्ता नसतो. मग मी त्या शेअरच्या उदाहरणासारखं वागायचं ठरवलं. पन्नास रुपयांच्या शेअरचा भाव ४५ रुपयांवर आला की ते विकून टाकायचे. तसं, त्याची साडेबारापर्यंत वाट बघायची. नंतर सरळ जेवून घ्यायचं. मग ते केव्हा का येईनात! असं करायला सुरुवात केल्यामुळं डोक्याला कटकट व्हायचं थांबलं. तेव्हा कुठल्या गोष्टीला किती महत्त्व द्यायचं हे प्रत्येकानं ठरवून

टाकावं. वाजवीपेक्षा जास्त महत्त्व दिलं की उगीच मनःस्ताप होतो आणि सगळं बिघडून जातं. आता हेच पाहा ना, परवा एका चांभाराकडे मी तुटलेली वहाण शिवायला गेलो. त्याला वहाण दाखविली. विचारलं, किती पैसे द्यायचे ? तर तो म्हणाला, 'द्या इच्छेला येतील ते.' अर्थात इच्छेला म्हणजे त्याच्या हे माझ्या नंतर लक्षात आलं ! त्याला मी पंचवीस पैसे द्यायला लागलो.

'ठेवा हे तुमच्यापाशीच !'

'म्हणजे ?'

'पंचाहत्तर पैसे द्या.'

'अरे वा रे वा ! दोन ठिकाणी टाके मारलेस आणि पंचाहत्तर पैसे मागतोस ?'

'द्या पैसे लवकर. मला टाइम नाही.'

मी विचार केला, त्याच्याशी हुडसून खडसून मी ठरवलं नाही. ही चूक माझीच ना ? बरं, बाब केवढ्याची आहे ? बारा आण्याची. त्या क्षुल्लक गोष्टीत प्रतिष्ठा आणण्यापेक्षा सरळ त्याच्या तोंडावर बारा आणे फेकावेत. किरकोळ गोष्टीतून किती भांडण पेटू शकतं त्याचं हे उदाहरण पाहा. आमच्या समोरच्या घरापाशी एक रिक्षा उभी राहिली. रिक्शावाल्यानं तीन रुपये पंधरा पैसे मागितले. प्रवासी भांडू लागला. 'मी तुम्हाला म्हणालो होतो तिथं तुम्ही का थांबला नाहीत ? मुद्दाम पुढं येऊन थांबलात. त्यामुळं लगेच मीटरचा पुढचा दहा पैशाचा आकडा आला. नव्या नियमाप्रमाणं फक्त तीन रुपये झाले असते- आता पंधरा पैसे जास्त भुर्दंड मला काय म्हणून ?'

'ते मला माहीत नाही. तुम्ही म्हणाल त्या जागी काय गाडी खटकन उभी करता येते काय ? पैसे द्या मुकाट्यानं.'

'देत नाही ! हवे असतील तर हे तीन रुपये घ्या.'

ते भांडण खूप पेटलं. आईमाईचा उद्धार झाला. तत्त्वाचा प्रश्न म्हणून त्या प्रवाशानं भांडण चालूच ठेवलं. मला ही कटकट सहन होईना. मी तिथं गेलो, त्या रिक्शावाल्याला पंधरा पैसे दिले. पण ते दोघेही खवळले !

'तुम्ही का तोंड घालता आमच्यामध्ये ?' ते दोघेही गरजले, आमच्या

हा तत्त्वाचा प्रश्न आहे!'

'मग कृपा करून इथून पुढं जाऊन कुणाला त्रास होणार नाही अशा ठिकाणी जाऊन भांडा.'

पण ते विचार करण्याच्या मनःस्थितीत नव्हते. तो तत्त्वाचा प्रश्न केव्हा सुटला कुणास ठाऊक? माणसं उगीच काही क्षुल्लक गोष्टी ताणतात. दुसऱ्याला समजूतदारपणा नसला तर आपण पड खाऊन वाद मिटवावा हे त्यांच्या लक्षात येत नाही. यावर कुणी म्हणले, माजतात अशानं लोक. या विषयी आपण गोष्टी जरा तारतम्यानं ठरवाव्यात. प्रत्येक बाबतीत नेहमी विचार असा करावा की ह्या गोष्टीचं महत्त्व काय? आपण यात आपली प्रतिष्ठा कितपत आणतो? या प्रश्नावर घसाफोड करून आपण फार मोठं यश संपादन करणार आहोत का? एवढाच वेळ आपण दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टीवर खर्च केला तर मानसिक समाधान नाही का लाभणार?

मी अहमदाबादला महिनाभर माझ्या तीन सहकाऱ्यांबरोबर राहिलो होतो. आमच्यातला एकजण भलता कंजूष होता. मी जाण्या-येण्याच्या बसचे पैसे खर्च करायचो. वाटेत कुठं खायचं झालं तर एकजण खर्च करायचा. असं एक माणूस सोडून प्रत्येकजण समजून खर्च करायचा. आठवडा गेला. हा चिक्कू माणूस पाण्याचे दहा पैशाला एक ग्लास याप्रमाणं रस्त्यावर पाणी प्यायलो की पैसे द्यायचा. म्हणजे चाळीस पैसे खर्च करायचा. माझा दुसरा मित्र म्हणाला, 'आपण तिघे प्रत्येकी तीनएक रुपये खर्च करतो. हा चिक्कू माणूस मात्र चाळीस पैसे खर्च करतो.' मी त्यावर म्हणालो, 'असं पहा, हा पैसे खर्च करत नाही हे माझ्या पहिल्याच दिवशी लक्षात आलं आहे. पण ही गोष्ट मनाला लावून घेऊन मनःस्ताप करून आपलं रक्त कशाला जाळायचं? तू त्याला स्पष्ट सांगणार आहेस का?'

'छे, ते बरं दिसणार नाही.'

'म्हणूनच तो सोकावलाय. हे पहा, एक तर मुकाट्यानं खर्च करा. डोक्याला त्रास करून घेऊ नका किंवा त्याला हुशारीनं टाळायला शिका.'

मग दुसऱ्या दिवसापासून आम्ही त्याला अगदी टाळायला सुरुवात केली. मग माझा मित्र म्हणाला,

'बरं झालं. मनस्ताप कमी झाला.'

'अरे, एवढ्याशा क्षुल्लक गोष्टीला आपण आपल्या स्वास्थ्याचं केवढं मोठं मोल देतो ! एका ठराविक मर्यादेपेक्षा मी नाही असल्या गोष्टीला महत्त्व देत.'

'तू आहेस साधू ! तुला जमेल हे.'

'अरे, तसं नव्हे. तू प्रयत्न कर.'

## भावनाविवश होऊ नका

माझ्या एका मित्रानं त्याची हकीकत एकदा मला सांगितली, 'एका मुलीवर मी मनापासून प्रेम केलं. तिच माझ्याशी लग्न होऊ शकलं नाही पण मी त्या दुःखातून सावरलो. कारण दोष तिचा नव्हता. तिला जबरदस्तीनं दुसऱ्या कुणाशीतरी लग्न करावं लागलं होतं. मी तिला म्हणालो, 'आजवर आपले संबंध शुद्ध होते. तू माझी होऊ शकलेली नाहीस. निदान आता तरी एक कर, तुझा एक हितचिंतक मित्र म्हणून तरी माझ्याशी मित्रत्वाचे संबंध ठेव.' त्याला ती तयार झाली. त्या दोघांच्या संसाराला मी हरघडीची मदत नंतर केली. कुठलाही घाणेरडा हेतू मनात न बाळगता. पुढं तिच्या नवऱ्याला उगीच काहीतरी वाटेल ही भीती त्या नवऱ्यापेक्षा हिलाच जास्त वाटू लागली. ती मला टाळू लागली. मी अतिशय कष्टी होऊ लागलो. मला तिला पाहिल्याशिवाय करमायचं नाही. पुढं पुढं तिनं अशा सूचक हालचाली केल्या की त्यावरून माझ्या लक्षात आलं की हिला खरंच मी नकोय. तिच्या जीवनातला मी एक अडसर झालो होतो.

'मग मी तिला भेटणं बंद केलं. ती अत्यंत कृतघ्नपणानं माझ्याशी वागली होती आणि माझा कसलाही अपराध नसताना तिनं मला दूर केलं होतं. माझं स्वास्थ्य पार हरवून गेलं होतं. मग मी सावरलो. म्हणालो, 'ठीक आहे. नाही ना तिला मजविषयी फारसं काही वाटत ? तर मग द्या तिचा विषय दूर करून. हवी कशाला डोक्याला कटकट ?'

'हळूहळू मी सावरलो. तिच्यात कसलाही बदल झाला नाही. मलाही पुढं त्याचं काही वाटलं नाही. मला 'मी असाच विचारानं त्रासून गेलो असतो आणि सदैव तिला जाऊन पटवू लागलो असतो की मी कसा बरोबर

हा तत्त्वाचा प्रश्न आहे !'

'मग कृपा करून इथून पुढं जाऊन कुणाला त्रास होणार नाही अशा ठिकाणी जाऊन भांडा.'

पण ते विचार करण्याच्या मन:स्थितीत नव्हते. तो तत्त्वाचा प्रश्न केव्हा सुटला कुणास ठाऊक ? माणसं उगीच काही क्षुल्लक गोष्टी ताणतात. दुसऱ्याला समजूतदारपणा नसला तर आपण पड खाऊन वाद मिटवावा हे त्यांच्या लक्षात येत नाही. यावर कुणी म्हणले, माजतात अशानं लोक. या विषयी आपण गोष्टी जरा तारतम्यानं ठरवाव्यात. प्रत्येक बाबतीत नेहमी विचार असा करावा की ह्या गोष्टीचं महत्त्व काय ? आपण यात आपली प्रतिष्ठा कितपत आणतो ? या प्रश्नावर घसाफोड करून आपण फार मोठं यश संपादन करणार आहोत का ? एवढाच वेळ आपण दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टीवर खर्च केला तर मानसिक समाधान नाही का लाभणार ?

मी अहमदाबादला महिनाभर माझ्या तीन सहकाऱ्यांबरोबर राहिलो होतो. आमच्यातला एकजण भलता कंजूष होता. मी जाण्या-येण्याच्या बसचे पैसे खर्च करायचो. वाटेत कुठं खायचं झालं तर एकजण खर्च करायचा. असं एक माणूस सोडून प्रत्येकजण समजून खर्च करायचा. आठवडा गेला. हा चिक्कू माणूस पाण्याचे दहा पैशाला एक ग्लास याप्रमाणं रस्त्यावर पाणी प्यायलो की पैसे द्यायचा. म्हणजे चाळीस पैसे खर्च करायचा. माझा दुसरा मित्र म्हणाला, 'आपण तिघे प्रत्येकी तीनएक रुपये खर्च करतो. हा चिक्कू माणूस मात्र चाळीस पैसे खर्च करतो.' मी त्यावर म्हणालो, 'असं पहा, हा पैसे खर्च करत नाही हे माझ्या पहिल्याच दिवशी लक्षात आलं आहे. पण ही गोष्ट मनाला लावून घेऊन मन:स्ताप करून आपलं रक्त कशाला जाळायचं ? तू त्याला स्पष्ट सांगणार आहेस का ?'

'छे, ते बरं दिसणार नाही.'

'म्हणूनच तो सोकावलाय. हे पहा, एक तर मुकाट्यानं खर्च करा. डोक्याला त्रास करून घेऊ नका किंवा त्याला हुशारीनं टाळायला शिका.'

मग दुसऱ्या दिवसापासून आम्ही त्याला अगदी टाळायला सुरुवात केली. मग माझा मित्र म्हणाला,

'बरं झालं. मनस्ताप कमी झाला.'

'अरे, एवढ्याशा क्षुल्लक गोष्टीला आपण आपल्या स्वास्थ्याचं केवढं मोठं मोल देतो ! एका ठराविक मर्यादेपेक्षा मी नाही असल्या गोष्टीला महत्त्व देत.'

'तू आहेस साधू ! तुला जमेल हे.'

'अरे, तसं नव्हे. तू प्रयत्न कर.'

## भावनाविवश होऊ नका

माझ्या एका मित्रानं त्याची हकीकत एकदा मला सांगितली, 'एका मुलीवर मी मनापासून प्रेम केलं. तिच माझ्याशी लग्न होऊ शकलं नाही पण मी त्या दुःखातून सावरलो. कारण दोष तिचा नव्हता. तिला जबरदस्तीनं दुसऱ्या कुणाशीतरी लग्न करावं लागलं होतं. मी तिला म्हणालो, 'आजवर आपले संबंध शुद्ध होते. तू माझी होऊ शकलेली नाहीस. निदान आता तरी एक कर, तुझा एक हितचिंतक मित्र म्हणून तरी माझ्याशी मित्रत्वाचे संबंध ठेव.' त्याला ती तयार झाली. त्या दोघांच्या संसाराला मी हरघडीची मदत नंतर केली. कुठलाही घाणेरडा हेतू मनात न बाळगता. पुढं तिच्या नवऱ्याला उगीच काहीतरी वाटेल ही भीती त्या नवऱ्यापेक्षा हिलाच जास्त वाटू लागली. ती मला टाळू लागली. मी अतिशय कष्टी होऊ लागलो. मला तिला पाहिल्याशिवाय करमायचं नाही. पुढं पुढं तिनं अशा सूचक हालचाली केल्या की त्यावरून माझ्या लक्षात आलं की हिला खरंच मी नकोय. तिच्या जीवनातला मी एक अडसर झालो होतो.

'मग मी तिला भेटणं बंद केलं. ती अत्यंत कृतघ्नपणानं माझ्याशी वागली होती आणि माझा कसलाही अपराध नसताना तिनं मला दूर केलं होतं. माझं स्वास्थ्य पार हरवून गेलं होतं. मग मी सावरलो. म्हणालो, 'ठीक आहे. नाही ना तिला मजविषयी फारसं काही वाटत ? तर मग द्या तिचा विषय दूर करून. हवी कशाला डोक्याला कटकट ?'

'हळूहळू मी सावरलो. तिच्यात कसलाही बदल झाला नाही. मलाही पुढं त्याचं काही वाटलं नाही. मला 'मी असाच विचारानं त्रासून गेलो असतो आणि सदैव तिला जाऊन पटवू लागलो असतो की मी कसा बरोबर

आणि ती कशी चूक, तर ते तिला पटणार होतं का ? बिलकुल नाही. कारण तसा मी दोनदा प्रयत्न केलेला होता. मग हा नाद सोडणंच इष्ट होतं.' तेव्हा कुठल्या गोष्टीला किती महत्व द्यायचं हे प्रत्येकानं ठरवलं पाहिजे. जीवनात भावनेला स्थान असतं याबद्दल वाद नाही. पण भावना-विवश होण्यात काय अर्थ आहे ? तेव्हा प्रत्येक गोष्टीच्या वेळी, तारतम्य वापरून, प्रतिष्ठेचा त्यात दरवेळेला संबंध न आणता, भावना दूर ठेवून विचार करावा आणि त्याप्रमाणं आचरण करावं हेच फायदेशीर नाही का ?

## नसावी खंत, नसावा खेद !

मागं केलेल्या चुकांवर उगीचच खंत करत बसण्याची खोड प्रत्येक माणसाला असते. आपल्याला आपणच दोनतीन गोष्टी विचारा. दुसरं महायुद्ध होऊन गेलं; त्याचे परिणाम जगानं भोगले आहेत. आज तुम्ही ते बदलू शकाल का ? १८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम झाला. त्यात यश आलं नाही. त्यात झालेल्या चुका तुम्ही आज दुरुस्त करू शकणार आहात का ? तुम्ही विचाराल हे असले खुळचट प्रश्न का विचारताय, तसंच आहे. गत गोष्टी तुम्ही जर बदलू शकत नाही तर त्या वेळी घडलेल्या चुका मनाला का लावून घेता ? आता हेच पहा ना, आपण विसरायला कसे तयार नसतो पहा. माझी चूक नसताना एका मोठ्या माणसानं माझा चारचौघात उगीचच अपमान केला. मला त्यानं बोलूच दिलं नाही. मी मुकाट्यानं तिथून उठून गेलो. माझं मन तो अपमान विसरायला तयार नव्हतं. मी रात्रंदिवस त्या गोष्टीवर विचार करायला लागलो. काळजी आणि खंत करून मी माझं डोकं शिणवून घेतलं. खरी गोष्ट काय आहे ते त्या इतर लोकांना समजावून द्यायला मी गेलो. त्या कुणाच्या ती गोष्ट फारशी लक्षातहि नव्हती. पण मी प्रत्येकाकडे जाऊन जेव्हा खरी गोष्ट सांगू लागलो, तेव्हा त्या प्रत्येकानं मोठ्या रुबाबात, पुढं पुढं करण्याच्या सवयी-मुळं त्या मोठ्या माणसाचीच री ओढली. माझी सर्वत्र नालस्ती झाली. मग मी असा विचार केला. काय जरूरी होती मला त्या लोकांना खरं काय आहे ते समजावून देण्याची ? मी इतका का संवेदनाशील झालेलो होतो ?

झाला असेल गैरसमज इतरांचा. त्यानं माझा अपमान केला होता. तो परत भरून येणार नव्हता, मी गप्प बसलो असतो तर ते प्रकरण तिथंच मिटलं असतं. बरं तसं प्रकरणहि फारसं महत्वाचं नव्हतं. केवळ माझा अभिमान दुखावला गेला होता म्हणून मी इरेला पेटलो होतो. मी गप्प बसणं फार अगत्याचं होतं. पण ते मला जमलेलं नव्हतं. मी विसरायला तयार नव्हतो, ही माझी चूक होती. माझ्याकडून एकदा एक वस्तु विकत घेताना वाजवी-पेक्षा खूपच जास्त पैसे दुकानदाराने वसूल केले. मी जास्त भावानं वस्तू घेऊन फसवला गेलो होतो. उगीचच खंत करत बसलो होतो. चार ठिकाणी चौकशी केली नाही. ही माझी चूक होती. माझं रक्त उगीचच मी जाळत होतो. दैनंदिन जीवनात मी अशाच चुका वारंवार करत होतो आणि मग खंतावून जात होतो. मी विचार करण्याच्या मन:स्थितीतच नव्हतो. गेलेल्या गोष्टी मी परत आणू शकत होतो का ? हे मला समजत नव्हतं का ? समजत होतं, पण मी बरोबर वागू शकत नव्हतो. मी माझं सारं समाधान हरवून बसलो होतो. प्रत्येकजण कमीअधिक प्रमाणात असाच वागतो. मुलगा परीक्षेत नापास झाला की मग बाप त्याला छळून काढतो. त्या मुलाला घरात रहाणं असह्य होतं. रोज उठून त्याला टोचलं जातं. झाल्या गोष्टीतून कुणी बोध घेऊन सुधारणा करण्याच्या ऐवजी मागच्या चुका सारख्या उगाळत बसतो. क्वचित् मुलगा घरातून पळून जातो. जीव देतो. मग पुन्हा हे असं कसं झालं म्हणून आई-बाप खंतावून जातात. मी म्हणतो, पोरगा नापास झाला. झाला असेल ! त्याला छळून त्याची मन:स्थिती आणखीनच वाईट होते. म्हणजे तो आता धास्तीनं नक्कीच परत नापास होतो. त्याला चुचकारून घेण्याच्या मन:स्थितीत कोणीच नसतो. मागच्या चुका उगाळून कापण काहीहि साधत नसतो.

एका गृहस्थांनी आपले फंडातले दहा हजार रुपये एका कंपनीत ठेव म्हणून ठेवले. नंतर त्यांच्या लक्षात आलं की, ती कंपनी चांगली नाही. पुढं ते सगळे पैसे बुडले. आम्हालाच फार काळजी लागली. आता याचं काय होणार ? मी त्याला भेटायला गेलो. तो मजेत कुठलीतरी डिटेक्टिव्ह कादंबरी वाचत होता.

'या. बसा.'

'फार वाईट झालं नाही?'

'कशाचं ?'

'अहो, तुमचे पैसे बुडाले ना ?'

'अहो, मी ती गोष्ट पार विसरून गेलो.'

'असं कसं ? रक्कम फार मोठी होती. आता तुमच्या मुलीचं लग्न आहे त्याला पैसे कुठून आणाल ?'

'देव मोठा आहे. चहा घेणार ?'

खरंच मी त्या माणसाकडून शिकत नव्हतो. मी घरी आलो, मुलानं ट्रांझिस्टर रेडिओ हातातून खाली टाकून तोडला होता. मी त्याला चांगलाच धोपटून काढला. मग माझं मलाच वाईट वाटलं. त्यानं काय तो मुद्दाम खाली पडला होता ? मला हे समजत नव्हतं का कळत होतं पण वळत नव्हतं. मी गोष्टी विसरायला शिकत नव्हतो. पूर्वीच्या चुकांचं विवरण करून त्यातून काय सुधारणा करता येईल याचा विचार खरं तर करायला हवा. दूध सांडलं म्हणून खंत न करता आता पुढं काय काळजी घ्यावी याचा विचार करून तसा आचार ठेवायला हवा. काही काही माणसं आपल्या मागच्या चुकांचाच सदैव विचार करीतअसतात 'हे असं कसं झालं' म्हणून आतल्या आत जळत रहातात. त्यांच्या जीवनात लहानमोठ्या चुका सतत होत असतात, त्याची खंत करण्यातच ते जगत असतात. जीवनातली चांगली बाजू ते पहायला तयारच नसतात. मग त्यांना अल्सर, ब्लडप्रेशर वगैरे विकार होतात. प्रत्येक माणसानं सारासार विचार करायला शिकलं पाहिजे. गतचुकांची खंत बाळगणे हे मूर्खपणाचं आहे हे कुणालाहि पटेल. पण हे जर खरं आहे तर मग त्याची काळजी लगेच का सोडून देत नाही ? मी म्हणतो भूतकाळात (त्या वाईट गोष्टीत) का जगता ? त्यामुळं सगळा जन्मच भूतकाळ होऊन जातो. मागच्या चुका ध्यानात घेऊन वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ चांगला घालवा. त्यातच तुमच्या सुखी जीवनाचा मार्ग आहे. सचोटीनं नोकरी करणाऱ्या बँकेतल्या एका माणसाच्या हातून एक फार मोठी चूक झाली. दुसऱ्या कुणीतरी अफरातफर केली आणि प्रकरण त्याच्यावरहि शेकवलं. त्या इतरांना शिक्षा झाली आणि याला नोकरीतून काढून टाकलं गेलं. दुसऱ्यावर फार विश्वास टाकला म्हणून हे खरं घडलं.

पण इतर लोक याची कुचेष्टा करायचे. त्यांना वाटायचं हाहि एक चोर आहे. त्यानं रात्रंदिवस या गोष्टीवर खंत करत घालवले. काळजीनं, अपमानानं तो खंगून गेला. त्यानं स्वतःशी असा विचार केला नाही, 'मी स्वतः चोर नाही ना ? मग मी का इतका संवेदनाक्षम राहावं ? माझ्या अपराधाची शिक्षा मी भोगली आहे. आता त्याच गोष्टीबद्दल परत शिक्षा काय म्हणून मी भोगावी ? लोक बोलणारच, त्यांची तोंडं कुणी बंद करणार आहे का ? मग का उगीच खंत करतो आहे मी ?' पण हे त्याला जमलं नाही. त्याचं आपलं तेच तेच रडगाणं मनातल्या मनात चालू होतं. तो आतल्या आत जळत होता. तेव्हा अशा स्वभावाला मुरड घालण्याचा प्रत्येकानं प्रयत्न करायला हवा. न पेक्षा जीवन असह्य होईल !

## शास्त्रशुद्ध विचार

काळजी करायची सवय जर मोडायची असेल तर त्याचा शास्त्रशुद्ध विचार व्हायला हवा. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करायला हवा. म्हणून आपण काय विचार करतो, आपल्या मनात काय असतं, दुसऱ्याच्या मनात काय असतं या गोष्टींवर आपण बारकाईनं लक्ष पुरवायला हवं. समजा, मला तुम्ही काय विचार करता, कसा विचार करता हे ध्यानात घेता आलं तर तुम्ही कोण आहात, तुमचं व्यक्तिमत्त्व काय आहे, तुमची विचारांची बैठक काय आहे हे लगेच लक्षात येईल. आपल्या विचारसरणीवर आपण कोण आहोत हे ठरतं. आता पहा ना, मी जर प्रथमपासून चोऱ्या कशा कराव्यात, पाकिटं कशी मारावीत हे मनात घोळवू लागलो तर मी चोर होणार हे अगदी निश्चित. कदाचित मी एखादं धाडसाचं विधान करू लागलो तर तुम्ही मला माफ कराल. आपले विचारच आपलं नशीब घडवितात.' मग ओघानंच आलं की, आपले विचार चांगले असायला हवेत. आपली विचारांची दिशा योग्य असेल तर आपण कोणतीही संकटं शांतपणानं निवारू शकतो. आपण सदोदित आनंदी रहायचा विचार डोक्यात ठेवला. वाईट घटना विसरायचं ठरवलं तर आपलं जीवन नक्कीच सुखाचं आणि समृद्धीचं होईल. पण आपण नित्य लोकांच्या कलागती नि चहाड्या

करायचं ठरवलं, असंतुष्ट जीवन जगायचं ठरवलं किंवा भित्रेपणाचा जीवनविषयक दृष्टिकोन ठेवला तर हटकून समजा सदैव आपलं जीवन दुःखमय होणार आहे. सकाळ-संध्याकाळ तुम्ही मनाशी उगाळत बसा की, 'माझं इथचं दुखतंय, मला काहीतरी होतंय' नंतर झोपा. तुम्ही खरंच आजारी पडाल. कुणी घरातलं काम सांगितलं की 'मी आजारी आहे' म्हणून तुम्ही सांगाल. पण तेच तुमच्या आवडीचं कुणी रस्त्यावर भेटायला आलंय किंवा तुम्हाला कुणी अतिशय आनंदाची बातमी सांगितली की तुमचा आजार पळून जाईल ! तेव्हा हे सारे मनाचे खेळ आहेत. आजार असेल तर औषधं जरूर घ्या. पण आजारीच आहोत ही भावना घेऊन का जगता ? जीवनात नकारात्मक भूमिका घेऊन का जगता ? प्रत्येक गोष्टीकडे नकारात्मक भूमिकेतून पहाण्याचा काही लोकांचा दृष्टिकोन असतो. मुलाला शाळेच्या ट्रिपला पाठवायचं झालं की तुमच्या डोक्यात येतं, हा गाडीखाली सापडून मरणार तर नाही ना ? हा पाण्यात तर बुडणार नाही ना ? हे सारे नकारात्मक विचार झाले. ट्रिपला पाठवताना काळजी घ्या. नीट सूचना द्या. पण पाठवायचंच नाही म्हणजे काय ? रस्ता क्रॉस करताना पुष्कळ लोकांना वाटतं की आपण गाडीखाली सापडणार तर नाही ना ? या अशा धरसोडीच्या, दुबळ्या आणि भित्र्या मनोवृत्तीची माणसंच गाडीखाली सापडतात. रस्ता क्रॉस करायचा आहे तर नीट विचार करून क्रॉस करा. काळजी का करता ? केनेडींच्या आयुष्यातली एक घटना गमतीदार आहे. क्यूबा बेटं उडवून द्यावीत का, क्यूबाला दम द्यावा का रशियाला दम द्यावा या गोष्टींवर त्यांच्या मनात वादळ माजलं होतं रशियानं अमेरिकेजवळच्या क्यूबात अण्वस्त्रं उभारली होती. निर्णय घेण्यामुळं जागतिक युद्धाचा भडकाही उडाला असता. केनेडी शांतपणानं वावरत होते. अवकाशात फेरी मारून आलेल्या एका वीराचा सत्कार करत होते. पण मनात विचार चालू होते. काळजी नव्हती. ते केनेडी फार थोर होते. आपण सामान्य माणसं आहोत. आपल्या अडीअडचणी छोट्या. आपण आपल्या परीनं केनेडींच्या वागणुकीतलं थोडं तरी आपल्या वागणुकीत आणायला काय हरकत आहे ? शांतपणानं कुठल्याही अडचणीचा विचार केला की योग्य मार्ग सुचू शकतो. पण काळजीच्या चक्रात सापडलात की विवेक नाहीसा होतो आणि भोवऱ्यात

सापडल्यासारखी परिस्थिती निर्माण होते.

## अविचारांची धैर्यावर मात

थोर विचारवंतांचं जीवन पहाण्यासारखं असतं. मोठ्या, आनंदानं ते हुरळूनही जात नाहीत आणि मोठ्या दुःखानं ते व्याकुळही होत नाहीत. आपण काय बोध घ्यायचा यातनं ? कदाचित असल्याच प्रसंगात माणसाची खरी परीक्षा होते. अडचणी आल्या की आपण चेंडूसारखं जमिनीवर आपटतो, पण विचारवंत माणसं दुप्पट जोरानं वर उसळी मारतात अडचणींतून दुप्पट उत्साहानं वर येतात. एक सोपी गोष्ट लक्षात घ्या म्हणजे विचार माणसाला वर नेतात किंवा डुबवतात हे पटेल ! ग्राऊंड आहे. त्यावर एक सरळ रेषा काढली आहे. तुम्हाला सांगितलं आहे, चाला या रेषेवरून. तुम्ही म्हणाल त्यात काय आहे ? पण समजा, त्या रेषेच्या उजव्या आणि डाव्या बाजूला खोल दरी आहे, फक्त चालण्याइतपत रुंद रस्ता आहे चालाल तुम्ही त्या अरुंद पायवाटेवरून ? निश्चितच नाही. कारण तुमचे विचार तुमचं धैर्य खच्ची करून टाकतात. आजूबाजूला दरी आहे हीच भीती तुम्हाला ग्रासते आणि तुम्ही पडता. वाईट विचार तुमचं हेच भविष्य ठरवतात. आपल्याकडच्या थोर संतांनी हेच सांगितलं आहे की,– मन चंगा तो कथोट में गंगा ! ( मन खंबीर असेल तर तुम्ही दारात सुद्धा गंगेला आणू शकाल. ) कमकुवत मनाच्या माणसाची आणखी एक खोड असते. त्याला सतत कुणाची तरी सहानुभूती हवी असते. परीक्षेत पास झाला नाही तर बऱ्याच लोकांनी त्याला जाऊन सांगावंसं वाटतं, ‘ अरे, खूप लोक नापास झालेत. अरे, शिकवलंच नव्हतं चांगलं वगैरे वगैरे. सहानुभूतीनं प्रश्न सुटणार आहे का ? विचार दृढ ठेवून परत जर अभ्यास केला तर यश हमखास मिळणार आहे. पण काय चुकीचे पेपर तपासतात, शिकवतच नाहीत. इतर कॉप्या करतात. असली विचारसरणी ठेवलीत की पुन्हा अपयश– पुन्हा किरकिर, पुन्हा अपयश. हे दुष्टचक्र चालू झालंच म्हणून समजा. आपले दोष असतील ते काढा. वेगळ्या पद्धतीनं अभ्यास करा, यश तुमचंच आहे. एका गृहस्थाला मित्रांनी सल्ला दिला की, तू

काही दिवस स्थानपालट कर. कुठंतरी दूर मोकळ्या ठिकाणी जा. तुझं नैराश्य पळून जाईल. हा गेला. त्या नव्या वातावरणात खूप शिकण्यासारखं होतं. वेगळी माणसं होती. पशुपक्षी आणि निसर्ग यांच्या सान्निध्यात खरं तर तो सुधारायला हवा होता. पण तो बरोबर त्याचे निराशायुक्त विचार घेऊन आला होता. त्या विचारांना कुरवाळत बसला. परत गेला त्याच अवस्थेत. आता याला काय म्हणणार तुम्ही ? जीवनात कित्येकांच्या वाट्याला प्रेमभंग येतो. अशी माणसं झिडकारली गेल्यामुळं निराश होतात. वेड्यासारखा प्रिय व्यक्तीला मिळविण्याचा हास्यास्पद प्रयत्न करत असतात. ती व्यक्ती हातातून निसटलेली असते. हे बिचारे वेड्यासारखे तिच्या मागं धावत असतात. पर्यायानं दुःखी होतात. जीवही देतात. कालांतरानं काही लोकांना पटतं की ठीक आहे. तिनं झिडकारलं ना मला, मग मी मरण्यासारखी अतिरेकी भूमिका का घ्यावी ? जीवन असल्या क्षुल्लक कारणावरनं संपवायचं असतं ? पण हे त्यांना प्रेमभंगानंतर लगेच कळत नाही. ही माणसं लगेच सावरत नाहीत. ती चांगल्या विचारांच्याऐवजी निराश विचारांचे भक्ष्य बनलेली असतात. अशा दुःखाच्या प्रसंगी आपला रचनात्मक छंद जोपासा, संगीत शिका किंवा सतत उद्योगी रहा. सतत उद्योग तुम्हाला काळजी करायला फुरसतच देणार नाही !

## विरोधकाची मात

जीवनात हरघडी निरनिराळ्या लोकांशी संबंध येतात. सर्वच लोकांशी आपलं पटतं असं नाही. कितीतरी लोकांशी भांडणं होतात. कधी आपली बाजू बरोबर असते म्हणून आपण भांडतो, कधी आपली बाजू चुकीची असतानासुद्धा प्रतिष्ठेचा प्रश्न करून आपण भांडत असतो. कधी एखाद्या विशिष्ट विषयाबाबत आपण घेतलेली आग्रही भूमिका बरोबर असूनसुद्धा इतरांना पटत नाही. त्यामुळं आपले त्यांच्याशी खटके उडत असतात. आपल्या मनाप्रमाणं झालं नाही की आपण इतरांशी शत्रुत्व धरतो. ज्या वेळेला आपण आपल्या शत्रूंचा तिरस्कार करत असतो त्या वेळेला अहोरात्र आपण मनात त्यांच्यावर जळत असतो. घरी, दारी, सतत शत्रूचा विचार

केला जातो. त्यामं केलेले आपले अपमान आपण विसरत नाही. या सर्व गोष्टींचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. मन शांत नसल्यामुळं आपल्या झोपेवर परिणाम होतो. त्यामुळं आपली पचनशक्ती कमकुवत होते. अन्नावर वासना राहत नाही. ब्लड प्रेशर किंवा अल्सर यासारखी दुखणी आपणहूनच आपण स्वत:ला लावून घेतो. वरवर शांत असणाऱ्या आपल्या मनावर आपल्या विरोधकाचा संपूर्ण ताबा असतो. मनातल्या घडामोडी कळणारं यंत्र जर तयार होऊ शकलं आणि ते जर आपल्या डोक्याला लावलं आणि ते आपल्या शत्रूनं पाहिलं तर आपण त्याला किती अवाजवी महत्त्व दिलं आहे हे पाहून त्याला परमावधीचा आनंद नक्कीच होईल ! या तिरस्कारामुळं त्याचं कवडीचंही नुकसान होत नाही. आपण मात्र जळून जळून आपलं आयुष्य उगीचच कमी करून घेत असतो. काही काही वेळा आपल्या सान्निध्यात कृतघ्न माणसं येतात. काहींना तुम्ही खूप मदत केलेली असते. तरीसुद्धा ते कालांतरानं ती विसरतात आणि तुमची निंदा करू लागतात. एकाद्या माणसाला तुम्ही नऊ वेळा मदत केलेली असते, पण समजा दहाव्या वेळेला तुम्हाला ते जमलं नाही तर तो तुमची निंदा करीत सुटतो. सर्वच माणसं अशी असतात असं मला म्हणायचं नाही, पण अशी अकारण निंदा तुमच्या कानावर आली की तुम्ही खवळता आणि मनुष्यस्वभावाप्रमाणं त्याची कानउघाडणी करायला जाता. तो निर्लज्ज आणि कोडगा असतो. कृतघ्नपणाचं त्याला काहीच वाटत नाही. तुम्ही मात्र स्वत: उगीच आतून जळत राहता. यावर खरा उपाय एकच आहे आणि तो म्हणजे एकादा माणूस असा मतलबी आहे हे लक्षात आलं की, त्याच्यापासून दूर रहावं आणि त्याला विसरून जावं. त्याच्याशी हुज्जत घालण्याचं किंवा तुम्ही कसे बरोबर होता आणि तो कसा चुकीचा होता हे त्याला पटविण्याच्या भानगडीत पडूच नका वैद्यकीय अहवालावरून असं सिद्ध होतं की, एकाद्या व्यक्तीचा आपण मनामध्ये सतत तिरस्कार करीत राहिलो आणि निरनिराळ्या व्यक्तींबद्दल आपल्या मनात असलेल्या तिरस्कारांनी धुमाकूळ माजविलेला असला तर आपल्याला ब्लड प्रेशर निश्चित होऊ शकेल. त्यातून हृदयरोगसुद्धा होऊ शकेल. घरामध्ये तसंच घराबाहेर असल्या प्रसंगांना तोंड देण्याचं कित्येकांच्या नशिबी येतं. घरी पत्नी आपल्या मना-

२२४८९ २०५९

प्रमाणं वागत नाही. मुलं आपल्या इच्छेविरुद्ध वागतात. ऑफिसात अधिकारी निष्कारण आपला छळ करतो. हाताखालचे लोक आपल्याला योग्य ती किंमत देत नाहीत. फार काय पट्टेवालासुद्धा पाणी मागितलं तर देत नाही. पण उसने पैसे मागायला मात्र हमखास आपल्या घरी ३० तारखेला येतो! घरी, दारी तुमच्या मनाविरुद्ध घडणाऱ्या अशा सर्व गोष्टींचे राग तुमच्या मनात उफाळून येत असतात. मग तुम्हाला ब्लड प्रेशर न झालं तरच नवल!

## मौनं सर्वार्थ साधनम् !

सतत मुठी आवळून रागीटपणानं बोलणाऱ्या लोकांना हार्ट ॲटॅक येऊ शकतो. ज्यांचा हृदय मुळातच कमकुवत आहे त्याचा मृत्यू तो अतिशय रागावलेला असेल आणि कोणावर तरी तोंडसुख घेत असेल अशा वेळी होऊ शकतो. आपल्या शत्रूंच्यावर विजय मिळविण्यापेक्षा त्यांच्यावर प्रेम करायला शिका ही साधुसंतांची शिकवण काही चुकीची नाही. कित्येक वेळा आपल्यावर अन्याय होतो. आपले शत्रू आपल्यावर विजय मिळवितात. तिथं त्यांना धडा शिकविण्यासाठी तलवार परजणं नेहमीच फायदेशीर असतं असं नाही. तसं करू लागलात की विरोधकालाहि चेव येतो आणि तो भल्याबुऱ्या मार्गानं तुमचा काटा काढण्याचा प्रयत्न करीत असतो. पण यापेक्षा शहाण-पणाचा मार्ग म्हणून कितीतरी वेळा गप्प बसण्यामुळं पुढील भांडणं टळतात. एखाद्यानं तुमच्यावर अन्याय केला असेल तर कालांतरानं त्याला आतूनच पश्चाताप होतो. तो तुमच्याशी सरळ वागू लागतो. पण समजा, असं झालं नाही तर तुम्ही त्याला धडा शिकविण्याचं धोरण सोडून दिल्यामुळं तुम्हाला मानसिक त्रास होत नाही. कुठल्या गोष्टीला किती महत्व द्यायचं, काय सहन करायचं आणि कुठं प्रतिकार करायचा हे प्रत्येकानं तारतम्यानं शिकलं पाहिजे. जर समजा तुम्हाला तुमच्या शत्रूवर प्रेम करणं खुळचट-पणांच वाटत असेल तर निदान तुमच्या स्वतःवर तरी प्रेम करा. बाहेरच्या कोणच्याहि छळामुळं तुमची मनःशांति ढळू देऊ नका आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे तुमच्या शत्रूला तुमच्या सुखावर, प्रकृतीवर ताबा मिळवू देऊ नका.

आपल्या जीवनात येणारी सर्वच माणसं आपल्याला आवडतात असं नाही. जी आपल्याला आवडत नाहीत त्यांना तत्काळ विसरून जाणं यासारखी सुखाची गुरुकिल्ली दुसरी कुठलीच नाही ! माझे एक स्नेही आहेत. त्यांचा एक नातलग अतिशय क्षुद्र वृत्तीचा आहे.मतलब असला की त्यांच्याकडे येतो. काम झालं की बाहेर जाऊन मित्राची निंदा करतो. त्याचं मुख्य दुखणं म्हणजे त्याचा माझ्या मित्राविषयीचा मत्सर ! माझा मित्र अत्यंत हलाखी-तून वर आलेला, चांगला अडीच हजार रुपये पगार मिळविणारा आहे. त्याच्या नातलगाला हे पाहवत नाही. ही गोष्ट मला त्या मित्राच्या बायकोकडून समजली. मी मित्राला म्हटलं; ‘ काय रे, या नादान माणसाला तू हाकलून का लावत नाहीस ?’

तो म्हणाला, ‘ या माणसाला मी कवडी किंमतसुद्धा देत नाही. घरी आला की त्याचं काय काम असेल ते मी दोन मिनिटांत करून टाकतो आणि कचऱ्याच्या पेटीत जसा आपण नको असलेला कागद चुरगाळून टाकतो तसा त्याला विसरून जातो.’

मी त्याला म्हणालो, ‘ आपण काही इतके साधू नाही ! ’ तो मला म्हणाला, ‘ असल्या नालायक लोकांना माझी मनःशांती कुरतडू देण्याची संधी मी कधीच मिळू देत नाही. त्याची पाठ वळताच मी त्याला विसरून जातो. थोर नेत्यांची चरित्रं वाचल्यानंतर असं लक्षात येत की, त्यांनी ज्या ज्या लोकांना महत्पदावर नेऊन बसविलेलं असतं त्यांतली कितीतरी माणसं संधिसाधूपणानं वागतात आणि त्या नेत्यांचे शत्रू म्हणून वावरतात. अमेरिकेचे अध्यक्ष लिंकन त्यांच्या जीवनातसुद्धा असंच घडलं होतं. परंतु या नेत्यांच्या चरित्रावरून असं दिसतं की स्वतःहून फार मोठ्या कार्याला जर तुम्ही वाहून घेतलं असेल तर अपमान, मानहानी या गोष्टींचा तुमच्यावर कसलाहि परिणाम होत नाही. आणि मग आपोआपच तुम्ही तुमच्या शत्रूला विसरता !

## निरपेक्ष रहा

एका संस्थेचे प्रमुख अत्यंत सरळ वृत्तीचे, निर्गर्वी स्वभावाचे व परोप-

चि...४

कारी वृत्तीचे होते. ते मला नेहमी भेटत. ज्या ज्या वेळी मला त्यांच्या संस्थेत जाण्याचा योग आला त्या त्या वेळी माझ्या असं लक्षात आलं की, हाताखालच्या लोकांशी त्यांचे संबंध अत्यंत प्रेमाचे आहेत. संस्थेमधील लोकांच्या व्यक्तिगत अडीअडीचणीसुद्धा हे गृहस्थ वेळ पडल्यास स्वतःच्या पदरचे पैसे खर्च करूनदेखील सोडवत असत. मी ज्या वेळी त्यांच्याबरोबर कुठं कुठं जात असे त्या वेळी माझ्या असं लक्षात आलं की, हा गृहस्थ अत्यंत शांत वृत्तीचा आहे. मध्यंतरी असाच एकदा दुसऱ्या एका संस्थेच्या प्रमुखाला भेटण्याचा योग आला. ते गृहस्थ दुसऱ्या एका गृहस्थाशी बोलत होते. त्यांचा संवाद मोठा मनोरंजक वाटला. ते म्हणत होते, ‘ अहो, त्या तात्यांच्यासारखा नालायक माणूस या जगात मी पाहिला नाही. तो जेव्हा अडचणीत होता तेव्हा सतत माझ्या दारात खेटे घालत होता. मी मोठ्या मुष्किलीनं त्याच्या मुलाला वशिल्यानं नोकरीत चिकटवून दिला. त्यानंतर परवा त्याचं लग्न झालं. हरामखोरानी मला साधी लग्नपत्रिकासुद्धा पाठविली नाही. मला वाटतं, कधी कुणाच्या उपयोगी पडू नये. सगळे मतलबाच्या वेळी तुमचे बूट चाटतील ; काम झालं की टांग मारून पळून जातील ! असे हे कृतघ्न लोक माझ्याभोवती घोटाळत असतात. मलाच अक्कल नाही. जरा मोठेपणा दिला की मी भुलतो आणि त्यांना मदत करतो.’ ‘जाऊ द्या हो साहेब, सगळ्याच लोकांना कुठली आली आहे रीत’ हे बोलत असताना त्या समोरच्या गृहस्थाचा चेहरा पडला. कारण त्या साहेबांनी त्यालाहि मदत केलेली होती आणि तोहि असाच एका छोट्याशा कार्याला साहेबांना बोलवायला विसरला होता. त्याचं मन त्याला उगीचच खाऊ लागलं आणि नकळत त्याच्या मनात त्या साहेबाविषयी तिरस्काराची भावना निर्माण झाली. मला हे ऐकून खरंच गंमत वाटली. खरंच तो साहेब स्वभावानं चांगला होता. पण मग तो दुःखी का होता ? मी विचार करू लागलो आणि माझ्या असं लक्षांत आलं की त्यात त्याचा काही दोष नव्हता. त्याने ज्यांना मदत केली होती त्यांचच चुकलं होतं. तीच मंडळी कृतघ्न झालेली होती. त्या लोकांना मनातल्या मनात शिव्या देत मी निघालो आणि बाहेर पडलो आणि अचानक मला रस्त्यात त्या पहिल्या संस्थेचे साहेब भेटले. मी त्यांना विचारलं, ‘ तुम्ही खूप लोकांच्या नेहमी

उपयोगी पडता. त्यांच्या अडीअडचणीला धावून जाता. हे लोक तुमच्याशी नंतर कसे वागतात ?' 'त्याचं असं आहे, या गोष्टीचा मी कधी विचार करीत नाही. कारण बहुतेक सर्व लोकांची वृत्तीच केलेले उपकार विसरण्याचीं असते. फार थोडे लोक कृतज्ञातेची भावना ठेवून माझ्याशी वागतात. बाकीचे सारे स्वार्थी असतात. काम झालं की संपलं ! याउलट काही लोक त्याही पुढं जाणारे असतात. मी जर एखाद्याला चार वेळेला मदत केलेली असली आणि पाचव्या वेळेला मला जमलं नाही तर तो माणूस नाराज होतो आणि माझी बाहेर खूप निंदा करतो. मी त्याला पूर्वी चार वेळा केलेली मदत पार विसरून जातो.

'मग असल्या लोकांना तुम्ही जवळ कशाला करता ?' मी विचारलं.

'प्रश्न तो नाही. अडीअडचणीला आपण कोणाला तरी मदत करावी हाच माझा त्या मदतीमागं उद्देश असतो. त्या मदतीतून मला काहीही नको असतं. कुणा एकाला मदत केल्यानंतर त्याचं जे कल्याण होतं ते पाहिलं म्हणजे मला फार समाधान वाटतं. त्या मदतीतून त्याच्याकडून काही उपटावं किंवा त्यानं सदोदित माझी स्तुति करावी असा विचारसुद्धा माझ्या मनाला शिवत नाही. मनुष्यस्वभावच असा आहे की, गरज सरो आणि वैद्य मरो हे तत्त्व त्याला अगदी तंतोतंत लागू पडतं. अर्थात एखादा जाणणारा असतो. त्यानं कृतज्ञता व्यक्त केली की जरा बरं वाटतं. पण त्यामुळं मी कधी हुरळूनही जात नाही आणि एखाद्यानं जर निंदा केली तर खंतावूनही जात नाही. अगदी अलिप्तपणानं मी या गोष्टीकडे पहातो.'

'तुम्ही साधु आहात ! आपल्याला नाही हे जमायचं.'

'का नाही जमायचं ? भगवद्गीतेतहि असंच लिहिलं आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन्.' म्हणजे फलाची अपेक्षा न धरता काम करीत रहा.

'इथं फळाची अपेक्षा म्हणजे तुम्हाला असं अभिप्रेत आहे की मदत यशस्वी झाली की त्या माणसानं मला मोठं म्हणावं. माझा उदोउदो करावा. ते फळ तुम्हाला मिळालं नाही की तुम्ही दुःखी होता. अपेक्षाच ठेवू नका. मग कसलं दुःख ? काळजी कशाची ?'

मला खरोखरीच हे सर्व पटलं. आणि सदोदित चिडणाऱ्या, वर उल्लेख

केलेल्या त्या अधिकाऱ्याची कीव आली. त्यानं स्वतःलाच हास्यास्पद करून घेतलं होतं. जगात सर्वत्र हेच पाहायला मिळतं. एकादा माणूस लहान वयात अचानकच मरतो, त्याची मुलं उघड्यावर पडतात. मग कुणी काका मामा आयत्या वेळी उभा रहातो. मुलांना रेघेरुपेला लावतो आणि जिकडे-तिकडे हे सर्व उगाळत रहातो. पुढं ती मुलं त्याच्या तंत्रानं चालत नाहीत. ह्याचं प्रेस्टिज दुखावतं. आता मुलंच बोलून चालून ती ! त्यांना स्वतःचं व्यक्तिमत्व आहेच की ! त्यांनी तरी काय म्हणून ह्यांना दर खेपेला किंमत द्यावी ? दिनूमामांचं असंच झालं. त्यांनी आपल्या पुतण्याचं सारं शिक्षण केलं पण लग्नाचे वेळी त्यांनी पसंत केलेली मुलगी त्यानं नाकारली. झालं ! दिनूमामा भडकले.

'साल्याचा सगळा संभाळ मी केला आणि माझी एवढीसुद्धा इच्छा त्यानं ऐकली नाही.'

इथं दिनूमामांनी केलेल्या मदतीवर पाणी पडलं, आधी त्यांनी मदत केली हे उगाळायला नको होतं आणि दुसरं तो आपल्या तंत्रानं चालेल ही अपेक्षाहि ठेवायला नको होती. दिनूमामा लग्नालाहि गेले नाहीत. खरोखर चूक त्यांचीच होती. कारण त्यांनी सुचवलेली मुलगी दिसायला कुरूप होती. तुम्ही म्हणाल, दिनूमामांसाठी पुतण्यानं स्वार्थत्याग करायला हवा होता. खरं तर जन्माची जोडीदारीण निवडण्यात असला मूर्खपणा करणं यात स्वार्थत्याग नव्हताच. पुढं पुढं, जेव्हा नवीन लग्न झालेलं जोडपं दिनूमामांच्याकडे आशीर्वादाला यायचं तेव्हा मामांचा तोंडपट्टा सुरू व्हायचा. त्यांना तारतम्य रहायचंच नाही. ते म्हणायचे, 'फसलो मी तुला मदत करून. तुला त्याचं चीजहि नाही आणि दुसऱ्याचं मन मोडल्याबद्दल दुःखहि नाही. मग पुतण्या मामांचं घर टाळू लागला. मामा आणखीनच भडकू लागले. ते सारखे खंत करीत बसत. आणि त्यातच त्यांना हार्ट-अॅटॅक आला.

## असंतुष्टपणा कशाला हवा ?

प्रत्येक माणसानं मनात अशी भूमिका ठेवावी की मदत ही मदतीच्या

आनंदासाठीच मी करीन. आपल्यामुळं कुणाचं जर कल्याण होऊ शकलं तर मला त्यात आनंदच होईल. मगच तो सुखी होईल. नपेक्षा त्याच्या मागं अपेक्षाभंगाचं दुःख हात धुवून लागेल. शरयू आणि तिच्या नवऱ्याची हकीकत ऐकायची आहे तुम्हाला ? मग ऐकाच तर. तिची दूरची कुणी नातलग बाई नुकतीच वारली तिला शरयू हीच एकमेव जवळची होती. त्या बाईनं आपल्या पाच लाखाच्या इस्टेटीतले एक लाख रुपये शरयूच्या नावे केले. केवढं मोठं भाग्य हे! पण शरयू आणि तिचा नवरा दोघंहिजण त्या बाईच्या नावानं बोटं मोडत होती. 'मरतानासुद्धा सगळी इस्टेट आमच्या नावानं केली नाही तिनं. उरलेले चार लाख त्या शाळेत घातले. शाळेचे संचालक ती रक्कम फस्त करतील. आम्हाला दिले असते तर आम्ही संभाळले असते ते नीट.'

म्हणजे एक लाख मिळाले ते गेलेच कुणीकडे !

## तुमची मुलं तुमचे गुलाम नव्हेत !

मुलं आपल्याशी फटकून वागतात, आपल्याला विचारत नाहीत ही वृद्ध माता-पित्यांची नेहमीची तक्रार. ती कृतघ्न आहेत हे तर आई-वडील उघड बोलून दाखवतात. मला वाटतं, मुलं असं जे वागतात त्यामागं नकळत आई-वडलांच्या वागणुकीचा तर त्यांच्यावर ठसा पडत नसेल ? ते त्यांच्या आई-वडलांशी तसेच वागले नसतील कशावरून ? किंवा मुलांनी इतरांशी कृतज्ञ रहावं ही शिकवण त्यांनी मुलांना दिली नसेल तर ? या बाबतीत मला असं वाटतं की, आई-बाप मुलांचा सांभाळ करत असताना मुलांकडून नकळत अपेक्षा धरू लागतात की, आमच्या म्हातारपणी आम्हाला मुलं विचारतील. मी म्हणतो, ही अपेक्षा फोल आहे. तुम्ही तुमचं कर्तव्य करा. मुलांना रेघेरूपाला लावा. विचारलं त्यांनी तुम्हाला ठीक, नाही विचारलं द्या सोडून. पण असं होत नाही. आई-बाप मुलांना उपकाराच्या ओझ्याखाली दडपतात. 'मी तुझं शिक्षण केलं, मी तुला नोकरीला लावलं, मी, मी, मी...मग तू माझ्या तंत्रानं चाललं पाहिजेस. माझा सतत उदोउदो केला पाहिजेस.' वगैरे मग इथं खटके उडू लागतात. जनावरात आणि माणसात

एक फरक आहे. जनावरात, जन्माला आल्याबरोबर पिलं चालू लागतात– स्वतःच्या पायावर उभी रहातात. माणसात, मुलांना स्वतःच्या पायावर उभं रहायला खूप वेळ लागतो. आई-वडिलांची मदत लागते. म्हणून काय त्यांना मिंधं करता की काय ? या हातानं दिलं की त्या हातानं मागता का ?

मुलाचे लग्नाचे वेळी हा प्रश्न नेहमी बिकट होतो. एका मराठी सिनेमात फार उत्कृष्ट प्रसंग दाखवला होता. मुलाचे वडील लग्न ठरवायच्या बैठकीला वधूपित्याला म्हणाले, 'मुलाच्या शिक्षणाला मी खूप पैसा ओतलाय, तेव्हा ते पैसे हुंड्याच्या रूपानं मला परत हवेत.' वधूपिते उठले, निघाले. कारण त्यांना ही वसुली पसंत नव्हती. जाताना ते क्षणभर थबकले आणि म्हणाले, 'मुलावर जो तुम्ही खर्च केलेला आहे त्यात थोडी चूक आहे. त्याच्या बारशाचा खर्च तुम्ही कुठं धरला आहे ?'

## लाल दिवा

जीवनाचा संघर्ष हा प्रत्येक माणसाच्या बाबतीत नित्य चालूच असतो. त्यात हरघडी सुख-दुःखाचे प्रसंग येत असतात. मानवी मनाची प्रवृत्ती फार गमतीदार असते. जरासा आनंद झाला की तो त्याचा गाजावाजा जोरदार-पणानं करतो. जरासं दुःख झालं की जिकडे-तिकडे आक्रोश करीत फिरतो. त्या आक्रोशाच्या मागं लोकांनी आपल्याला सहानुभूती दाखवावी अशी त्याची स्वाभाविक इच्छा असते. जीवनातल्या हरघडी घडणाऱ्या गोष्टीकडे तो निरपेक्ष वृत्तीनं पहायला शिकतच नाही. सुख आणि दुःख यांचा मारा आलटून पालटून त्यांच्यावर चालूच असतो. माणसाच्या स्वभावाची एक गंमत आहे. ती म्हणजे सुखाचे क्षण तो लगेच विसरून जातो, दुःखाचे क्षण मात्र विसरणं त्याला फार कठीण जातं. जीवनातल्या काळ्या बाजूलाच तो जास्त कुरवाळीत बसतो. अगदी बारीकसं उदाहरण द्यायचं तर ट्रॅफिकच्या सिग्नलचं देता येईल. जेव्हा जेव्हा सायकलवरून, स्कूटरवरून किंवा मोटार-मधून आपण गावातल्या रस्त्यावरून जात असतो, तेव्हा ट्रॅफिकचा लाल सिग्नल पाहिला की आपलं डोकं भडकतं. आपण म्हणतो, 'जेव्हा पहावं तेव्हा

लाल दिवा ! रस्त्यात दर ठिकाणी हे अडथळे. कधी हिरवा दिवा असायला आणि आपण तेथे यायला गाठ पडली आहे असं होतच नाही. ' वास्तविक आपण जर बारकाईनं पाहिलं तर आपल्या लक्षात येईल की बरेच वेळा हिरवा दिवा असल्यामुळं न थांबता आपण पुढं गेलेले होतो. पण हे प्रसंग लक्षात ठेवतो. कोण ? फक्त लाल दिवा पाहिल्याचेच प्रसंग आपण लक्षात ठेवतो, ही झाली एक क्षुल्लक गोष्ट.

## कुरकुर किती करावी?

माझे एक मित्र आहेत. सदा रडत असतात. सदा कुरकुर करीत असतात. सदा असमाधानी असतात. दुसऱ्याला जरा काही मिळालं की यांचा जीव वरखाली व्हायला लागतो. किंबहुना दुसऱ्याला काहीच मिळू नये, सर्व आपल्यालाच मिळावं अशी यांची धारणा. यांना दुर्दैवानं तिन्ही मुलीच झाल्या; मला मात्र मुलगा झाला. हे गृहस्थ जे माझ्यावर उखडले की काही विचारू नका. जणू काही माझ्या हातून काही गुन्हाच घडला होता ! माझ्यापेक्षा या गृहस्थाचं शिक्षण जास्त होतं. पगार चांगला होता. राहायला स्वतःचा बंगला होता. पण गृहस्थ तगमगत होता. मुली मोठ्या गोंडस आणि देखण्या होत्या, पण हा सदैव दुःखीच असायचा. त्याला जीवनातली सर्व अंगं बघायची इच्छाच नव्हती. त्यामुळं नोकरीत इतरांशी वागतांना त्याची वृत्ति चावे घेणाऱ्या एखाद्या कुत्र्यासारखी झालेली होती. मी त्याला म्हणालो. ' तुलनाच जर केली, तर माझ्यापेक्षा तुझी परिस्थिती कितीतरी चांगली आहे. मग तू सुखी का नाहीस ?' त्यावर तो एवढंच म्हणाला की, ' तुला कळायचं नाही माझं दुःख. ' मिळालं आहे त्यात संतुष्ट रहायची त्याची वृत्तीच नव्हती. आमच्या माहितीच्या एक गृहस्थाची दोन्हीही मुलं लहान असतानाच वारली. त्या गृहस्थानं ऑपरेशन करून घेतलं होतं. कालांतरानं तो सारी दुःख विसरून गेला आणि जीवनप्रवाहात रममाण झाला. हा माझा वर उल्लेख केलेला कुरकुर करणारा मित्र हे असलं काही पहायला तयारच नव्हता. त्याच्या तिन्ही मुली जिवंत होत्या. त्यात त्याला समाधान नव्हतं. मुलगा नव्हता म्हणून काळजी होती. समजा त्याला मुलगा झाला असता तर तो

निरोगी राहील ना, चांगला शिकेल ना, अपघातात कुठं सापडणार नाही ना, दीर्घायुषी होईल ना, मी खूप वर्षे जगून तो म्हातारपणी मला विचारेल ना अशा काळज्या सतत या माणसाच्या मागं लागल्या असत्या. याबद्दल मला जराहि शंका नाही. तात्पर्य एकच. समाधानी वृत्ती तुम्ही जोपासली नाही तर तुमच्यासारखे दु:खी तुम्हीच.

## सुखी माणसाचा मॅनिला

ऐहिक सुखं तर तुमच्या पाठीमागं हात धुवून लागावीत असं तुम्हास वाटतं. आज माणसाची खरी धडपड कसली आहे तर ती म्हणजे त्याला चांगल्या चांगल्या वस्तु चैनीखातर वापरायला हव्या आहेत. एक रेडिओ घरात असण्याची मारामार अशी काही घरं आहेत पण त्याचबरोबर दिवाण-खान्यात एक रेडिओ आहे पण स्वयंपाकघरांत अन्न नाही त्यासाठी पैसे जमवले पाहिजेत अशीहि घरं सापडतात. ही सारी ऐहिक सुखं उपभोगल्या-नंतर उपभोगाची भूक सारखी वाढतच असते. अग्नि जास्त जास्तच प्रज्वलित होत जातो ह्याचं उत्तम उदाहरण म्हणजे माणसाची पैशची भूक. ती कधीच शमत नाही. पैसा जमा करण्याची एकाद्याला भूक लागली तर तो अधिक पैसा असंच करीत रहातो. असल्या गोष्टींना सतत यश येतंच असं नाही. मग तो दु।खी होतो. हे एक मासलेवाईक उदाहरण पहा. गोरे आणि देसाई यांची एकमेकात अधिक पैसे मिळविण्याबद्दल स्पर्धा चालू असते. दोघांचेहि पगार चांगल्यापैकी आहेत. काही पैसा पगाराव्यतिरिक्त जास्त काम करून मिळतो. त्यावरून यांची मारामारी चालू आहे. दोघांनाहि या जादा पैशाचीं काहीहि जरूर नाही. मी त्यांना असं विचारलं, ' बेटयांनो, एकमेकांशी स्पर्धा करून तुम्ही हे असे पैशाच्या मागं का लागला आहात? वास्तविक आहे ह्या पगारात तुमची काहीतरी शिल्लक पडते असं तुम्ही म्हणालेले आहात. मग पैशाकरिता असा का जीव टाकता? या पैशांचा उपयोग बँकेची पासबुकं डोळे भरून पहाण्यापलीकडे तुम्हाला काहीच होत नाही. त्यावर ते म्हणाले की, ' प्रश्न तत्त्वाचा आहे! हा पैसा आम्ही साठवितो तो पुढील काळाची तजवीज करण्यासाठीच साठवीत आहोत. ' या तत्त्वासाठी भांडणाऱ्या

लोकांना स्वार्थापुरतंच तत्त्व दिसत होतं त्यांच्यापेक्षा मी पगारानं कमी होतो आणि त्या जादा मिळणाऱ्या रकमेत मला काही वाटा हवा याचा त्यांना विचारच नव्हता. केवळ त्यांच्यां हातात थोडा अधिकार जास्त होता म्हणून त्यांनी मला मार्गातून दूर करून टाकलं होतं. मीहि प्रथमपासूनच ' देगा उसका भला, न देगा उसका भी भला ! ' अशा वृत्तीनं रहात असल्यानं या अधिक पैसा मिळविण्याच्या राजकारणासून अलिप्त होतो. पण दोन पैसे कमी मिळत असूनहि मी आतिशय सुखी होतो. मी त्या दोघांनाहि नेहमी म्हणत असे की, ' तुम्हास सुखी माणसाचा सदरा फक्त मजकडूनच मिळेल. अर्थात मी काटकसरीनं रहात असल्यानं सदऱ्याऐवजी मॅनिला देऊ शकेन. '

## तारतम्य हवं !

मी जर असं पाहिलं आहे की अधिक शिक्षणामुळं माणूस कित्येकवेळा अधिक दुःखी होत चालला आहे. त्यापेक्षा कित्येक वेळा अशिक्षित आणि कमी पगारवाले परवडले. त्यांच्या गरजा कमी. त्यांच्या सुखाच्या कल्पनाहि मर्यादित. याला साधा पुरावा देता येईल. गरीबगुरीबाच्या घरी कुरकुरणाऱ्या पलंगावर त्या माणसाला सुखानं निद्रा लागते, पण श्रीमंताच्या दिवाणावर टाकलेल्या तीन इंच जाडीच्या फोम रबराच्या गादीवर झोपेची गोळी घेतल्याशिवाय लोकांना झोप येत नाही. असं आहे हे सुखाचं मानसशस्त्र. मला सदैव वाटतं की, प्रत्येकाला लहानपणापासून, ' जीवनात मी प्रगतीसाठी खूप धडधड करेन, पण आहे त्यात समाधानहि मानेन आणि सतत माझी तुलना माझ्यापेक्षा कमी दर्जाच्या माणसाशी करेन, माझ्यापेक्षा ज्याला दोन गोष्टी कमी आहेत अशा माणसाशी करेन ' अशी शिकवण आईवडलांनी द्यायला हवी. शिक्षकांनी द्यायला हवी. या गोष्टीची फार जरूर आहे सध्या. कारण निरनिराळ्या भांडणांचं मूळ ही जीवघेणी स्पर्धा आहे. सरळ मार्गानं पैसा मिळत नाही, मग ज्याच्याविषयी आपल्याला मत्सर आहे त्याच्यापेक्षा जास्त पैसे मिळविण्यासाठी करा वाकड्या मार्गाचा उपयोग. सरळ मार्गानं सत्ता मिळत नाही ना मग करा गैरमार्गाचा उपयोग शेजाऱ्याकडे टेलिव्हिजन आहे ना मग करा घरादाराची कटकसर आणि

घ्या टेलिव्हिजन. समोरच्याकडे स्कूटर आहे ना मग काढा पैसे कर्जाऊ आणि घ्या ती न पेलणारी स्कूटर. समोरच्याच्या मुलाला ८० टक्के मार्क मिळाले ना मग धोपटा आपल्या बुद्धीनं सामान्य असलेल्या मुलाला ! जीवनातला हा तोल, हे तारतम्य माणसाला ! जमणार आहे की नाही ? न पेलणाऱ्या तलवारी माणूस उचलायचं सोडणार आहे का ? एखादा वयस्क डॉक्टर असतो. त्याची प्रॅक्टिस जोरात चाललेली असते. त्याचा मुलगा मेडिकलच्या कोर्सला जावा म्हणून तो धडपडत असतो. मुलाला मेडिकलची बिलकुल आवड नसते. पण या गृहस्थांना काळजी लागलेली असते. माझी प्रॅक्टिसं पुढं कोण टिकवणार ? मुलगा जर नाही शिरला धंद्यात तरी ती प्रॉक्टिस समोरचा तो फडतूस डॉक्टर बळकावणार ! वास्तविक या गृहस्थांनी अमाप पैसा मिळवलाय. पण त्यांना फार काळजी लागलीय. मुलाला जबरदस्तीनं निरनिराळ्या क्लासला घातलं जातं. तो नुसता श्रवणभक्ति करून येत असतो. परीक्षेला सामान्य मार्क मिळवतो. मग बापाची हिंदुस्थानभर धावपळ सुरू होते. कुठतरी प्रवेश मिळविला जातो. मुलगा टक्केटोणपे खात डॉक्टर होतो. पेशंट हळूहळू दुसरीकडे जातात. कारण चिरंजीवांना त्या विषयात फारशी गति नसते. पुन्हा बाप दु.खी ! पोरगा आयुष्यभर लोकांच्या जीवनाशी खेळत बसतो. बापानं जर विचार केला असता. मुलाची आवड लक्षात घेतली असती तर तो दुःखी झालाच नसता. हवी कशाला आपल्यानंतर आपल्या प्रॅक्टिसची काळची ? प्रत्येकानं नको का तारतम्य पाळायला ? पण हा विचार कोण करतो ?

## तुमच्या इच्छा मुलांवर लादू नका

वर मी म्हटलं होतं की, आपल्या इच्छा मुलांवर लादू नका. त्यामुळं त्यालाही डोकेदुखी होते, आणि तुम्हीहि उगीचच काळजी करत बसता. मुलाचा कल न पाहता त्याला आपल्या इच्छेप्रमाणं वाकवायचा प्रयत्न केला की फार अडचणी निर्माण होतात. एकेकांच जीवन असल्या लादणुकीमुळं पार असह्य होऊन जातं. माझा एक अत्यंत तऱ्हेवाईक मित्र अहे. त्याच्या डोक्यानं एकदा ठाम घेतलं की बायकोला इंग्रजी शिकवायचं. तिची बुद्धिमत्ता

यथातथाच होती. तिला शिक्षणाची बिलकुल आवड नव्हती. पण याचा उत्साह अत्यंत दांडगा ! घरातलं काम आटोपून ती बिचारी थकून जायची मग याला इंग्रजी शिकवायला जोर यायचा, ती डुलक्या खात ही इंग्रजी "शिक्षा' सहन करायची ! तिला काहीहि आलं नाही. मग नवरा-बायकोत खूप खटके उडू लागले. तो तिला म्हणायचा, 'बघ, त्या समोरच्या वाघमाऱ्यांची बायको पन्नासाव्या वर्षी बी. ए. झाली.' पण मला असं कितीतरी वेळा वाटायचं, की त्याला सांगावं, हवी कशाला तुला ही स्पर्धा ? माझं स्वतःचंच उदाहरण किती गमतीदार आहे पहा ! माझे वडील बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय कसलंही शिक्षण नसतांना अत्यंत यशस्वीरीत्या करत होते. त्यांनी चागला नावलौकिक व पैसा मिळवला. मी स्वतः सिव्हिल इंजिनिअर व्हावं म्हणून त्यांनी माझ्यामागं खूप लकडा लावला. त्यांचं माझ्यावर फार प्रेम आहे. त्यांच्या इच्छेखातर मी मेकॅनिकल इंजिनिअर व्हायची माझी महत्त्वाकांक्षी दूर ठेवून सिव्हिल इंजिनिअर झालो. मला त्यांचा व्यवसाय बिलकुल आवडत नव्हता. त्यात सारखी धावपळ, मनस्ताप, पैशांची विवंचना हे असले 'छळ' होते. मला वाद्यवादन, बागकाम, लेखन या व्यावसायिकांच्या हिशोबानं 'फालतू' गोष्टीत फारच रस होता. पुढं पुढं वडलांनी माझा नाद सोडून दिला. त्यांनी कधीच मनाला लावून घेतलं नाही. मीहि माझ्या मार्गानं गेलो. मी प्राध्यापकाची नोकरी करू लागलो, माझ्या आवडीच्या क्षेत्रात मी बऱ्यापैकी नाव मिळवलं. आज मी छातीठोकपणानं सांगू शकतो की, जगात माझ्याइतका सुखी माणूस कुणी असूच शकणार नाही ! माझ्या जीवनाची वेल मी अशी काही बहरून टाकली आहे की, एकाच कलमी गुलाबाच्या झाडावर जशी निरनिराळ्या रंगांची फुलं येऊ शकतात तसं माझं जीवन मी विविध कलागुणांनी भरून टाकलं आहे. अखेर जीवन म्हणजे काय (आचार्य अत्र्यांच्या भाषेत) वाहतं पाणी ! डबकं नव्हे. मुलं, बायको, भावंडं यांच्या बाबतीतहि मी अनुभवानं शिकलो. ते म्हणजे त्यांचा कल बघून त्यांना मार्गदर्शन करायचं. आपल्या हुकुमशाहीच्या जोरावर ज्या घरात निर्णय घेतले जातात तिथल्या व्यक्तीचं जीवन खुरटून जातं. तणाव वाढतात. आयुष्य दुःखी होतं. पण माणसं याचा विचारच करत नाहीत. प्रत्येक व्यक्ती ही इतरांपासून अगदी

वेगळी असते. जगात दोन अगदी सारखी दिसणारी, सारखं वागणारी, सारखी बुद्धिमत्ता असणारी माणसं कधीच सापडणार नाहीत, हे एक शास्त्रीय सत्य आहे. याचा अर्थ असा की, प्रत्येकाचं व्यक्तिमत्व अगदी वेगळं आहे. मग त्याच्यवर गोष्टी लादता क? जो पुढं शेळी म्हणून जगणार आहे त्याला वाघाचा मुखवटा चढवता का ! त्यातं आयुष्यभर हसं होईल यात तिळमात्रहि शंका नाही.

## आंधळं अनुकरण नको !

टेलिव्हिजनचे कार्यक्रम मी नियमानं पहातो. शुक्रवारचा 'फूल खिले हैं गुलशन् गुलशन्' या कार्यक्रमातल्या एक दोन सिनेनटांच्या मुलाखती मी मन लावून पाहिल्यात, त्यांचं म्हणणं एकच. एकदा सिनेमा जर हिट ठरला तर त्याची नक्कल करणारा दुसरा सिनेमा काढायचा. एक बॉबी सिंनेमा, किशोरावस्थेतून तारुण्याकडे जाणाऱ्या नटनटींमुळे हिट ठरला की तसाच दुसरा काढायचा. तो चालतोच असं नाही. मग झाली यांची काळजीला सुरवात. नटांचं असंच ! एकादा नवा विनोदी नट चमकू अशा ईर्षेनं पुढं यायला लागला की त्याला आगा, भगवान, चार्ली चॅप्लीन, बस्टर कीटन, लॉरेल हार्डी असल्या गाजलेल्या नटाच्या नकला करायला भाग पाडलं जातं. एका विनोदी नटाला विचारलं, की तुम्हाला सदैव हाफ पँट मध्येच का दाखवलं जातं ? त्यानं उत्तर की, 'माझा हाफ पँटमधला एक रोल फार हिट ठरला. झालं ! माझ्या नशिबी हाफ पँट आली.' त्या नटाची ही शोकांतिका ! वास्तविक त्याची स्वतःची स्टाईल काय आहे हे कुणी पहायला हवं. त्याप्रमाणं त्याला काम द्यायला हवं. पण हा धोका पत्करतो कोण ? आले डायरेक्टरांच्या मना तेथे कोणाचे चालेना ! अशा नकला करणारे नकली राजकपूर, नकली दिलीपकुमार आयुष्यांत अयशस्वी झाले नाहीत तरच नवल ! दुसरं असं, प्रत्येकाची अशी स्वतःची अस्मिता. लता मंगेश-करच्या चालीवर 'प्रतिलता' निघाल्या आहेत. मला वाटतं त्या लताच्या 'प्रती' आहेत म्हणजे कॉप्या आहेत. छे, कुणाची कॉपी असणं यासारखं दुःख जगात दुसरं नाही. जगप्रसिद्ध डायरेक्टर्स हेच म्हणतात. त्यांच्याकडे

येणाऱ्या होतकरू नटांच्या डोक्यातून हे ' प्रति ' पण काढून टाकणं हीच त्यांची डोकेदूखी असते. इथं मी एक गमतीदा उदाहरण देतो. स्कूटरच्या कारखान्यात ज्या स्कूटर्स तयार होतात त्याची प्रत्येकाची प्रकृती वेगळी असते. माझी स्कूटर आणि दुसऱ्या कुणाची स्कूटर अगदी नव्या असल्या तरी त्यांचा परफॉर्मन्स वेगळा सापडतो. कारणं अनेक असू शकतील. तेव्हा या उदाहरणाकडे मर्यादित अर्थानं पाहिलं तर असं लक्षात येईल की, तुम्हाला जर कितीतरी अब्ज सख्खे भाऊ असतील तर त्यातला एकसुद्धा दुसऱ्यासरखा असणार नाही. तेव्हा याचा अर्थ एकच आहे. स्वतः कोण आहोत हे समजून घ्या आणि त्याप्रमाणं आपलं व्यक्तिमत्व वाढवा किंवा सुधारा. प्रत्येक आईनं, प्रत्येक वडलानं हा विचार मनावर ठामपणानं ठसवला पाहिजे की, माझ्या मुलांची आवड काय आहे, त्यांची इच्छा काय आहे त्याप्रमाणं मी त्यांना वाढवेन. त्यातच त्यांची भरभराट होणार आहे. एकाद्या मुलाचं चित्रकलेचं अंग असेल तर तो सारखी चित्रच काढत बसेल. मग त्याची ती कला जोपासा. एकाद्याला गायक व्हायचं असेल तर त्याची ती कला जोपासा नवे फुटणारे धुमारे मुळातच खुडू नका. जबरदस्तीनं एखाद्यांला एकाद्या क्षेत्रात तुम्ही लोटलंत तर नाइलाज म्हणून तो त्या क्षेत्रात काम करेल. त्याची वृत्ती सरळ असेल तर तो दिलेलं काम मन लावून करेलहि पण त्या क्षेत्रात काही नेत्रदीपक असं तो बिलकूल करणार नाही. मग तो निराश होईल आणि सहकाऱ्याच्यावर किंवा कनिष्ठांच्यावर सूड घेत बसेल.

## वेळीच सावध व्हा !

काही धाडसी माणसं यातूनहि मार्ग काढतात. पंधरा-पंधरा वर्षे एखाद्या युनिव्हर्सिटीत खर्डेघाशी करणारा माणूस त्या नोकरीला लाथ मारून विनोदी नट म्हणून चमकतो. वीस वर्षे मिलिटरी अकौंटस्कडे नोकरी करून एकादा माणूस सुप्रसिद्ध गायक व्हायचं म्हणून नोकरी सोडून नाव कमावतो. केव्हा ते आधीच विचारात घ्या. फार उशीर करू नका. कारण जितका उशीर, जितकं वय वाढतं तितकं धाडस करणं टाळलं जातं. माणूस लंगडा बनत जातो. तेव्हा वेळीच सावध व्हा. माणसाच्या अमाप सुप्त शक्तींपैकी

तो फक्त टक्केच वापरतो. उरलेल्या सुप्तच राहतात. प्रत्येक माणसाला या शक्ति असतात त्याचा उपयोग करा. उद्योगी रहा. म्हणजे चिंता करायला वेळच सापडणार नाही. आणि शेटी लक्षात ठेवा–

आंब्याचं झाड पिंपळाच्या झाडासारखं नसतं. वडाचं झाड गुलाबाच्या झाडासारखं नसतं. तद्वतच तुम्ही स्वतः कुणी वेगळेच आहात. तुम्ही या जगात नवीनच आहात. तुमच्यासारखं दुसरं कुणी असूच शकणार नाही. तेव्हा तुम्ही वेगळेच राहू. वेगळेच जोपासले जा. जिद्द बाळगा आणि धडाडीनं पुढं या.

## नकारात्मक भूमिका टाळा

प्रत्येक माणसाची विचार करण्याची एक एक प्रवृत्ती असते. कुणाची नकारात्मक असते त्याला इंग्रजीमध्ये निगेटिव थिंकिंग म्हणतात. त्याविरुद्ध पॉझिटिव्ह थिंकिंग नावाचा प्रकार आहे. कुठल्याहि गोष्टीचा नकारात्मकच विचार करून आयुष्य दुःखी करण्याची सवय कित्येकांना असते. उदाहरणार्थ, एकाद्या कामावर त्यांना नेमलं तर ते कुरकुर करायला लागतात. ‘हाताखाली कोणी माणसं नसतांना हे एवढं काम करणं अवघड आहे.’ एखाद्या नालायक शेतकऱ्याला जर एखादी रेताड जमीन वाट्यात मिळाली तर तो सारखा मिळाली तर तो सारखा शिव्या देत बसतो. नशिबाला बोल लावत बसतो. म्हणतो, ‘या असल्या नापीक जमिनीत मी काय दिवे लावून दाखवणार ?’ एकादा शाळेचा मुख्याध्यापक म्हणतो, ‘हाताखाली हे असले चुकार मास्तर आहेत. मी काय रिझल्ट सुधारून दाखवणार दगड ?’ एकाद्या कामाची इच्छा नसलेल्याला तुम्ही काही यंत्रदुरुस्ती सांगितली की तो म्हणतो, ‘हत्यारं नाहीत, हाताखाली मदतनीस नाही, कसं दुरुस्त करायचं हे यंत्र ?’ ही असली नकारात्मक वृत्ती व्यक्तीचा विकास कधीच करू शकत नाही. आपलं काम नावडीनं करणं याला गमतीनं पाट्या टाकणं असं म्हणतात. ‘कसली रद्दी बॅच आहे ही विद्यार्थ्यांची ! मी आपला वर्गात पाट्या टाकून येतो. अशी नकारात्मक भूमिका घेणारे शिक्षक कमी नाहीत. कलाकार आणि पाट्या टाकणारा कामगार यातील एक फरक आपण लक्षात घेतला

पाहिजे. कलाकार हा जीव ओतून एकाद्या कलेत रस घेणारा असतो, पण पाट्या टाकणारा पाट्या टाकण्यासाठीच असतो. कलावंत एकाद्या कलेला आपलं जीवन वाहून टाकतो. तिथं आवड असते. दुर्दम्य महत्त्वाकांक्षा असते. कला पूर्णत्वाला नेण्याची जिद्द असते. मार्गात येणाऱ्या सर्व अडचणींना तोंड देऊन पुढं जाण्याची इच्छाशक्ती आणि चिकाटी असते. एकदा एक फार मोठ्या व्हायोलिनवादकाचं वादन चालू असतांना व्हायोलिनची एक तार तुटली. दुसरी जवळ नव्हती. त्यानं आपलं वादन उरलेल्या तीन तारांवरच पुरं केलं. तो रडत बसला नाही, हे उदाहरण देण्यामागं एक फार मोठा आशय मला सांगायचा आहे. तुमच्या जीवनात काही कमतरता असेल तर रडत बसू नका. त्यावर मात करा आणि काहीतरी विधायक करून दाखवा. जीवनात काही त्रुटी असली की लोक खंतावून जातात. न्यूनगंड त्यांना पार ग्रासून टाकतो. ते सतत मागं रहातात. स्वतःचं आयुष्य तर दुःखी करून घेतातच आणि कुटुंबातल्या व्यक्तींनाहि छळतात, हाताखालच्या लोकांना गांजून टाकतात.

## सुखी जीवनाची गुरुकिल्ली

'मला वरची जागा मिळायला दहा वर्षे लागली, हाताखालच्याला निदान तितकी वर्षं झाल्याशिवाय मी वरची जागा मिळूनच देणार नाही.' अशी भूमिका घेऊन चलाख, हुशार माणसाला दाबून टाकणाऱ्या कितीतरी व्यक्ति सापडतात. हाताखालचा जर कुढत बसणारा असला तर तो जीवन दुःखी करून घेतो. त्यानं हा विचार धरला पाहिजे की, नोकरी म्हणजेच जीवन नाही. तिथं मन लावून काम करावं, बाहेर आपलं जीवन, इतर कशात तरी रस घेऊन फुलवावं. आपल्याला वाचनाचा छंद असेल तर हजारो पुस्तकं वाचून काढावीत. काही विधायक करावं, पण त्या अधि-काऱ्याशी भांडत बसू नये. कामात चुकारपणा करू नये. त्यामुळं त्या अधि-काऱ्याच्या मनात कालांतरानं चांगली भावना निर्माण होऊ शकते. थोडक्यात काय, आपल्या वाट्याला आलेल्या गोष्टींबद्दल कुरकुर करत राहू नये. सतत उद्योगी असणारी माणसं अशी कुरकुर कधीच करत नाहीत. त्यांना

वेळच नसतो. एकाद्या माणसाला धंद्यात अडचणी येत असतात. भरपूर पैसा, कुशल कामगार, भरपूर ऑर्डर्स. असलं असेल तर कुणीहि धंदा करेल. पण खरी परीक्षा अडचणीतच होत असते यशस्वी उद्योगपती अडचणींवर चांगल्या प्रकारे मात करू शकतात. जितके ते अडचणीत येतात तितके तावून सुलाखून त्यातून बाहेर पडतात. तेव्हा जीवन यशस्वी आणि सुखी करायचं असेल तर नाकारात्मक भूमिका सोडून दिली पाहिजे. हेलेन केलर आंधळी आणि बहिरी होती. पण ती रडत बसली नाही. तिनं अत्यंत नेत्र-दीपक कार्य करून ठेवलं. सुप्रसिद्ध कवि मिल्टन आंधळा होता. बिथीवेन हा संगीतकार बहिरा होता, तरीपण त्यानं उत्कृष्ट संगीतरचना केल्या. टॉल-स्टॉयचं जीवन अत्यंत कष्टमय होतं. पण उत्कृष्ट कादंबऱ्या लिहिल्या. त्या मानानं आपण आपली स्वतःची त्यांचेशी तुलना करा. आपल्याला परमेश्व-रानं सारे अवयव शाबूत ठेवून जन्माला घातलंय. जमलं तर मोठं कार्य करा, नाहीतर निदान चांगलं जीवन तरी जगा, जीवनातल्या चांगल्या गोष्टीत रस घ्या आणि आनंदी व्हा. तक्रारखोर माणसाला जरी तुम्ही अगदी चांगल्या परिस्थितीत नेऊन ठेवलंत तरी तो तक्रारीच करत राहणार. याउलट ज्याला सुखी जीवनाची खरी गुरुकिल्ली सापडली आहे तो कुठल्याही परिस्थितीत मनाचं स्वास्थ, आनंद टिकवून धरतो. जीवनात प्रत्येकाला यश मिळतंच असं नाही, पण प्रवृत्ती आनंदी ठेवा. एखादे वेळी समजा आपण अयशस्वी झालो तर निदान आपल्याला, 'आपण मन लावून कष्ट केले' हे समाधान तर लाभतं की नाही? आयुष्यातल्या यशातून शिकणारे मूर्खच असतात. अपयशातून जे शिकतात तेच खरे शहाणे. एकदा सिनेमा यशस्वी झाला की निर्माते तसाच सिनेमा पुन्हा काढतात आणि व्यावसायिकदृष्ट्या मार खातात. पण जर एखादा चित्रपट पडला तर त्यातून बोध घेऊन ते सुधारू लागले, तर फार पुढं जातात. माणसाच्या आयुष्यातले निरनिराळे टप्पे असतात. साधारणतः वयाची पस्तिशी ओलांडायच्या सुमारास त्याचा सारा भर कर्तृत्वावर असतो. त्या वेळी विचार पक्व असतातच असं नाही. तारुण्याचा जोष असतो, तडफ असते. साधारणतः माणूस चाळीशीला आला की मग विचारी होत जातो. प्रत्येक गोष्टीचा साधकबाधक विचार करायला लागतो. याच सुमारास कित्येक

लोकांना नैराश्य यायला लागतं. आयुष्यातल्या मोलाच्या काळात धडपड करूनही जर एखाद्याच्या वाट्याला असफलता यायला लागली तर त्याच्या मनात एक तऱ्हेची पोकळी निर्माण व्हायला लागते. स्पर्धेच्या या जगात भल्याबुऱ्या स्पर्धेमध्ये तो मागं टाकला जातो. मग तो स्वतःला शिव्या द्यायला लागतो. स्वतःचं नशीब फुटकं म्हणून प्रत्येक ठिकाणी स्वतःला कमी लेखायला लागतो. हे वय असं असतं की एकाच वर्गात शिकलेले मित्र काही वेळा फार वरच्या जागेवर गेलेले असतात. व्यवसाय करणारे काहीजण मोटारीतून फिरायला लागलेले दिसतात. त्यांच्याशी तुलना केली तर आपण फार कमनशिबी आहोत असं त्याला वाटायला लागतं. तो मनातल्या मनात कुढायला लागतो. त्याचं स्वतःचं आणि त्याच्या घरचं जीवन तो बिघडवून टाकतो. अशा माणसाला मी मूर्ख म्हणतो. आपलं नशीब दुसऱ्याच्या नशिबाला घासून आपण मोठे किंवा सुखी किंवा यशस्वी होणार आहोत का ? हा प्रश्न, हा माणूस स्वतःला विचारत नाही. पण त्याच जागी एखादा शहाणा माणूस असेल तर तो म्हणेल, 'ठीक आहे. आलीय ना ही परिस्थिती आपल्या वाट्याला ? मग ती बदलायचा शक्यतो सर्व प्रयत्न आपण करायचा. पण रडत नाही बसायचं.

## तोडला तरु फुटे–

थोर पुरुषांची चरित्रं शाळेपासून नेहमी वाचावीत असं मला सर्वांना सुचवावंसं वाटतं. प्रत्येक थोर पुरुष हा फार मोठा झगडा देऊन वर आलेला असतो. मी तर असं म्हणेन, शहाण्या माणसाचं जीवन जितकं अडचणींनी भरलेलं असतं तितकी तो त्यातून सपाट्यानं प्रगती करून इतरांना दाखवतो. ज्या राष्ट्रांना युद्धाचा तडाखा सारखा बसत असतो ती राष्ट्रं त्यातून फार थोड्या काळात झपाट्यानं वर येतात. 'की तोडला तरू फुटे जोमाने' हे झाडांच्या बाबतीत खरं आहे तर माणसाच्या बाबतीत का खरं नाही ? एक छोटीशी तुलना मला सुचते. माझ्या घरी शंभर गुलाब आहेत. गुलाबाचं फूल तोडताना जर चार-सहा इंच लांब देठ कापला नाही तर नवी चांगली

चिं...५

फूट फुटत नाही. म्हणजे याचा अर्थ काय ? झाडाला छाटलं तरच ते जोरानं वर येतं. माणसांमध्ये एखादी त्रुटी आहे असं त्याला जर वाटलं तरच तो पुढं जातो. तुम्ही जर अगदी सुखात लोळायला लागलात तर तुमची प्रगती होणारच नाही. माझं व्यक्तिगत उदाहरण मी सांगतो. वयाची चाळिशी उलटली तरी मला जीवनात स्थैर्य मिळालेलं नाही. सतत अपयश येत राहिलं. मी फार खंतावलो. मी विचार केला, माझ्यावर येणारी संकटं दैव फिरलं असल्यामुळं मी टाळू शकतोय का ? नाही. मग भ्या का ? मी निर्धारानं माझ्या अडचणींशी मुकाबला करायला लागलो. मी अगदी कोंडीत सापडलेलो होतो. मानहानी, पैशाची नासाडी, सदोदित अपयश, मानसिक छळ या गोष्टी माझ्या अगदी हात धुऊन मागं लागलेल्या होत्या. कधी कधी माझ्यावर शारीरिक हल्ले होण्याचंही मला भय होतं. मला काही वेळा वेड लागायची पाळी यायची. पण मी हिंमत सोडलेला माणूस नव्हतो. हिंमते मर्दा तो मदद खुदा ! मी शांतपणानं प्रत्येक प्रसंगाला तोंड देत होतो. माझा मानसिक समतोल मी कधीही बिघडून दिला नाही. घरी-दारी सर्वत्र माझ्यावर सतत संकटांचा मारा होत होता. घरच्या लोकांचा आनंद मी कधी घालवला नाही. त्यात मी बी. ई. च्या परीक्षेला बसत होतो. मी या साऱ्या संकटांना पद्धतशीरपणानं तोंड दिलं. मी काय केलं ? मी अत्यंत उद्योगी राहिलो. दिवसाचा मिनिट आणि मिनिट मी कारणी लावला. मनाला विरंगुळा आणि मन सतत कुठंतरी गुंतलेलं राहावं म्हणून मी छंद लावून घेतले. आकाशवाणीवर मी नियमित बासरीवादनाचे कार्यक्रम करू लागलो. साहित्यिक लिखाण मी अधिक जोमानं करायला लागलो. घरी गुलाबाची फुलबाग फुलवली. परीक्षेच्या सुमारास दिवस-रात्र अभ्यास करून बी. ई. ला पहिला वर्ग मिळविला. माझ्या जीवनातल्या अडचणींवर मी चिकाटीनं विजय मिळविला. माझ्या भोवतीचं वातावरण निवळलं. मग मी दुप्पट उत्साहानं कामाला लागलो. माझं लोकांना सतत हेच सांगणं आहे. उद्योगी पुरुषाला विजयश्री नेहमी माळ घालते. आपली जिद्द माणसानं अशी ठेवली पाहिजे की, मी वाळवंटात फेकला गेलो तरी आनंदी राहीन आणि धडाडीनं पुढं जाईन. इस्राईलनं वाळवंटातूनच एक सुजलाम् सुफलाम् देश निर्माण केला ! पुलावर काम करणाऱ्या एका इंजिनिअरचं लग्न झालं.

त्याची नवोढा वधू त्या जंगलातल्या झोपड्यात त्याच्याजवळ राहून कंटाळली. तिथं खूप आदिवासी लोक होते. ती सुरुवाती सुरुवातीला त्यांना टाळायची. पुढं तिच्या लक्षात आलं, हे जीवन आपल्या वाट्याला आलंय ना ? मग ते सुसह्य करू या. तिनं त्या आदिवासीत जाऊन समाजकार्य सुरू केलं. आदिवासींनी तिला अक्षरशः डोक्यावर घेतलं ! तेव्हा वर पाहिलं की शहाण्या माणसाला आकाशातले सुंदर तारे दिसतात. मूर्खाला दलदलीतला चिखल दिसतो. तेव्हा जीवनाचं एक तत्त्वज्ञान ठरवा. आहे त्या परिस्थितीत सर्वांत चांगलं काही करता आलं तर करा. कुणाचा द्वेष करू नका. वाटलं तर लोकांना मदत करा. शत्रूसुद्धा अशा त्यांना संकटात केलेल्या मदतीनं विरघळतो. सतत उद्योगी राहा आणि स्वतःला कधी कमी लेखू नका. लक्षात ठेवा, माणूस आपल्या सुप्त शक्तीतल्या फार मोठ्या साठ्यातला अगदी ५ ते १० टक्के भागच वापरतो. उरलेला साठा तुम्ही वापरायचा का प्रयत्न करत नाही ?

## अनाथांची दुःखं !

माझ्या माहितीचे एक गृहस्थ आहेत. सध्या त्यांचं वय सत्तर आहे. त्यांनी व्यवसायात खूप पैसे मिळविले. काही घालवले. एकंदरीत त्यांचं जीवन अतिशय यशस्वी झालेलं आहे. मी त्यांचं जीवन खूप वर्षं जवळून पाहिलेलं आहे. त्यांच्या बालपणातल्या गोष्टी त्यांनी आम्हाला सांगितलेल्या आहेत. त्यांची अत्यंत हलाखी होती. एका छोट्या खेड्यात त्यांची शेती आहे. त्यावर खूपच कर्ज करून ठेवलेलं होतं. वडिलांनी अवर्षणं, दुष्काळ याला तोंड देऊन जे धान्य पदरात पडायचं त्याची सावकाराला धन करावी लागायची. लहानपणी दूध प्यायला मिळायचं नाही. कारण घरच्या गाई-म्हशींचं दूध पैशासाठी विकावं लागायचं. काही वर्षांनी त्यांचे वडील वारले. यांचं वय त्यावेळी अवघं चौदा वर्षांचं होतं. आईनं त्यांना परगावी एका मोठ्या माणसाकडे ठेवून दिलं. घरगड्याला करावी लागतील ती सारी कामं त्यांना करावी लागायची. मालकांच्या मुलांना शाळेत पोचवणं, परत घरी आणणं, दळण आणणं, बाजार करणं आणि फावल्या वेळेत शाळेला

जाणं ! एवढं करूनही या लहान मुलाला परीक्षेत चांगले मार्क पडले. मालकांचा मुलगा नापास झाला. त्यामुळं हे बरं दिसणार नाही म्हणून त्या माणसानं या मुलाला दुसरीकडे जायला लावलं. हा चुणचुणीत मुलगा अक्षरशः माधुकरी मागून राहू लागला. एका घरी झोपायचं आणि रोज नव्या घरी जेवायचं. त्यावेळची प्राध्यापक मंडळी फार दिलदार स्वभावाची होती, पण त्यांचा दिलदार स्वभाव त्यांच्या बायकांना आवडायचा नाही. दुसऱ्याला मदत करण्याची त्यांची इच्छा नसायची. मग शिव्याशाप देत जेवण मिळायचं. एक धोतर आणि एक शर्ट इतके कपडे असायचे आणि झोपायला मोठ्या वाड्याची देवडी असायची. शाळेतली मुलं ' भिकारडा ' म्हणून चेष्टा करायची. ' वारकऱ्या ' म्हणून डिवचायची, ' माधुकऱ्या ' म्हणून अवहेलना करायची. पण या मुलानं हे सारं सहन केलं. एवढ्या लहान वयात या मुलानं घर सोडलं होतं. आई असूनही हा पोरका होता. पण इतर लोकांना सतत मदत करून, त्यांची कामं करून घरोघरी या मुलानं प्रेमाचं असं स्थान मिळवलं व पुढं स्वतःचा व्यवसाय सुरू केला. इंजिनिअरिंगचं शिक्षण गरिबीमुळं नशिबात नव्हतं. व्यवसायात अमाप पैसा मिळविला. त्यानं ज्या ज्या लोकांच्या घरी कामं केली ती माणसंही त्याचं कौतुक करू लागली. मग त्यानं आपल्या शेतीवरचं कर्ज फेडून टाकलं. आईला आपल्याजवळ राहायला आणलं. आई अतिशय म्हातारी होऊन गेली होती. ती थोड्याच दिवसांत वारली. अत्यंत सुखात असताना आईचं छत्र गेलं; त्या गृहस्थाला अत्यंत दुःख झालं. आपल्या आई-वडिलांची माया, त्यांचं प्रेम कधीच फारसं मिळालं नाही म्हणून त्यास वाईट वाटायचं. त्याचे गरिबीत असलेले दोन नातलग अचानक वारले. त्यांच्या लहानग्या मुलांना आई-वडील कसले ते दिसलेही नाहीत. या गृहस्थांना आई-वडिलांचं प्रेम मिळालं नाही म्हणून फार वाईट वाटायचं. पण ही छोटी छोटी मुलं तर अशी होती की, त्यांना समजायला लागायच्या आधीच त्यांचे आई-वडील वारलेले होते. त्यांनी विचार केला, मला आई-वडिलांचं सुख काही काळ तरी मिळालं. या दुर्दैवी मुलांना तर आता आयुष्यभर दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहात बसावं लागणार. त्यांचं हृदय हेलावून गेलं. त्यांनी त्या लहानग्या मुलांना आपल्याजवळ ठेवून घेतलं. पुढं त्यांची शिक्षणं करून त्यांना रेघे-

रूपाला लावलं. इतकंच नव्हे तर त्यांची लग्नकार्यं केली. त्यांना नोकऱ्या मिळवून दिल्या. या मदतीमुळं त्यांचं दुःख हलकं झालं. दुसऱ्याच्या चेहऱ्यावरचे अश्रू पुसून त्यांच्या चेहऱ्यावर हसू आणण्यात माणूस स्वतःचं दुःख विसरतो. अनाथाश्रमातला एक छोटा मुलगा शाळेत शिकायला जायचा. तिथं पोरका म्हणून सगळी मुलं त्याला चिडवायची. त्याच्या हलक्या दर्जाच्या कपड्यांना हसायची. त्याला फार दुःख व्हायचं. शाळा सुटली की अंगावर काटा यायचा. फार काळजी वाटायची. कधी कधी वाटायचं, जीव द्यावा. पण त्या छोट्या मुलाच्या डोक्यात एक कल्पना आली. त्यानं या कुचेष्टेकडे दुर्लक्ष करून संधी सापडेल तेव्हा इतरांना मदत करायची वृत्ती जोपासली. हळूहळू विरोध कमी होत गेला आणि तो मुलगा सर्वांना हवाहवासा वाटू लागला.

## दुसऱ्याचं सुख आपलं सुख !

आजचं जीवन अतिशय धकाधकीचं व्हायला लागलेलं आहे. यंत्रयुगानं मानवाची प्रगती निश्चित झालेली आहे. पण तो खोट्या सुखाच्या आणि प्रतिष्ठेच्याही नकळत मागे पळतो आहे. त्याला मनाची शांती लाभत नाही. आपल्या देशात सध्या तरी काही लोक समाधानी आणि काळजीपासून मुक्त असे सापडतील. पण पाश्चात्य देशात तर यंत्रांनी मानव पार गिळून टाकलेला दिसतो. ऐहिक सुखोपभोगाच्या मागे तो अतिशय लागलेला आहे. या 'मॅड रेस'मुळं तो कुठंतरी मागं टाकला जातो आहे. त्यामुळं त्याचं जीवन अधिकाधिक दुःखी, एकलकोंडं आणि स्वार्थी होत आहे. आपण दुसऱ्यासाठी काही केलं पाहिजे ही भावनाच मानवाच्या मनातून एके दिवशी निघून जाईल की काय, अशी मला भीती वाटते. हे सारे पैसे आपली परिस्थिती इतरांपेक्षा जास्त चांगली दिसावी म्हणून मिळवायचे, नवरा आणि बायको, दोघांनीही नोकऱ्या करायच्या. मग दुसऱ्या कुणाला मदत करायची म्हणजे थोडाफार पैसाही कदाचित घालवावा लागेल. मग त्याच्यासाठी का हे करा? सारं काही स्वतःसाठी करा ही भावना फार वेगानं जोपासली जात आहे. जिकडे तिकडे तुम्हाला स्वार्थी आणि मतलबी लोकांचा भरणा दिसेल. दोन

बरोबर नोकरी करणाऱ्या मैत्रिणींची ही हकीकत ऐका म्हणजे माणूस स्वार्थाच्या बाबतीत किती पुढं गेला आहे ते पाहायला मिळेल. या दोन्ही मैत्रिणींचे मुलगे पुण्याच्या शाळेत पहिल्या इयत्तेत घालायचे होते. एक मैत्रीण अतिस्वार्थी आणि महत्त्वाकांक्षी. दुसरी इतरांना मदतीचा हात पुढं करणारी. प्रवेश मिळविण्यासाठी आधी फॉर्म मिळणं मुष्किल असतं हे साऱ्यांना माहीत आहे. त्या सालस बाईनं दोन फॉर्म्स एका चांगल्या शाळेतल्या प्रवेशासाठी मिळविले आणि ती आपल्या मैत्रिणीकडे द्यायला गेली. तिनं एक फॉर्म त्या स्वार्थी मैत्रिणीला दिला. तिनं दुसऱ्या शाळेचा एक फॉर्म गुपचूप आणून आधीच भरला होता. हे तिनं त्या सालस मैत्रिणीला सांगितलं नाही. कारण जर तिनंही फॉर्म भरला असता तर स्पर्धा वाढली नसती का? अद्यापही खेड्यात किंवा लहान शहरात एकमेकांना मदत करायची, बऱ्या-वाईट प्रसंगी मदतीला धावून जायची प्रवृत्ती शिल्लक आहे. दुसऱ्याला मदत करण्यामध्ये जर उपकाराची भावना ठेवली नाही, जर कसलीही अपेक्षा ठेवली नाही तर त्यासारखा निर्भेळ आनंद दुसरा कशात नाही. मी तर म्हणेन जसं रवीन्द्रनाथ टागोरांनी म्हटलं होतं, 'वर्क इज वर्शिप' म्हणजे 'काम हीच भक्ती' आहे तसं, दुसऱ्यांना मदत करणं हीच भक्ती आहे. प्रसिद्ध इंग्रजी वचन 'लव्ह दाय नेबर' म्हणजे 'शेजाऱ्यांवर प्रेम करा' हे काय सांगते? दुसऱ्यांचं जीवन सुखी करताना माणूस स्वतःची दुःखं नकळत विसरून जातो. आज याच गोष्टीची खरी जरूर आहे. या जीवनात प्रत्येक माणूस कुठंतरी अपयशाचा तडाखा खातो आहे आणि सदैव कुरकुरत बसतो आहे की 'या जगात मला कुणी समजून घेतलं नाही. माझ्या-कडे कुणाचं मुळी लक्षच नाही.' लोकांची सतत सहानुभूती मागत बसणं यासारखी दुसरी वाईट गोष्ट नाही. तेव्हा आपमतलबीपणा, स्वार्थीपणा, कुरकुर करण्याचा स्वभाव ह्या गोष्टी माणसाचं व्यक्तिमत्त्व अत्यंत क्षुद्र आणि खुरटं बनवतात. त्या व्यक्तिमत्त्वामध्ये 'मी' शिवाय दुसरं काहीच दिसत नाही. जीवनाचं खरं रहस्य उदात्त वागणुकीमध्येच आहे. विद्या ही जशी दिल्यानं वाढते तसं सुख हे दुसऱ्याला दिल्यानं वाढतं– म्हणजे आपल्या वाट्याला जास्त येतं. नोकरीत मोठ्या पदावर असणाऱ्या अधिकाऱ्याला तो नोकरीत असेतोवर फार मान दिला जातो. त्याचा प्रत्येक शब्द झेलण्यात

हाताखालील माणूस धन्यता मानीत असतो. पण त्या पदावरून तो अधिकारी निवृत्त झाला की कुत्रासुद्धा त्याच्याजवळ फिरकत नाही. अधिकाराच्या जोरावर तो माणूस दुसऱ्याला खाली ओढणं, दुसऱ्याला कमी लेखणं, स्वतःचं भलं करण्यासाठी हाताखालच्यांचा वापर करणं यापलीकडे काहीही करत नाही. त्यामुळं हा स्वार्थी माणूस उणे त्याचा अधिकार बरोबर शून्य असंच समीकरण सामान्य माणूस तयार करतो. कालपर्यंत मोठ्या पदावर असलेले हे मोठे लोक निवृत्त झाले की मोडीच्या भावानंसुद्धा बाजारात विकले जात नाहीत.

## जे का रंजले गांजले

याविरुद्ध मला गुरुस्थानी असलेल्या, इंजिनिअरिंग कॉलेजच्या एका प्राचार्यांचं उदाहरण पाहा. मी ज्यावेळी त्यांच्या सहवासात आलो त्यावेळी त्यांचं निगर्वी वागणं, शिस्तबद्धता, वक्तशीरपणा, निर्व्यसनी वर्तणूक हे सारं पाहून मी नकळत त्यांच्याकडे ओढला गेलो. सुरुवातीला त्यांच्याबद्दल मला भीती वाटायची. पण आतून हा माणूस अत्यंत भावनाशील आहे याची मला खात्री पटली. त्यांनी मला बोलण्याच्या ओघात विचारलं, 'तुम्ही दुसऱ्या-करिता काय करता ?' मी काहीच करत नव्हतो. माझं झालं की संपलं. मी नकारार्थी उत्तर दिल्यावर ते म्हणाले, 'मग या जगात तुमची किंमत शून्य आहे. तुम्ही किती माणसं जोडली याला फार महत्त्व आहे. तुम्ही मदतीचा हात पुढं केलात की असंख्य माणसं तुम्हाला आपलं म्हणतील.' हे त्यांच्या-बाबत खरं आहे. ते जिथं जातात तिथं त्यांना भेटायला लोक उत्सुक असतात. स्वतःच्या घरात रमण्यापेक्षा हा गृहस्थ लोकांत रमतो. गांजले-ल्यांच्या डोळ्यांतले अश्रू पुसण्यात स्वतःला धन्य समजतो. आज अधिकारा-वर आहेत; पण उद्या अधिकारावरून निवृत्त झाले तरी लोक त्यांना विसरायचे नाहीत. मला त्यांच्या सहवासात काय दिसलं ? आमच्या संस्थेच्या एका पट्टेवाल्याला कसला तरी ताप यायचा. तो औषध घेऊनसुद्धा हटत

नव्हता. त्यांच्या माहितीचे एक नामवंत वैद्य होते. त्यांच्याकडून औषधं घेऊन त्यांनी त्या पट्टेवाल्याला घरी जाऊन ती औषधं दिली. दुसरा एखादा म्हणाला असता, ‘ तो पट्टेवाला आहे, मी प्राचार्य आहे. मरेना का तो तिकडे ! आपल्याला काय करायचं आहे ?’ मला ते एकदा म्हणाले, ‘ मज-बरोबर जरा चलता का ? आपल्या संस्थेतील एक प्राध्यापक सर्दीनं नेहमी फार हैराण होतात असं मी ऐकलंय. ’ मी त्यांच्याबरोबर गेलो. ते प्राध्यापक सर्दीनं खरोखरच हैराण झालेले होते. सहा महिने त्यांना हा त्रास होता. प्राचार्य त्यांच्या बायकोला म्हणाले, ‘ त्यांच्या संपूर्ण पाठीला कमरेपर्यंत तुम्ही तेल लावून रोज मालिश करीत जा. मी दाखवतो कसं मालिश करायचं ते. ’ त्यांनी स्वत: त्यांच्या पाठीला तेल लावून मालिश करून दाखविलं. मग नाकानं पाणी कसं प्यायचं ते दाखवलं. त्या हाताखालच्या माणसाला मदत करून त्यांना काय मिळणार होतं ? मी त्यांच्याबरोबर सहजच गेलो होतो. मी हे सारं पाहून खजील झालो. मी चुकूनसुद्धा दुसऱ्याच्या जवळ जात नव्हतो. आपण बरे आणि आपला संसार बरा ! आपण दुसऱ्याला मदतही करायची नाही आणि दुसऱ्याकडून मदतीची अपेक्षाही करायची नाही. मला माझी स्वत:ची लाज वाटू लागली. तेव्हापासून माझ्या वागण्यात बदल झाला– अगदी नकळत. पूर्वीची स्वत:च्या अंगाला काहीही चिकटवून न घेण्याची प्रवृत्ती मी सोडली. स्वत:हूनच माझ्याभोवती मी उंच उंच भिंती निर्माण करून घेतल्या होत्या. त्या हळूहळू काढून टाकल्या. तेव्हा माझं सर्वांना सांगणं आहे, ‘ अपेक्षा न धरता दुसऱ्याला सढळ हातानं मदत करा.’ खरं म्हणजे ही शिकवण निदान भारतीय लोकांना नवीन नाही. आपल्या साधुसंतांनी हीच शिकवण लोकांना दिलेली आहे. आपणाला हे सारं समजतं. पण आपण कधी त्याचा उपयोग करतो का ? आपण कधी दुसऱ्याचा विचार तरी करतो का ? बसच्या रांगेमधील पुढच्याला मागं टाकून घुसणारे कितीतरी महाभाग पुण्या-मुंबईत सापडतील. त्याचा रीतसर नंबर असून-सुद्धा त्याला आपण मागं रेटतो, मग त्याला मदत करण्याचं नावसुद्धा काढू नका. जिकडे तिकडे स्वार्थ, स्वार्थ आणि स्वार्थ ! हा स्वार्थ इतका परा-कोटीला गेलेला आहे, की त्यापुढं माणूस माणुसकीलाही विसरू लागला आहे. कृतघ्न आणि उलट्या काळजाचा होऊ लागला आहे.

## उधार उसनवार

शेजाऱ्याकडून उसनं आणणं हे काही नवीन नाही. तुम्ही शंभर वेळा त्याच्याकडून वस्तू उसन्या आणत जा. मग समजा, तुम्ही त्याचा विजेचा पंखा मागितला आणि त्यानं तुम्हाला नाही म्हटलं तर लगेच तुम्हाला राग येतो. तुम्ही त्याला पाण्यात पाहू लागता. त्यानं पूर्वी केलेली मदत लगेच विसरता. याउलट तुम्ही तुमच्यासाठी आणलेल्या वस्तूंचा मात्र त्या शेजाऱ्याला पत्तासुद्धा लागू देत नाही. हे सारं तुमची मुलं पाहतात. त्यांना हे मतलबी-पणाचं बाळकडूच तुम्ही नकळत पाजत असता.. दुसऱ्याच्या चांगुलपणाचा सर्रास फायदा घेणारी माणसं, दुसऱ्याकरता काहीही न करणारी माणसं सुखी असतात असं तुम्हाला वाटतं का ? चूक आहे ! ही स्वार्थी माणसंच सदैव दुःखी असतात. सदैव काळजीत असतात. ती माणसं सदैव कुरकुरत असतात, 'आमच्याकडे कुणाचं लक्ष नाही. जो तो स्वतःपुरतं पाहतो.' आहे की नाही ?

## स्वतःचं जग

माझी स्कूटर मेकॅनिक दुरुस्त करत होता. तिथं एक वरच्या वर्गातला माणूस आला आणि त्या मेकॅनिकला सांगू लागला, 'ताबडतोब चला. मला घाई आहे, माझी स्कूटर समोर बंद पडली आहे.' जणू मला काहीच काम नव्हतं, मी रिकामटेकडाच होतो ! त्या माणसाच्या बोलण्यात अजिजीचा सूर बिलकुल नव्हता. उलट तो मेकॅनिकला धमकावणीच्या स्वरूपातच हुकूम सोडत होता. मेकॅनिकनं त्याला पुढं व्हायला सांगितलं. तो गेल्यावर मेकॅनिक मला म्हणाला, 'वो क्या समझता है मैं उसके बापका नोकर हूँ? और आप यहाँ पहले आये हैं ये वो गधेको समझता नहीं ?' मी त्याला म्हणालो, 'आप जाइये, उनका काम पहले कीजिये !' मला त्या गृहस्थाची कीव आली. एवढा वयानं मोठा वाढूनही तो लहान मुलासारखा वागत होता. स्वतः-पलीकडे त्याला काही दिसत नव्हतं. तसं काही दिसत नव्हतं म्हणूनच तर तो दुःखी होता. लहान मुलं नाही का आक्रस्ताळेपणानं रडून, आकांत करून इतरांचं आपल्याकड लक्ष वेधून घेत, तसाच हा माणूस! अशी

माणसं आपल्याला जीवनात हरघडी भेटतात. तुम्ही आम्ही थोड्याफार फरकानं असंच वागतो ना ? तुम्ही म्हणाल, ' तसा मी फार समजूतदार आहे. ' मग मला सांगा, तुमच्या ऑफिसच्या पट्टेवाल्याची सहृदयतेनं तुम्ही कधी चौकशी केली आहे का ? तुमच्या घरच्या मोलकरणीचा नवरा कुठल्या-तरी रोगानं आजारी असतो. तिला त्याच्या शुश्रूषेसाठी दवाखान्यात जावं लागतं. तुमच्या घरी ती आली नाही की तुम्ही तिचे खाडे कापता. या वेळेला वास्तविक तुम्ही तिला मदत करायला हवी. उलट तुम्ही पैसे कापून कमीत कमी धोक्यात घालता. त्या बाईचा नवरा मरतो. तुम्हाला त्या गृहस्थाच्या अंत्यविधीसाठी मदत करण्याची फारशी इच्छा नसते. फार झालं तर ५-१० रु. तुम्ही उचल म्हणून त्या बाईच्या तोंडावर फेकता. घरी तुमची बायको म्हणते, 'अहो, कशाला तिला पैसे देता ? गेले तुमचे पैसे ! ती कसली आता तोंड दाखवते...' ही आपली माणुसकी !

## साध्यासुध्या गोष्टी

पुलाच्या चढावर सामानानं खूप भरलेली हातगाडी एखादा हमाल ओढत असतो. त्याची बायको मागच्या बाजूनं गाडी ढकलत असते. चढ खूप असतो. त्यांना कुणीतरी हात देण्याची जरूर असते. प्रत्येकजण खूप गडबडीत असतो. त्यामुळं त्याला कुणी मदत करत नाही.ही आपली दुसऱ्याविषयीची सहानुभूती! पण एवढे कष्ट करून तो हमाल संध्याकाळी सुखाची झोप घेतो. तुम्हा-आम्हाला काळजीमुळं झोप येत नाही. गोळ्यासुद्धा खाव्या लागतात ! तुम्ही कित्येक वर्षं एखाद्या भाजीवाल्याकडून भाजी घेता, एखाद्याकडून वर्तमान-पत्रं घेता. कधी त्याची विचारपूस करता ? निदान नुसती विचारपूस तरी करत जा. तेवढंच त्याला बरं वाटेल असं नाही तुम्हाला वाटत ? मदत केलीत थोडीफार तर त्यालाही जगण्यात खचितच मौज वाटेल आणि उलट तो तुमच्याशी पूर्वीपेक्षा जास्त चांगल्या तऱ्हेनं वागेल. प्रेम हे दिल्यानं वाढतं हे खोटं नाही. या जगात तुम्ही इतरांशी कसे वागता त्यावरच खरं म्हणाल तर दुसऱ्याची तुमच्याशी वागणूक अवलंबून आहे. तेव्हा इतरांना समजावून द्या. त्यांच्याशी समरस व्हा म्हणजे तुम्ही स्वतःला विसरून जाल. तुमच्या

काळज्या पळतील– दूर कुठेतरी!

## हे कसलं चिंतामुक्त जीवन ?

सध्याच्या समाजरचनेकडे पाहिलं तर असं लक्षात येतं की आपला समाज हळूहळू अश्रद्ध होत चालला आहे. श्रद्धेचा मनुष्याच्या मानसिक स्थिरतेच्या दृष्टीनं फार मोठा उपयोग आहे. आणि श्रद्धा कमी व्हायला लागली की माणसाचं जीवन अस्थिरतेकडे झुकायला लागतं. आणि मग निरनिराळ्या प्रकारच्या काळज्या त्याला ग्रासायला लागतात. जीवनातला संघर्ष कुणाला टाळता आलाय ? संघर्षाशिवाय जीवनच असू शकत नाही असं मला वाटतं. आता तुम्ही म्हणाल, हे बोलणं खुळचटपणाचं आहे. ते समोरचे बापूसाहेब पाहा, गेली पंचवीस वर्षं रोज नियमानं कचेरीमध्ये जातात, तिथं मान मोडून काम करतात. शिव्या खातात नि घरी येतात. जेवतात, लगेच झोपी जातात. बायको खूपच त्रास देते. हे काहीच विरोध करीत नाहीत. मुलं उनाडक्या करतात. हे काहीच विरोध करीत नाहीत. जीवन कसं चिंतामुक्त आणि सुखी आहे ना ? कुठं आहे इथं जीवनसंघर्ष ? हे दुसरं उदाहरणही तुम्ही द्याल. ते रावसाहेब मोठे अधिकारी आहेत. कचेरीत येतात साधारणतः दुपारी एक वाजता. समोर आलेल्या कागदांवर अक्षरशः डोळे मिटून सह्या करतात. कुणी कसली तक्रार घेऊन आला तर त्याला सांगतात, 'तू असं कर, माझ्या असिस्टंटला भेट.' तो असिस्टंट खूप अन्याय करतो इतरांवर. पण रावसाहेब काही ऐकत नाहीत. कुणी आपली अडचण सांगायच्या आधीच ते म्हणतात, 'तुम्ही असं करा, माझ्या असिस्टंटला भेटा.' आहे की नाही रावसाहेबांचं जीवन चिंतेपासून मुक्त ? बापूसाहेबांचं जीवन हे मी मरता येत नाही म्हणून जगणं असं समजतो. खऱ्या अर्थानं ते मुळी जीवनच नाही. रावसाहेबांचं जीवन हा एक निर्लज्जपणा आहे. बापूसाहेबांना काळजी नाही त्याचं कारण ते कुठं विरोधच करीत नाहीत. मुलगी कुठल्याही माणसाचा हात धरून पळून गेली तरी हा मख्खच ! हे काय जीवन आहे ? रावसाहेब हे नंबर एकचे चुकार गृहस्थ आहेत. ते एकला ऑफिसात येतात आणि तीनला पळून जातात. हाताखालचे लोकही मजा करतात. हा शुद्ध कामचुकारपणा झाला ! थोडासा निर्लज्जपणा अंगी बाळगावा म्हणजे सारी

सुखं उपभोगता येतात. मग, माणूस काळजीपासून मुक्त होतो. असला माणूस मला अभिप्रेत नाही आणि त्याच्या जीवनाला मी सुखी जीवन कदापिही म्हणणार नाही. रावसाहेब किंवा बापूसाहेब स्थिर विचारसरणी घेऊन वागायला लागले, शिक्षा लावायला लागले किंवा अन्यायाला विरोध करू लागले तर ते जीवन. मग तिथं संघर्ष आला की काळजी आलीच. कारण शेवटी प्रत्येक गोष्टीचा निकाल नशिबाप्रमाणं ठरणार. मग इथं श्रद्धा आली. जीवनात श्रद्धेला अनन्य साधारण महत्त्व आहे. ही गोष्ट मी काही नवीन थोडीच सांगतोय ? पण मी तुम्हाला जागं करून देतोय की, श्रद्धा कमी होत चाललीय. ती जरा वाढवा. मी म्हणतोय 'जरा' वाढवा. नाहीतर तुम्ही म्हणाल हे 'बाबा वाक्यं प्रमाणम्'चा उपदेश करताहेत. नाही, तसं बिलकुल नाही. मला अंधश्रद्धा अभिप्रेत नाही. डोळस श्रद्धा ठेवा असं मला म्हणायचं आहे.

## श्रद्धा आणि अंधश्रद्धा

संगीत, चित्रकला किंवा अन्य फाइन आर्टस् ज्या आहेत त्यात तर श्रद्धा महत्त्वाची आहे. माझ्या गुरूवर माझी नितांत श्रद्धा जर नसेल तर मला गुरु पूर्ण ज्ञान देऊच शकणार नाही. मी जर ज्ञानावरची श्रद्धा उडवलेलं त्याच्या लक्षात आलं तर तो मन लावून शिकवणारच नाही. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे परमेश्वरावरच्या श्रद्धेचा. असं मी म्हटलं की वाचक म्हणायला लागतील, काहीतरी भोंदूगिरीचा किंवा बुवाबाजीचा हा प्रकार मी सुचवतोय. परमेश्वरावर श्रद्धा ठेवा याचा अर्थ कामधंदे सोडून (किंवा वाईट कर्म करून देवाचं डोक चोवीस तास धरून बसा असं मला म्हणायचं नाही. मी उदाहरणच देतो म्हणजे माझा मुद्दा पटेल.

साधारणतः १८८५ ते १९४० च्या दरम्यानचा काळ होता. आमची पन्नास-साठ एकर जमीन मंगळवेढे तालुक्यात होती. त्यावेळेला कुठलं संकरीत बियाणं, औषधं फवारणी आणि नव्या शेतीच्या सुविधा ? माझे आजोबा आकाशाकडं डोळे लावून पावसाची वाट बघत बसायचे. सदाचा दुष्काळ, हलाखी आणि कर्ज ! एक पोतं शेंगदाणे पेरले तर एक

पोतं शेंगा पिकायच्या, असल्या जमिनी ! (विनोदाचा भाग सोडून द्या. ) सावकार हजार रुपये कर्ज देऊन त्यांच्यावर पाच हजार रुपये व्याज काढण्याच्या लायकीचा ! आजोबा साक्षर होते. तरी पण अडचणीत आले की निरक्षराला जसं मुद्दल, व्याजाचा दर वगैरे काही कळत नाही तसं त्यांनाही काही दिसायचं नाही. ते आपले कर्ज काढून वेळ भागवायचे. माझे वडील सांगतात, ' त्यावेळी वर्षानुवर्ष अवर्षण पडायचं त्यामुळं हलाखी वर्षाच्या वर्षाला वाढत जायची ! आजी–आजोबा कष्ट करून मरायचे. त्यात देणेकरी दारात आले की त्यांची झोप उडायची. त्या काळजीचा त्यांच्यावर वाईट परिणाम होत गेला. ते ४०-४५ वयाच्या सुमारासच वारले. आमचं घर उघडं पडलं. आजीनं नेटानं सर्व प्रसंगांना तोंड दिलं. सांगून विश्वास बसणार नाही, पण कणसं ओलीकच्ची भरडून त्याच्या भाकऱ्या करून आजी माझ्या वडिलांना खायला घालायची. वडील आणि त्यांची लहानगी भावंडं तिला छळायची, पण ती कधी चिडायची नाही, रागवायची नाही. रोज रात्री न चुकता दासबोध वाचायची. देवावर तिची नितांत श्रद्धा होती. तिची ती नेटानं संसार करीत होती. लहान लहान मुलांना तिनं परगावच्या नातलगांकडे ठेवलं. आमचे सर्व काका, वडील शिकले. एक काका अमेरिकेत जाऊन स्थायिक झाले. त्यांनी, वडिलांनी- सर्वांनी शेतीचं कर्ज फेडून टाकलं. मी लहान होतो तेव्हा आजी साठाव्या वर्षी वारली. पण तिनं देवावरची श्रद्धा कधीच कमी केली नाही. श्रद्धेमुळं दुःखाची संख्या कमी झाली असेल का ? कदाचित त्याचा सुख-दुःखाशी काहीही संबंध नसेल. मग या देवधेव करायचा काय उपयोग? सांगतो. नीट समजावून देतो माझं मत. माझा देवावर बिलकुल विश्वास नाही. त्याच्या भक्तीमुळं आपली पापं टळतात, पुण्य लाभतं हे तर सारं भाकड आहे. तसं जर असतं तर ज्यानं सारं आयुष्य धार्मिक वृत्तीनं, सदाचारानं घालवलं त्याचा कर्ता मुलगा का अचानक मरावा ? किंवा त्याचं प्रचंड आर्थिक नुकसान का व्हावं ? त्याची ऐहिक अधोगती का व्हावी ? या जन्मातल्या चांगल्या करणीमुळं चांगली फळ मिळतील हेही मला पटत नाही. मग आपलं लक्ष पूर्वजन्माकडे वळतं. पूर्वजन्मातलं पाप म्हणून आता छळ होतो असं आपण म्हणतो. या साऱ्या भ्रामक समजुती आहेत. माझ्या दृष्टीकोनातून हिशेब सरळ आहे. जर कुठं परमेश्वर असेल

तर त्यानं प्रत्येकाच्या नशिबात कमी-अधिक हालअपेष्टांची, दुःखाची मापं टाकलेली असतात. ती तुम्ही–आम्ही भोगतो. त्याचा पूर्वजन्मातल्या पाप-पुण्याशी, या जन्मातल्या सदाचाराशी काहीही संबंध नाही. मग सदाचार का ठेवा ? सदाचार ठेवला तर निदान चांगल्या माणसाला मानसिक समाधान तरी मिळतं. ' मी कोणाचं वाईट केलं नाही. असं समाधानी मनानं तो म्हणू शकतो. परमेश्वराची भक्तीसुद्धा मानसिक समाधान, स्थैर्य लाभण्यासाठी करा. कुठंतरी चांगल्या आदर्शांना शरण जा, श्रद्धा ठेवा. श्रद्धेमुळं माणसाचं हेलकावे खाणार मन स्थिर होतं. उदात्त वातावरणात विचार करू लागतं. काहीतरी मार्ग निघतो. आणि कृती या सारासार आणि योग्य विचार करून केलेल्या असल्यामुळं कुणावर अन्याय होत नाही. इतरांचं जीवन सुखी होतं. तुमचंही सुखी होतं.

## प्रार्थना

पाश्चात्य लोक विज्ञानाच्या प्रगतीमध्ये जगात पुढे आहेत. त्यांना काय समजत नाही का की चंद्र हा देव नाही ? मग ते चंद्रावर निघाले की त्यांचे नातलग देवालयात ' त्यांचा प्रवास सुखकर होवो ' अशी प्रार्थना का करतात ? त्यांना माहीत असतं की, मानवाच्या ज्ञानापलीकडची, कल्पनेपलीकडची, कुवतीबाहेरची एखादी घटना घडून त्या चांद्रवीरांना मृत्यू येण्याची शक्यता आहे. ती घटना घडू नये. त्या प्रार्थनेनं घडणारी घटना टळणार आहे का ? नाही. पण श्रद्धेमुळं, प्रार्थनेमुळं त्या चांद्रवीरांची वाट पाहणाऱ्या नातलगांना मनःशांती तर लाभते की नाही ? आणि त्याचीच खरी जरूर आहे. माणसं अडचणीत सापडली की देवाचा धावा का करतात ? देव असल्या ' टेंपररी ' भक्तांना काय ओळखून नसतो का ? देव तसा कृतघ्नच आहे म्हणा ! पण श्रद्धा ठेवून माणसं शांत राहतात. त्यामुळं संकटं टळायला निदान वातावरण तरी चांगलं निर्माण होतं. आता असं पाहा, नवरा-बायको, दोघंही ऑफिसला जातात. त्यांची पोरं घरी सांभाळ करायला ठेवलेल्या बाईच्या किंवा म्हाताऱ्या आईच्या हातावर तुरी देऊन रस्त्यावर इतस्ततः पळत असतात. काळजी करणारे काही आई-बाप असतात.

रस्त्यात कुठंही वाहनांना ब्रेक लागून आवाज झाला की हे घाबरतात. त्यांना वाटतं, माझं छबुकडं असंच नाही ना गाडीखाली सापडणार ? आमच्या ओळखीच्या एक तिशीच्या शिक्षिका होत्या. त्या म्हणायच्या, 'मी माझी मुलं देवावर हवाला टाकून शाळेत येते. देव त्यांचा सांभाळ करतो.' योग्य काळजी घेऊन हीच विचारसरणी, हीच श्रद्धा नको का ठेवायला ? संततिनियमनाचं ऑपरेशन केल्यानंतर माणसाला उगाचच एक फालतू काळजी टोचत असते. मुलाला जरा ताप आला की मला वाटायचं, चालला हा ! आपण उगाच ऑपरेशन करून घेतलं. कसला विचारांचा मूर्खपणा आहे हा ! तो जर जाणार असेल तर ऑपरेशन केलं काय आणि नाही केलं काय, जाणारच ! पण माणसाला वाटत असतं ना की, एक नग गेला तर त्या जागी मी दुसरा नग निर्माण करू शकलो असतो ! एक हुशार मुलगा गेला तर त्या जागी दुसरा जन्माला घातला तर तेवढी कर्तबगारी दाखवू शकेल ? छे ! जो गेला तो गेला. आता हे खरं म्हणा, वंशाचा दिवा पुढं लावायला किंवा म्हातारपणी सांभाळायला कुणीतरी नवीन निश्चितच जन्माला घालता आला असता (जर एकुलता एक मुलगा गेला असता तरची गोष्ट आहे ही). या दोन्ही गोष्टी आता फारशा महत्त्वाच्या उरलेल्या नाहीत. एक तर वंश असा काय मोठा 'दिवा' लावण्याच्या लायकीचा असतो सामान्यांचा ? दुसरं, हल्ली म्हातारपणी कुणी कुणाला फारसं विचारत नाही, सांगायचा मतलब असा, 'होणारे न चुके येई ब्रह्मा तया आडवा' हेच खरं. फक्त वाईटच घडेल असा जप न करता कुठंतरी श्रद्धा ठेवा, शांतपणानं या जीवनसंघर्षाला तोंड द्या. 'Faith is a great healer.' असं म्हटलंय ते काय उगीच आहे ? संकटसमयी चांगल्या ग्रंथांचं (उदा. भगवद्‌गीता वगैरे) परिशीलन केलं तर कदाचित आपल्या अडचणी-वर तोड सुचू शकेल किंवा देवाची भक्ती केली की एकतानतेमुळे काही चांगले विचारप्रवाह मनात येऊ शकतील असं मला वाटतं. धर्माचं तसंच आहे. खऱ्या अर्थानं धार्मिक विचाराचा माणूस पापभीरू असतो. त्याच्या हातून पापाचरण होत नाही. इथं पुन्हा स्पष्ट केलं पाहिजे की दिवसा देवा-पुढं ध्यान धरून बसणारा आणि रात्री वेश्यागमन करणारा मला अभिप्रेत नाही. खऱ्या अर्थानं सत्त्वशील माणूस मी विचारात घेतो आहे. धर्मावर

श्रद्धा ठेवा असं मला म्हणायचं आहे याचा अर्थ असा नव्हे की ढोल, नगारे व्रतं, वैकल्य यावर श्रद्धा ठेवा, किंवा मला असंही म्हणायचं नाही की अमुक एक धर्मच स्वीकारा. सारे धर्म चांगले आहेत. त्यांच्या उदात्त शिकवणीवर विश्वास ठेवून मार्ग काढत राहा. जीवन विवेकानंदांसारख्या, तुकारामांसारख्या थोर माणसांच्या आदर्शाच्या शिदोरीवर सुसह्य होईल याबद्दल मला जरासुद्धा संदेह नाही. असं समजू, तुम्ही बिलकुल धार्मिक वृत्तीचे नाही आहात. मग तुम्ही या जगाचं नियंत्रण करणाऱ्या त्या शक्तीची उपासना करा. कुठंतरी नतमस्तक व्हा. ' यात काय आहे, त्यात काय आहे.' अशी प्रत्येक गोष्टीची टिंगल उडवणारी अश्रद्ध माणसं मी कमी पाहिलेली नाहीत. कुठंही गेली की ती असंच वागतात. काही काळ लोक त्यांच्या असल्या फटकळपणाला भितात. मग सर्वांच्या असं लक्षात येतं की टिंगल करण्यापलीकडे यांच्याजवळ काही नाही. ही माणसं जीवनात क्वचितच सुखी होतात. हळूहळू एकटी पडत जातात. नवीन पिढीतल्या मंडळीतील कित्येकांनी व्यसनावर श्रद्धा ठेवलेली आहे. जीवनातील दुःखं, काळज्या, पराभव विसरण्यासाठी माणूस दारू पितो हे आपण सिनेमात पाहतो. ही एक पळवाट आहे. प्रसंगाला धैर्यानं तोंड देण्याऐवजी गुंगी आणून आपलं कमकुवत मन जरा दुसरीकडे न्यायचं यापलीकडे या गोष्टीला अर्थ नाही. शेवटी मी तुम्हाला असं सुचवू इच्छितो, की तुम्हाला असलेल्या अनंत काळज्या जर तुम्हाला टाळता येत नसतील; तुमचे इतर सारे प्रयत्न फोल ठरले असतील तर अगदी शेवटचा प्रयत्न म्हणून का होईना, देवाची प्रार्थना करा... नाइलाज म्हणून का होईना !

## टीका– टाकीचे घाव !

माणसाच्या जीवनाला टीका हा एक अविभाज्य भाग आहे असं माझं वैयक्तिक मत बनलेलं आहे. ते अर्थातच स्वानुभवावरूनच बनलेलं आहे. सामान्य माणूस टीकेला भयंकर घाबरतो. आपल्याला कोण काय म्हणतंय हे जाणून घेणं हा एक त्यांचा अत्यंत आवडता छंदच असतो. प्रत्येकाला वाटत असतं, आपल्याला लोकांनी चांगलं म्हणावं. प्रत्येकाचीच अशी धारणा

असते की आपली प्रत्येक कृती बिनचूक आणि रास्त किंवा योग्य असते. अर्थात ह्या दोन्हीही गोष्टी चूक आहेत. निंदा करणं हा सामान्य (फार काय, काही थोर) माणसांचा स्वभाव असतो. तसंच आपण पुष्कळ गोष्टी चुकीच्या करीत असतो, त्यामुळं निंदेचं लक्ष्य बनत असतो. टीका, निंदा कुचाळक्या प्रत्येकाला सहन कराव्याच लागतात. काही काही माणसं तर भलतीच संवेदनाक्षम असतात. माझ्या एका मित्राला मी सांगितलं, 'अरे, विद्यापीठाबाबत जो वाद सुरू झाला आहे, त्यासाठी जी हमरीतुमरी झाली तुमच्या कॉलेजात, त्याचं वृत्त आजच्या वर्तमानपत्रात आलंय. त्यात तुझ्यावर खूप टीका आलीय.' तो जो एकदम घाबरला, की त्याला एकदम घामच फुटला. तो मला म्हणाला, 'माझ्या काही वाचनात आली नाही!' 'अरे, तशी पाच-सहा ओळींचीच आहे ती बातमी.' मग मी त्याला त्याच्या लायब्ररीत नेऊन ते वृत्तपत्र दाखवलं. आजूबाजूला खूप विद्यार्थी होते. त्यांनी ही बातमी वाचली असती, तो प्राध्यापक मित्राची कुचेष्टा झाली असती. तो सपाटयानं पुढं झाला. त्यानं ते वृत्तपत्राचं पान फाडून त्याची घडी खिशात टाकून दिली. आम्ही बाहेर पडलो. मी त्याला म्हणालो, 'तू काय बोलला होतास विद्यापीठाबाबत?'

'अरे, तुला माहीत आहे ना, मी कुठल्याही राजकारणात पडत नाही म्हणून...अरे, चुकून माझं नाव पडलंय.'

'अरे, मग तू एवढा त्या टीकेला घाबरलास का?'

'अरे, उगीच विद्यार्थी टिंगल करतील.'

'अरे, माझ्यासारखा कोडगा हो. टीका केली म्हणून काय झालं? राजाला सुद्धा माग लोकं नावं ठेवतात! लोकशाहीच्या जमान्यात कुणावरही टीका होऊ शकते. ब्रिटन, अमेरिकेच्या पंतप्रधानांना, प्रेसिडेंटना लोक टीकेनं भाजून काढतात. मग आपण तर काय सामान्य लोक आहोत. त्यांनासुद्धा कोणी सोडत नाही तर आपण कोण?'

त्याला काही पटलं नाही. आपल्याविषयी टीकेचं मोहोळ उठलं की माणूस काळजी करू लागतो. उगीचच टीका करणाऱ्यांना आपण खरे कसे आहोत हे पटवून तरी द्यायचा प्रयत्न करतो किंवा त्यांच्यापुढे शरणागती

श्रद्धा ठेवा असं मला म्हणायचं आहे याचा अर्थ असा नव्हे की ढोल, नगारे व्रतं, वैकल्य यावर श्रद्धा ठेवा, किंवा मला असंही म्हणायचं नाही की अमुक एक धर्मच स्वीकारा. सारे धर्म चांगले आहेत. त्यांच्या उदात्त शिकवणीवर विश्वास ठेवून मार्ग काढत राहा. जीवन विवेकानंदांसारख्या, तुकारामांसारख्या थोर माणसांच्या आदर्शाच्या शिदोरीवर सुसह्य होईल याबद्दल मला जरासुद्धा संदेह नाही. असं समजू, तुम्ही बिलकुल धार्मिक वृत्तीचे नाही आहात. मग तुम्ही या जगाचं नियंत्रण करणाऱ्या त्या शक्तीची उपासना करा. कुठंतरी नतमस्तक व्हा. ‘ यात काय आहे, त्यात काय आहे.’ अशी प्रत्येक गोष्टीची टिंगल उडवणारी अश्रद्ध माणसं मी कमी पाहिलेली नाहीत. कुठंही गेली की ती असंच वागतात. काही काळ लोक त्यांच्या असल्या फटकळपणाला भितात. मग सर्वांच्या असं लक्षात येतं की टिंगल करण्यापलीकडे यांच्याजवळ काही नाही. ही माणसं जीवनात क्वचितच सुखी होतात. हळूहळू एकटी पडत जातात. नवीन पिढीतल्या मंडळीतील कित्येकांनी व्यसनावर श्रद्धा ठेवलेली आहे. जीवनातील दुःखं, काळज्या, पराभव विसरण्यासाठी माणूस दारू पितो हे आपण सिनेमात पाहतो. ही एक पळवाट आहे. प्रसंगाला धैर्यानं तोंड देण्याऐवजी गुंगी आणून आपलं कमकुवत मन जरा दुसरीकडे न्यायचं यापलीकडे या गोष्टीला अर्थ नाही. शेवटी मी तुम्हाला असं सुचवू इच्छितो, की तुम्हाला असलेल्या अनंत काळज्या जर तुम्हाला टाळता येत नसतील; तुमचे इतर सारे प्रयत्न फोल ठरले असतील तर अगदी शेवटचा प्रयत्न म्हणून का होईना, देवाची प्रार्थना करा... नाइलाज म्हणून का होईना !

## टीका– टाकीचे घाव !

माणसाच्या जीवनाला टीका हा एक अविभाज्य भाग आहे असं माझं वैयक्तिक मत बनलेलं आहे. ते अर्थातच स्वानुभवावरूनच बनलेलं आहे. सामान्य माणूस टीकेला भयंकर घाबरतो. आपल्याला कोण काय म्हणतंय हे जाणून घेणं हा एक त्यांचा अत्यंत आवडता छंदच असतो. प्रत्येकाला वाटत असतं, आपल्याला लोकांनी चांगलं म्हणावं. प्रत्येकाचीच अशी धारणा

असते की आपली प्रत्येक कृती बिनचूक आणि रास्त किंवा योग्य असते. अर्थात ह्या दोन्हीही गोष्टी चूक आहेत. निंदा करणं हा सामान्य (फार काय, काही थोर) माणसांचा स्वभाव असतो. तसंच आपण पुष्कळ गोष्टी चुकीच्या करीत असतो, त्यामुळं निंदेचं लक्ष्य बनत असतो. टीका, निंदा कुचाळक्या प्रत्येकाला सहन कराव्याच लागतात. काही काही माणसं तर भलतीच संवेदनाक्षम असतात. माझ्या एका मित्राला मी सांगितलं, ‘अरे, विद्यापीठाबाबत जो वाद सुरू झाला आहे, त्यासाठी जी हमरीतुमरी झाली तुमच्या कॉलेजात, त्याचं वृत्त आजच्या वर्तमानपत्रात आलंय. त्यात तुझ्यावर खूप टीका आलीय.’ तो जो एकदम घाबरला, की त्याला एकदम घामच फुटला. तो मला म्हणाला, ‘माझ्या काही वाचनात आली नाही!’ ‘अरे, तशी पाच-सहा ओळींचीच आहे ती बातमी.’ मग मी त्याला त्याच्या लायब्ररीत नेऊन ते वृत्तपत्र दाखवलं. आजूबाजूला खूप विद्यार्थी होते. त्यांनी ही बातमी वाचली असती, तो प्राध्यापक मित्राची कुचेष्टा झाली असती. तो सपाट्यानं पुढं झाला. त्यानं ते वृत्तपत्राचं पान फाडून त्याची घडी खिशात टाकून दिली. आम्ही बाहेर पडलो. मी त्याला म्हणालो, ‘तू काय बोलला होतास विद्यापीठाबाबत?’

‘अरे, तुला माहीत आहे ना, मी कुठल्याही राजकारणात पडत नाही म्हणून...अरे, चुकून माझं नाव पडलंय.’

‘अरे, मग तू एवढा त्या टीकेला घाबरलास का?’

‘अरे, उगीच विद्यार्थी टिंगल करतील.’

‘अरे, माझ्यासारखा कोडगा हो. टीका केली म्हणून काय झालं? राजाला सुद्धा मागं लोकं नावं ठेवतात! लोकशाहीच्या जमान्यात कुणावरही टीका होऊ शकते. ब्रिटन, अमेरिकेच्या पंतप्रधानांना, प्रेसिडेंटना लोक टीकेनं भाजून काढतात. मग आपण तर काय सामान्य लोक आहोत. त्यांनासुद्धा कोणी सोडत नाही तर आपण कोण?’

त्याला काही पटलं नाही. आपल्याविषयी टीकेचं मोहोळ उठलं की माणूस काळजी करू लागतो. उगीचच टीका करणाऱ्यांना आपण खरे कसे आहोत हे पटवून तरी द्यायचा प्रयत्न करतो किंवा त्यांच्यापुढे शरणागती

तरी पत्करतो. यातून त्याला काहीही साधता येत नाही. टीकाकार वाढूच लागतात. उत्तम उपाय म्हणज कोडगं व्हायचं. मी झालोय !

जगाचं असं आहे, तुम्ही काहीही करा, लोक बोलणारच. हिंदीत एक म्हण आहे, ' मारनेवालेका हाथ पकड सकते हैं, लेकिन बोलनेवालेका मुंह नहीं बंद कर सकते ।' लोकांना देवानं तोंड दिलेली असतात. टीका, कुचेष्टा आणि निंदा करणं हा त्यांचा एक आवडता छंद असतो. काही वेळा तोंडावर आडून आडून बाण मारले जातात. गैरहजर व्यक्तीवर तर वाटेल तसं तोंडसुख घेता येतं. हळूहळू ते त्यांच्या कानावर जातं. तो अस्वस्थ होतो. सारखा मनातल्या मनात खात राहतो. कॉलेजच्या, शाळेच्या सहली नेणाऱ्या शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या पैशातून कमिशन काढलं, हा आरोप खूप वेळा ऐकायला मिळतो. काही लोक चिडतात. जे तापट असतात ते विद्यार्थ्यांशी दोन हात करून स्वतःचं ब्लडप्रेशर वाढवून घेतात. हिशोब नोटीस बोर्डावर लावावेत आणि सारं विसरून जावं. आपण जर सरळ असलो तर कुणालाही भिऊ नये. केली टीका तर तोंडाला तोंड देत बसू नये. कित्येक वेळा असल्या बिनबुडाच्या टीकेची दखल घेतली नाही तर टीकाकार कंटाळून जातो. तुम्ही दखल घेतली की त्याला चेव येतो. थोरामोठ्यांचा चारित्र्यावर अकारण राळ उडविणारी माणसं काही कमी नसतात. टीका करून कित्येक वेळा स्वतःला समाधान मिळविणं किंवा प्रसिद्धी मिळविणं हाही उद्देश असतो. या बाबतीत शिकलेले, न शिकलेले, खेड्यातले व शहरातले सगळे सारखेच असतात. व्यक्तिगत टीकेमुळं सुरुवाती सुरुवातीला मी भलताच बेचैन होत असे. टीका केल्याचं माझ्या कानावर आलं की मी त्या माणसाला गाठून त्याच्याशी वाग्युद्ध खेळण्याच्या पवित्र्यात विषय उकरून काढत असे. तो बिचारा काय बोलला हे विसरलेलाही असायचा. मी त्याला उलटा-सुलटा करून टाकत असे. आज याला आडवा केला, उद्या त्याला आडवा केला अशा भाषेत मी स्वतःवर खूष होत असे. त्या टीकेपेक्षा माझं हे ' आडवं करणं 'च लोकांच्या जास्त लक्षात राहायला लागलं. टीका प्रतिटीका, वाकुडपणा हे चालूच होतं. मी वाऱ्याशी भांडल्यासारखा वागत होतो. पुढं विचार केला, लोकांना आडवं करण्याच्या उद्योगात रक्तदाबाचा विकार लागून मी मात्र एक दिवस आडवा होईन ! निरनिराळ्या क्षेत्रात

काम करणाऱ्या मोठमोठ्या लोकांना खूप वेळा मोठ्या टीकेला तोंड द्यावं लागतं. अशाच एका गृहस्थाला मी विचारलं, 'तुम्ही अशा परिस्थितीत मनाचा समतोल कसा टिकवता ?' ते उत्तरले, 'सुरुवातीला मी अतिशय सेन्सेटिव्ह होतो. पुढं काही दिवसांनी मला या टीकेमुळं फार गंमत वाटू लागली. तुम्ही काहीही करा, लोक टीका करणारच. त्यामागं हेवा, मत्सरही असू शकतो.' एखाद्या संघटनेचा मुख्य अधिकारी हाताखालच्या लोकांच्या टीकेचं लक्ष्य असतो. त्याच्या प्रत्येक कृतीची मागं टवाळकी केली जाते. आजकालचा जमानाच असा आहे. जे लोक चुकार असतात ते आपला दोष झाकण्यासाठी वरिष्ठांवर टीका करतात. सवंग लोकप्रियता मिळविणं हा त्यामागं उद्देश असतो. फॅक्टरीमध्ये कामगार कितीतरी वेळा वरिष्ठांबद्दल हीन भाषा वापरताना आढळून येतात. जर्मनीमध्ये प्रत्येक अधिकाऱ्याच्या मागच्या भिंतीवर एक बोर्ड लावलेला असतो. त्यावर लिहिलेलं असतं, 'तुमचा बॉस नेहमीच बरोबर असतो हे लक्षात असू द्या.' याचा व्यापक अर्थ एकच आहे, 'उगीच फालतू वादविवाद त्याच्याशी धरू नका.' वर्तमानपत्रांत एखाद्यावर टीकेची झोड उठवली की टीकाकारांना एक मानसिक समाधान मिळतं. कारण त्यांचं नाव प्रसिद्ध होत असतं. हीसुद्धा एक प्रकारची प्रसिद्धी मिळवण्याची क्लुप्ती असते. दुसऱ्याचं चारित्र्यहनन केलं की जनसामान्यांना ती गोष्ट चवीनं चघळण्यास एक प्रकारची मजा वाटते. माझा अनुभव असा आहे की खूपसे लोक कूपमंडूक आणि क्षुद्र मनाचे असतात. आपल्या सहकाऱ्याच्या छोट्याशा चांगल्या गोष्टींचंसुद्धा त्यांना वैषम्य वाटत असतं.

मी कॉलेजच्या स्नेहसंमेलनाचं एक नाटक बसवलं होतं. नाट्यक्षेत्रातला माझा अनुभव शून्य होता. नाटकाची मला बिलकुल आवड नव्हती. पण नाटक मलाच बसवावं लागलं. मी चिकाटीचा माणूस आहे. केवळ चिकाटीवर मी एक नाटक अत्यंत उत्कृष्ट बसवलं. ते अत्यंत यशस्वी झालं. अक्षरश: तीन तास लोक हास्याच्या धबधब्यात पार बुडून गेले होते. मध्यंतरामध्ये काही निवडक मंडळींना मी प्राचार्यांच्या बरोबर आत चहापानाला बोलावलं होतं. दुसऱ्या दिवशी मी कॉलेजात गेलो. कालच्या नाटकाचा कैफ माझ्यावर उगीचच होता. वास्तविक माझ्यासारख्या एका सामान्य

माणसानं काहीतरी स्तुती करावी असं करून दाखवलेलं होतं. पण स्तुती राहू द्यातच, एका वरिष्ठ प्राध्यापकानं मला फैलावर घेतलं. मला सुरुवातीला वाटलं होतं हे माझं कौतुक करतील. छे ! ते म्हणाले, 'कालच्या मध्यंतराच्या चहापानाच्या कार्यक्रमाला आम्हाला बोलवलं असतं तर काय मेला असतास का ?' म्हणजे मी तीन महिने अत्यंत परिश्रम घेतले ते गेलंच होतं कुणीकडे ! ह्यांना चहाची काळजी होती ! खरं म्हणजे मला कुठंतरी यश मिळालं हे त्यांना पाहवलं नव्हतं. बायकांनासुद्धा टीकेनं कसं भाजून काढलं जातं याचा नमुना पाहा. नोकरी करणारी एक तरुणी अत्यंत रूपवान होती. कामालासुद्धा अत्यंत चोख. कुणी उगीच लघळपणा केलेला तिला आवडायचा नाही. ती तिच्या शेजारी बसणाऱ्या एका चांगलं काम करणाऱ्याशी फक्त बोलायची. त्यावरून लोकांनी त्यांची घाणेरडी नाती जोडायला कमी केलं नाही. मजल तिच्या नवऱ्याला निनावी पत्रं पाठविण्यापर्यंत गेली. शेवटी तिनं शेजारी बसणाऱ्या सहकाऱ्याशी बोलणं बंद करून टीकेपुढं शरणागती पत्करली, तेव्हा तिच्या मागची काळजी दूर झाली. ती बाई आपल्याशी बोलत नाही, फक्त एकाच माणसाशी बोलते म्हणूनच टीका होत होती हे उघड होतं. गंमत म्हणजे त्या बाईच्या इतर सहकारी बायकासुद्धा तिची टवाळकी करायच्या. ती बाई सुंदर होती आणि तिचं घरचं चांगलं होतं. सगळेजण शिकलेले होते. इतर बायकांचं सारं बेताबेताचंच होतं. तेव्हा त्या फडतूस बायकाही हात धुऊन घेत होत्या. तेव्हा लक्षात ठेवा, टीका ही 'तुमच्याजवळ आमच्यापेक्षा काहीतरी चांगलं आहे' अशी पावतीच असते एक तऱ्हेची ! आजवरच्या अनुभवावरून मी एकच शिकलो आहे. टीकाकारांना अनुल्लेखानं मारायचं. टीकेची दखलच घ्यायची नाही. वातावरण आपोआप शांत होतं. तोंडातोंडी केली की आपणच वाईट ठरतो. मला म्हणायचं आहे, की जगात सद्‌गुणांचं चीज करणारेसुद्धा खूप लोक आहेत. त्यांना तुमचं नक्कीच कौतुक असतं. आणि समजा त्यांनी नाही तुमचं कौतुक केलं तर त्यासाठी हपापता का ? तुमच्या समाधानासाठी तुम्ही सत्कार्य करत चला. आणि लक्षात ठेवा, अन्याय्य टीकेची दखलसुद्धा घेऊ नका.

# निंदकाचे घर असावे शेजारी !

मागच्या विवेचनावरून तुम्हाला असं वाटेल की, निर्लज्ज व्हा असं मला म्हणायचं आहे. बिलकुल नाही ! खूप वेळा असं होत असतं की आपण जे करत असतो त्यात काही चुका असतात. आपण नकळत कुणाच्या भावना दुखावत असतो. आपण वागताना दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून विचार करत नसतो. मग टीका होते. अशी टीका नक्कीच विचारात घ्या आणि त्याप्रमाणं सुधारा. चांगल्या हेतूनं केलेली टीका दुर्लक्षू नका. टीकाकार हे तुमचे गुरू आहेत असं तात्यासाहेब केळकरांनी कुठंतरी म्हटलं आहे ते अगदी खरं आहे. निंदकाचं घर असावं शेजारी— मी तर म्हणतो माझ्याभोवती सगळे निंदा करणारे आणि टवाळ लोकच असूद्यात. त्यामुळं त्यांच्यावर मात करण्यासाठी मी सतत धडपड करत राहीन. सगळ्याच लोकांनी माझी स्तुती आरंभली तर मी सुस्त पडेन. मी जे काही थोडंफार यश आतापर्यंत मिळवलं आहे ते निंदकाच्यावर विजय मिळवण्याच्या सुप्त इच्छेमुळंच. त्यांच्या टीकेतून मी मला पोषक असा भाग घेतो, बाकी विसरून जातो. असं पाहा, माझी निंदा जर अव्याहत चालू असेल तर त्याचा अर्थ विरोधकांना दुसरा काही उद्योग नाही आणि मी त्यांच्या नसानसात उगाच वास करीत आहे. म्हणजे मीच सुखी आहे. मग काय, पटलं माझं म्हणणं ? तर मग ठरवा— काळजी टाळायची असेल तर अन्याय्य टीकेकडे दुर्लक्ष करा. सद्भावना ठेवून केलेल्या टीकेचं स्वागत करा. टीकाकारांशी वितंडवाद घालू नका. त्यामुळं तुमचंच हसं होईल. टीकाकारांना अनुल्लेखानं मारा. लक्षात ठेवा इतर लोक स्वतःमध्ये रस घेतात, स्वतःचं महत्त्व वाढावं म्हणून कित्येक वेळा दुसऱ्याला कमी लेखतात. एखाद्या माणसाला सारख्या लांबीच्या दोन दोऱ्या दिल्या आणि म्हटलं, एक तुझी आणि एक माझी. तुझ्या दोरीची लांबी वाढवून दाखव. तो काय करतो ? माझ्या दोरीची लांबी कमी करतो. त्यामुळं आपोआप त्याची दोरी लांब ठरते ! शेवटी देवाजवळ प्रार्थना करा, 'हे देवा, माझ्या निंदकांना सुखी ठेव, तेच माझे खरे गुरू आहेत !

# चूक कबूल करा !

आपलं जीवन काळजीपासून मुक्त करायचं असेल; तर आपल्या वागण्यातील दोषही आपल्याला घालवले पाहिजेत. माणसाचा स्वभाव बदलत नाही असं म्हणतात. पण माणूस पुष्कळसा निवळू शकतो. आधी खूप रागीट असलेले लोक परिस्थितीचे तडाखे बसायला लागले की निवळतात. बाहेरच्या जगात जिथं चालतं तिथं आरडाओरड करून माणसं हुकमत गाजवतात. पण मग त्यांनाही शेराला सव्वाशेर भेटतात. मग त्यांच्या लक्षात येतं, आपण हुकूमशाहीनं वागणं चुकीचं आहे. आपल्या रागामुळं, तऱ्हेवाईक स्वभावामुळं आपण इतरांच्या सुखी जीवनाशी खेळतो हे ज्यावेळी माणसाला पटायला लागतं तेव्हा त्याच्या वागणुकीत निश्चित बदल घडून येतो. मूळ स्वभाव शंभर टक्के बदलत नाही हे मला मान्य आहे. मूळचा रागीट स्वभाव बाहेर काबूत राहू शकतो, घरीही खूप वेळा राहू शकतो; पण केव्हातरी माणूस जमदग्नीचं रूप धारण करू शकतो. पण पूर्वी सतत आरडा ओरडा करणारा माणूस विचारी बनला म्हणजे क्रोध आवरू शकतो. माणूस आपल्या प्रत्येक वागण्याची नंतर चिकित्सा करू लागला की त्याला खूप वेळा असं वाटायला लागतं, आपण चुकलो होतो तेव्हा; असं वागायला नको होतं. हा माणूस नक्की सुधारू शकतो. पण जी माणसं आपली कृती नि आपलं बोलणं बरोबर होतं का चूक होतं याचा विचारही करत नाहीत ती कधीच बदलत नाहीत. त्यांचं कधीच चुकत नसतं ! माझ्या माहितीच्या एक बाई आहेत. अंदाजे तीस वर्षांच्या असाव्यात. दुसऱ्याच्या परिस्थितीत जाऊन त्यांना कधीच विचार करता येत नाही. आपल्या वागण्यानं बोलण्यानं, दुसऱ्याला आपण दुखावतो, त्याचं जीवन नाहक दुःखी करतो याची त्यांना जाण नाही. माझ्या त्यांच्या चार वर्षांच्या सहवासात त्यांच्या तोंडातून एकदाही असं आलेलं नाही की मी त्यावेळी चुकले. त्यांचं कधीच चुकत नाही. त्यामुळं त्यांनी खूप लोकांना दुखावलं, खूप शत्रू करून घेतलेत. इतर स्त्री-पुरुष त्यांना 'शिष्ट' या विशेषणानंच त्यांची भलावण करतात. माणसं अशी का वागतात ? ती कधी विचार तरी करतात का ? एकदा कामगार रागावला

की विचार न करता डोकं फोडायला कमी करत नाही. त्याला सारासार विचार, तर्कशुद्ध विचार करता येत नाही. हे त्याच्याबाबत एक वेळ क्षम्य आहे असं मी समजतो. पण चांगले शिकलेसवरलेले लोक खुळ्यासारखं वागतात. कुणी पटवून द्यायला गेलं तर त्यांची प्रतिष्ठा दुखावते. मग ते आणखीन वेड्यासारखे वाद घालायला लागतात. घरामध्ये कितीतरी मुलांना आई–बाप गुरासारखं झोडपतात. अशी मुलं पुढं डूक धरणारी, सूड घेणारी आणि भांडकुदळही निपजू शकतात असं काही मानसशास्त्रज्ञ म्हणतात. मुलांना प्रेमानं वागवावं हे खूपशा पालकांना समजतसुद्धा नाही. मी माझ्या मुलाला नुसतं धाकात धरलंय, असं सांगण्यात त्यांना मोठेपणा वाटतो. ही फार धाकात वाढलेली मुलं पुढं मोठेपणी आयुष्यात संधी मिळाली की दुसऱ्याला छळू लागतात. दुसरा माझा असा अनुभव आहे की. माणूस खूप प्रवास करू लागला की त्याचं व्यक्तिमत्त्व कित्येक वेळा मनमिळावू स्वभाव अंगी बाणवू शकतं. माणसानं आपलं तेच सर्व बाबतीत खरं हा दृष्टिकोन सोडून दिला तर माणूस हुशार होत जातो. फार मोठ्या मोठ्या विद्वानांनीसुद्धा कबूल केलंय की मी आयुष्यात अनंत वेळा चुकलोय! पण या मोठ्या लोकांचा गुण म्हणजे त्यांना कोणी चूक दाखवल्यावर ती माणसं प्रतिष्ठेचा प्रश्न करीत नाहीत. अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहाम लिंकन यांना त्यांचे सहकारी एकदा म्हणाले होते, ‘तुम्ही मूर्ख आहात.’ लिंकननं विचार केला, इथं चिडण्यात अर्थ नाही. ह्या सहकाऱ्याच्या दृष्टिकोनातून माझं वागणं खरोखरीच चुकीचं असेल. लिंकननं आपली चूक लगेच सुधारली. याउलट आपण प्रश्न प्रतिष्ठेचे करतो आणि मग उगीचच भांडत बसतो. अधिकारी एखाद्या कनिष्ठाला बोलतात. कनिष्ठ विचार न करता लगेच वाद घालायला लागतो. मीच कसा बरोबर हे वरिष्ठाला पटवून देतो. खरी चूक असूनसुद्धा कनिष्ठ दिशाभूल करू पाहतो. मग तणातणी वाढते. कित्येक वेळा ‘माझं चुकलं हं’ असं म्हणण्याचा मोठेपणा वरिष्ठसुद्धा हाताखालच्या लोकांशी वागताना दाखवतात. त्यामुळं वरिष्ठांबद्दल आदर वाढतो. पण याउलट काही अधिकारी असे असतात की त्यांना कुणी विरोध केलेला व त्यांच्या चुका काढलेल्या आवडत नाहीत. विधायक टीका ही कार्याला पोषक असते.

तिचं स्वागत करणारा अधिकारी फार यश मिळवू शकतो. चिंतेची वेळच येत नाही. पण आपण म्हणजे 'सर्व सर्वा आणि बरोबर' असं सूत्र धरलं की चुका होतात आणि त्याचे परिणाम भोगताना काळजीनं जीव ग्रासून जातो.

## दुसऱ्याचं मन

समाजामध्ये वागताना आपण दुसऱ्यांच्या मनाची कदर केली पाहिजे. प्रत्येकाची विचार करण्याची पद्धत वेगळी असते. प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असतो. त्याला योग्य ते महत्त्व दिलंच पाहिजे. कित्येक वेळा समाजात अगर नोकरीत काही माणसं आपल्या मर्यादांचं उल्लंघन करताना आढळतात. त्यामुळं ती गोत्यात येतात.

वसंतराव आणि वामनराव दोघे सहकारी आहेत. परब हे त्यांचे अधिकारी आहेत. वामनराव चुकार आहेत. वसंतराव चोख आहेत त्यांच्या कामात. वामरावांच्या चुकारपणामुळं वसंतरावांना काहीही जादा काम करावं लागत नाही. कारण दोघांचीही कामं भिन्न आहेत. वामनराव चुकार आहेत हे वसंतरावांना आवडत नाही. ते त्यांना टोचून बोलतात. हळूच परबांच्या कानावर घालतात. इथं वसंतराव आपल्या मर्यादेचं उल्लंघन करतात. त्यामुळं त्यांना स्वस्त प्रसिद्धी मिळते. दुसायाचं उणं काढून त्यांना बरं वाटतं. वास्तविक वामनरावांना सुधारणं हे वसंतरावांचं काम नाही. ते परबांचं काम आहे. परबांचं काम स्वतःकडे घेण्याचा वसंतरावांना कुणी अधिकार दिला ? परबांच्या लक्षात येतं की वसंतराव कामाला चोख आहेत पण चुगलखोर आहेत. परब वामनरावांच्यावर काही अॅक्शन घेत नाहीत असंच वसंतरावांना जणू सुचवायचं आहे. परबांच्या मर्जीतून वसंतराव उतरून जातात. विठू पट्टेवाला कामचुकार आहे. त्यामुळं साहेब त्याला बोलतात. विठू ऑफिसमधल्या दुसऱ्या एखाद्या माणसाला मन मोकळं करण्याच्या उद्देशानं हे सारं सांगतो, अर्थात एकतर्फीच ! स्वतःच्या चुका माणसं दडपून ठेवतात किंवा त्यांना त्या कळतही नाहीत काही वेळा ! मग तो माणूस विठूला म्हणतो, 'दे साहेबांच्या विरुद्ध अर्ज.'

विठू अर्ज देतो. मग काही दिवसांनंतर हा सल्ला कुणी दिला हे साहेबाला कळतं. साहेब त्या माणसाच्या मागं लागतात. कशाला हा अव्यापारेषु व्यापार ? आपण कोण आहोत आणि आपल्या मर्यादा कोणत्या हे समजलं नाही की माणूस अडचणीत सापडतो. मग त्यातून सुटणं त्याला मुष्कील होतं. मला तर कित्येक वेळा वाटतं. श्रेष्ठ किंवा कनिष्ठ, कुठलाही माणूस सतत चुका करत असतो. विचारी माणूस फक्त चुका टाळण्याची पराकाष्ठा करतो. थोर शास्त्रज्ञ आइन्स्टाईन म्हणतात, ' माझे निष्कर्ष ९९.९ टक्के चूक असल्याचं मला आढळतं. ' ' दिवसाकाठी प्रत्येक माणूस खूपदा मूर्खा-सारखा वागतो. ' असं मला वाटतं. शहाणा माणूस मात्र ही मर्यादा पाच मिनिटांवर नेत नाही. या विवेचनावरून आपण काही बोध घ्यायला नको का ? माझी एखादी लेखमाला आवडल्याची पत्रे मला नेहमी येत असतात. वाचकांच्या मनाला ही लेखमाला जाऊन भिडते त्याचं मुख्य कारण म्हणजे, एक सामान्य माणूस म्हणून मी जे सुखदुःखाचं जीवन जगतो आहे किंवा इतरांची सुखदुःखं जी मी जवळून पाहिलेली आहेत त्यांचं खरं-खुरं वर्णन मी या लेखमालेत करत असतो. व्यक्तींची नावं काल्पनिक असतात. पुढच्यास ठेच मागचा शहाणा हे अगदी खरं आहे. पण त्यावरून आपण बोध न घेता ' मेरी मुर्गी एकही टांग ' असंच हेकेखोरपणाचं वागणं ठेवलं तर पुढच्यास ठेच मागचाही उताणा ! या पलीकडं दुसरं काय होणार ? बदल हा आतून लागतो. बाहेरून दडपणानं आणलेल्या स्वभावातील बदलात काहीही अर्थ नसतो. आपण जेव्हा म्हणतो ' माझं काहीतरी चुकलं बुवा, ' तेव्हा आपण सुधारू शकतो.

## नियतीवरही मात करा

गंमत ऐका. एक खाजगी कंपनीत काम करणारे अधिकारी त्यांचे अनुभव मला नुकतेच सांगून गेले. ते म्हणाले, मी भयंकर तामसी माणूस होतो. एकदा आमच्या कंपनीतल्या एका क्लार्कनं मला पट्टेवाल्यामार्फत ताबडतोब येऊन भेटा असा निरोप दिला. मी ताड्ताड् त्या कारकुनाकडे गेलो. त्याला मी स्पष्ट शब्दांत सुनावलं, ' तुम्ही क्लार्क आहात. तुम्ही स्वतः येऊन मला भेटत

जा. मी अधिकारी आहे, लक्षात ठेवा. ' असे खूप अधिकारी त्या कंपनीत होते. हा व्यक्तिशः कुणाकुणाला जाऊन भेटणार ? त्या क्लार्कनं मुकाट्यानं ते ऐकून घेतलं. मग शेवटी तो अधिकारी महाशयांना म्हणाला, 'तुम्हाला वरच्या जागेवर बढती देण्याचं प्रपोजल हेड ऑफिसनं मागवलंय. तुमची काही माहिती अपुरी होती. ती तुमच्याकडून प्रत्यक्ष घेऊन हे पत्र आजच टपालात पडावं अशा विचारानं मी तुम्हाला निरोप पाठवला. ते अधिकारी चारचौघात खेटर मारल्यासारखं तोंड घेऊन बसले ! त्या अधिकाऱ्यांनी मला असंही सांगितलं की पूर्वी मला हाताखालच्या माणसानं विरोध केलेला आवडत नसे. दोघेजण फार हुशार होते. ते नेहमी माझ्या कार्यपद्धतीला विरोध करायचे, मला ते सहन न होऊन मी त्यांना खालच्या जागेवर टाकायला कमी केलं नाही. पुढे कितीतरी वर्षं ही गोष्ट मला फार लागून राहिली होती. त्यांचं जीवन मी दुःखी करून टाकलं होतं. त्या खुनशी माणसाच्या पापाची कबुली ऐकून मी थक्कच झालो ! नंतर कुतूहल म्हणून मी त्या हाताखालच्या दोघांना भेटायला गेलो. एकजण खालच्या जागेवर टाकल्यामुळे भलताच निराश झाला होता. जीवनातला सगळा आनंद, सारं चैतन्य गमावून बसला होता ! त्यानं नकारात्मक भूमिका घेतली. माझ्या कामाचं चीज झालं नाही ना ? मग जा. मी आता असाच चुकारपणा करणार. तो आणखीनच बिघडत गेला होता ! याउलट त्या दुसऱ्याला मी भेटलो, तो भलता आनंदी दिसला. वास्तविक त्याला खालची जागा मिळाली होती. तो म्हणाला, ' नोकरी म्हणजे काही माझं जीवन नाही, त्यात तर मी चोख काम करतोच. ( खरं म्हणजे काम करण्यापेक्षा चुकारपणा केला तर माणूस बोअर होतो. जो काम करत असतो त्याला मानसिक थकवा येत नाही. ) पण जीवनातल्या या अपयशातूनच मी खरं काय ते शिकलो. मी कोण आहे हे मला माहीत आहे. त्या अधिकाऱ्यानं मला वाईट म्हटलं म्हणजे मी तात्पुरता वाईट ठरेन. पण गुणांचं चीज करणारा कोणीतरी भेटेलच !' मला त्याची हीच विचारसरणी फार आवडली. मागील लेखात म्हटल्याप्रमाणे परिस्थितीचे खूप तडाखे मी सहन केलेत. पण प्रत्येक तडाख्यातून मी दुप्पट जोरानं वर आलोय. या गोष्टीचा मला खरंच अभिमान आहे. प्रत्येक गोष्ट झगडून मिळाली आहे. माझं नशीब लॉटरीसारखं नाही.

पण हे आलंय ना नशिबाला ? मग दुःख का करायचं ? याबाबत मला एक चांगली उपमा आठवली. ती बहुधा राधाकृष्णन यांनी दिली असावी. त्यांचं म्हणणं असं की, जीवन हा एक पत्त्यांचा खेळ आहे. तुमच्या हातात कोणती पानं यावीत यावर तुमचं नियंत्रण नाही. पण वाईट पानं आली तर डाव टाकू नका. वाईट पानांचाच उपयोग करून चांगला खेळ करून दाखवा. जे लोक पत्ते खेळतात ( मी ब्रिज या खेळाविषयी बोलतोय.) त्यांना माझं म्हणणं पटेल. ब्रिजमध्ये खेळणारा चांगला असेल तर फडतूस पानं हाती असतानासुद्धा चांगला डाव खेळू शकतो. सफाईनं उतारी आपल्या हातात घेतो आणि नोट्रंपशसारख्या डावात इतरांना हातातली भारी पानं नुसती जाळायला लावतो ! इथं वाईट पत्त्यातूनच चांगला डाव होतो ना ? मग जीवनात तसंच आहे असं समजा ! वर मी कंसात बोअर होण्याविषयी लिहिलंय. त्यावरून थोडं थकवा या विषयावर लिहायला मोह होतो. चिंता-मुक्त जीवन या विषयाला पोषक असंच हे विवेचन आहे. कारण मानसिक थकावटीचा काळजीशी खूप संबंध आहे. थकवा नाहीसा करण्यासाठी जर माणूस आपले स्नायू ढिले ठेवून काही वेळ आराम करू शकला तर त्याचा थकवा नाहीसा होऊन चिंताही कमी होऊ शकते.

## अल्प विश्रांतीचे महत्त्व

शास्त्रज्ञांनी असं सिद्ध केलेलं आहे की दिवसाकाठी माणसानं दुपारची एखादी डुलकी घेतली तर नंतर त्याचा कामाचा उत्साह वाढतो. वामकुक्षी ही शरीराची झीज भरून काढण्यासाठी फार महत्त्वाची आहे. गंमत अशी आहे की, सुट्टीच्या दिवशी आम्ही दुपारी जेवून जे आडवे पडतो ते पाचलाच उठतो ! मग आळस येतो. रात्री झोप येत नाही ! ही वामकुक्षी नव्हे ! दुपारी अर्धा तास झोप मिळाली तरी माणूस ताजातवाना होऊन दुप्पट उत्साहानं काम करू शकतो. अर्थात सर्वच माणसांना हे जमेल असं नाही. विशेषतः नोकरी करणारांना हे जमणार नाही. पण निदान ताठून खुर्चीवर बसून शरीराची अवघडलेली कमान न करता स्नायू ढिले सोडून माणूस नक्कीच काम करू शकेल ! शास्त्रज्ञ असंही म्हणतात. दर तासाला पाच

मिनिटं डुलकी घ्या! अर्थात हे सारं तारतम्य ठेवून अंमलात आणणं अगत्याचं आहे. नाहीतर सर्व कचेऱ्यांतील कर्मचारी डुलक्या खाताना किंवा वामकुक्षी करताना आढळतील तर त्यांची रवानगी घरी केली जाऊन चिंता-मुक्तीपेक्षा नोकरीमुक्तीचा प्रत्यय त्यांना घेईल ! सांगायचं तात्पर्य एवढंच आहे की, जी गोष्ट तुम्हाला बसून करता येईल ती उभं राहून करू नका. जी गोष्ट झोपून करता येईल ती करण्यासाठी बसून पाठीचे मणके का झिजवता ? शास्त्रज्ञांनी आणखी गमतीदार संशोधन केलेलं आहे. मेंदू कधीच थकत नाही हे ते महत्त्वाचं संशोधन आहे. एखादा बुद्धिजीवी आणि श्रमजीवी तुलनेसाठी घेतला तर श्रमजीवीच्या मेंदूतील रक्तात थकवा निर्माण करणारी द्रव्ये सापडतात. पण आठ-आठ तास काम करणाऱ्या बुद्धिजीवी माणसाच्या रक्तात ती सापडत नाहीत. याचा अर्थ एकच आहे. मेंदू गंजत ठेवला तरच तो थकतो. डोक्याचं काम खूप केल्यामुळं आपली मानसिक प्रवृत्ती आपण थकलो अशी होते. म्हणून आपल्याला आपण थकतो असं वाटतं. तसंच स्नायू ढिले न सोडता आपण ताणून बसलो की आपण थकतो.

## तडजोड

दैनंदिन जीवनात प्रत्येकाला हरघडी तडजोडच करावी लागते. जे तडजोड करणं शिकत नाहीत ते सदैव चिंतेत असतात. नवरा मनाप्रमाणं वागत नाही, सासू मनाप्रमाणं वागत नाही म्हणून किती बायका चिडत असतात. त्यांना कुठं मन मोकळं करता येत नाही, त्यामुळं मानसिक ताण वाढत असतो. त्यामुळं ब्लड-प्रेशर होऊ शकतं. याबाबत एक महत्त्वाचा उपाय आहे. माणसाचं कुठं जर बिनसलं, कुठं जर कुणाच्या वागणुकीमुळं त्याच्या मनात तणाव निर्माण होऊ लागला तर त्यानं आपला एखादा विश्वासू मित्र गाठावा आणि त्याच्यापुढं मन मोकळं करावं. त्यामुळं ताण कमी होतो. मित्र एखादा सहानुभूतीचा शब्द बोलतो, थोडासा उपदेश करतो, त्यामुळं आपलं दुःख व आपली काळजी कमी होते. आपल्याला दिलासा मिळतो. आपल्या काळजीत आपण नकळत कुणाला तरी सहभागी

करून घेतो. यामुळंच आपल्याला परिस्थितीशी दोन हात करण्याची शक्ती मिळत असते. दुसऱ्याजवळ बोलून आपलं दुःख, आपली काळजी नक्कीच कमी होते याचं तुम्हाला एक अतिशय चांगलं उदाहरण देतो. माझा एक मित्र आहे. अत्यंत सज्जन, हरहुन्नरी, सतत उद्योगी असणारा. त्याचं एका नोकरी करणाऱ्या विवाहितेवर प्रेम बसलं. त्यात घाणेरडे उद्देश नव्हते. शारीरिक लाभ उठवण्याचा हेतू नव्हता हे त्यानं त्या स्त्रीलाही स्पष्ट केलं होतं. ती विवाहिता अत्यंत देखणी होती. तिनं आजवर कुणालाही जवळ केलं नव्हतं. आपल्या सौंदर्यावर दुसऱ्याला सहजपणे खेळवू शकणारी होती. पण तिनं माझ्या मित्राला जवळ केलं. त्याच्या प्रेमाचा तिनं स्वीकार केला. तो तिच्यासाठी खूप झटायचा, तिचं भलं व्हावं या हेतूनं; आणि बदल्यात तिनं प्रेमाचा सहवास देणं चालू ठेवावं हीच त्याची इच्छा होती. त्याची ती अगदी जिवाभावाची मैत्रीणच झाली होती. त्या स्फूर्तीवर तो अफाट कार्य करत होता. मग काही दिवसांनंतर त्या स्त्रीच्या असं लक्षात आलं की या मैत्रीमुळं तिची बदनामी होऊ लागली आहे. त्या स्त्रीनं क्षणात माझ्या मित्राला दूर केलं. तो पैशानं झिजला होता, श्रमानं झिजला होता; पण त्याचं तिला काहीही सोयर सुतक नव्हतं. मित्रानं मला हे खूपदा सांगितलं. मी त्याला धीर दिला. तो म्हणायचा, मला तिची अभिलाषा नव्हती. तिच्या संसारात मला माती कालवायची नव्हती. तिनं मला असं झिडकारायला नको होतं! आज सांगायला अभिमान वाटतो की, त्याला मी सदोदित धीर दिला नसता, त्याचं न ऐकून घेता त्याची टिंगल केली असती तर त्या गरीब आणि निष्पाप मित्राचं जे वेड्यात रूपांतर झालेलं मला पाहावं लागलं असतं. तर ते मी टाळलं. कशावर? तर नुसत्या शब्दांवर. त्याची समस्या मी दूर करू शकत नव्हतो. त्याची त्यालाच काही काळानंतर मनाची उभारी आली आणि दुप्पट उत्साहानं तो परत कामाला लागला. आजही त्याची खंगलेली चिंताग्रस्त मुद्रा मला आठवते आहे.

## शिस्त आणि टापटीप

टापटिपीचा, शिस्तीचा आणि वक्तशीरपणाचा काळजीशी कितपत संबंध

आहे ? माझ्या दृष्टीने खूपच आहे. म्हणून त्याची चर्चा करणं फार अगत्याचं आहे. मी घरातला कर्ता आणि मोठा माणूस आहे. त्यामुळं अर्थातच मला घरात मान आहे. माझा शब्द सहसा कुणी खाली पडू देत नाही. पण म्हणून मी घरच्या लोकांना किती वैताग द्यावा ?

मी संध्याकाळी कॉलेजमधून आलो की स्कूटर ठेवून घरात शिरतो. टेबलावर कुठंतरी स्कूटरची किल्ली टाकून देतो. कधी ती किल्ली पँटमध्येच राहते. शेजारी भाऊ राहतो. कधी त्याच्या घरात मी संध्याकाळी बाहेरून आल्यावर जर प्रथम शिरलो, तर किल्ली तिथंच विसरून येतो. मग मी किल्लीचं साफ विसरून जातो. आठवण केव्हा येते तर दुसऱ्या दिवशी कॉलेजला निघताना. मग किल्ली हुडकायला सुरुवात होते. कपडे घालून मी अगदी तयार असतो. टेबलावर, बाहेरच्या खोलीत, स्वयंपाकघरात, भावाच्या घरात सर्वत्र मी किल्ली हुडकू लागतो. मग घड्याळाकडे पाहतो. मला उशीर व्हायला लागलेला असतो. मी हिला हाक मारतो, ‘अग, किल्ली हुडक.’ पलीकडे भावाच्या बायकोला हुकूम करतो ‘किल्ली हुडका.’ मी, ही, भावाची बायको, माझी मुलं सर्वजण किल्ली हुडकायला लागतात. मग विचार सुरू होतो. काल मी आलो तो प्रथम कुठं गेलो ? असं विचार करून डोकं फुटायची पाळी येते. मग किल्ली एकदाची सापडते, पण मला उशीर होतो. साहेबांची भीती वाटते. हृदय धडधड करायला लागतं. रस्त्यावरून जाताना लक्ष स्कूटर चालवण्याकडे मुळी नसतंच. लोकांचं दैव बलवत्तर असतं म्हणून अपघात होत नाही माझ्या हातून ! तिथं पोचतो, गुपचूप जागेवर जाऊन बसतो. हळूच मित्राला विचारतो,

‘साहेब विचारत नव्हते ना माझ्याबद्दल ?’

‘कुणास ठाऊक ! मला तर विचारलं नाही.’

मला सारखी काळजी लागून राहते.

हे असं दोन-तीन दिवस होतं. मग एक दिवस साहेब खरंच रागावतात. मग मला अक्कल सुचते. मी घरी येतो. भिंतीवर खिळा ठोकतो. तिथं किल्ली अडकवतो आणि मुख्य म्हणजे ही सवय मोडत नाही ! आता माझी किल्ली मला हुडकावी लागत नाही. ही झाली एक तऱ्हा !

प्रत्येक नागरिकाला नित्य निरनिराळी बिलं, टॅक्स भरावे लागतात.

त्याच्या तारखा त्यानं स्वतःहून लक्षात ठेवून वेळच्या वेळी टॅक्स भरायचे असतात. उदा. ड्रायव्हिंग लायसेन्स फी, आर. टी. ओ. वाहन कर वगैरे. आता गंमत ऐका. सकाळी मी उठलो, की माझं सगळं अगदी आरामात दाढी आंघोळ उरकायची. उगीच कुठंतरी वेळ काढायचा. मग कॉलेजला निघायची वेळ झाली की एकदम आठवतं,

'विम्याचा हप्ता भरायची आजची शेवटची तारीख आहे.' मग धांदल सुरू होते. विम्याची नोटीस कुठंतरी कोनाड्यात, ड्रॉवरमध्ये पुस्तकांच्या शेल्फात फेकून दिलेली असते. मी आरडाओरडा करायला लागतो.

'अग, काय शिस्तच नाही या घराला ! विम्याची नोटीस कुठाय ?'

'मला काय माहीत ? तुम्हीच फेकता कुठंतरी.'

'मी असतो कामात. तुला नाही का नीट ठेवता येत ?' मग निरर्थक भांडण सुरू होतं.

'सगळं मेलं मीच करायचं. आता हप्ता भरणं, टॅक्स भरणं या गोष्टीसुद्धा तुम्हाला जमत नाहीत.'

'तू गप्प बस. नोटीस हुडक. आज हप्ता नाही भरला, तर मग कदाचित मला मेडिकल एक्झमिनेशनही करून घ्यावी लागेल !' मला काही सुचत नाही. विम्याची एक महिन्याची हप्ता भरायची मुदत शेवटी टळून जाते. माझा संताप अनावर होतो. नोटीस हुडकताना मुलगा येतो. म्हणतो,

'बाबा, हे गणित सांगा.'

'चल रे, चालता हो, मला नोटीस सापडत नाही.' मी ओरडतो.

हे नाटक निरनिराळे टॅक्स, बिलं वगैरे भरताना शेवटच्या क्षणी जाग आल्यामुळं माझ्याकडे नेहमी व्हायचं. आता मी एक कागद तयार केलाय. त्यावर लिहून ठेवलंय. डिसेंबर– स्कूटरचा विमा, स्कूटरचा आर. टी. ओ. टॅक्स. जानेवारी– घरपट्टी. फेब्रुवारी– बिगर शेतसारा (घराचा) इन्कम-टॅक्स वगैरे वगैरे. हा चार्ट मी दिसेल असा अडकवून ठेवलाय. आता मला त्रास होणार नाही हे निश्चित. कारण मार्च उजाडला की मी चार्ट पाहतो. 'ड्रायव्हिंग लायसन्सचे पैसे भरले पाहिजेत.' मग मी वेळच्या वेळी पैसे भरतो.

दैनंदिन जीवनात टापटिपीला फार महत्त्व आहे. आपला कितीतरी वेळ

आहे ? माझ्या दृष्टीने खूपच आहे. म्हणून त्याची चर्चा करणं फार अगत्याचं आहे. मी घरातला कर्ता आणि मोठा माणूस आहे. त्यामुळं अर्थातच मला घरात मान आहे. माझा शब्द सहसा कुणी खाली पडू देत नाही. पण म्हणून मी घरच्या लोकांना किती वैताग द्यावा ?

मी संध्याकाळी कॉलेजमधून आलो की स्कूटर ठेवून घरात शिरतो. टेबलावर कुठंतरी स्कूटरची किल्ली टाकून देतो. कधी ती किल्ली पँटमध्येच राहते. शेजारी भाऊ राहतो. कधी त्याच्या घरात मी संध्याकाळी बाहेरून आल्यावर जर प्रथम शिरलो, तर किल्ली तिथंच विसरून येतो. मग मी किल्लीचं साफ विसरून जातो. आठवण केव्हा येते तर दुसऱ्या दिवशी कॉलेजला निघताना. मग किल्ली हुडकायला सुरुवात होते. कपडे घालून मी अगदी तयार असतो. टेबलावर, बाहेरच्या खोलीत, स्वयंपाकघरात, भावाच्या घरात सर्वत्र मी किल्ली हुडकू लागतो. मग घड्याळाकडे पाहतो. मला उशीर व्हायला लागलेला असतो. मी हिला हाक मारतो, ‘ अग, किल्ली हुडक. ’ पलीकडे भावाच्या बायकोला हुकूम करतो ‘ किल्ली हुडका. ’ मी, ही, भावाची बायको, माझी मुलं सर्वजण किल्ली हुडकायला लागतात. मग विचार सुरू होतो. काल मी आलो तो प्रथम कुठं गेलो ? असं विचार करून डोकं फुटायची पाळी येते. मग किल्ली एकदाची सापडते, पण मला उशीर होतो. साहेबांची भीती वाटते. हृदय धडधड करायला लागतं. रस्त्यावरून जाताना लक्ष स्कूटर चालवण्याकडे मुळी नसतंच. लोकांचं दैव बलवत्तर असतं म्हणून अपघात होत नाही माझ्या हातून ! तिथं पोचतो, गुपचूप जागेवर जाऊन बसतो. हळूच मित्राला विचारतो,

‘ साहेब विचारत नव्हते ना माझ्याबद्दल ?’

‘ कुणास ठाऊक ! मला तर विचारलं नाही. ’

मला सारखी काळजी लागून राहते.

हे असं दोन-तीन दिवस होतं. मग एक दिवस साहेब खरंच रागावतात. मग मला अक्कल सुचते. मी घरी येतो. भिंतीवर खिळा ठोकतो. तिथं किल्ली अडकवतो आणि मुख्य म्हणजे ही सवय मोडत नाही ! आता माझी किल्ली मला हुडकावी लागत नाही. ही झाली एक तऱ्हा !

प्रत्येक नागरिकाला नित्य निरनिराळी बिलं, टॅक्स भरावे लागतात.

त्याच्या तारखा त्यानं स्वतःहून लक्षात ठेवून वेळच्या वेळी टॅक्स भरायचे असतात. उदा. ड्रायव्हिंग लायसेन्स फी, आर. टी. ओ. वाहन कर वगैरे. आता गंमत ऐका. सकाळी मी उठलो, की माझं सगळं अगदी आरामात दाढी आंघोळ उरकायची. उगीच कुठंतरी वेळ काढायचा. मग कॉलेजला निघायची वेळ झाली की एकदम आठवतं,

'विम्याचा हप्ता भरायची आजची शेवटची तारीख आहे.' मग धांदल सुरू होते. विम्याची नोटीस कुठंतरी कोनाड्यात, ड्रॉवरमध्ये पुस्तकांच्या शेल्फात फेकून दिलेली असते. मी आरडाओरडा करायला लागतो.

'अग, काय शिस्तच नाही या घराला! विम्याची नोटीस कुठाय?'

'मला काय माहीत? तुम्हीच फेकता कुठंतरी.'

'मी असतो कामात. तुला नाही का नीट ठेवता येत?' मग निरर्थक भांडण सुरू होतं.

'सगळं मेलं मीच करायचं. आता हप्ता भरणं, टॅक्स भरणं या गोष्टीसुद्धा तुम्हाला जमत नाहीत.'

'तू गप्प बस. नोटीस हुडक. आज हप्ता नाही भरला, तर मग कदाचित मला मेडिकल एक्झमिनेशनही करून घ्यावी लागेल!' मला काही सुचत नाही. विम्याची एक महिन्याची हप्ता भरायची मुदत शेवटी टळून जाते. माझा संताप अनावर होतो. नोटीस हुडकताना मुलगा येतो. म्हणतो,

'बाबा, हे गणित सांगा.'

'चल रे, चालता हो, मला नोटीस सापडत नाही.' मी ओरडतो.

हे नाटक निरनिराळे टॅक्स, बिलं वगैरे भरताना शेवटच्या क्षणी जाग आल्यामुळं माझ्याकडे नेहमी व्हायचं. आता मी एक कागद तयार केलाय. त्यावर लिहून ठेवलंय. डिसेंबर– स्कूटरचा विमा, स्कूटरचा आर. टी. ओ. टॅक्स. जानेवारी– घरपट्टी. फेब्रुवारी– बिगर शेतसारा (घराचा) इन्कम-टॅक्स वगैरे वगैरे. हा चार्ट मी दिसेल असा अडकवून ठेवलाय. आता मला त्रास होणार नाही हे निश्चित. कारण मार्च उजाडला की मी चार्ट पाहतो. 'ड्रायव्हिंग लायसन्सचे पैसे भरले पाहिजेत.' मग मी वेळच्या वेळी पैसे भरतो.

दैनंदिन जीवनात टापटिपीला फार महत्त्व आहे. आपला कितीतरी वेळ

फुकट जातो क्षुल्लक गोष्टीत. मी जर घरात घेतलेली कात्री त्याच जागी ठेवली नाही तर मुलंही त्याचं अनुकरण करतात. वेळेवर कात्री मुळी सापडतच नाही ! जो जी वस्तू घेतो ती काम झाल्यावर मूळ जागेवर ठेवतच नाही. कुणाचं पुस्तक वाचायला आणलं की परत त्याला देताना सापडतच नाही. वर्तमानपत्र वाचून झालं की कुठंही फेकलं. मग पुन्हा वाचायची वेळ आली की सापडतच नाही. मग झाला आरडाओरडा सुरू ! तणातणीमुळं ब्लड-प्रेशर वाढतं. अति काटेकोर शिस्त जितकी वाईट तितकाच गलथानपणाही वाईट ! माझ्या एका मित्राचे महत्त्वाचे कागद त्यानं त्याच्या घरी वर्तमानपत्राची रद्दी ठेवतात, त्या कोनाड्यात चुकून ठेवले. ते रद्दीत विकले गेले ! मग राग कुणावर काढायचा ? पोरावर, बायकोवर ! कारण तीच एक राग काढायची हक्काची जागा असते ! इतर तिऱ्हाईत कोण ऐकून घेईल ?

गबाळपणामुळं माझ्या मित्राला एकदा शंभर रुपयांचा फटका बसला. शेअरवर जे व्याज येतं, त्याचा इन्कमटॅक्स आधीच कापला जातो. तसं सर्टिफिकेट मिळतं. ते इन्कमटॅक्स कचेरीकडे पाठवलं की तो टॅक्स परत मिळतो. वर्षाच्या वर्षाला हे करावं लागतं. एक दिवस जुने कागदपत्र पाहताना मित्राला आढळलं की पाच वर्षांपूर्वीची अशी सर्टिफिकिटं एका भलत्याच पाकिटात तशीच पडून होती. आता त्याचा काही एक उपयोग नव्हता ! आपले कागद जर अस्ताव्यस्त कुठंही गहाळ होत असतील, तर एकदा तारेचा काटा करावा. त्याला महत्त्वाचे कागदपत्र टोचून ठेवावेत. म्हणजे एकाच ठिकाणी सगळे सापडतील. गोष्ट साधी आहे. मी जे सांगितलं हे अंमलात आणणं किती सोपे आहे ! पण प्रत्यक्षात उतरवतो कोण ? वैद्यक शास्त्रातलं एक दुर्मिळ पुस्तक माझ्या एका मित्रानं माझ्याकडून वाचायला नेलं. महिना झाला, दोन महिने झाले, परत देण्याची भाषाच नव्हती. ‘ उद्या नक्की आणतो.’ ‘ अरे, सॉरी, विसरलो.’ असं चालूच होतं. मग मी त्याच्या घरी गेलो. त्यानं ते हुडकायला सुरुवात केली. मीही मदतीला लागलो. ते सापडलंच नाही. मी मुकाट्यानं परत गेलो. मित्र दुसऱ्या दिवशी मला म्हणाला, ‘ मी रात्रभर काळजीत होतो, पुस्तक सापडतंय का नाही म्हणून. मग शेजाऱ्याकडे सापडलं.’ या बारीकसारीक गोष्टी तुमचं-आमचं स्वास्थ्य

बिघडवून टाकतात आणि मग महत्त्वाच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत करायला उमेद, उत्साह आणि वेळच सापडत नाही. गबाळग्रंथी ऑफिसर असला म्हणजे महत्त्वाचे कागद गायब होतात. महत्त्वाच्या पत्रांना वेळच्या वेळी उत्तरं जात नाहीत. टेबलावर कागदांचा मोठा बुजबुजाट झालेला असतो. त्याचं एक विनोदी उदाहरण ऐका. साहेबांच्या टेबलावर कामाचा ढीग पडला होता. फायलीवर फायलींचा डोंगर होता. साहेब कुठल्यातरी फालतू लोकांशी तास न् तास गप्पा मारत होते. पट्टेवाल्याचा धक्का लागला आणि फायली ढासळल्या. त्या गठ्ठयातून एक पाकीट साहेबांच्या अंगावर पडलं. ती एक महत्त्वाची तार होती ! चार दिवस फोडलीच नव्हती. मग साहेब घाबरून गेले. त्यांना महत्त्वाच्या कामाला दोन दिवसांपूर्वी नागपूरला बोलावलेलं होतं. तो दिवस उलटून गेला होता. वरिष्ठांकडून जाब विचारला जाणार म्हणून ते सारखे काळजीत होते !

## जिभेला लगाम

जी गोष्ट टापटिपीची तीच तारतम्य ठेवून वागण्याची. तुमचं बोलणं जर खुळचटासारखं असेल तर तुम्ही कसे अडचणीत येऊ शकता त्याचं उदाहरणच देतो !

माझ्या एका मित्राचा धंदा आहे. त्याला एक ऑर्डर मिळणार होती. बोलणीही निश्चित झाली होती. आता फक्त लेखी पत्र त्याच्या पार्टीकडून यायचं होतं. मित्र त्याच्या ओळखीच्या लोकांत गप्पा मारताना म्हणाला, ‘ त्या ढेरपोटयाची पंचवीस हजारांची ऑर्डर मिळते आहे. बरं झालं. त्याच्या घरी अधूनमधून आता जाता येईल. त्याची बायको भलतीच देखणी आहे.’ ज्या लोकांत तो बोलला, त्यातला एक त्या ऑर्डर देणाऱ्याचा नातलग होता. त्यानं हे त्याला घरी जाऊन सांगितलं. मग ही गोष्ट मित्रालाही कळली. त्यानं खूप काळजी केली. काही कारण नसताना केलेली टीका त्याला सहन झाली नाही. त्यानं ऑर्डर द्यायचं रद्द केलं. नोकरी करणाऱ्या लोकांना कुठं काय बोलावं याचं भान राहिलं नाही की ते वरिष्ठांच्या मर्जीतून

उतरतात. साहेबांची त्यांच्या पाठीमागे निंदा करायची हा एक वरिष्ठांचा छंद असतो. स्वतःची वैगुण्य त्यामुळं झाकली जातात. कुणीतरी एकदा साहेबाच्या कानाला लागतो, कुचाळक्या करणारे घाबरून चिंता करू लागतात, 'आता आपलं काय होणार ?'

लक्षात ठेवा, साहेबाच्या मागं तुम्ही लाखवेळा त्याची स्तुती केली आणि ती त्याच्या कानावर गेली, तर त्याला त्याचं विशेष काही वाटत नाही. पण त्याची निंदा तुम्ही एकदा जरी केली आणि ती त्याच्या कानावर गेली, तर तो ती खपवून घेईलच असं नाही. माणसाचा एक स्वभावधर्म आहे. कुणालाही आपली जरासुद्धा टिंगल केलेली आवडत नाही. प्रत्येकजण स्तुतिप्रिय आहे. मग मी म्हणतो, कामाव्यतिरिक्त तोंड उघडाच कशाला ? अधिकारी त्याच्या परीनं चांगलं काम करीत असतो. कनिष्ठाचं काम काय ? त्याचे हुकूम पाळणं, त्यानं घेतलेल्या निर्णयाचे जे बरेवाईट परिणाम होतील ते तो निस्तारेल. करता कशाला त्याच्यावर टीका ? आधी तुम्ही बोलायचं, मग कुणी साहेबाकडे जाऊन चुगली केली तर त्या चुगलीखोराला शिव्या द्यायच्या. हवी कशाला ही डोकेदुखी ? त्यामुळं निष्कारण डोक्याला काळजी मात्र लागते. वरिष्ठ हलक्या कानाचा असला तर तुमच्या कामाचं चीज न होता तुम्हाला त्रास मात्र होण्याची जास्त शक्यता असते. शेजाऱ्या शेजाऱ्यांत चुगलीखोरीमुळं कितीतरी भांडणं होतात. आधी बोलायचं पण मग त्याची चुगली केली जाईल म्हणून काळजी करत बसणारे कितीतरी महाभाग मी पाहिलेले आहेत. माणसानं दुसऱ्यातले गुण पाहून त्याचं गुणग्रहण करायला शिकलं पाहिजे. त्याच्यातले दोष जर तुम्हाला त्रासदायक होत नसतील, तर त्यांची दखल का घेता ? तुमच्या मित्राच्या कंजूष स्वभावामुळं तुम्हाला काही त्रास होत नसेल तर त्याची टवाळी का करता ?

## दोन पिढ्यांतील संघर्ष

जी गोष्ट वायफळपणानं बोलण्याची तीच गोष्ट चमत्कारिकपणानं वागण्याची आहे. जो माणूस कालाप्रमाणं न बदलता आपलं तेच खरं, मेरी मुर्गीकी एकही टांग ! अशा हटवादीपणानं वागतो त्याचं जीवनही असंच

काळजीनं काळवंडून जातं. उदाहरणच देतो.

तात्यासाहेब भलतेच श्रीमंत. त्यांचा व्यापार मोठा. घरात त्यांची हुकूमशाही. मुलगी लग्नाला आलेली. तिनं एका शाळामास्तरशी लग्न जमवलं. वेळ जावा म्हणून तीही शिक्षिकेची नोकरी करायची. त्या प्रेम-विवाहाला वडिलांचा कडा विरोध.

अगदी हिंदी सिनेमातला खानदान का सवाल ! मुलीचं लग्न बापानं त्या मास्तराशी होऊ दिलं नाही. मग पुढे मुलीनं वडिलांनी आणलेल्या प्रत्येक स्थळाला विरोध केला. तिचं लग्नच झालं नाही. पुढे तिला एक डॉक्टर घरी शिकवणीला बोलावू लागले. डॉक्टरांना तीन मुलं. स्वतःचं वय ३५, म्हणजे हिच्यापेक्षा १० वर्षांनी मोठे. त्यांचं जमलं. ती डॉक्टरांची बायको होण्याची स्वप्नं पाहू लागली. डॉक्टरांनी स्वतःची बायकोही सोडली नाही आणि या मुलीलाही. तिला त्यांच्यापासून सध्या चार वर्षांचा एक मुलगा आहे ! काय मिळवलं वडिलांनी ?

त्यांचा मुलगा हुशार. शाळेत पहिला वर्ग मिळविणारा. त्याला आधुनिक बेलबॉटम पँट शिवायला यांचा सक्त विरोध जुनी पिढी आणि नवी पिढी यांतला हा संघर्ष– दिसते ती पँट गबाळ. पण आज पोरांना तीच आवडते ना ? त्यांनी तारतम्य बाळगलं नाही. मुलगा वर्तनानं शुद्ध होता. पण यांचं लांब केस ठेवायचे नाहीत, बेलबॉटम शिवायच्या नाहीत, हे इतकं पराकोटीला गेलं की, त्यांनी त्याचे केस स्वतः कात्रीने कापले. मुलगा गप्प बसला. पुढे मोठेपणी त्यानं बापाला पार धाब्यावर बसवलं.

बापानं तारतम्य नको होतं का वापरायला ? कशाला ताणायचं एवढं ? पाश्चात्यांकडून येणारी ही फॅशन्सची लाट थोपवायची असेल तर त्या मुलावर स्वतःची मतं लादण्याऐवजी त्याचं मन वळवा. जमलं तर जमलं, नाहीतर तडजोड करा. अति ताणू नका, असं मला सुचवायचं आहे. अगदीच मुलगा व्यसनाकडे वळू लागला तर सर्व शक्तिनिशी त्याचा मुकाबला करा. पण किरकोळ गोष्टीतून भांडणं, तणाव का माजवता ?

माझं तर म्हणणं आहे, बारीकसारीक बाबींमध्ये कुठल्याही माणसानं आग्रही भूमिका घेऊ नये. प्रत्येकाचे विचार वेगळे असतात. प्रत्येकाला वागायचं स्वातंत्र्य असतं. अगदी फार मोठं नुकसान होणार असेल आणि

तुमचा अधिकार असेल तरच मार्गदर्शन करा, प्रयत्न करा. पण तुमची मतं दुसऱ्यावर लादू नका.

## भांडायचं कुठं ?

जीवनात कुठल्या गोष्टीला महत्त्व द्यायचं, कुठं दुर्लक्ष करायचं हे ज्यांना समजत नाही, ते सतत दु:खी होत असतात. चांभारानं वीस पैशांच्याऐवजी तीस पैसे घेतले, रिक्शावाल्यानं थोडंसं वेगळ्या मार्गानं नेऊन चार-आठ आण्यानं बिल वाढवलं, अशा क्षुल्लक कारणांवरून भांडण्यात काय अर्थ आहे ? तिथं प्रतिष्ठा आडवी येते. तत्त्वाचा प्रश्न होतो तो ! तुम्ही म्हणाल, मग काय लुच्च्या लोकांना सोकावू द्यायचं का ? तसं नाही. पण प्रश्न किती पैशांचा आहे ? किरकोळ आहे ना ? मग का भांडता ?

बायका अशाच वागतात कितीतरी वेळा. मिरच्या, कोथिंबीर, भोपळा, गवार यांच्या भावात खळखळ करतात. प्रश्न असतो रुपाया-दोन रुपयांचा. साड्यांच्या खरेदीला जातात आणि निमूटपणानं पाव आणा कमी न करता मागतील तेवढे पैसे देतात ! कदाचित एखादा दुकानदार सेलच्या नावाखाली मूळ किंमत आणि नवी कमी केलेली किंमत म्हणून खोट्या किंमती लिहीत नसेल कशावरून ?

साड्या पाहता पाहता गिऱ्हाईक म्हणतं, ' यापेक्षा जरा भारी दाखवा. ' असं करता करता, एखादी अगदी भारी वाटणारी, ग्लेझ असणारी सुंदर डिझाइनची तीस रुपयांची साडी दुकानदार पन्नास रुपयांच्या आसपासच्या साड्यांत घुसडून कशावरून नाही टाकणार ?

आता वाऱ्याशी भांडणाराचं एक गमतीशीर उदाहरण पाहा.

रस्त्यानं चौघेजण चालले होते. मागून सायकलवरून दोघेजण आले. ते त्यांच्याजवळून गेले. त्या चौघांपैकी एकजण म्हणाला,

' काय रे, रस्ता नाही दिसत नीट ?' ही अर्थातच त्या सायकलवाल्याची कुचेष्टा होती. त्या दोघांनी सायकली रस्त्याला उभ्या करून ठेवल्या आणि ' कुणाला म्हणाला ' वगैरे वादावादी सुरू केली. चौघे विरुद्ध दोघे यांत अर्थात दोघांनी मार खाल्ला. मग दोघे सायकलवर बसले, निघाले. पुन्हा

त्यांना एकू आलं.

' जा मुकाट्यानं आता. '

इथं मी म्हणतो, टिंगल ऐकू आल्यावर जर ते दोघे तसेच गेले असते तर मार वाचला असता का ? वाचला असता. ते चौघे अनोळखी होते ना ? यांचं त्यांचं वैर होतं का ? नव्हतं. पुन्हा संबंध येणार होता का ? नव्हता. मग का भांडता ? वाचक म्हणतील, हे नेभळे विचार झाले. याने गुंडगिरी फोफावते.

मी म्हणतो, दुर्लक्ष केल्यामुळं टीका-टिंगल जेवढी फोफावते त्यापेक्षा मार खाल्ल्यामुळे जास्त फोफावते. कारण असं पाहा. मार दिल्यामुळं गुंडांना समाधान मिळतं, आत्मविश्वास वाढतो. दुर्लक्ष केलं तर निव्वळ बाष्कळ बडबडीचा, टिंगल केल्याचा आनंद मिळतो. हे चौघं जर नेहमी तुमच्या सहवासात येणार असतील आणि काहीही कारण नसताना तुम्हाला छळत असतील तर वैध मार्गांनी जरूर प्रतिकार करा. तिथं कच खाऊ नका. रस्त्यातल्या या क्षुल्लक भांडणात एखादा खूप दम देतो, मग बाकीचे त्याला बघून घेऊ म्हणून सांगून जातात. ते गुंड जमा करून सतावतील की काय अशी याला काळजी लागते. असल्या क्षुल्लक गोष्टींकडे नेहमी दुर्लक्ष करावं.

## जीवनप्रवासी

जीवन हा एक प्रवास असं समजा. आपल्याला मुंबईला जायचं असेल तर वाटेत लागणाऱ्या घोरवाडी, कामशेत, विठ्ठलवाडी आणि तत्सम फडतूस स्टेशनवर थांबताच कशाला ? त्यांना मागे टाका, त्यांना विसरा आणि मुंबईला सहीसलामत पोहोचा. मी जे विवेचन केलं आहे ते काही मोठं तत्त्वज्ञान नाही. अगदी साध्या गोष्टी आहेत त्या. पण त्या व्यवहारात उपयोगात आणल्या नाहीत तर मार्ग कष्टाचा होतो. उगीच नको त्या गोष्टीत माणूस गुंतला जातो. आजवर एक सामान्य माणूस म्हणून मीसुद्धा खूप चुका केलेल्या आहेत. मी फक्त त्यावर आणि इतरांच्या चुकांवर विचार करून ते इथे मांडतो आहे. त्या चुकांचा विचार नंतर केला तर असे नक्की वाटते की आपण त्या टाळू शकलो असतो. आता साधी गोष्टच घ्या की !

दुसऱ्याच्या फार जवळ जाऊ नये हे खरं ना ? हे काम कुणी शिकवायला हवं का ? पण मी ते फटके खाऊन शिकलो.

माझ्या ओळखीचं एक कुटुंब आहे. मी बहुश्रुत आहे. मला शेअर्सपासून इंजिनिअरिंगपर्यंत, संगीतापासून साहित्यापर्यंत थोडं थोडं येतं. मी हरघडी त्या कुटुंबाला मदत करीत होतो. दुसऱ्याला मदत करण्यात फार आनंद असतो. मी भाबडेपणानं त्यांना मदत करत होतो. प्रसंगी पदराला खार लावून ! त्यांनी एक स्कूटर घ्यायचं ठरवलं. ती स्कूटर आधी कोण वापरत होतं, त्याच्या रिपेअर्स काय झाल्यात हे मला सुदैवानं माहीत होतं. त्या स्कूटरच्या मालकाचे माझे संबंध बरे नव्हते. मी सांगूनही त्या कुटुंबानं ती स्कूटर विकत घेतली, ते फसले. त्यांना आधी वाटलं होतं, मी त्या स्कूटर-मालकाच्या पूर्वग्रहामुळे स्कूटरला नावे ठेवतो. पण गंमत अशी, फसल्या-नंतर त्या कुटुंबानं माझा संबंध हळूहळू कमी करून टाकला. त्यांच्या फार जवळ जाण्याचं हे फळ मला मिळालं होतं. त्यांचं हित पाहणं हा जणू मी ठेकाच उचलला होता. इथंच माझं तारतम्य गहाळ झालं होतं. मग उगीच दुसऱ्याला दोष देण्यात काय अर्थ होता ? जास्त इंटरेस्ट घेतला हेच माझं चुकलं होतं. एकदा सांगून बघायचं आणि गप्प बसायचं, हे मला जमलं नाही. संशय वाढला, मी अप्रिय झालो ! त्यावरून एकच गोष्ट मला महत्त्वाची वाटली. ती म्हणजे, कुणाजवळ फार जाऊ नये. कुठंही भावनेनं अडकू नये. फार काय, आपल्या मुलाबाळांत, पत्नीत किंवा आईवडलांत-सुद्धा भावनेनं फार गुंतू नये. हे जरा चमत्कारिकपणाचं वाटेल. पण जितकं तुम्ही दुसऱ्या व्यक्तीमध्ये भावनेनं गुंतत जाता, तितक्या तुमच्या अपेक्षा वाढत जातात. ती व्यक्ती आपलं स्वतंत्रपण कायम टिकवू इच्छिते, सतत तुमच्या मनाप्रमाणं वागतेच असं नाही. पर्यायानं तुम्ही दुःखी होता ! वर उल्लेख केलेल्या सर्व उदाहरणांवरून लक्षात येईल की नीटनेटकेपणा, टापटीप, तारतम्य, या गोष्टींचा अभाव आणि कशाला महत्त्व द्यायचं हे समजण्याचा अभाव, नको तिथं आग्रही भूमिका घेण्याची सवय, सतत आपलंच खरं करण्याची खोड, असल्या वागण्यामुळं माणूस सतत स्वतः-काळज्या निर्माण करीत असतो. सतत अप्रिय होत राहतो. त्याचप्रमाणे कित्येक वेळा डोक्यानं निर्णय घेण्याऐवजी हृदयानं निर्णय घेतल्यामुळं तो

निरनिराळ्या अडचणींत सापडू शकतो. त्याच्या काळज्या वाढतात. म्हणून माझं प्रत्येकाला आवर्जून सांगणं आहे की, सतत विचारानं वागा. अविचारानं केलेल्या कृती दूरगामी परिणाम करून जाणाऱ्या असतात. आज चुकलं असाल, पण पुढे सुधारण्याची इच्छा धरा आणि प्रयत्नशील राहा.

## आपल्या मुलांशी वागणं

परमेश्वर माणसावर काही आपत्ती आणतो. उदाहरणार्थ आवडत्या माणसाचं आजारपण, त्यामुळे उद्भवणाऱ्या काळज्या, पैसे चोरीला जाणे, त्यामुळे उद्भवणारी चिंता, चोरी, घरफोडी ही गोष्ट मी दैवाधीनच समजतो. पण माणूस स्वतःच्या वागण्यामुळे स्वतःवर निरनिराळ्या तऱ्हेच्या काळज्या ओढवून घेतो. त्या टाळायचा त्यानं प्रयत्न केला तर त्याचं जीवन निश्चितच सुखी होईल असं मला वाटतं. त्यामुळे माणसानं कसं वागावं या गोष्टीची मी इथे चर्चा करणार आहे. प्रत्येकाला जीवनात हरघडी निर-निराळ्या भूमिका बजावाव्या लागतात. घरी बापाची, ऑफिसात कनिष्ठ (किंवा वरिष्ठ) नोकराची, सासुरवाडीला जावयाची (म्हणजे मानाची), मुलीच्या सासरी कमीपणाची वगैरे वगैरे. मला वाटते, की आपल्याला मिळणारी वागणूक हे आपण दुसऱ्याला दिलेल्या वागणुकीचे प्रतिबिंब असते, तो एक प्रकारचा प्रतिध्वनीच असतो म्हणा ना ! आपण दुसऱ्याला आदरानं वागवलं तर दुसराही आपला आदर करतो. अपवाद असतातच म्हणा ! आपण नीट वागलो नाही तर भांडणं होतात, शत्रुत्व निर्माण होतं. शत्रुत्वा-मुळे काळजी लागते. तेव्हा प्रथमच वागणं समजुतदारपणाचं, शहाणपणाचं ठेवलं, तर तणावच निर्माण होत नाहीत. मग माणसाने कुठे कसे वागावे किंवा वागवावे ?

प्रथम माणसाने घरी कसे वागावे याचा विचार करू या. घर हा प्रत्येकाचा आसरा, प्रत्येकाचं विश्रांतीस्थान आणि प्रत्येकाचं स्फूर्तिस्थान असतं. तिथं वातावरण आनंदी असायला हवं. शिस्त हवी पण हुकूमशाहीची शिस्त नसावी. घरातल्या लहान मुलांना मतं असतात. त्यांची जरूर कदर करावी. मुलं आपल्यावर अवलंबून असतात म्हणून त्यांना छळू नये. मार-

हाण तर बिलकुल करू नये. काळाप्रमाण आपण बदलत जावे म्हणजे दोन पिढ्यांतले अंतर कमी ठेवता येईल. मुलांच्यावर स्वतःचे विचार लादू नयेत. चालू पिढी ही भलती सिनेमाप्रिय आहे. थोडेफार बघू द्यावेत सिनेमे. पण घरीदारी सतत सिनेमाची चर्चा टाळावी. मुलांवर आईवडलांच्या वागण्याचा फार मोठा प्रभाव पडत असतो. ज्या घरात आई-वडील सतत भांडत असतात त्या घरातली मुलं वाह्यात निघू शकतात. घरात एका वेळेला एक शिस्त लावत असेल, तर दुसऱ्यानं मध्ये लुडबूड करू नये. मुलं दांडगाई करतात, मोडतोड करतात, कामं ऐकत नाहीत, हे सारं घरोघरी चालतं. त्यांना फार धारेवर धरू नये. नेमके जेवायच्या वेळी बहुधा सगळे एकत्र असतात. तेव्हा केवळ बाप म्हणून मुलांच्यावर राग काढण्याचे प्रकार घडत असतात. विशेषतः मुलांची मित्रमंडळी जमली की आईला किंवा वडलांना मुलांचा पाणउतारा करण्याचा भलता हुरूप येतो. मग मुलं दूर दूर जाऊ लागतात. अति झालं की पळूनसुद्धा जातात. मग आई-बाप काळजी करायला लागतात. मुलांच्या जिज्ञासू वृत्तीला कधी मारू नये. त्याचप्रमाणे त्यांना चांगल्या चांगल्या फॅशन्सचे कपडे वापरू द्यावेत. अर्थात हे मर्यादा पाळून करावं. पण त्यांच्या अभ्यासाकडे, शाळेतल्या हजेरीकडे नियमाने लक्ष पुरवावं. मुलांच्या बालपणातल्या आठवणी हा त्यांच्या पुढच्या जीवनातला सुखद ठेवा असतो. अर्थात त्याने मागितलेली प्रत्येक वस्तूही त्याला मिळालीच पाहिजे, असं त्याला वाटू देऊ नये. कारण भावी आयुष्यात त्याच्या मनासारखे झाले नाही तर तो दुःखी होतो. घरात लैंगिक विषयावर चर्चा करू नये. मुलांना आई-वडलांनी तसले ज्ञानही देऊ नये असे मला वाटते. त्याचे कारण मी सांगतो, ते तुम्हाला पटेल. मुले मित्रांत आणि शाळेत दिवसाचा खूप वेळ असतात. त्यांच्यात या विषयावर अधूनमधून काहीतरी चर्चा कुतूहल म्हणून होतच असते. तसंच मुले सर्व प्रकारची पुस्तके, मासिके वाचतच असतात. 'रीडर्स डायजेस्ट'मध्ये मागे एक लेख आला होता. एका इंग्लिश बाईने आपल्या मुलाला वयाच्या पंधराव्या वर्षी लैंगिक शिक्षण दिले. त्याचा परिणाम असा झाला की, मुलगा आई-वडिलांच्यावरच सतत रखवाली करू लागला. त्याचप्रमाणे या माहितीच्या आधारे जवळपासच्या मुलींवर प्रयोग करू लागला. त्या बाईला हे 'बाळ'

आवरणं मुष्किल झालं ! माझे हे विचार नवीन विचारांच्या लोकांना किंवा मानसशास्त्रज्ञांना रुचणार नाहीत. पण माझ्या दहा वर्षांच्या मुलाच्या प्रश्नोत्तरांवरून तुमच्या लक्षात येईल की मुलांना जे ज्ञान इतरत्र मिळते आहे त्यात आपण भर घालू नये हेच खरे !

मी मुलांना फटाके आणायला स्टॉलसवर नेले होते. तिथे खूप हिजडे फिरत होते. आठ वर्षांच्या माझ्या मुलीनं मला विचारलं,

'बाबा, हे कोण आहेत ?'

मी म्हणालो, 'हे पुरुषही नाहीत आणि स्त्रीही नाहीत.'

दहा वर्षांचा माझा मुलगा म्हणाला, 'अग, यांना हिजडे म्हणतात. म्हणजे अर्धनारीनटेश्वर ?'

आहे की नाही ! मला घरात या विषयावर बोललेलं आवडत नाही. थोरला मुलगा सोळा वर्षांचा आहे. मित्रामित्रांत ते गुपचूप या विषयावर थोडीफार चर्चा करतातच.

मला एकच सांगायचं आहे, चालू जमाना जुन्या पिढीपेक्षा हुशार आहे. त्याला 'मामा'– बावळट– ठेवू नका, पण त्याच्या ज्ञानात भर घालू नका ! हे विचार तुम्हाला अगदीच पटत नसतील तर मुलांना या विषयावरची डॉक्टरांनी लिहिलेली शास्त्रीय पुस्तके वाचायला द्या.

## वळण

मुलींवर आई-वडलांनी बारकाईने लक्ष ठेवावे. शाळा ते घर या मार्गावर नेहमी खूप 'हीरो' दहा-बारा वर्षांच्या मुलींच्या मागे असतात. ते तसे भित्रे असतात. मुलींची टिंगल करणे, त्यांना उद्देशून बोलणे वगैरे प्रकार चालतात. त्यावर उत्तम उपाय म्हणजे मुलींना तिकडे दुर्लक्ष करण्यास सांगावे. म्हणजे हे हीरो कंटाळतात व नाद सोडतात. न पेक्षा मुलींनी थोडा जरी रिस्पॉन्स दिला तरी मागे लागतात, दहशत घालतात, परिणामी मुलींच्या मनावर ताण निर्माण होतो. घरात मुला-मुलींचे निकोप वृत्तीचे मित्र-मैत्रिणी यायला आई-वडलांनी हरकत घेऊ नये. आई-वडलांनी आपले दोष झाकून ठेवू नयेत, ते प्रांजळपणानं कबूल करावेत. त्याचा जरूर फायदा

होतो. माझा स्वतःचा अनुभव मी सांगतो. मी उशिरा उठणारा माणूस आहे. त्यामुळे माझं खूप नुकसान झालेलं आहे. मुलांना मी यापासून कसं वाचवलं आहे पाहा. थोरल्या मुलाला ' लवकर ऊठ ' असा धोशा लावण्याआधी मी त्याला विश्वासात घेऊन म्हणालो,

'मी जर लवकर उठू शकलो असतो तर आयुष्यात आणखी यशस्वी झालो असतो. मला माझा हा दोष काढता आला नाही. तू त्यावरून धडा घे.' हे त्याला पटले. त्याचे उशीरा उठणे मी असे अटकळीने टाळले. मुलाचे वाह्यात मित्र घरी येऊ लागले की, मी मुलाचा अटकळीनं ब्रेन वॉश करून त्या मित्रांना घरी येऊ देत नाही, शेवटी सारं नशिबावर असतं हे जरी खरं असलं तरी प्रयत्न जंगली नसावेत. जी गोष्ट मुलांना तुम्ही जबरदस्तीनं टाळायला लावता तीच गोष्ट हटकून मुलं करतात. मग ती वाह्यातपणानं वागायला लागली की आई-बापांच्या तोंडचे पाणी पळून जाते.

'मी नोकरीला लागेतो सुताचे कपडे वापरत होतो आणि गाढवा, तू दहावीत टेरेलिनच्या कपड्यांचा हट्ट धरतोस ?' ही असली कान किटणारी बोधवाक्ये मुलांना सतत ऐकवू नये. अर्थात त्यांच्या नकळत आहे त्या परिस्थितीत समाधानाने राहावे ही शिकवण चांगली रुजवावी. मुलांनी हॉटेलात खाण्याचे जर टाळायचे असेल तर ते पदार्थ महिन्यात एखाद्या वेळी घरी आणून त्यांना द्यावेत किंवा त्यांना बरोबर हॉटेलात नेऊन ते खावयास द्यावेत. शक्यतो सर्वांनी मिळून अशा वस्तू खाण्याचा रिवाज पाडावा म्हणजे चोरून खाण्याची इच्छा टाळली जाईल.

तसेच मुले उनाडक्या करण्याच्या वृत्तीपासून वाचवायची असतील तर त्यांना मुलांसाठी निघणारी पुस्तके घरी भरपूर आणून द्यावीत (किंवा लायब्ररी लावून द्यावी.) हे उपाय मी स्वतः केलेले आहेत. त्यामुळे मुलांचे भटकणेही थांबते आणि पुस्तके वाचून त्यांचे ज्ञानही वाढते.

## नातलग

नातलगांत वागताना फार काळजीने वागावे लागते. काही नातलग उण्याचे वाटेकरी असतात. काही मात्र चांगले असतात. दुसऱ्याचे चांगले कुणाला

पाहवत नाही. नातलगांचे गट पडत असतात. आज काही या गटात असतात, उद्या काही त्या गटात असतात. तेव्हा ते या गटात त्यांची निंदा करतात. एखाद्याने गट बदलला की पहिल्या गटातले लोक दुसऱ्या गटातल्या लोकांची त्याने काय निंदा केली होती हे उघडपणाने बोलतात. मग भांडणे होतात. तणाव निर्माण होतात. लग्नकार्याला काही लोक येतात. काही लोक येत नाहीत. जे येतात ते उघड कुचेष्टा करतात. भांडणे लावतात.

शहाण्या माणसाने ही गटबाजी थांबवावी. मुख्यत: कुणी नातलग घरी आला तर त्याच्याशी निंदा, कुचेष्टा करण्याचे टाळावे. इथे ऐकलेले दुसरीकडे पोचवणे व भांडणे लावून संबंध दुरावणे हे काही लोकांचे उद्योगच असतात. त्यापेक्षा कुणाकडे जाऊ नये. फार तर अशामुळे 'तुसडा' ही टीका होईल; पण भांडणे तर लागणार नाहीत ना ?

केशवराव दिनकररावांकडे जातात, तिथे विषय असतो अण्णाकाकांची निंदानालस्ती करायचा. दिनकरराव जे बोलतात तेच फक्त केशवराव अण्णाकाकांच्याकडे गेल्यावर सांगतात. अण्णाकाका मग दिनकररावांवर शिव्यांची लाखोली वाहतात. ती डाक पुढच्या भेटीत दिनकररावांना पोचवली जाते. ही अशी 'खुन्नस' कुठल्या तरी कार्यात प्रत्यक्षात उखाळ्यापाखाळ्याचं स्वरूप धारण करते. दोघे एकमेकांची तोंडे पाहत नाहीत. कशाला हव्यात या उचापती आणि नंतरची डोकेदुखी ? शक्यतोवर नातलगांशी हवापाण्याच्या गप्पा कराव्यात, पण कुणाचे विषय काढू नयेत.

## धुसफूस

घरातल्या वडिलधाऱ्या मंडळींचे मुलांच्या लग्नाकार्याच्या वेळी आणि नंतर खूपसे चुकते. मुलाच्या कलाप्रमाणे त्याला मुलगी निवडू द्यावी. त्याला वाटले तर एकत्र कुटुंब पद्धतीत सामावून घ्यावे. न पेक्षा स्वत: वेगळे काढावे. पण ही माणसे ऐकत नाहीत. आपल्या इच्छा मुलांवर लादतात. सुनेला नवराच प्रिय असतो. ती त्याला बाहेर काढू पाहते. मग सासू-सासरे छळतात, नणंदा तेल ओतात. त्या बिचाऱ्या नवऱ्याचे काळजी करून करून डोक्याचे केस पांढरे होतात. नुसती धुसफूस चालू असते. प्रकरणे कोर्टापर्यंत

जातात, प्रश्न प्रतिष्ठेचे केले जातात. मनं मारली जातात, वडीलधारी माणसे स्वतःच्या मुलीला एक न्याय आणि सुनेला दुसरा असली दुटप्पी भूमिका धारण करतात. घरोघरी हेच चाललेलं असतं. घरी गाडी असते, मुलगा मोठा इंजिनिअर, डॉक्टर असतो– पण ग्रॅज्युएट सुनेला उपासतापास सोवळे, देवधर्म यांची सक्ती केली जाते! हे प्रत्यक्ष पाहिलेलं वर्णन सांगतोय! जिथे नवरा ढिला असतो तिथे बायकोचा उभा जन्म हा छळ सहन करण्यात जातो. जिथे बायको तडकफडक असते तिथे क्षणोक्षणी सासू-सासऱ्यांशी भांडत असते. इथे शिकलेले, अशिक्षित, गरीब, श्रीमंत असा भेद नसतो. सगळे सारखेच वागतात.

याविरुद्ध, माझ्या माहितीच्या एका गृहस्थानं फार अक्कलहुशारीनं संसार केला. त्यांना चार मुलगे. प्रत्येकाचं लग्न झाल्याबरोबर त्यांनी स्वतःच प्रत्येकाला वेगळे काढून संसार थाटून दिले. कुठलाही प्रश्न त्यांनी प्रतिष्ठेचा केला नाही. कुणाच्याही संसारात त्यांनी 'न मागता' सल्ला दिला नाही. त्यामुळे प्रत्येक मुलाला आपले आई-वडील हवेहवेसे वाटतात. किती सापडतील अशी उदाहरणे?

## घराबाहेर

आता घराबाहेर माणसाने कसे वागावे हे आपण पाहू. व्यवसायाच्या क्षेत्रात कित्येक वेळा अपयश पदरी येते. मग माणसे लोकांचा मत्सर करू लागतात. भल्या-बुऱ्या मार्गाने प्रतिस्पर्ध्यांना खाली ओढू पाहतात. निंदा, कुचेष्टा यांना ऊत येतो. आपल्या देशात फार मोठ्या प्रमाणावर लोक नोकऱ्या करणारे आहेत. जेव्हा मोकळा वेळ मिळतो तेव्हा इथे गटबाजीला ऊत येऊ शकतो. सतत सहकाऱ्यांवर टीका करणे, अधिकाऱ्यांवर टीका करणे हा कित्येक नोकरांचा गुणधर्म असतो. नोकरांनी झटून काम करावे हे सांगायची जरूर नाही. परंतु टिंगल टवाळी, चहाड्या, या गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत. बोलताना एखाद्या अधिकाऱ्याबद्दल चटकन काहीतरी वाईट बोलून जातो. मग कुणीतरी चहाडखोर ती गोष्ट त्या अधिकाऱ्यापर्यंत पोचवतो, मग बोलणारे 'पुढे काय होणार' या विवंचनेत राहतात!

हे प्रत्येकाने टाळले पाहिजे.

## श्रमजीवी महिलांविषयी आदर हवा

नोकरी करणाऱ्या सहकारी स्त्री कर्मचाऱ्यांबद्दल असंच काही काही वेळा घाणेरडं बोललं जातं. बोलणारांना असं बोलताना मजा वाटत असते, पण साऱ्या गोष्टी मनाचा हलकेपणा दाखवतात. नोकरी करणाऱ्या कितीतरी बायकांना घरीदारी सारखे कष्टच उपसावे लागतात. त्यांचे नवरे त्यांच्याकडे पैसे मिळवून आणून देणारी आणि दोन्हीकडे राबणारी तरी पण आपल्या हुकमतीखाली राहणारी स्त्री म्हणून पाहतात. अशा गरीब आणि कष्टाळू स्त्रीबद्दल समाजाला आदर वाटायला हवा आणि नवऱ्यानं तिची जाणीव ठेवून तिला स्वातंत्र्य द्यायला हवं.

माझ्या माहितीचे एक गृहस्थ आहेत. आपण त्यांना आनंदराव म्हणू. त्यांची बायको नोकरी करते. ते स्वतः नोकरी करतात, आठशिवाय उठत नाहीत. दूध आणणे वगैरे फालतू कामे बायको पाचला उठून करते. मुलांचा अभ्यास घेणे, त्यांना अंघोळी घालणे, अंथरुण घालणे, फार काय काटकसर म्हणून घरी धुणं धुणे ही आणखीन फालतू कामे बायकोच करते. सासूसासरे आणि नवरोजी जाच करण्याचं महत्त्वाचं काम करतात. त्या बाईची एवढी शामत आहे की इतके काबाडकष्ट करून ती नोकरीला जाते तिथे तिचे रिपोर्ट चांगले आहेत. तिचे बॉस चांगले आहेत. त्यांनी घरी तिला हळदी-कुंकवाला बोलावलं तर ही जाऊ शकत नाही. कारण 'ह्यांची' धारणा अशी आहे की बॉस हा एक चारित्र्यशून्य माणूस असतो. ही बॉसला घरी बोलावू शकत नाही, फार काय ऑफिसातला कोणताही पुरुष हिच्या घरी आलेला कुणाला खपत नाही. शेवटी एवढं काम करूनही हिला स्वातंत्र्य नाही, आणि काळजी कसली तर बॉसला दुखवलं म्हणजे नोकरीवर तर गदा नाही ना यायची या गोष्टीची !

का करू नये माणसानं एकमेकांचा विचार ? का देऊ नये बायकोला थोडंसं स्वातंत्र्य ? घरी, दारी सर्वत्र माणसानं सदैव दुसऱ्याचा विचार करायला शिकलं पाहिजे, मी मनाशी म्हटलं पाहिजे, मी त्याच्या परि-स्थितीत असतो तर काय केलं असतं ? असे विचार नेहमी माणसाचं मन

पक्क बनवतात. जे असा विचारच करत नाहीत ते सतत भांडत असतात. सतत कुरकुरत असतात. मानसानं सहनशीलता, तारतम्य या गोष्टी अंगी बाणवल्या पाहिजेत. त्यामुळे आपण दुसऱ्याला कमीत कमी उपद्रव देत असतो.

## अपेक्षाभंग कसा टाळाल ?

मागं मी म्हटलं होतं की कुणातही भावनेनं फार अडकू नये त्यामुळं माणसाचं जीवन अधिक दुःखी होतं. आई, वडील, मुले, पत्नी आणि इतर जवळचे नातलग यात माणसाच्या जिवाभावाचे लोक असतात, ही माणसं आपल्यावर प्रेम करत असतात. परंतु मला असे वाटते. मर्यादेपेक्षा या व्यक्तींमध्ये आपण भावनेनं गुंतू नये प्रत्येकाला योग्य ती किंमत द्यावी. 'माझा राजू' किंवा माझी आई, माझे बाबा असा प्रेमाचा अतिरेक करू नये. जग भावनेवर चालत नसून व्यवहारावर चालतं हे ध्यानात ठेवावं. कारण मुलाबाळांत, सग्यासोयऱ्यांत जर आपण भावनेनं गुंतलो तर पुढे त्यापैकी मनासारखं कुणी वागलं नाही की रागाच्या भावना त्वरित निर्माण होतात. मला एवढंच म्हणायचं आहे, भावनाशील असावं पण अतिरेक करून पुढे स्वतःला दुःखी करून घेऊ नये. ज्या व्यक्तीबद्दल आपल्या प्रेमाच्या अथवा जिव्हाळ्याच्या भावना तीव्र असतात, तिच्याकडून आपण नकळत कसली तरी अपेक्षा ठेवत असतो. त्या व्यक्तीनं जर अपेक्षा-भंग केला तर माणूस दुःखी होतो.

घरीदारी सर्व माणसांत मिसळावे. कुठेही आपल्या पैशाचा, पोझीशनचा गर्व करत बसू नये. तो गर्व खोटा असतो. काही लोकांना असं वाटतं, की चेहेऱ्यावरची इस्त्री मोडली, की आपली किंमत गेली. एकदा विद्वान माणूस जेव्हा एकटा एकटा राहतो, तुसडेपणानं वागतो तेव्हा लोक त्याला मनातून शून्य किंमत देतात. तेव्हां पट्टेवाल्यापासून साहेबापर्यंत सर्वांशी वागणं खेळीमेळीचं असावं. लोकांना प्रेमानं जिंकायची कला ज्याला साधली आहे तो या जगात कधीच एकटा पडत नाही. त्याचं जीवन हे खरंच काळजी-पासून मुक्त असतं !

# काल्पनिक आजार

आजकाल प्रत्येक माणसाला खऱ्या किंवा काल्पनिक आजाराची फार मोठी चिंता लागलेली असते. मासिकांत, वर्तमानपत्रात वैद्यकीय विषयांवर जे वेळोवेळी लेख येत असतात. त्यामुळे कित्येकांना त्या रोगाची लक्षणे स्वतःलाच झालेली आहेत असे वाटून ते उपचार करू लागतात. सध्या फार मोठ्या प्रमाणावर लोकांना आपल्याला कसलातरी कॅन्सर होणार नाही ना याची भीति सदैव ग्रासत असते. त्याचप्रमाणे शेकडो लोक, जरा छातीत दुखले की आपण हृदयरोगाने तर खलास नाही ना होणार या काळजीने व्यथित असतात. याबाबत मला असे वाटते की, डॉक्टरी शास्त्र आपण आपल्या हातात घेण्याच्या भानगडीत सामान्य मानसाने कधी पडू नये. कारण नुसती पुस्तके वाचून जर कोणी डॉक्टर होत असला तर वैद्यकीय महाविद्यालयांची गरजच भासली नसती. पण वैद्यकीय जनरल नॉलेज प्रत्येकाला थोडेफार डॉक्टर बनवून त्याच्या खिशाला आणि डोक्याला उगीचच वैताग देऊ शकते. अशी खूप उदाहरणे मी पाहिलेली आहेत. फार काय मीही या ' रोगाच्या साथीला बळी पडलो आहे.

माझा एक मित्र मला एकदा म्हणाला, ' गेल्या वर्षी एका दिवशी मी तापाने फणफणलो. ताप चांगला तीनपर्यंत चढला. दोन दिवस ताप होता. माझ्या शेजारी एक माणूस राहात होता तो पटकन् मला म्हणाला, ' अरे, हा पॅराटायफॉईड आहे. तू क्लोरोमायसेटीन घे.' मी ते मिळवून घेतले आणि काय, टायफॉईड लगेच थांबला. टायफॉईड झाला म्हटल्यावर मी घाबरूनच गेलो. तो मित्र मदतीला आला म्हणून थोडक्यात वाचलो. नाही तर डॉक्टरानं मला खूप चिरलं असतं. '

मी त्याला विचारलं,

' तुझा ताप टायफॉईडचा होता हे निश्चित का ?'

' हो, कारण मित्र म्हणाला. टायफॉईडमध्ये ताप उतरत नाही. '

' मित्र डॉक्टर आहे का ?'

' नाही. पण त्याला खूप माहिती आहे. '

मी मनातल्या मनात खूप हसलो. हा सारा मूर्खपणा होता. वास्तविक

टायफॉईड आहे किंवा नाही, हे ठामपणानं ठरवण्यासाठी सर्वसाधारणपणे 'व्हिडाल टेस्ट' ही रक्त तपासणीत केली जाते. अर्थात हे सारं डॉक्टर ठरवतात. उगीच कुठल्याही तापावर क्लोरोमायसेटीन घ्यायचं नसतं. माझ्या एका मित्राला खराच टायफॉईड झाला होता. त्याला रीतसर क्लोरोमायसेटीन चालू होते. त्याच्या एका मित्रानं त्याला सांगितलं, 'अरे, आता तुझा ताप नॉर्मलला आलाय ना, मग कशाला दिवसाकाठी चार कॅप्सूल खातोस ? अरे, नगरला माझ्या माहितीच्या एका माणसाला बहिरेपण आलं असं मी ऐकलं.'

झालं, मित्रानं डॉक्टरांच्या नकळत औषध बंद केलं. हा खुळचटपणा होता. टायफॉईडमध्ये असे औषध पुष्कळ दिवस घ्यावे लागते. कान बहिरे होतात वगैरे सारं खोटं आहे. व्हायचं तेच झालं. ताप उलटला. सगळं निस्तरता निस्तरता पुरेवाट झाली ! ताप उलटला. तो चांगला १०४ पर्यंत गेला. मित्राला वाटले आपण मरतो. आता हे असे 'डॉक्टर' सर्वत्र असतात.

## तुम्ही डॉक्टर होऊ नका

माझ्या आणखी एका मित्राला महिन्यातून एकदातरी हृदयविकाराचा ( काल्पनिक ) झटका येत असतो. त्याच्या छातीत डाव्या हाताला दुखले की तो सर्वांना घाबरवून सोडतो. हृदयविकार या विषयावर तो प्रबंध लिहू शकेल एवढं जनरल नॉलेज त्यानं मिळवलं आहे. एकदा छातीत दुखल्यावर त्याला नक्कीच वाटलं, 'आपण चाललो.' बायको घाबरली. तिनं निष्णात कार्डिओलॉजिस्टला बोलावून घेऊन इलेक्ट्रोकार्डिओग्रॅम ( हृदयाच्या स्पंदनाचा आलेख ) काढला. सर्व नॉर्मल होते. छातीत गॅसमुळे दुखत होते ! तो हार्ट अ‍ॅटॅक त्या दिवशी थांबला. मग दुसरा आला तो असा–

एकदा त्यानं वाचलं, हार्ट-अटॅकच्या वेळी पाठीतून कळ निघून छातीतून कॉलर बोनकडे जाते. तसेच शर्टाची गुंड्यांची जी लाईन असते तिथे दुखतं. आणि काय ! कळा पाठीतून घुसून मानेकडे जाऊ लागल्या. गुंड्यांच्या लाईनला छाती दुखू लागली. हा दुसरा हार्ट-अ‍ॅटॅक जोरात होता. त्यात

आम्हीच आडवे झालो. खूप धावपळ झाली. पुन्हा सर्व नॉर्मल !

हे दुसरे एक चिरंजीव. ते खूप सिगरेटी ओढतात. थंडीने घसा धरला की झालाच यांना घशाचा कॅन्सर ! २।३ दिवसांत हा कॅन्सर पूर्णपणे बरा होतो.

माझ्या एका उच्चपदस्थ ओळखीच्या माणसाच्या बेबीजवळ डाव्या हाताला दुखू लागले. त्यांनी लगेच होमिओपाथी आणि बाराक्षार पद्धतीचा अभ्यास सुरू करून स्वत:चे निदान केले. हा ' म्युकस कोलायटीस ' आहे. औषध सुरू. दोन दिवसांत रोग बरा !

मी स्वत: होमिओपाथी आणि बाराक्षार पद्धतीचं खूप वाचन केलं आहे. या पद्धती अतिशय उपयुक्त आहेत याबद्दल वादच नाही. पण एका दिवसात हे एवढे ज्ञान मिळविणे अवघड आहे, असे अजूनही माझ्या अल्पबुद्धीला वाटते !

एका रविवारच्या वर्तमानपत्रातला ' आव ' या विषयावरचा लेख माझ्या आठ वर्षांच्या मुलीनं वाचला आणि ती मला म्हणाली,

' बाबा, मला आव झालीय. '

' तुला कसं कळलं ?'

' मी आजच्या वर्तमानपत्रात वाचलं. मला औषध द्या. '

आहे की नाही !

माझ्या मुलाच्या काल्पनिक दुखण्यामुळे मी माझ्या आयुष्यातली दोन बहुमोल वर्षं काळजीनं वाया घालवली हे सांगताना मला खरोखरच लाज वाटते.

ऐकाच !

माझ्या मधल्या मुलाला माझ्या वडिलांनी हाताच्या पंजांना धरून वर उचलल्याचे निमित्त झाले. त्याचे कोपर आणि दोन्ही मनगटे सुजली. मला वाटले, फ्रॅक्चर झाले. मी लगेच एक्स रे काढून आणले. ते नॉर्मल निघाले. दोन दिवस मुलगा हात आखडून बसला होता. मी डॉक्टरांना दाखवले. त्यांनी कसला तरी लेप लावला. ते बरे झाले. नंतर काही दिवसांनी मुलगा पडला. त्याचा घोटा सुजला. दरम्यान मी एक लेख वाचला. ' ऱ्हुमॅटिझम

चि...८

आणि हार्ट डिसीझ ' आणि हबकूनच गलो ! त्या लेखात असे म्हटले होते की, लहान मुलांना ताप येऊन सांधे धरतात. सांधे धरले की हृदयाला नुकसान पोचते. संधिवातजन्य ताप (ऱ्हुमॅटिक फीवर) सांध्यांना जणू कुत्र्यासारखा चाटतो पण हृदयाचा चावा घेतो. (It licks the joint and bites the heart) आणि हा असा रोगी वयाच्या वीस वर्षांपुढे जगत नाही ! बाप रे ! म्हणजे जर हा असला ताप माझ्या मुलाला असेल तर तो मरणार ! मी पार घाबरून गेलो.

लगेच माझ्या एका डॉक्टर मित्राला गाठले. त्याला विचारले, तर तो म्हणाला, ' कदाचित तू म्हणतोस तसला रोग त्याला नसेलही, पण स्पेशालिस्टला दाखव ! ' मी त्याच्याकडून एक पुस्तक वाचायला नेले. त्यात लिहिले होते की ' कधी कधी रोग्याला तापही नसतो. ' नक्कीच माझ्या मुलाला ऱ्हुमॅटिक फीवर असावा. कारण पडला त्या वेळी ताप नव्हता. पुस्तकात लिहिले होते एकदा एक सांधा धरतो मग दुसरा धरतो (fleeting pain) माझ्या मुलाचे असेच होते. मी धावपळ करू लागलो. स्पेशालिस्टांना जेव्हा दाखवले तेव्हा अर्थात आजार नव्हता. मी चंगच बांधला. आयुर्वेदिक युनानी सारी औषधं त्याला देऊ लागलो. वटवाघळाचे तेल सांध्यांना चोळू लागलो. त्याची या मालिशमुळे रोज दिवाळी चालू होती. बेटा खुषीत होता. मी काळजीत होतो. आता माझ्या मूर्खपणाचं मला हसू येतं. डॉक्टरीशास्त्र मी हातात घेऊन मूर्ख बनलो होतो ! या गोष्टीला झाली दहा वर्षं. मला एक स्पेशालिस्ट म्हणाले, ' त्या वेळी कदाचित त्याच्या सांध्या वरची आवरणं कमकुवत असतील म्हणून सुजत असतील. तुम्ही उगीच काळजी केलीत. '

मला प्रत्येकाला एक गोष्ट सांगायची आहे. ती म्हणजे, कोणत्याही माणसाने सर्दी, फ्लयू वगैरे रोगाशिवाय कशावरही स्वतः डॉक्टर बनून औषधे घेऊ नयेत. कित्येक लोक डॉक्टर फार फी घेतात म्हणून त्यांच्याकडे न जाता स्वतःच स्वतःचे डॉक्टर बनतात. हा शुद्ध घातकीपणा आहे. वैद्यकी ही एक विज्ञानाची महत्त्वाची अशी स्वतंत्र शाखा आहे. निष्णात डॉक्टराच्या मागे खूप तपश्चर्या असते. खूप रोगी त्याच्या हाताखालून गेलेले असतात. तेव्हा त्याच्या ज्ञानाला योग्य ती किंमत द्या. तिथे चिकटपणा करू नका.

मी तर पुढे जाऊन असं म्हणेन, लहान मुलांचा रोग असेल तर लहान मुलांच्या स्पेशालिस्टकडे जा. दोन पैसे जास्त गेले तरी मनाला लावून घेऊ नका. पण स्वत: स्वत:चे डॉक्टर होऊ नका.

मनाला चटका लावणारं उदाहरण मी इथे देतो. एका गृहस्थाचा वर्षाचा मुलगा सर्दीनं खूप बेजार झाला. सात-आठ दिवस हे असं त्याला लाळ गिळणंही मुष्किल झालेलं होतं. वेळेवर निष्णात डॉक्टरांकडे जायच्या ऐवजी थातुरमातुर उपचार झाले. आणि अगदी शेवटच्या घटकेला एका चांगल्या डॉक्टरांनी त्या मुलाची तब्येत पाहिली. घशामध्ये चमचा घालून त्यांनी पाहिले. ते म्हणाले, ' हा घटसर्प आहे. फार उशीर झालेला आहे. ऑपरेशनमध्ये मुलगा जगेल असं काही वाटत नाही. ' शेवटच्या दिवशी मुलाच्या घशाची घरघर वाढली. बोलणं बंद झालं. ऑपरेशन टेबलवर मुलगा गेला ! चांगल्या डॉक्टरकडे वेळीच नेलं असतं तर त्यांनी तेव्हाच घसा पाहिला नसता का ?

सध्याचा माणूस रोगांच्या बाबतीत भलताच हळवा झालेला आहे. एखाद्या रोगावरचं विवेचन वाचलं की जशी त्याला त्या रोगाची सर्व लक्षण स्वत:मध्ये दिसू लागतात त्याप्रमाणेच गावात एखादी रोगाची साथ आली की त्याला वाटायला लागतं की आपणाला बहुतेक तो रोग झालाच असेल, किंवा आपण या साथीला बळी तर नाही ना पडणार ?

या सर्व काल्पनिक रोगांवर एकच उपाय आहे. तो म्हणजे मन चंचल न होऊ देणे. विचाराने आणि प्रयत्नाने हे जमते. प्रत्येकाने असा विचार केला पाहिजे की काळजी करून रोग टळत नाही. योग्य काळजी घेऊन मात्र तो टाळता येतो. आणि एवढे करूनही तुमचा त्याच रोगानं बळी जाणार असेल. तुमचे नशीब म्हणून स्वस्थ बसा. हार्टसर्जन स्वत: हार्ट-अॅटॅकनेच गेलेल्या कित्येक केसेस मी पाहिलेल्या आहेत. कॅन्सरबाबत जी लक्षणे दिलेली असतात, उदा. एखादा तीळ मोठा होत जाणे किंवा अचानक शरीरात कुठेतरी रक्तस्राव होणे वगैरे. ती दिसली तर योग्य चिकित्सा करून घ्या. आणि लक्षात ठेवा, कॅन्सर हा प्रथम स्टेजमध्ये निदर्शनाला आला तरच रोगी जगण्याची शाश्वती असते आणि तिसऱ्या स्टेजमध्ये लक्षात आला तर काहीच उपाय नसतो. आणि कित्येक वेळा तो शेवटच्याच

स्टेजमध्ये लक्षात येतो. ही मतं तज्ज्ञांची आहेत, माझी नाहीत. तेव्हा कॅन्सरची फार काळजी करू नका.

## धूम्रपान

धूम्रपान मनावर ताबा ठेवून टाका. पण बंधनाबाबत अतिरेक करू नका. त्यामुळे मनाचा समतोल मात्र बिघडतो.

सिगारेट ओढण्यामुळे कॅन्सर होण्याची जास्त शक्यता असते हे लक्षात घेऊन त्यावर मर्यादा घाला. मध्यंतरी काही शास्त्रज्ञांनी असे सिद्ध केलेले आहे की, मर्यादित प्रमाणात व्यसने करणारा माणूस हा निर्व्यसनी माणसापेक्षा जास्त दिवस जगतो. हे जरासे चमत्कारिक वाटेल, पण ते शास्त्रज्ञांनी स्टॅटिस्टिकवरून सिद्ध केलेले आहे. तेव्हा दिवसाकाठी १–२ सिगारेट ओढल्या तर काही विशेष बिघडत नाही. निर्व्यसनी माणसांना हा माझा सल्ला नसून तो व्यसनी माणसांना आहे हे तुमच्या लगेचच लक्षात येईल.

काही लोकांना वजन कमी कसे करावे याची जशी भयंकर काळजी लागलेली असते तशी काही माणसांना वजन वाढत नाही म्हणून काळजी असते. लठ्ठपणा– अर्थात वाजवीपेक्षा जास्त– ही चिंतनीय बाब आहे हे खरे, कारण लठ्ठपणाबरोबर हृदयाचा आकार वाढत जात नाही त्यामुळे त्याच आकाराच्या हृदयाला तुलनेने जास्त मोठ्या शरीराला रक्ताचा पुरवठा करावा लागतो. त्यावर ताण पडू लागतो व कालांतराने ते निकामी होते. त्यामुळे निर्धारपूर्वक प्रयत्न जरूर करा. कृश असणारांनी तर कशाचीच काळजी करू नये. कारण कृश माणूस काटक असतो.

## तरुणपणाची हौस

आपण सतत तरुण राहावे, आपला बांधा आकर्षक असावा, आपले केस भरपूर आणि काळे असावेत असे कुणाला वाटत नाही ? पण त्या गोष्टीला आपण किती महत्त्व द्यावे ? केस कुणाचे गळत नाहीत ? साऱ्या जगाचे केस गळतात. पण स्वतःचे केस गळू लागले म्हणजे जीव घाबराघुबरा होतो. वाटू लागते, टक्कल पडणार. बायकांना केस गळू लागले तर फारच वाईट

वाटते. हे सारे साहजिकच आहे पण मग त्यातून माणूस काळजी करू लागतो. लगेच जाहिराती वाचू लागतो. जाहिरातदारांना तुमची नाडी ठाऊक असते; जाहिरातदार लिहितो : तुमच्या कंगव्यात जर केस येत असतील तर हे काळजीपूर्वक वाचा. तुमचे केस गळू लागले आहेत. मग आमचे हे स्पेशल तेल वापरा. म्हणजे विपुल केशसंभार निर्माण होईल. जाहिरातीत (स्पेशल तेलाचा उपयोग न करताही) भरपूर केस असलेल्या तरुणीचा फोटो असतो. तुम्ही लगेच १५।२० रुपये देऊन ते तेल आणता. नियमाने लावता. आता केसाबरोबर पैसेही गळू लागतात पण काळजी करणे काही जात नाही !

हे सारं मी अनुभवानं लिहितो आहे. पांढरे केस काळे करणारी तेलं, भरपूर केस वाढवणारी तेलं वगैरे सारं मी ‘ पचवून ’ बसलोय. उगीच पैसे नासले जातात असे माझे मत आहे.

विवाहितांच्या मागे आणखी एक सुप्त काळजी सतत असते. ती म्हणजे लैंगिक जीवनामुळे होणारे दुष्परिणाम. आपल्यापुढे पूर्वापार सतत एकच प्रचार होऊन गेलेला आहे तो म्हणजे ‘ वीर्यनाश हा मृत्यू.’ हे अगदी टोकाचं विधान झालं. ‘ ब्रह्मचर्य हेच जीवन आणि वीर्यनाश हाच मृत्यु.’ याचा अर्थ सारे विवाहित (म्हणजे या जगातले कुटुंबवत्सल लोक) मेलेले आहेत असं समजायचं का ? हा सारा भडक प्रचार झाला, त्यामुळे सामान्य माणसाला एक तऱ्हेची भीती लैंगिक जीवनाबद्दल बसलेली आहे. प्रत्येकाची अन्न खाण्याची भूक जशी कमी-जास्त असू शकते तशी लैंगिक भूकही कमी-जास्त असते. हे सारं प्रत्येक जोडप्याने आपापल्या कुवतीवर, आवडी-निवडीवर ठरवावं. अति सर्वत्र त्याज्य हे तर खरंच. पण समागमामुळे हार्ट अ‍ॅटक येतो वगैरे गोष्टी गैरसमजुतींवर आधारलेल्या आहेत. मध्यंतरी एका हार्ट स्पेशालिस्टनंच म्हटलं आहे की समागमाचे वेळी हृदयात तयार होणारी द्रव्ये वेगळ्या प्रकारची असतात. त्यांचा हृदयावर परिणाम होत नाही पण अति थकलेले असताना समागम टाळावा. माझे तर असे मत आहे की, वैवाहिक जीवनाचे बरेचसे यश नवरा-बायकोच्या Sexual adjustment वरच अवलंबून आहे. हे सारं विवाहितांच्या संबंधात आहे हे विसरू नये. विवाहबाह्य संबंधात मानसिक ताण आणि काळज्या वाढतात हे सांगण्याची

गरज नाही.

## निद्रानाश

निद्रानाशाबाबत इथे मला काही लिहायचे आहे. या विषयावरचं शास्त्रीय लिखाण मी वाचलेलं आहे. झोप न येणाऱ्या लोकांना, हमखास उपाय म्हणून एक गोष्ट करता येईल. ती म्हणजे खूप व्यायाम करा. शरीर अति थकलं की माणूस जागा राहू शकत नाही. ज्याला निद्रानाशाचा विकार आहे त्याला तर फारच महत्त्वाची माहिती अशी की माणूस निद्रानाशामुळे मरत नाही. त्यामुळे आपले काही वाईट होणार आहे या काळजीमुळे मात्र तो लवकर मरतो ! जगात अशी उदाहरणे आहेत की वर्षानुवर्षे निद्रा-नाशाचा विकार असूनही माणसे अत्यंत सुदृढ असून सुखी आहेत. झोप येत नसेल तर डोळे मिटून पडून राहा. शरीराला विश्रांती तर मिळेल ! ते अवघड किंवा नकोसं वाटत असेल तर उठून काम करा. तसेच स्वतःला निद्रानाश आहे का नाही हे दुसऱ्याला पहायला सांगा. कित्येक वेळा झोप येत नाही म्हणणारे इतरांपेक्षा जास्त वेळ झोपतात !

## शुद्ध विचारांची गरज

माणसाचं जीवन काळजीपासून मुक्त व्हावं असं त्याला सतत वाटत असतं. काळजी कुणाला हवी आहे ? पण त्यासाठी सर्वांत महत्त्वाचा ठेवा माणसाजवळ असायला हवा. तो म्हणजे स्थिर आणि शुद्ध मनोवृत्ती. माणसाच्या साऱ्या हालचाली, वागणूक आणि व्यवहार बहुतांशी त्याच्या मनोवृत्तीचे दर्शन घडवतात. ज्यांची मनोवृत्ती सरळ आणि शांत असते ते कुठलाही आघात अगदी सहजपणे झेलू शकतात.

जगातल्या प्रत्येक माणसाची मनोवृत्ती सरळ आणि स्थिर असेल तर बहुतेक भांडणांची मुळे नाहीशी होतील. परंतु हे घडणे फार अवघड आहे असे मला वाटते. प्रत्येक माणूस वयात आल्यानंतर जर शुद्ध विचारानं वागू लागला तर सर्वांना न्यायाची वागणूक मिळेल. सारेजण सुखी होतील.

चिंतेचे कारणच उरणार नाही.

आयुष्यात प्रत्येकाला निरनिराळ्या भूमिका बजावाव्या लागतात. कुणाला व्यापारी म्हणून समाजाशी संबंध ठेवावा लागतो. कुणाला नोकरीत कसलीतरी पदे भूषवावी लागतात. हरघडी मन साफ ठेवायचा प्रत्येक माणूस प्रयत्न करू लागला तर त्याच्याशी संबंध येणारेही त्याच्याशी सरळ वागू लागतील. पण असे किती ठिकाणी घडते ?

माणूस आपली मनोवृत्ती न्याय्य, सरळ आणि उदार आहे असं किती वेळा दाखवतो ? आता उदाहरणेच देतो.

हा एक व्यापारी घ्या. याचा दिवस सुरू होतो तो झपाट्यानं पैसा कसा मिळवावा या विवंचनेतच ! धंद्यात फार थोड्या काळात खूप पैसे मिळवणे ह्या गोष्टीसाठी त्याची फार धडपड चाललेली असते. हे साधण्यासाठी त्याला गैरव्यवहार करावे लागतात. हा जर तांदळाचा व्यापारी असेल तर २० पोती तांदळात एक पोते गारा समप्रमाणात मिसळून हा त्या एका गारांच्या पोत्याचे तांदळाच्या पोत्यात रूपांतर करून जनतेला फसवून पैसे मिळवतो. एकदा एखाद्याने भेसळीचे तंत्र अवलंबले की मग त्याला भीती वाटायला लागते. आपण पकडले जाऊ नये म्हणून अधिकाऱ्यांची तोंडे दाबायचे तंत्र त्याला अवगत करावे लागते. अधिकारी दबले नाहीत तर प्रसंगी तुरुंगाची हवा खावी लागते. लोकांचे स्वास्थ बिघडवले जाते व स्वतःची मानसिक अवस्थासुद्धा दयनीय होते. भेसळीची औषधे विकून माणसे मृत्युमुखी पडतात त्याचबरोबर ती विकणारा केमिस्टसुद्धा आतून मानसिक छळ सहन करत असतो. पुढेपुढे तो निढावत जातो हे खरे जरी असले तरी तो मनानं शांत नसतो. भीती आणि काळजी त्याला सतत ग्रासत असते. लाच खाणारी माणसं वरवर जरी शांत दिसत असली तरी आतून ती पार पोखरली जात असतात. या हातानं करावं त्या हातानं भरावं हे तत्त्व व्यवहारात प्रत्येक माणसाच्या वाट्याला येते किंवा नाही हे कळायला मार्ग नाही. पण पैसेखाऊ माणसाचं त्याच्याच देखत वाटोळं होऊ शकतं. ज्याची मनोवृत्ती दुसऱ्याला छळायची आहे त्याच्या वाट्याला सतत छळ येत राहतो.

माझे एक मित्र आहेत. फार मोठ्या पदावर आहेत. अशा पदावरची व्यक्ती सरळ असली तर ती जिथे जिथे जाते तिथे तिथे तिचे स्वागत होत असते. ह्यांची वागणूक कशी आहे ? पहिली गोष्ट माझ्या ध्यानात आली आहे ती म्हणजे आपल्या मोठ्या पदाचा त्यांनी कधीही दुरुपयोग केलेला नाही. मोठ्या पदावरची व्यक्ती; हातात अधिकार असला आणि स्वतःला कुणी दुखावलं तर लगेच त्याचा सूड घेऊ शकते. पण हे गृहस्थ मनानं अत्यंत सरळ, निगर्वी असून आपल्या पदाचा उपयोग त्यांनी नेहमी लोकांच्या कल्याणासाठीच केलेला आहे. त्यात कधी डावपेच खेळलेले नाहीत किंवा कुणावर आकस धरलेला नाही. प्रत्येकाची न्याय्य मागणी पुरी करणे, प्रत्येकाची अडचण सोडविणे, या साऱ्या गोष्टीत या माझ्या मित्राने अगदी सरळ आणि सहानुभूतीची वागणूक ठेवलेली असून असंख्य लोकांचा दुवा घेतलेला आहे. त्यामुळे त्यांना कधीही कसलीही चिंता किंवा भीती नसते. जीवन कसं गंगाजलासारखं शुद्ध आणि पवित्र आहे. मला खात्री आहे ते निवृत्त झाले तरी लोक त्यांना चहातील.

याविरुद्ध मी असे लोक पाहिलेले आहेत की स्वतःच्या पदाचा दुरुपयोग केल्यामुळे त्यांचे जीवन अत्यंत हलाखीत गेलेले आहे. बदल्या करण्यात डावपेच खेळणे, पैसे खाणे अशी वाकडी मनोवृत्ती ठेवली की मग शत्रू तयार होऊ लागतात. पर्यायाने स्वतःचे आणि लोकांचे जीवन दुःखमय होते.

या दृष्टीने मराठीतील 'सामना' हा चित्रपट फार परिणामकारक म्हटला पाहिजे. त्यातल्या गुन्हेगार माणसाला त्यातला मास्तर म्हणतो, 'अहो, तुम्ही खून करून दडपून टाकला खरा, पण आतून तुम्ही त्याची शिक्षा भोगताय.' जनतेशी नोकरांचा जिथे संबंध येतो तिथे कधी कधी असे चित्र दिसते की, नोकर आलेल्या माणसाचे काम करण्याऐवजी त्याला टाळायच्या मागे असतो. इथे त्या नोकराने उगीचच चुकारपणा म्हणून कागद दाबून ठेवले तर आलेला मानून वरिष्ठाकडे तक्रारही करू शकतो. मग नोकर गोत्यात येतो. आपले काही नुकसान तर नाहीना होणार अशी काळजी त्याला लागते. वास्तविक आल्याबरोबर माणसाचे काम निपटून टाकणे यासारखं सुख आणि समाधान कशातच नसतं. अशा प्रकारे जर

नोकर वागू लागला तर त्याच्या डोक्याला कसलीही काळजी नसते. कामाची टाळाटाळी, चुकारपणा यामुळे माणूस उलट जास्त थकतो असा माझा अनुभव आहे. जेव्हा भरपूर काम असते तेव्हा वेळ कसा जातो कळतसुद्धा नाही. पण एखाद्या दिवशी नाहक कुणीतरी चकाट्या पिटून आपला वेळ खाऊ लागला की मनाचा समतोल बिघडतो. मग उगीचच थकवा येतो.

अर्थात जो पूर्ण कोडगा आहे किंवा ज्याने लाज अब्रू पार गुंडाळून ठेवली आहे अशा माणसाबाबत बोलणे उगीच वेळ घालवण्यासारखे आहे. ज्याला सुधारावयाची इच्छा आहे अशा माणसांसाठीच प्रस्तुतचे विवेचन आहे. चुकारपणा करून फायदे उपटणारांविषयी अधिक न लिहिलेलेच बरे !

सरळपणाने काम करण्यामुळे जसा मनाचा समतोल राखता येतो, तद्वतच क्षुल्लक गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यामुळे माणसाचं मन नेहमी स्थिर रहातं.

## अति तिथं माती

माझ्या एका मित्राकडे गेलं की, मला एक चित्र पहायला मिळतं. त्याची मुले हॉलमध्ये आली की, याचं लक्ष त्यांच्या हालचालींवर असतं. मुलगा कोचावर चढतोय असं याला वाटलं की तो ओरडतो, त्याला दूर करतो. मुलगी वहाणांच्या रॅकमधल्या वहाणा उचकू लागली, ह्यांच्या हृदयाचे ठोके वाढतात. ते या गोष्टीकडे दुर्लक्ष करायचं ठरवतच नाहीत. आमच्या कामात यांच्यामुळे व्यत्यय येतो. मी कंटाळून उठतो. त्यांना म्हणतो, ' येईन पुन्हा. तुम्ही आता बिझी दिसत आहात. ' या मित्राचं असंच चालू असतं.

एकदा तो आजारी पडला. दवाखान्यात दाखल केलं. तिथं नर्सला बोलवायची बेल चालू नव्हती. तो स्वतः उठला. डॉक्टरकडे जाऊन तक्रार करून आला.

बेडशीट बदलला नव्हता. त्यानं लगेच व्यवस्थापकांना बोलावून तो बदलून घेतला. शेजारच्या रूममधल्या पेशंटचे नातलग चुकून याच्या रूममध्ये आले. तो उठला. त्यांना बरोबर घेऊन त्या पेशंटकडे गेला.

रात्री झीरो पॉवरचा दिवा लागत नव्हता म्हणून त्यानं बदलून घेतला.

इतकी कचकच करून त्याला झोप आली नाही. डॉक्टर मला म्हणाले, 'फालतू गोष्टींवर फार भर दिला की यांना मन:स्वास्थ्य कधीच लाभत नाही.'

## मनाला लावून घेऊ नका

माणसाचं सध्याचं जीवन अतिशय धकाधकीचं होत चाललंय. या स्पर्धेच्या जगात एक पुढे गेला की दुसरा मागे पडत जाणार हे उघड आहे. गैरमार्गाने एखादा पुढे गेला तर दुसऱ्याला वाईट वाटणं हेही स्वाभाविक आहे. या गोष्टीचा त्याच्या दैनंदिन जीवनावर फार मोठा परिणाम होतो. गोष्टी बदलणे त्याच्या हातात नसते, घडणाऱ्या अन्याय्य घटना मुकाटयानं पहाव्या लागतात. मग मनाचा समतोल बिघडत जातो. आपण सारे सामान्य जन आहोत, साधुपुरुष नाही आहोत, त्यामुळे स्थितप्रज्ञासारख्या घडणाऱ्या घटना निर्विकारपणे पहाणे आपल्याला जमणार नाही हे मला मान्य आहे. पण आपण मनातून एक वृत्ती ठामपणाने जोपासावी. ती म्हणजे कुठलीही गोष्ट मनाला फार लावून घेऊ नये. जीवनात हारजीत ही चालायचीच. आपण जिंकलो नाही तर कुढत बसू नये. मला यातून पलायन वाद बिलकुल अभिप्रेत नाही. हरल्यानंतर वैराग्य आणू नये असं म्हणायचं आहे. या जगातले व्यवहार भावनेवर चालत नसतात. तेव्हा माणसानं अति भावनाप्रधान असू नये. हे म्हणणं सोपं आहे, प्रत्यक्षात उतरवणं अवघड आहे हे मला समजतं आहे. कारण प्रत्येकाचा स्वभाव बनलेला असतो तो पूर्णपणे बदलणे अवघड असते. फक्त त्याला मुरड घालणे शक्य होते.

माणूस जसा शिकत जातो तसतसा आजूबाजूला घडणाऱ्या बऱ्यावाईट घटनांचा त्याच्या सुप्त मनावर परिणाम होऊ लागतो असा माझा अंदाज आहे. या गोष्टीचा आपल्यावर किती परिणाम होऊ द्यायचा यालाही काही मर्यादा आहेत.

माझा एक प्राध्यापक मित्र अतिशय हुशार आणि विचारी आहे. त्याचे वाचन दांडगे आहे. आजूबाजूला घडणाऱ्या घटना त्याचं मन:स्वास्थ्य लगेच

बिघडवून टाकतात. त्याचं स्वतःचं खाजगी जीवन अत्यंत सुखाचं आहे. त्यात कसलीही त्रुटी नाही. गावातल्या एका निरपराध कुटुंबाची हत्या झालेली याला समजली की तो अपसेट होतो. कुठे लाचलुचपतीचे, भ्रष्टाचाराचे एखादे प्रकरण वाचले की हा हताश होतो. सामान्य नागरिक म्हणून प्रत्येकानं जागृत राहिलं पाहिजे, सभोवताली घडणाऱ्या घटनांकडे डोळे झाकून पाहू नये हे खरं; पण हा रात्रीही 'जागृत' असतो त्याचे काय ?

आपल्या मनातला क्षोभ तो घरी व्यक्त करत नाही हे एका तऱ्हेने चांगलं आहे. घरच्या लोकांचा छळ नको. तो एकदा मला म्हणाला, 'सारखं' उदास वाटतं. मन द्विधा होतं, अपसेट होतं. तसं वरवर पाहता त्याच्या त्याच्या जीवनात काहीच वाईट घडत नव्हतं. मग बारकाईनं विचार करता मला इतर घटनांचा त्याच्या दैनंदिन जीवनावर पगडा असतो असं लक्षात आलं हे त्याच्या, इतर घडामोडीवरच्या प्रतिक्रियांवरून लगेचच लक्षात आलं. मी त्याला म्हणालो, 'तू तुझ्याशी संबंधित नसलेल्या गोष्टींकडे फार बारीक लक्ष देऊ नकोस.' उपयोग कितपत होईल कुणास ठाऊक !

मनात कुढणारा आणि काळजी करणारा असाच एक माणूस मी पाहिलाय. त्याची चित्तवृत्ति अत्यंत चंचल आहे. जरा कुणी बोललं, की लहान मुलासारखा तो फुरंगटून बसतो. बोलणाऱ्याला, याला दुखविण्याचं अभिप्रेत असतंच असं नाही. बोलणारा ही गोष्ट कदाचित विसरूनही जातो; पण हा मनाला लावून घेतो. असल्या लोकांना ब्लडप्रेशर होण्याची दाट शक्यता आहे. तेव्हा हे असले ताण मनात कोंडून ठेवू नयेत. कुठेतरी आपल्याशी फारसा संबंध नेहमी न येणाऱ्या एखाद्या सद्गृहस्थापुढे तारतम्य ठेवून अधूनमधून मन मोकळं करून त्यांना वाट काढून द्यावी. आता नोकरीत दरमहाचा पगार मिळणे ही कसली आलीय उल्हसित होण्यासारखी गोष्ट ? पण या गृहस्थाला ज्या दिवशी पगार मिळतो त्या दिवशी हा जणु प्रमोशन मिळालंय अशाच आनंदात तो असतो. दुसऱ्या दिवशी जरा कुणी दुखावलं की हा आपला अपमान कुरवाळीत बसतो. हे सगळं लहान मुलासारखं वागणं आहे असं मला वाटतं. अशा मनोवृत्तीमुळे हा गृहस्थ घरादारातल्यांना अक्षरशः गांजतो.

या स्पर्धेच्या जगात मनाचा समतोल सतत बिघडवणारे काही लोक

करण्यापासूनच खरं म्हणजे अवहेलनेचं जिण सुरू झालेलं असतं त्यामुळं हेच आपलं जीवन अशी स्त्रियांची शतकानुशतके ठाम कल्पना झालेली आहे. माझा एक मित्र एकदा या विषयावर माझ्याशी चर्चा करत होता. मी माझे हे विचार त्याच्यासमोर व्यक्त केले. तो म्हणाला, ' अरे, ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणं त्याला कामं मिळतात. बायका मुळातच बिनडोक असतात घरकाम करणं, मुलं वाढवणं हेच त्यांचं काम ! '

इतके खालच्या दर्जाचे विचार मी आजतागायत कुणाच्या तोंडून ऐकलेले नाहीत. ते जरी काहीही असलं तरी कित्येक लोक स्त्रियांना न बोलून असेच वागवत असतात. हे पुरुषांचं जग आहे. त्यात बदल केव्हा होईल कोण जाणे, पण आज प्रश्न असा आहे, मग स्त्रियांनी कसं वागावं ? नवविवाहितेच्या बाबत मला काही विशेष सांगावंसं वाटतं.

नवीन लग्न झालेली सून घरात आली की, तिनं असंच वागलं पाहिजे, तसंच वागलं पाहिजे, जरा मोकळी सोडली तर ती डोक्यावर मिरे वाटील अशा तऱ्हेच्या विचारानं सासरची माणसं अगदी भारलेली असतात.

नवरा तसा विचारानं पक्व नसतो. आई-वडील, बहीण, भाऊ हेच त्याचे आधारस्तंभ आणि मार्गदर्शक असतात. ते त्याचं अहित कसं करतील ? त्यामुळे त्याला शिकवण सुरू होते...

' पाहा रे बाबा, ही ग्रॅज्युएट मुलगी आहे. आताच ताब्यात ठेव, न पेक्षा तुझं पोतेरं करेल. ' हे ऐकून नवरा आधीच तिचं पोतेरं करण्याच्या तयारीला लागतो. तिनं घरातली सगळी कामं केलीच पाहिजेत, पहाटे उठलंच पाहिजे, दुपारी जरासुद्धा झोपलं नाही पाहिजे, माहेरी ( गावात असलं तर ) फारसं गेलं नाही पाहिजे हे सारे फॉर्म्युले त्या बिचाऱ्या नव्यानं लग्न झालेल्या आणि भावी सुखी संसाराची स्वप्नं पहाणाऱ्या पोरीवर वापरले जातात.

तीही संधी सापडेल तेव्हा माहेरी ह्या अत्याचारांचं वर्णन करत असते. मग माहेरची माणसं (जी आपल्या सुनांना असंच वागवत असतात) तिला हळूहळू कानमंत्र द्यायला लागतात. ती अपक्व विचारांची मुलगी त्या मंत्रांचा वापर सासरी करायला लागते. मग खटके उडू लागतात.

सासरच्या माणसांना सुबुद्धी सुचली तर मी म्हणतो तो सल्ला मुलीला देण्याची जरूरच नाही. पण ती तशी जर फॉर्म्युल्याप्रमाणे वागणारी असली

तर मुलीनं कसं वागावं ?

ही समाजरचना बदलणं जर त्या मुलीच्या हातात नाही ही गोष्ट शंभर टक्के सत्य आहे तर तिनं हट्टानं वागू नये. भांडण न करता प्राप्त परिस्थितीत जमवून घ्यावं. नवरा नावाच्या माणसाला सुरुवातीला प्रेस्टिज हाच प्रकार फार महत्त्वाचा असतो. बायको जरा मर्जीविरुद्ध वागली की तिला धारेवर धरलं जातं. बायकोची किंमत घरात अजून एस्टॅब्लिश झालेली नसते. त्यामुळे तिचं कोणीही ऐकत नाही. त्यामुळे तिनं सर्वांना सांभाळून राहावं. कोणी विरोध केला तर गप्प बसावं. आपला हेका न चालवणाऱ्या आणि लहान-थोरांना आपलंसं करून टाकणाऱ्या सुनेविषयी सहानुभूती नक्कीच वाढते. मग काही काळानंतर तिला घरात अत्यंत महत्त्वाचं स्थान मिळतं. नाहीपेक्षा तिला भयंकर मनःस्ताप आणि काळजी या गोष्टींना तोंड द्यावं लागतं.

बायकोला खूप छळलेले नवरे काही वर्षांनी कबुली देतात की 'आमचं चुकलं.' पण हेच नवरे त्यांनी विरोध केला असता तर त्यांना टाकून द्यायला मागेपुढं पाहाणारे नसतात ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे.

इथे विषय पुरुषांनी किंवा इतरांनी कसं वागावं हा नसून नवविवाहितेनं कसं वागावं हा आहे. इथे पुरुषांच्या किंवा सासू-सासऱ्यांच्या वागणुकीची मी तरफदारी करत नसून फक्त एवढेच सूचित करतो आहे की कालांतराने सासरच्या माणसांचे विचार आढळतात.

यामागे स्त्रियांची गुलामगिरी वाढवायची कसलीही भावना नाही. इथे मुलीलाच आपलं घर सोडून सासरी जावं लागतं ही गोष्ट महत्त्वाची आहे. आपण आपलं घर सोडून दुसऱ्याच्या घरी जेव्हा जातो तेव्हा तिथले लोक वागवतील तसं वागावं लागणार हे उघड आहे. ही परिस्थिती कधी सुधारेल कुणास ठाऊक ! पुरुषानं आपण दाखवण्याच्या कार्यक्रमात मुलीकडून नापास केले जात आहोत किंवा आपण आपले घर सोडून मुलीच्या घरी राहायला जात आहोत अशी नुसती कल्पना करून पाहावी म्हणजे किती अपमानाला तोंड द्यावं लागतं हे लक्षात येईल.

संसारात नवरा-बायकोतल्या अॅडजस्टमेंटमधून एक प्रकारचा एकोपा निर्माण होण्यास मदत होते. मुख्य म्हणजे काळज्या आणि तणाव निर्माण

होत नाहीत. दैनंदिन जीवनात काही निर्णय घ्यावे लागतात. त्यात नवरा-बायकोंची भांडणंही होऊ शकतात. काही वेळा निर्णय चुकतात. मग दोषांचं खापर निर्णय घेणाऱ्यावर फोडलं जातं. घरातील निर्णयही एकमेकांच्या विचारानं घ्यावेत. इतर माणसं जर योग्य सल्ला देऊ शकत नसतील तरच एखाद्या व्यक्तीनं निर्णय घ्यावेत.

याबाबत माझ्या आणखी एका मित्रानं मला फार महत्त्वाची मुक्ताफळे ऐकवली. तो म्हणाला, 'जे घर बाईच्या सल्ल्याने चालते त्याचे वाटोळे झालेच म्हणून समजा!' अशा अर्धवट विचाराचे लोक या जगात काही कमी नाहीत. 'तू गप्प बस, तुला काय अक्कल आहे!' असं बायकांना सतत दरडावणारे असंख्य नवरे अस्तित्वात आहेत. केवळ आपण कर्ते आहोत म्हणून प्रत्येक निर्णय हा आपणच हेकेखोरपणानं घेतला पाहिजे अशा थाटात ही माणसे वागतात. मग चुकले की बायको सुनावते,

'तरी मी सांगत होते माझं ऐका म्हणून.'

याबाबत मला काय वाटतं ते मी सांगतो. निर्णय घेणं किंवा संसाराचा रामरगाडा हाकणं याला स्त्री समर्थ नसते हे म्हणणं चूक आहे. पण नवरा-बायकोंत दोघांत कोण जास्त अचूक निर्णय घेऊ शकतं हे एकमेकांनीच ठरवावं व त्याप्रमाणं वागावं.

घरातल्या, नातलगांच्या किंवा इतर मित्रपरिवारांच्या लग्नकार्यात देवाण-घेवाण हा एक अपरिहार्य कार्यक्रम असतो त्यात 'अमक्याला दहा रुपयांपेक्षा जास्त आहेर करायचा नाही.' असं बायका ठामपणानं सांगतात. त्यांचे अकाऊंट्स अगदी तयार असतात. 'वनीच्या लग्नात त्यानं २५ रुपयांचा आहेर केलाय. तेव्हा आपण त्याची परतफेड करू.'

सर्वसाधारणपणे देवाण-घेवाण, आहेर वगैरे पुरुषांना फारसे समजत नाही. रीत आणि व्यवहार सोडून ते जरा जास्त सढळ असतात ( नको तिथे ). तेव्हा हे खाते बायकांनीच चांगले सांभाळावे.

नणंदा, भावजया, सास्वा, सुना यांच्या संदर्भात बायका भलत्याच सेन्सिटिव्ह असतात. त्यांचं क्षेत्र घर आणि नातेवाईक यांच्यापुरतंच मर्यादित असल्यामुळे या गोष्टींना जास्त महत्त्व येणं अपरिहार्य असतं. असल्या किरकोळ गोष्टीत पुरुषांना फारसा रस नसतो.

मनीषाची नणंद तिच्या शेजारीच राहते. दोघींचेही ब्लॉक वेगळे आहेत. दोघींच्याही नवऱ्यांचे एकमेकांशी संबंध अतिशय प्रेमाचे आहेत. नणंदेच्या घरच्या नसत्या उठाठेवी केल्याशिवाय मनीषाला करमतच नाही. मासला ऐका,

'अहो, ऐकलंत का ?'

'बोल, ऐकतोय.' मनीषाचा नवरा म्हणाला.

'अहो, त्यांच्या घरचा नामू गडी मला सांगत होता, इतके चिकट लोक जगात पाहिले नाहीत, त्याच्याकडून मरेतो काम करून घेतात आणि त्याला साधा चहाचा कपसुद्धा देत नाहीत.'

'अग पण...'

'अहो ऐका ना, कपडे भिजवताना साबणच इतका कमी टाकतात मग कपडे चांगले निघाले नाहीत की मोलकरणीला शिव्या देतात. अहो, वरच्या मजल्यावरच्या बिऱ्हाडातल्या बाबूला उगीचच काम सांगून बेजार करतात.'

'अग पण या साऱ्या प्रकरणात आपला संबंध येतो कुठं ?'

'अहो, पण यांना चिकटपणा करायला काय भीक लागलीय का ?'

'पण आपल्याला काय करायचंय ?'

मनीषाचं हे अधूनमधून असंच चाललेलं असतं...माझ्या मित्राच्या शेजाऱ्यांत आणि त्याच्यात भांडणं व्हायचं कसं अगदी थोडक्यात टळलं. त्याच्या शेजारी एक प्रोफेसर राहत होता. त्याचा मुलगा ७ वर्षांचा आणि मित्राचा ५ वर्षांचा होता. मुलांची भांडणं व्हायची. मित्राचा मुलगा लहान असल्यामुळे अर्थातच नेहमी मार खायचा. मित्राची बायको त्याला नेहमी म्हणायची, 'अहो, त्या प्रोफेसराची जरा कानउघडणी करा.'

'अग पण, त्याची काय त्याच्या मुलाला फूस आहे का ?'

'म्हणून काय झालं ? त्यानं आपल्या मुलाला आवरायला नको का ? माझ्या मुलाला काय मारून टाकायचाय का ?'

'त्यानं मारू नये असं वाटत असेल तर तुझ्या मुलाला तू कोंडून घाल.'

'बाळ बाहेर खेळणार. बाहेरची जागा काय त्या प्रोफेसराची आहे का ?'

चि...९

मग एकदा असाच बाळनं मार खाल्ला. बायको तणतणू लागली.

'तुम्ही जाऊन त्या प्रोफेसराला स्पष्ट सांगता की मी जाऊन त्यांच्याशी भांडण करू ?'

'अग, मुलांच्या भांडणात मोठ्यानं पडू नये.'

'तुम्ही नेभळे आहात, कसला मेला हा नवरा मिळालाय कुणास ठाऊक !'

सांगायचं तात्पर्य, बायका कितीतरी वेळा क्षुल्लक गोष्टीला निरर्थक महत्त्व देऊन स्वतःचं ब्लडप्रेशर वाढवून घेत असतात.

जरा मुलं मोठी झाली म्हणजे स्त्रियांना फावला वेळ भरपूर असतो. त्या वेळी त्यांनी चांगले चांगले छंद आत्मसात करावेत म्हणजे उगीच रिकामटेकडेपणा करण्यापेक्षा मन आणि शरीर कायम कुठेतरी गुंतलेलं राहतं. अतिशय उद्योगी माणसाला काळजी करायला फुरसतच नसते.

नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घरी दारी खूपच कष्ट उपसावे लागतात. दोन्हीकडे कुचराई करणारे अपवाद मला अर्थातच अभिप्रेत नाहीत. पुष्कळ ठिकाणी अशा स्त्रियांना भरीत भर म्हणून नवऱ्याच्या हुकूमशाहीला तोंड द्यावं लागतं. काही समजदार नवरे घरी काम करून बायकांना हातभार लावतात.

बायको समजूतदार आणि चतुर असेल तर नवऱ्यानं तिला स्वातंत्र्य द्यावं. स्वयंपाकघरातल्या गोष्टींत लुडबूड करून बायकोला उगाच गांजू नये असं मला वाटतं.

## वागणूक

घरामध्ये विवाहितेनं कसं वागावं हे आपण पाहिलं. तिच्या इतर नातलग स्त्रियांनी कसं वागावं याची चर्चा केलीच पाहिजे. अजून सास्वा जुन्याच जमान्याप्रमाणे सुनांना वागवताना दिसतात. काळ झपाट्यानं, बदलत चालला आहे. ज्या घरात जुनी माणसं नव्या पिढीशी जमवून घेत नाहीत तिथे तणाव निर्माण होतात. शिकलेल्या सुना घरात आणायच्या आणि त्यांना जाच करायचा हे काही केल्या कमी होत नाही. आपल्या

घरची शिस्त हीच सर्वोत्तम आणि सुनेला तिच्या आईनं काहीच शिस्त कळली नाही हे सासूचं ठाम मत असतं. सून ही नुकतीच ग्रॅज्युएट झालेली किंवा एस. एस. सी. झालेली आणि अल्लड स्वभावाची असते. स्वयंपाका-पैकी तिला फारसं येत नाही. तिला सासूनं कलानं शिकवावं. पण सासू फटाफट बोलणारी असली की मग शब्दाने शब्द वाढत जातो. सास्वांनी मानसशास्त्राचा जरूर अभ्यास करावा. मला असं वाटतं, सुनेला सांभाळून घेण्याची वृत्ती असावी. बारीकसारीक चुकांकडे कानाडोळा करावा. पण सासू चूक पकडून लगेच तिथल्या तिथे कानउघाडणी करणारी असते. सुनेला नवऱ्याकडूनही संरक्षण नसते. नवरा-बायकोच्यात सासू फार लुडबूड करू लागली की अप्रिय होते. नवीन लग्न झालेले नवरा-बायको हिंडणं फिरणं यात भलतेच मश्गुल असतात. त्यांच्याकडे कानाडोळा करण्यापेक्षा 'हे काय हे रोज उठून मेलं फिरणं आणि पैशांचा नाश करणं ! तिला घरातलं बिलकुल बघायला नको. तू गेलास की ही आपली उगीच टिवल्या-बावल्या करत बसते ! नाहीतर सरळ उठून माहेरी जाते. आम्ही काय बाबा परके. पण तूच याला बंधन घाल.'

नणंदा अशाच प्रकारचे उद्योग करू लागल्या की मग नणंदा-भावजयांत भांडणं लागतात. वास्तविक लग्न झाल्यानंतर कुणीही कुणाला नसते सल्ले देऊ नयेत असं मला वाटतं. भावानं बहिणीच्या संसारात लुडबूड करू नये किंवा बहिणीनं लग्न झाल्यानंतर आपल्या माहेरच्या गोष्टीत फार नाक खुपसू नये. नाहीतर बहिणींची भावाला शेरेबाजी सुरू झाली की भाऊ वैतागतो.

'अरे, काय रे तुझी बायको, घर नीट झाडतसुद्धा नाही. बघ सगळ्या फर्निचरवर केवढी प्रचंड धूळ बसली आहे ती.'

मग भाऊ बायकोला बोलायला लागतो आणि मग त्या धुळीनं बायकोचा चेहरा मलीन होऊन जातो. लग्नाआधी भाऊ, बहिणी, आई, वडील हे सारे एक जरी असले तरी प्रत्येकाची लग्नं झाली की, प्रत्येकानं मनाला विचारलं पाहिजे, 'इथे सल्ला देण्याची मला काही जरूर आहे का ?'

ज्या घरात अन्य माणसं एकमेकांच्या व्यवहारात लुडबूड करत नाहीत तिथे एकोपा, खेळीमेळी टिकून राहते.

अशा घरातल्या सुना सासूचं, नणंदेचं कौतुकच करतात. तिथे तणावाला मुळी जागाच नसते.

## पैसा

दैनंदिन जीवनात माणसाचा पूर्ण आयुष्यभर पैशाशी सतत संबंध येत असतो. घराच्या बाहेर पडताना एकवेळ खिशात रुमाल नसला तर चालू शकेल पण पैसे नसतील तर पदोपदी अडते. पैसा हे अनोळखी ठिकाणीही किंमत प्राप्त करून देणारे एक साधन आहे. एकादेवेळी तुम्ही पैसे विसरलात तर ज्याच्याशी तुमचा व्यवहार झाला आहे तो ओळखीचा असेल तर तो चालवून घेईल; पण अनोळखी ठिकाणी पैसे नसतील तर तुम्हाला कोणीही 'ओळखणार' नाही.

असे या पैशाला अनन्यसाधारण महत्त्व आलेले असल्यामुळे आणि बहुसंख्यांकांची, पैशाने सारी सुखे विकत घेता येतात अशी ठाम समजूत झालेली असल्यामुळे जो तो पैशाच्या मागे धावताना दिसतो आहे. कित्येक-प्रसंगी थोडीशी प्रतिष्ठा सोडून, लाज सोडून पैसा मिळत असला तर तो कित्येकांना आज हवा आहे. कमीत कमी कष्ट करून त्या कामाचा जास्तीत जास्त मोबदला उपटायची सवय खूप जणांना लागली आहे. काम न करता भरपूर पैसे आणून दिले तरी त्यांना हवे आहेत.

पैशाकरता हपाप करत, दुसऱ्याच्या माना मुरगाळत आणि त्याला कसला तरी तात्त्विक मुलामा देत पैसे मिळवणारी कित्येक माणसे मी पाहिलेली आहेत. त्यांच्या आठवणीने मला उबग येतो. त्यांच्या सहवासाने माझा जीव गुदमरतो. जनावरे भुकेली असली की कडबा पुढे टाकल्यावर त्यावर तुटून पडतात. वेळ पडली तर जवळच्या इतर जनावरांना शिंगे मारून भरभर कडबा घशाखाली घालतात. पण एकदा पोट भरल्यावर त्या कडब्याकडे ती ढुंकूनसुद्धा पाहणार नाहीत. पण माणसाचे सर्व विचित्र आहे. आहे. पैशावर तो इतका तुटून पडतो, की त्यासाठी जवळपासच्या माणसाचा मुडदा पाडायला कमी करत नाही. पोटभर पैसा मिळाला तरी आणखी पैसा अशी त्याची भावना असते. हे त्याचे पैसा मिळवणे अखंड चालू असते.

अशा लोकांच्याबद्दल मी नेहमी विनोदाने म्हणतो, ' एखाद्या रस्त्याच्या कडचे गवत काढायचे असेल तर त्याचे तासाला जर दोन रुपये ठेवले तर पोझिशन सोडून कितीतरी लोक तयार होतील. फक्त एक विनंती करतील. ' दिवसा नको रात्री अंधार पडल्यावर काढतो. दिवसा काढायचेच असेल तर वेष बदलून, दाढी मिशा लावून काढतो ! ...'

पण असे लोक नेहमीच आपल्या पैशांचा उपभोग घेतात असेही दिसत नाही. मग हवा कशाला हा जास्त पैसा ? मुलांची शिक्षणे, लग्नकार्ये, घर बांधणे यासाठी माणसाला खूप पैसा लागतो हे मान्य आहे. परंतु त्याची एकदा तरतूद होऊनही पैशामागे धावणारे वीर मी सध्या पाहतो आहे.

' ठेविले अनंते तैसेचि रहावे ' हे एका अर्थाने जरी खरे असले तरी आपली परिस्थिती सुधारण्यासाठी, किमान गरजा भागविण्यासाठी माणसाने कष्ट करून जास्त पैसा मिळवावा याबद्दल कोणाचेच दुमत असणार नाही.

पण एखाद्या माणसाने महिना उत्पन्नच मुळी चारशे रुपये असताना त्याने स्वतःचा आलिशान बंगला बांधण्याचे स्वप्न पहावे कशाला ? वैधमार्गाने आपले उत्पन्न वाढवून आपले असले महत्त्वाकांक्षी स्वप्न पुरे केल्याचीही उदाहरणे मी पाहिलेली आहेत. पण हातात ' कमिशन खाण्याचा 'अधिकार असल्यामुळे भराभर पैसा मिळवून बंगला बांधणे मला त्याज्य वाटते. पण जीवनातली सारी मूल्ये आता बदलत चाललेली असून संस्कारहीन पिढी फार झपाट्याने वाढत आहे त्यामुळे ' मला गरजेपुरता पैसा मिळाला की मी थांबेन, त्यात मी समाधान मानेन ' असं म्हणणारा माणूस सध्या विरळा आहे.

मला हे पूर्ण माहीत आहे की, महागाई वगैरेमुळे काही लोकांचे जीवनही असह्य झालेले आहे. माझ्या लिहिण्याचा रोख या लोकांच्या बाबतीत मुळीच नाही. ज्यांना दोन वेळचे अन्न आणि अंगभर कपडा मिळवण्यासाठीच दिवसाचे बारा तास घालवावे लागतात. त्यांना नीती शिकविण्याचा कुणालाही अधिकार नाही.

वाममार्गाने पैसे मिळवणाऱ्या लोकांच्या पैशाला कधीच जय नसतो असे माझ्या पाहण्यात आलेले आहे. त्यांना कधीच बरकत येत नाही. तो पैसा येण्याच्या आधीच त्याच्या वाटा ठरलेल्या असतात. त्यांच्या घरातले आजार

त्यांना हजार हजार रुपयांना घाटा देत असतात. अशांच्या घरात बेबनाव असतो. माणसे अकाली मरत असतात.

याउलट सत्प्रवृत्तीने राहणाऱ्या आणि अगदी मर्यादित उत्पन्न असलेल्या कुटुंबाची भरभराट मी स्वतः पाहिलेली आहे ! कुणाच्या धनाचा लोभ न ठेवता राहिलात तर माणिक-मोती आपोआप तुमच्याकडे चालत येतील. ते पैशाच्याच रूपाने चालत येतील असे समजू नका. पण काहीतरी चांगले सतत होत जाईल. सर्वच्या सर्व मुले चांगली शिकतील. त्यांना चांगल्या नोकऱ्या किंवा उद्योग मिळतील वगैरे वगैरे !

माझा स्वतःचा तसा अनुभव आहे. वाममार्गाने पैसे मिळवणारे खूप लोक मला माहीत आहेत. पैशाच्या सतत मागे असणारे मी रोज पहातो आहे. त्या सर्वांपेक्षा मला कमी पैसे मिळतात. पण मला काहीही कमी पडलेले नाही.

काळाची पावले ओळखून मी सतत पावले टाकत असतो. वडलांचा उत्कृष्ट धंदा आवड नसल्यामुळे मी करायचा नाही असे ठरवले म्हणून शेवटी बंद झाला. घरी मोटार होती. ती कधीही विकायची नाही म्हणून मी निर्धार केला होता. पण पेट्रोलचे भाव वाढल्यावर प्रतिष्ठेचा प्रश्न न करता ती मी विकून टाकली. स्कूटर घेतली. ती बरीच वर्षे वापरली. नोकरीत मिळणारा पैसा फारसा वाढत गेला नाही. मुलांची शिक्षणे, इतर जरुरीचे खर्च वाढत गेले. स्कूटर ठेवणेही दुरापास्त झाले. मग स्कूटरही विकली आणि आता लूना घेतली आहे. ही स्थित्यंतरे होऊनही आम्ही सर्वजण सुखी आहोत. आमच्या पैशाला जय आहे.

उद्या कदाचित अशीही वेळ येईल (तशी वेळ न येवो ही परमेश्वराजवळ प्रार्थना) की लूना ठेवणेही कठीण होईल. मग मी सायकलवरून जाईन. तसा कमीपणा वाटण्याचे मला काही एक कारण नाही. मी जर पैशाच्या अधीन झालेलो नाही तर मला पैसा नसल्याबद्दल खंत बाळगायचं काही एक कारण नाही. प्रगतीसाठी धडपड करत असताना वेळ आली तर आहे त्यात समाधान मानण्याचा मी सतत प्रयत्न करत आहे.

तुम्हांस आश्चर्य वाटेल की माझ्या वडलांना धंद्यात हजारो रुपयांना लोकांनी बुडवले आहे (१९४० ते १९६० च्या दरम्यान.) पण त्यांनी कधी

कुणाच्या माना मुरगाळून पैसे मिळवायचा उपद्व्याप केला नसल्यामुळे आमची सतत भरभराट झाली आहे. उलट ज्यांनी त्यांना छळून पैसे काढले, बुडवले, कमिशने खाल्ली त्यांची परिस्थिती फारशी चांगली नाही. कुणाला हार्टअॅटॅक आलेले आहेत, कुणी ओळखू न येण्याइतपत अशक्त झालेले आहेत, कुणाच्या बायका वेडचा झालेल्या, कुणी निपुत्रिक आहेत तर कुणाची मुले मवाली निघालेली आहेत.

वाराने राहून शिक्षण केलेल्या माझ्या वडलांची सर्व मुले-मुली कुणी एम्. डी., एम्. एस. कुणी बी. इ. झाली, आणि वयाची सत्तरी उलटून गेली तरी अजून माझे वडील ताठ मानेने आणि ताठ शरीराने टिकून आहेत, एवढेच नव्हे तर दिवसाचे बारा तास काम करतात. मला या गोष्टींचा रास्त अभिमान आहे, गर्व नाही. म्हणूनच मला सर्वांना पुनः पुन्हा सांगावेसे वाटते, तुम्ही पैशाच्या अधीन होऊ नका. वाजवीपेक्षा जास्त पैसा म्हणजे दुःखाला आणि चिंतेला आमंत्रण होय.

## सांडून गेलेल्या दुधाची चिंता

पैशाच्या संदर्भात आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आलेली आहे. ती म्हणजे, गेलेल्या पैशाबद्दल सारखी चर्चा आणि खंत.

उदाहरणेच देतो. दिनकरची जुनी स्कूटर विकायची म्हणून त्याने ठरवले. स्कूटर चांगली वापरली होती म्हणून तिची किंमतही निश्चितच चांगली आली असती. पण त्याचा स्वभाव उतावळा. एक गृहस्थ अचानक त्याच्याकडे आले आणि म्हणाले, 'पैसे रोख आणले आहेत लगेच सौदा करू.' त्याचवेळी दिनकरने जरा ताणून धरले असते तर बाजारभावापेक्षा दोन पैसे जास्त मिळाले असते. पण हा उतावळा. त्याने बाजारभाव तर राहूनच द्या, पण त्यापेक्षा दोन पैसे कमी घेऊन स्कूटर विकून टाकली. हे चुकल्याचे त्याच्याही लक्षात आले. पण मग ही गोष्ट किती लावून घ्यायची ? बायकोने त्याची खरड काढली. मित्रांनी त्याची अक्कल काढली. सर्व बाजूने त्याला लोक अक्षरशः 'चावत' होते. प्रत्येकजण त्याला म्हणायचा, 'मी तुला दोनशे रुपये जास्त मिळवून दिले असते. तू उगीच घाई केलीस.' दिनकरकडे

मी एकदा गेलो होतो. त्याच्या बायकोने ही रेकॉर्ड लावली. मी म्हणालो, ' वहिनी, यावर एक उपाय आहे. दोनशे रुपये मिळवता येतील. दिनकरच्या एकवेळच्या जेवणाचे दोन रुपये होतात असे मानले तर त्याला १०० दिवस एक वेळ उपास करायला सांगा. मग झाली की दोनशेची भरपाई !' त्या म्हणाल्या, ' दोनशे रुपयांची भरपाई काय उपास करून करायची असते ?' मी उत्तरलो, ' ती निदान उपास करून होईल तरी; पण चर्चा करून, खंत करून मात्र उगीच तणातणी वाढत जाईल. मनाला सतत टोचणी लागत राहील की, मी दोनशे रुपये कमी घेतले म्हणून.' गेल्याचा वृथा शोक नको हे काय खोटे आहे काय ! पण वहिनींना हे सांगणारा मी असा कोण मोठा तत्वज्ञ लागून गेलो होतो ?

इंटर सायन्सला असताना, वडिलांनी हौसेने घेऊन दिलेली माझी कोरी सायकल कॉलेजातून चोरीला गेली. वडील म्हणाले, ' अरे गेली तर गेली. दुसरी जुनी घे. ' पण मी जास्त हुशार ! मी सहा महिने रविवार पेठेतून फर्ग्युसन कॉलेजपर्यंत चालत जात येत होतो ! त्यांनी मोठेपणा दाखवला. मी शिक्षा करून घेतली.

मग मला दिनकरच्या बायकोला उपदेश करायचा काय अधिकार होता ? पण मीही कालांतराने हे शिकलो की गेलेले पैसे हे आपले नव्हतेच. मग तणातणी कशाला करायची ?

बापू स्वतः कधी बाजार करत नाही. मुलगा दहा वर्षांचा. वह्या घेऊन येतो. दुकानदार त्याला थोडेफार फसवतो. मग बापू घरूनच त्याला सांगतो, ' गाढवा, १–१५ ची वही तू १–२५ ला आणलीस ? जा, परत कर त्या वह्या. नाहीतर फरकाची रक्कम आण. ' तो पोरगा बिचारा वाकडं तोंड करून दुकानदाराकडे जातो. दुकानदार त्याला पिटाळतो. हे अधूनमधून घरात असेच चालू असते !

पुण्यातलीच गोष्ट आहे. एका दुकानात एक गडी नोकरीला होता. त्याने मालकाला न विचारता शेजारच्या दुकानातली सायकल भाड्याने घेऊन मालकाचे काम केले. मालक खूप गरम झाला, ' मला न विचारता तू १० पैसे का खर्च केलेस ?' हे दोन दिवस सारखे चालू होते. नोकर उठला. जुन्या बाजारात गेला. ७५ पैसे खर्चून त्याने एक जुना चाकू विकत घेतला

आणि मालकाचा खून केला !

कधी कधी माणसाला सर्व बाजूने काहूर झाल्यासारखे होते. मुले शाळेच्या डिपॉझिटची पावती हरवतात. डिपॉझिट मिळत नाही. पैसे जातात. मुलगा बाजारात जाताना त्याच्या हातून दहाची नोट हरवते. मुलीच्या सायकलचे नवे सीट कव्हर शाळेतली उपद्व्यापी पोरे ब्लेडने फाडतात. गुन्हेगार सापडत नाही. वैद्याकडून आणलेली अत्यंत भारी किमतीची भस्मे तुम्ही काही दिवस वापरायचे राहिल्यामुळे तुमची बायको 'ती भस्मे वर्षभर जुनी झाली आहेत.' या सबबीवर आयुर्वेद हातात घेऊन कचऱ्यात टाकून देते. तुम्हाला हे समजते तेव्हा तुमचा तिळपापड होतो. या सगळ्या गोष्टींच्या मागे पैसे हकनाक गेले हा एक महत्त्वाचा असतो.

हे सगळं टाळलं पाहिजे. प्रयत्नाने थोड्या फार प्रमाणात हे साधते.

सुरुवाती सुरुवातीला मला खूप त्रास व्हायचा. बारीक-सारीक बाबतीत मी चिडायचो. माझे दाढीचे ब्लेड माझा मुलगा सरळ पेन्सिल छिलायला वापरायचा. माझी आदळ-आपट व्हायची. तोंडाला अर्धवट साबण लावलेला असतानाच मी उठून त्याला बदडून काढत असे. टेबल टॉप चिकटवायला आणलेला चटकन वाळणारा पांढरा डिंक प्लॅस्टिकची पिशवी उघडी ठेवल्यामुळे वाळून जाऊन दहा रुपयांचे नुकसान झाले. एक दिवस गुलाबावर फवारायच्या औषधाची बाटली माझ्याच हातून उन्हात राहिल्यामुळे औषधाचे पार घट्ट मलम तयार होऊन फेकून द्यावे लागले. मग एक दिवस शेजारच्या घरातल्या पोरांनी क्रिकेटचा चेंडू असा मारला की आमच्या घराच्या सगळ्या काचा फुटल्या !

दर वेळी आपल्या पाकिटाला कात्री लागली आहे याची मला खात्रीच पटली. पैसे जाताहेत याची मला इतकी तळमळ लागून राहिली. माझे ब्लडप्रेशर वाढून रोहिण्या फुटतात का काय असे मला वाटले. डॉक्टर बहिणीला मी माझे ब्लडप्रेशर तपास म्हणून सांगितले. सुदैवाने ते नॉर्मल होते. पण माझ्या लक्षात एक गोष्ट आली की, या आदळ-आपटीने, आरडा-ओरडीने माझे स्वास्थ्य पार खलास होऊन जाणार.

माझे पैशाचे नुकसान मुद्दाम कुणीही करत नव्हते. मी मनाशी ठरवले बस झाली ही डोकेदुःखी मी मनाला लावून घ्यायचेच बंद केले.

पैसे जाण्याच्या ह्या तळतळाटावर मी आज इतकी मात केली आहे की तुम्ही एखादा प्रसंग. त्यात फुशारकी बिलकुल नाही.

माझ्या शिलकीतली काही रक्कम मी हळूहळू शेअर्समध्ये गुंतवायला लागलो होतो. चांगल्या कंपन्यांचे शेअर्स खरोखरीच फायदेशीर असतात. ठेव म्हणून तुम्ही आज हजार रुपये ठेवलेत तर पाच वर्षानंतर जे हजार तुमच्या हातात पडतात त्याची किमत हजार बिलकुल नसते. कारण दरम्यानच्या काळात रुपयाची किंमत कमी झालेली असते. पण शेअर्समध्ये रुपयाची किंमत बरोबर राहते. उदाहरणार्थ, आज तुम्ही दहा रुपयांचा एक शेअर जर घेतलात तर पाच वर्षाने त्याची किंमत १५ होते. त्यात पुन्हा बोनस शेअर्स वगैरे मिळतातच. या शास्त्राचा मी गेली दहा-बारा वर्षे अभ्यास केला.

जुन्या कंपन्यांचे शेअर अर्थात मूळ किंमतीला कधीच मिळत नाहीत. दहाचा २० रुपयाला, २५ रुपयाला घ्यावा लागतो. म्हणून मी जाणून बुजून धोका पत्करायचे ठरवले. Where there is no risk, there is no gain ! नवीन कंपन्यांचे शेअर अर्ज करून मला मूळ किंमत मिळू लागले.

यांतल्या कित्येक मिनिस्टील कंपन्या आज बुडाल्या असून माझे कष्टाने मिळवलेले थोडेथोडके नाही; पाच हजार रुपये पाण्यात गेलेले आहेत. हिंदुस्थानातल्या चांगल्या डायरेक्टरांनी काढलेल्या कंपन्यांत मी विचारपूर्वक माहिती जमा करून पैसे गुंतवले. त्यांच्यावर पॉवर शॉर्टेज, रॉ मटेरिअलचा तुटवडा, संप वगैरेमुळे कुलूप लावायची पाळी आली. मी साफ बुडालो. मी काय करणार होतो ? दिल्ली, मद्रास, गाझियाबाद वगैरे ठिकाणी जाऊन त्या डायरेक्टरांना शिव्या देणार होतो ? मी काय केले ?

मी काहीही केले नाही. गप्प बसलो. ते सारे विसरून गेलो. कुणाच्या दृष्टीने नव्या कंपन्यांच्या शेअरमध्ये मी पैसे गुंतवले हा मूर्खपणा असेल. मी तो केला होता. माहीत असून केला होता.

मी त्यावरून अक्कल शिकलो निश्चितच ! पण आदळ-आपट बिलकुल केली नाही. अंतर्मनाला टोचणी असते पण तेवढे किरकोळ चालायचेच. ती पण हळूहळू जाते.

बारा वर्षांपूर्वी चांगल्या ब्लेडने पेन्सिल छिलल्यामुळे मुलाला बडवणारा

तो मीच होतो, याचे मला राहून राहून हसू मात्र येते.

## गैरसमजुतींचे जाळे

माझे एक मित्र माझ्याकडे आले होते. जरा काळजीतच होते. मी त्यांना विचारले,

' काय हो, काळजीत दिसता आहात !'

' काय हा देश आहे का ? पोराला हव्या त्या शाळेत प्रवेशसुद्धा मिळत नाही.'

' म्हणजे ? तो शाळेत जातोच आहे ना सध्या ?'

' हो. तिथे त्याचा पहिला नंबर आला आहे. अहो, इतका हुशार पोरगा असून त्या अमुक-तमुक हायस्कूलमध्ये प्रवेश नाही म्हणून सांगतात. वरूनच प्रेशर आणावे म्हणून मी प्रयत्न करतो आहे. तुमचा काही वशिला आहे का ?'

' माझा काही तिथे वशिला नाही. पण पुण्यात, ज्या शाळेत सध्या तुमचा मुलगा जातो आहे ती शाळा एक बऱ्यापैकी म्हणून प्रसिद्ध आहे.' मी म्हणालो.

' अहो, कसली बरी शाळा ती ! मास्तर मुळी शिकवतच नाहीत. पोराचं वाटोळं होण्याआधी त्याला तिथून काढलाच पाहिजे. जातो. जरा गडबडीत आहे. तुमचा वशिला असला तर पाहायला आलो होतो.'

' आणि समजा प्रवेश नाही मिळाला तर ?'

' पैसे सोडणार. पैसे घेणारा कुणी मिळतो का तेही पाहणार आहे.'

' पण मी म्हणतो, का एवढा आटापिटा करता आहात ?'

' अहो, पोराला शिक्षण चांगलंच मिळालं पाहिजे.'

ते गेल्यावर मी मनाशी हसलो. ते ज्या शाळेतून मुलाला काढणार होते ती शाळा पुण्यातील एक बऱ्यापैकी शाळा आहे हे मला माहीत होते. म्हणजे मी त्या शाळेचाच काही वर्षे विद्यार्थी होतो !

आणि गंमत म्हणजे माझ्या वडलांनी वीस वर्षांपूर्वी हेच खूळ डोक्यात घेऊन मला त्या शाळेतून काढून दुसऱ्या शाळेत घातल्याची हकीगत मला आठवली. माझे मलाच हसू आले. मी त्या शाळेत दुसरा नंबर मिळवला

होता. वडिलांनी ठरवले, बस् मला तिथून काढून एका भारी शाळत घालायचे. ओळख गाठून मी त्या शाळेत शिरकावही केला आणि मग पुढे काय झाले ?

त्या शाळेत एकूण दोन हजार विद्यार्थी तेव्हा होते. नुसती जत्राच होती म्हणा ना ! कुणाचा कुणाला मेळ नव्हता. वैयक्तिक लक्ष बिलकुल दिले जात नव्हते. 'ए' तुकडीतल्या विद्यार्थ्यांना मात्र भरपूर कोचिंग दिले जायचे. त्यामुळे एस्. एस्. सी. ला पहिल्या तिसात आमच्या शाळेची काही मुले सतत दिसायची. मग आमच्या शाळेत इतर विद्यालयातले पहिले दुसरे आलेले विद्यार्थी प्रवेशासाठी गर्दी करायचे. म्हणजे आमच्या त्या शाळेत सर्व विद्यार्थी इतरत्र अतिशय बुद्धीमान ठरलेलेच प्रवेश घ्यायचे. त्या भारी शाळेत मी बुजलो. मला कधी कुणी होमवर्क दिले नाही आणि कधी दिले तर तपासून पाहिले नाही. त्याचा परिणाम असा झाला की माझ्या त्या पूर्वीच्या शाळेतला एक हुशार विद्यार्थी म्हणून मी त्या नव्या शाळेत जो गेलो तो एक कःपदार्थ म्हणून समजला जाऊ लागलो. शिक्षकही या गर्दीत फारसं मन लावून शिकवायचे नाहीत. त्यांना एक माहीत होते की ही सर्व पोरे मुळात चांगल्या ग्रेडची आहेत. बघतील त्यांचं त्यांचं ! नापास तर नाही ना व्हायची ? आणि तसंच झालं ! मी पंचावन्न टक्के मार्क मिळवले !

एस. एस. सी.ला गेलो तेव्हा गणित व इंग्रजी या विषयांचा वर्गात धुव्वा उडू लागला. म्हणजे असं व्हायचं की सरांनी वर्गात एकादे प्रमेय शिकवायला सुरवात केली की बाहेर क्लासला जाणारे तो धडाधडम्हणून दाखवू लागले. शिक्षक म्हणायचे, 'अरे, हे तर तुम्हाला येते आहे !' मग ते टिवल्या बावल्या करू लागले. मग नाइलाजाने मीही बाहेर क्लासला जाऊ लागलो. अमे बहुतेक सर्वजण क्लासला जात. पर्यायाने शाळेचा निकाल चांगला लागायचा ! मी बऱ्यापैकी पास झालो.

मग मला सांगा, त्या चांगल्या शाळेचा अर्थ काय ? सात-आठ तुकड्या असलेल्या त्या शाळेत माझे शिक्षक मला नावानेसुद्धा ओळखत नसत. वर्ग-शिक्षक फी घेताना म्हणायचे, 'भागवत ना तू ?' आता अशा परिस्थितीत कुठले आले वैयक्तिक लक्ष ? मग हवा कशाला माझ्या त्या मित्राच्या मुलाला

त्या ‘ मोठ्या ’ शाळेत प्रवेश ?

मला अजूनही वाटते, मी त्यापूर्वीच्या शाळेत असतो तर सध्यापेक्षा मी वरच्या लेव्हलवर या आधीच गेलो असतो. कारण तिथे माझ्यावर माझ्या शिक्षकांनी बारीक लक्ष ठेवले असते. ती शाळाही लहान होती. त्यामुळे मुख्याध्यापक कितीतरी मुलांना स्वतः ओळखत !

मोठ्या शाळा वाईट असतात असे मला बिलकूल म्हणायचे नाही. मोठ्या शाळेत निकोप स्पर्धेमुळे मुलाला आपली लेव्हल किती कमी आहे हे समजू शकते. कारण आजूबाजूला भरपूर हुशार विद्यार्थी असतात हे मला मान्य आहे. पण मला अजूनही असे वाटते की जर वैयक्तिक लक्ष असेल आणि मुलगा खराच हुशार असेल तर तो लहान शाळेतसुद्धा पुढे येतो. तसे नसते तर जळगाव, बार्शी, पंढरपूर येथील मुले एस. एस. सी.ला कधी पहिली आलीच नसती !

तेव्हा मोठ्या शाळेत प्रवेश मिळविण्याची काळजी करणे वेडेपणाचे आहे. त्यापेक्षा शाळा लहान असूनसुद्धा शिक्षक चांगले शिकवणारे जर असतील तर तुमच्या मुलाला तिथेच राहूद्यात असे मला लोकांना सुचवावेसे वाटते. फार भारी शाळेत सहजासहजी प्रवेश मिळत असेल तर वर लिहिलेले मुद्दे लक्षात घेऊन जरूर घाला तुमच्या मुलाला. पण त्यासाठी उगीच धडपड करू नका. गेल्या २० वर्षांत बहुतेक सर्व शाळांत चांगला फरक झाला असून सामान्य शाळांतसुद्धा गृहपाठ वगैरे घेणे, ते तपासणे इत्यादी गोष्टी कटाक्षाने पाळल्या जातात. शिक्षकही बऱ्यापैकी शिकवतात. तुम्ही म्हणाल, ‘सामान्य शाळांत हलक्या दर्जाचे विद्यार्थी असतात. त्यांना चांगल्या सवयी नसतात. ते गुंडगिरी करतात. आमचा मुलगा तिथे बिघडेल !

मग ऐका हे ! मी काही कामासाठी पुण्यातल्या एका भारी शळेत गेलो होतो. मुख्याध्यापक दोन गटातल्या मारामारीची चौकशी करत होते. एक-मेकांना लाथाबुक्क्यांनी मारामारी केलेली होती ! मग काय ! घरोघरी मातीच्याच चुली ! तुमच्या पोरावर तुमचं स्वतःचं लक्ष फार मोठ्या प्रमाणावर असेल, त्या मुलानं स्वतःचं मनानं चांगले मार्क मिळवायचं ठरवलं असेल त्याला शिक्षक चांगले शिकवणारे असतील तर तो चमकेल; अन्यथा नाही हे अनुभवाचे बोल मी सांगतो आहे. त्यात फुशारकी नाही, गर्व नाही.

माझा मुलगा पुण्यातल्या एका बऱ्यापैकी शाळेत जात होता तरी एस. एस. सी.ला त्याने ८० टक्के मार्क मिळवले !

## मुलांच्या भवितव्याची काळजी

आजकाल सर्वत्र असे दिसते की आई-बाप आपल्या मुलाच्या शिक्षणाबाबत काळजीने भलतेच गांजलेले दिसतात, मुलांनी चांगले चमकावे हे प्रत्येक आई-बापाला वाटणे साहजिक आहे. पण त्याची व्यर्थ काळजी कशाला करता ?

फार काय मीसुद्धा नुकता नुकता नकळत माझ्या मुलाच्या भवितव्याची उगीच काळजी करत होतो. त्याला अकरावीलाही ८० टक्के मार्क मिळाले. तो बारावीला गेल्यावर मी मनात सारखा विचार करू लागलो, याला मेडिकलला प्रवेश मिळेल का ? नाही मिळाला तर एवढ्या हुशार पोराचं वाटोळं होईल. मी मनाशी ठरवलं, काय वाटेल ते झालं तरी माझा मुलगा मी डॉक्टर करणार. मी त्याला म्हणालो, ' अरे, माझे शिल्लक असलेले सर्व पैसे मी तुझ्यासाठी खर्च करून तुला मी तुला डॉक्टर करेन. कॅपिटेशन फी पडली तरी देईन. देणगी द्यावी लागली तरी देईन. तुला पार मणिपालला ठेवावे लागले तरी सर्व खर्च करेन.' तोही खूष झाला.

त्यानंतर माझे एक मित्र मला भेटले. मी त्यांना माझा मनोदय सांगितला. ते हसले. मला म्हणाले, ' का एवढा अट्टाहास ? त्याच्या एकट्याच्या शिक्षणावर सर्व पुंजी खर्चून टाकून दुसरा मुलगा आणि मुलगी यांना काय वाऱ्यावर सोडणार ? एवढा स्वार्थत्याग करून स्वतःच्या उतारवयात काय खाणार ? चिंचोके ? त्या मुलानं तुम्हाला विचारलं नाही तर ? तेव्हा कॅपिटेशन फीचे १५।२० हजार रुपये उगीच खर्चू नका. माझं ऐका, बारावीला जर समजा त्याला अपेक्षेपेक्षा कमी मार्क मिळाले आणि दूरच्या ठिकाणी प्रवेश मिळाला तर जरूर शिकवा. डॉक्टर करा. पण पंधरा-वीस हजार रुपये देण्याला आपला विरोध आहे. त्यापेक्षा त्याला इंजिनिअर करा. आता दोन्हीकडे अर्ज करता यतो. कारण गणित आणि बायोलॉजी हे दोन्ही विषय बारावीला आहेत. समजा, त्याला दोन्ही बाजूकडे प्रवेश मिळाला

नाही तर त्याला आय. ए. एस., आय. एफ. एस. अशा परीक्षांना पुढं बसवा. होऊ द्या त्याला सायन्स ग्रॅज्युएट. तो जर मुळात बुद्धिवान असेल तर कुठेही चमकेल. नसेल तर मिळेल त्यावर समाधान माना. प्रयत्न जरूर करा. पण इरेला पेटून दु:खी होऊ नका. प्रश्न प्रतिष्ठेचा करू नका ! कारण मग त्यामुळे काळजी आणि दु:ख कदाचित सहन करावे लागले !

मला त्यांचे विचार पटले.

मुलं हुशार आणि चांगली निघणं हे प्रथम नशीबावर आहे. अन्यथा तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी ती तुम्हाला बनवू शकतील याची मला खात्री आहे. याचा अर्थ प्रयत्न सोडून देऊन दैववादावर विसंबून राहा असे मला बिलकुल सुचवायचे नाही. पण त्यातसुद्धा तारतम्य बाळगणार की नाही ? बेडकाला फुगवून तुम्ही काय त्याचा हत्ती करणार का ? मुलाची कुवत पाहणार की नाही ? का चाळीस टक्के मार्क मिळवायची लायकी असलेल्याला तुम्ही इंजिनिअर, डॉक्टर बनवायची स्वप्नं पाहून दु:खी होणार ? गेली पंधरा वर्षे विद्यार्थीवर्गात राहून मी असे कितीतरी लोक पाहिलेले आहेत.

परवाचीच गोष्ट सांगतो. एका मुलाचे वडिल नोकरीनिमित्त परगावी होते. मुलगा आईला जुमानत नव्हता. एस. एस. सी. ला नापास झाला. वडील रिटायर होऊन आले. मला भेटले. त्यांनी माझ्याकडून गणित शिकून घेतलं. मग ते मुलाला शिकवणार होते. मुलगा कुठल्याही क्लासला घातला की बुट्टया मारायचा. वडलांनी चंगच बांधला होता. मला त्यांची दया यायची. एक दिवस मला मोठी गमतीदार हकीगत ऐकायला मिळाली. तो मुलगा एके ठिकाणी म्हणाला ते माझ्या कानावर आले. तो म्हणाला, 'अरे, तात्या गणितात तयार होणार. मी मात्र त्यांच्याकडून गणित नाही शिकणार आपण कुठेतरी क्लार्क म्हणून चिकटणार. हवी कशाला ही डोकेदुखी ?' तेव्हा मला हे ऐकून फार वाईट वाटले. मी त्या मुलाच्या वडलांना म्हणालो, 'अरे, तुझा मुलगा चकाटया पिटतो आहे. तो जन्मात एस. एस. सी. होणार नाही. मी लिहून देतो!'

'अरे, छे रे ! पोरगा हुशार आहे. जरा थोडा बिघडलाय. पण मी त्याला बरोबर ताळयावर आणणार आहे !,

इथे वडील चुकताहेत. त्यांनी सरळ त्या पोराच्या शिक्षणाचा नाद सोडून देऊन स्वस्थ बसावे. आधीच तो दोन वेळा एस. एस. सी. ला नापास झाला. तो पास होणार नाही. आणि जरी मेटाकुटीने पास झाला, तरी त्याला काही हजार रुपयांची नोकरी थोडीच मिळणार आहे ? वडील मात्र काळजी करून खंतावतील ! मुलांचे शिक्षण हा पालकांची काळजी सतत वाढवणारा एक भाग आहे म्हणून या विषयावर विस्ताराने लिहावे लागत आहे हे वाचकांना समजत असेलच.

माझ्या माहितीचे एक गृहस्थ आहेत. त्यांचा मुलगा अत्यंत हुशार निघाला. एस. एस. सी. ला त्याला ७९ टक्के मार्क मिळाले. मुलाला डॉक्टर व्हायचं होतं. ते गृहस्थ माझ्याकडे आले. मला म्हणाले, 'काय करावं शिक्षणाचं ? त्याला बारावीला चांगले मार्क मिळाले नाही तर काय करावं ? ॲडमिशन मिळणार नाही.'

'अहो, असा का विचार करता ? त्यानं मनावर घेतलं तर आपले मार्क टिकवेल !

'त्यापेक्षा असं करू का ?'

'काय ?'

'मुंबईला मेडिकलला कमी मार्क असले तरी प्रवेश मिळतो. मुंबईला ठेवतो अकरावी आणि बारावीला.'

'मुलगा एकदम परक्या गावी ठेवला तर बिघडणार नाही का ? लहान वय आहे म्हणून म्हणतो.'

'छे हो. मी त्याला चांगलं वळण लावलं आहे.'

'पहा बुवा.'

ते गेले. त्यांनी मुलाला मुंबईला पाठवले. तिथे त्या मुलावर यांची काहीच देखरेख होऊ शकत नव्हती.

मुलाला एकदम नव्या वातावरणात नवे मित्र मिळाले. पुण्याला हॉटेल-मध्ये चुकू न जाणारा मुलगा मुंबईला हॉटेलात चैन करू लागला. त्याला मोकाट सुटल्यासारखे वाटू लागले. अकरावीला मार्क खाली आले आणि बारावीला त्याला केवळ ५९ टक्के मार्क मिळाले. प्रवेश मिळाला नाही.

काय मिळवले वडलांनी ? मुलाला वाया जाण्याचा मार्गच दाखवून

दिला नाही का ? त्या गृहस्थांची सारी स्वप्ने पार धुळीला मिळाली. मुलाच्या चिंतेने त्यांचे केस अकाली पांढरे झाले.

या सर्व प्रकारावरून माझे स्पष्ट मत झाले आहे की, मुलाला आपल्या-पासून दूर ठेवू नका. अगदी नाइलाज असेल तर गोष्ट वेगळी. पण मुले आई-वडलांजवळच असलेली बरी.

मला हे समजू शकते, की ज्या गावात उच्च शिक्षणच नसेल तिथे मुलांना ठेवणे– केवळ परगावी बिघडतात म्हणून– आत्मघातकीपणाचे आहे.

शाळेच्या प्रवेशाबाबत बोलायचे झाले तर मला वाटते, शाळाही आपल्या रहाण्याच्या जागेपासून मैलापलीकडे असू नये. मुलांना त्यामुळे चालणेही फारसे पडत नाही. कोणत्याही वेळी पालक ताबडतोब शाळेत जाऊ शकतात. पण मैलाच्या परिसरात पालकांच्या पसंतीची शाळा असतेच असे नाही. मग मुले घरापासून दूरवरच्या शाळेत जाऊयेऊ लागतात.

चांगल्या शाळेच्या हव्यासापायी मला दिसलेले एक उदाहरण तुम्हापुढे ठेवतो. मुलगा रहातो स्वारगेटापासून मैलभर अंतरावर, भापकर पेट्रोल पंपाकडे. शाळेत जातो जंगली महाराज रस्त्यावरच्या. कधी सायकलने जातो कधी बसने जातो. त्याला घरातून खूप आधी निघावे लागते. पुण्यातली रहदारी आणि अपघात फार वाढलेले आहेत. मुलाचे वय अगदी लहान आहे. तो आणि त्याचा मित्र हे सायकल वाकडी-तिकडी चालवत रस्त्याने जाताना मी पहातो. मुलाची कधी कधी भीती वाटते, याला कधी धक्का तर नाही ना लागणार जोराने जाणाऱ्या वाहनाचा ? पण मी मनाशी म्हणतो, परमेश्वर घेईल काळजी त्याची. माझ्या डोक्याला ती कशाला हवी ?

## माणुसकी हवीच !

मी एका खाजगी कंपनीत होतो तेव्हाची गोष्ट. कंपनीचा मालक आणि त्याचा मुलगा हाताखालच्यांना गुलामांपलीकडची वागणूक देण्यात प्रसिद्ध होते. प्रत्येकाकडून पाच-पाच वर्षांचा बाँड लिहून घेतलेला असल्यामुळे

प्रत्येक माणूस मुकाट्याने सारं सहन करत होता. मी मात्र काही कारणाने त्याच्या बाँडमध्ये अडकलो नव्हतो. प्रत्येक माणसावर मालकाची स्ट्रिक्ट देखरेख होती. जरा कुणी, कुठे वेळ काढू लागला की त्याला झाडायला ते तयार असत. पण पगार मात्र कारकुनासारखे होते. फर्स्टक्लास ग्रॅज्युएट नोकरी लगेच मिळते म्हणून मालकाच्या ट्रॅपमध्ये सापडत होते.

एक दिवस रात्री मला सडकून ताप भरला. मी माझ्या घरापासून दोनशे मैल दूर एकटाच एका खोलीत रहात होतो. माझी शुश्रुषा करायला कोणीहि नव्हतं. रात्रभर मी जागा होतो. रात्री तसाच एका डॉक्टरकडे चालत गेलो. त्यानं इंजेक्शन दिलं. वास्तविक दुसऱ्या दिवशी मी विश्रांती घेणे जरुरीचे होते. पण ताप उरतला म्हणून घरी बसण्यापेक्षा कंपनीत जावे म्हणून मी गेलो. माझा चेहरा अतिशय उतरलेला होता. मला पाहिल्यावर सर्व सहकारी माझ्याभोवती जमले. माझी चौकशी करू लागले. आपापल्या टेबलाभोवती कोणी नाही असे पाहिल्यावर मालकाचा मुलगा खवळला आणि माझ्या जवळ आला. त्याच्या लोकांची मी पाच मिनिटे खाल्ली म्हणून माझ्यावर आग ओकू लागला. त्यानं माझे असेच खूपदा विनाकारण अपमान केलेले होते. पण मी ' या मूर्खाच्या कशाला नादी लागा ' म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले होते. मी त्याचं सारं ऐकून घेतलं. मग त्याला सुनवायला सुरुवात केली. मी म्हणालो, ' तुमच्या जागी जर मी असतो तर प्रथम चौकशी केली असती की, सर्वजण एका माणसाच्या भोवती का जमले आहेत ? ते माहीत करून मग बोलायचं का नाही ते ठरवलं असतं. मी काल दिवसभर तापानं फणफणलो होतो. आज सकाळी ताप उतरला. मला घरी आळशासारखा वेळ काढणं आवडत नाही. उठून सरळ कामावर आलो पण हा विचार करून बोलण्याइतकी तुमची विचारशक्तीच नाही. दुसऱ्याच्या परिस्थितीत जायची तुमची इच्छाच नाही, हाताखालचे लोक तुमचे गुलाम आहेत अशा भावनेने तुम्ही वागता आहात. पण मी ही तुमची गुलामगिरी मिनिटभरही सहन करू इच्छित नाही. गुडबाय ! त्या गृहस्थाचा सर्वांदेखत अपमान करून मी तिथून निघालो आणि परत तिथे पाऊल टाकले नाही !

आयुष्यात मी असे खूप लोक पाहिलेत की ते स्वत:शिवाय दुसऱ्याचा

विचार करत नाहीत. मग अडचणीत येतात. वरील कंपनीचे मालक अशा-मुळे गोत्यात आले असं मी नंतर ऐकलं. त्यांच्या हाताखालच्यांनी एकदा संप केला होता. त्यांना खूप कटकटींना तोंड द्यावे लागले.

माझे सुभाष नावाचे एक मित्र आहेत. ते मला एकदा फार मजेदार गोष्ट सांगत होते. त्यांच्या साहेबांना घरी ऑफिसचे काम घेऊन आलेले आवडत नसे, हे सुभाष यांना चांगले माहीत होते. एक दिवस साहेब रजेवर मुंबईला गेले. तिथे त्यांच्या नातलगाचे लग्न होते. हे त्यांनी सुभाषनाच फक्त सांगितले होते. तिथे त्यांच्या लग्नघरी एक गृहस्थ काही काम घेऊन गेले. त्यांनी त्या गृहस्थाचे काम केले. पण ते संतापाने फुलले. केव्हा एकदा सुभाषना फैलावर घेतो असे त्यांना होऊन गेले. ते रजेवरून परत आल्यावर सर्वांदेखत सुभाषना जामू लागले,

'का म्हणून तुम्ही त्या गृहस्थांना माझ्याकडे पाठवलेत ?'

'कोण गृहस्थ ?'

'ते फर्टिलायझर कंपनीचे असिस्टंट.'

'त्यांना मी पाठवले नाही.'

'साफ खोटं आहे हे. तुमच्याशिवाय कुणालाही माहीत नव्हतं मी मुंबईला जाणार आहे हे. कंपनीच्या कामाचा माणूस तिथे आला ते तुमच्या सांगण्यावरूनच.'

'खोटं आहे हे.'

'उद्धटपणा करू नका.'

'त्यांना फोन लावूनच विचारतो.'

'काही जरुरी नाही.'

सुभाषनी त्यांना फोन लावला. ते म्हणाले, 'अहो, त्यांच्या ओळखीच्या एका गृहस्थांनी मला हे सांगितले.'

'मग हे तुम्हीच त्यांना सांगा.'

मग साहेबाने फोन घेतला आणि मग सुभाषना म्हणाले,

'सॉरी, मला वाटले, तुम्हीच सांगितलेत.'

'तुम्ही दुसऱ्या बाजूचा नीट विचार करायला हवा होता. मी काय म्हणत होतो ते न ऐकताच तुम्ही मला दम देऊ लागलात.'

त्या साहेबांची ऑफिसात बेअब्रू झाली म्हणून ते फार काळजीत पडले.

फार काय, मीही एकदा असाच मूर्ख बनलो होतो. मी एक नाटक केले होते. कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये ते सादर केले. त्या रात्री मी अगदी कावून गेलो होतो. मध्यंतरात महत्त्वाच्या एक-दोन व्यक्तींना मी आत चहाला बोलावून नेले. इतर सहकाऱ्यांना ते लागले. त्यांना वाटले आम्हाला का डावलले ? वास्तविक तो चहा काही सर्वांना नव्हता. सर्व नट मंडळींना वाटले, प्राचार्यांना बोलावून त्यांनाही चहा द्यावा. त्याप्रमाणे मी बोलावून त्यांची ओळख करून दिली. दुसऱ्या दिवशी मला वाटले होते कुणी तरी सहकारी मी उत्तम नाटक बसवले म्हणून माझी तारीफ करेल. पण छे ! त्यांपैकी एकजण माझ्याजवळ आले आणि मला म्हणाले, 'आम्हाला बोलावले असते चहाला तर काही बिघडले असते का ?' मी माझ्यापरीनं त्यांची समजूत घातली. ते गेल्यावर दुसरे एक माझ्याजवळ आले आणि म्हणाले, 'चहाचं काय ?'

मी त्यांच्यावर खवळलो. 'नाटक केले त्याचे श्रेय देण्याचे लांबच. कालच्या चहावर काय वादळ माजवता ?'

'अहो, माझे ऐकून घ्या.'

'जरूर नाही, एकाचे आत्ताच ऐकून घेतले. आता तुमचे ऐकून घेण्याची इच्छा नाही.'

'अहो, मी म्हणत होतो की तुम्ही सुंदर नाटक केलंत त्याबद्दल आता चहा द्या.' माझा चेहरा खर्रकन उतरला. ते गेले. मी मात्र उगीच काळजी करू लागलो. कदाचित ते प्राचार्यांचे कान तर नाही ना भरणार या धास्तीने उगीचच खंत करत होतो.

## दुसरी बाजू लक्षात घ्या !

त्यावरून मला एक प्रसंग आठवला. एकदा माझ्या मित्राने सभा आयोजित केली होती. नेहमीप्रमाणे संस्थेच्या सभांना विद्यार्थी, प्राध्यापक येतातच असे नाही. वक्ता मोठा असला की माणसे जमवावी लागतात. हा मित्र प्रत्येकाला सांगत होता, 'चला, सभेला चला,' काही विद्यार्थी त्याचा मान ठेवून जात

होते. काही आलोच पाणी पिऊन, म्हणून पळून जात होते.

तेवढ्यांत त्या मित्राला तिथले एक नवे सहकारी शंभर फुटांवर दिसले. त्याने त्यांना एक हाक दिली, 'अहो पारखी, चला सभेला या.' पारखी खवळले. त्याच्याजवळ आले आणि त्याला म्हणाले,

'काय हो ! हे सभेला धरून न्यायचे मूर्खासारखे खूळ का काढलेत तुम्ही ? तुम्हाला काही समजत नाही का की ही अॅक्टिव्हिटी काही कम्पलसरी नाही. आमची मर्जी असेल तर आम्ही येऊ.' ते संपादकी भाषेत बोलले. मग मित्र म्हणाला,

'प्राचार्यांनी मला सांगितले आहे की, प्रत्येक प्राध्यापकाला बोलावून आणा.'

मग पारखी घाबरले. त्यांना वाटले, आता हा जाऊन त्यांना सांगणार. मग प्राचार्य गरम होऊन त्यांची आपल्यावर खप्पा मर्जी होणार. या भीतीने ते हादरून गेले. मित्राच्या घरी गेले. त्यांनी त्याची माफी मागितली. असे होते दुसरी बाजू न ऐकता वागले म्हणजे !

व्यवहारांत आपले तेच खरे असे वागणारी खूप माणसे आढळतात. त्यांतली काही चुकतात, काही बरोबर होती असे काळ दर्शवितो. जी चुकतात ती मनमोकळेपणाने आपल्या वागणुकीचे पृथक्करण करणारी असली की पुढे त्यांचे वागणे सुधारते. त्यांना कुणी त्यांच्या चुका दाखवायला लागले की ती लगेच कबूल करतात. अशा माणसांना इंग्रजीत ओपन माइन्डेड असे म्हणतात. प्रत्येक प्रश्नाला खूप बाजू असतात. प्रत्येकाला सर्व बाजू माहीत असतीलच असे नाही. सर्व बाजूंनी विचार करण्यात निष्णात झाला की, माणूस पक्व आहे (मॅचुअर) असे आपण म्हणतो. वयानं मोठा म्हणजे पक्व असे म्हणणे चुकीचे आहे. कित्येकांना लॉजिकल थिंकिंग अँड रॅशनल थिंकिंग या गोष्टी माहीतच नसतात. त्यांना कुठेतरी एखादी माहिती वाचायला मिळते. ती खरी असे डोळे झाकून ते मान्य करतात. मग चर्चेत कुणी ती खोटी ठरवायला लागले की त्यांची प्रतिष्ठा धोक्यात आली असे त्यांना वाटते. मग ते भांडायला लागतात. इथे अशी व्यक्ती जर अधिकारी असली तर हाताखालच्यांना व्यक्तिगत अपमान समजून छळू लागते. जर ती कुणाच्या हाताखाली असली तर अधिकाऱ्याला पिडू लागते.

याबाबत मी एक गोष्ट वाचली आहे. इंग्लंडमध्ये एका मेजवानीच्या वेळी सहज विषय निघाला की, अमुकतमुक वाक्य कुणाच्या पुस्तकात आहे? त्यातला एक फार बडा माणूस म्हणाला, 'हे वाक्य शेक्सपिअरच्या नाटकातील आहे.' तिथे जमलेले सर्व लोक त्याच्यावर तुटून पडले. त्यांचे म्हणणे की ते वाक्य शेक्सपीअरच्या नाटकातील नाही. त्यावेळी तिथे कोपऱ्यात एक गृहस्थ बसले होते. ते शेक्सपिअरच्या नाटकांचा फार वर्षे अभ्यास करीत होते. ही माणसे त्यांच्याकडे गेली व त्यांनी त्याला विचारले. तो बडा माणूस की, 'हे म्हणतात ते बरोबर आहे.' हे ऐकल्यावर सर्व माणसे चकित झाली. तो बडा माणूस कशी इतरांची जिरली यावर खूष होऊन गेला. मग ती सर्व माणसे या अभ्यासू माणसाला म्हणाला, 'तुम्ही सरळ खोटं बोललांत, का असे केले? त्यावर तो माहितगार माणूस म्हणाला,

'अहो, तुम्ही जवळजवळ पंधरा लोक ठामपणाने म्हणत होता की, ते वाक्य शेक्सपिअरचे नाही. एखादा म्हणाला असता, 'ज्या अर्थी इतके लोक एका बाजूला आहेत तर मी नीट पडताळून पाहतो. कदाचित माझं चुकलं असेल. पण हा आपलं मेरी मुर्गी एकही टांग! मूर्ख म्हणा आणि द्या सोडून!'

व्यवहारात हरघडी डोळे आणि मन उघडं ठेवून वागले नाही तर काळजीचे प्रसंग येतात. एका सोसायटीने जागा घ्यायचे ठरविले. सेक्रेटरी सर्व हालचाल करीत होते. जमीन एका बाईची होती. पन्नास वर्षांचा शोध घेऊन ७-१२ चे उतारे तपासून जमीन निर्वेध आहे, असे त्याने पडताळून पाहिले. त्यांतल्या एका सभासदाने सहजच एक मुद्दा असा उपस्थित केला की मालकीण म्हणून जी बाई सहीला येणार आहे ती खरोखरीच मालकीण आहे का तोतया आहे? त्याला सर्वांनी वेड्यात काढले. कारण तिथे गटबाजी होती. सेक्रेटरी हसले आणि शेवटी त्याची शंका खरी ठरली. ती मालकीण नव्हतीच! मग तिला विचारता ती म्हणाली, 'मला वो काय तुमचा वेल्हार माहिती? मला ते लोक बोलले तुझा अंगठा पाहिजे, तेवढा दे.' काही बदमाषांनी बाईचे वतीने विक्रीचा व्यवहार करण्यात पुढाकार घेतला होता. दर खेपेला ते सेक्रेटरीला म्हणायचे, 'ती बाई अशिक्षित आहे. तिला फक्त व्यवहाराचे दिवशी नेऊ.' त्या सर्वांनी सोसायटीला चांगलेच

ठकवून पैसे बुडवले.

## आपल्या चुका दुसऱ्यावर ढकलू नका

आपले चुकले की प्रश्न प्रतिष्ठेचा न करता चूक मान्य करण्यातसुद्धा एक प्रकारचे धैर्य लागते. पण हे फार थोड्यांच्या अंगी असते. काम करताना चुका होतात. अगदी मी मी म्हणणाऱ्यांच्यासुद्धा होतात. एका गृहस्थाला तर भलतीच खोड होती. चूक झाली की ती तो सरळ दुसऱ्यावर लादायचा असे खूप वेळा झाले. इतरांच्याही ते ध्यानात आले. एकदा असेच त्याला त्याच्या साहेबाने एका चुकीबद्दल विचारले, 'का हो, हे काम तुम्ही असे केलेत ? ते चुकले आहे.' त्यावर तो सरळ त्यांना म्हणाला, 'तुम्हीच सांगितले असे करा म्हणून.'

त्यांची स्मरणशक्ति चांगली होती. त्यांनी ते सारे ऐकून घेतले आणि गृहस्थाच्या प्रमोशनच्या वेळी नालायक असा शेरा मारला !

भल्या भल्या माणसांना आचार-विचार आणि उच्चार यांची संगती राखता येत नाही त्यामुळे ते कितीतरी वेळा फार अडचणीत आलेले दिसतात.

'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले' हे आपल्याला माहीतच आहे. माणूस निरनिराळ्या परिस्थितीत दिलेल्या वचनाप्रमाणे किंवा बोलल्याप्रमाणे वागू शकला नाही की त्याचे हसे होते. तेव्हा सामान्य माणसाने बोलूच नये. म्हणूनच 'आधी केले मग सांगितले' हे म्हटले आहे ते काही खोटे नाही. आता उदाहरण पाहा, आमच्या एका शेजारणीने गर्भधारणा नको असल्यामुळे नवरा व डॉक्टर यांच्या सल्ल्याने क्युरेटिंग करून घेतले. त्या शेजारणीला आजूबाजूच्या बायकांनी टीका करून काहूर करून सोडले. 'हे काय मेले वेडेचार ! मुलगा लहान असताना वास्तविक संयमाने राहायचे ते गेलेच कुठे. आता होत होते तर होऊ द्यायचे. हे तिला शोभलं का ?' आणि त्या घटनेनंतर दोन वर्षांनी त्या टीकाकार बायकांपैकी एक बाई माझ्या सौभाग्यवतीला म्हणाली, 'अहो, तुम्ही माझ्या मुलाला दोन दिवस सांभाळाल का ?'

हिनं विचारलं,

• 'का ? काय अडचण आहे ?'

'अहो, तुम्ही विश्वासाच्या म्हणून तुम्हाला सांगायला हरकत नाही. आमच्या अशोकला वर्ष पुरं होण्याआधीच मला दिवस गेलेत. आम्ही क्युरेटिंग करून घेणार आहोत. पण ते कुणाला सांगायचं नाही !'

'का हो ?'

'अहो, क्युरेटिंग करून घेणं मूर्खपणाचं आहे असं मीच नव्हते का मागे त्या शेजारच्या ढवळ्यांच्या ताईंना म्हणाले होते. आता त्या काय म्हणतील ! का असं करू, माहेरी जाऊन करून घेऊ ?'

वास्तविक क्युरेटिंग करणार त्या स्वतःच्या खर्चाने आणि डॉक्टरांच्या परवानगीने. त्यांना काळजी कशाची ? पण त्या आधी बोलून बसल्या होत्या, त्यांना हसे होईल असे वाटले.

आमच्या एका शेजाऱ्याने स्वयंपाकासाठी गॅस घेतो म्हटल्यावर मला वेड्यात काढले होते. झाली त्या गोष्टीला पंधरा वर्षे. तो मला म्हणाला, 'अहो गॅस घेतलात कशाला ? औरंगाबादला गॅसचा स्फोट होऊन बाई मेली होती. मी नाही बुवा कधी गॅस घेणार.' ज्या दिवशी माझ्या घरी गॅस आला त्यावेळी त्याची मुले माझ्या घरात गॅस पाहायला आली होती. ती त्याने वटहुकूम काढून स्फोट होईल म्हणून परत बोलावून नेली. काही वर्षांनी मी ते गावच सोडले.

मध्यंतरी मी त्या गावाला गेलो होतो. त्याच्या नव्या घरात त्यानं मला नेलं. आत गेल्यावर मला गॅस दिसला पण मी त्याला काहीही विचारले नाही. मी बाहेरच्या खोलीत बसलो होतो. तर मला दबलेल्या आवाजातला संवाद ऐकू आला. तो म्हणत होता, बरं झालं त्यानं गॅसचं मला विचारलं नाही. तो माझा पाणउतारा करणार म्हणून मी काळजीतच होतो.'

'का हो ?'

'मी सांगेन नंतर.' तो म्हणाला. बाहेर मी हसलो.

फार कशाला, मी सुद्धा एकदा असाच आचार, विचार, आणि उच्चार यांची संगती न राखता आल्यामुळे अडचणीत आलो होतो.

माझ्या एका मित्राने स्कूटर विकून दुसरे कमी पेट्रोल लागणारे वाहन

विकत घेतले. मला तो त्या वाहनाची स्तुती सांगत होता. मी हसून त्याला म्हणालो होतो, 'ते काहीही असू द्यात. पण दोन चाकीत सर्वोत्तम वाहन म्हणजे स्कूटर.'

'अहो पण तिच्यापेक्षा या माझ्या अर्ध्या हॉर्सपॉवरच्या गाडीला पेट्रोल कमी लागते.'

'आपल्याला हे पसंत नाही. मी तर कधीही हे वाहन घेणार नाही.'

आणि त्या नंतर माझ्या दुसऱ्या एका मित्राने मला सांगितले की पेट्रोलच्या बचतीला स्कूटर उपयोगी नाही. वर्षांने मला खर्च परवडेना म्हणून मी अर्ध्या हॉर्सपॉवरचे वाहन घेतले. मग तो मित्र मला एकदा भेटला. मी त्याला म्हणालो,

'महाशय, आपण म्हणत होता तेच खरे होते. मी या आधीच हे वाहन घ्यायला हवे होते. परवडत नसताना उगीचच स्कूटर वापरत होतो.'

आम्ही दोघेही हसलो. हटवादीपणा न ठेवल्यामुळे माझ्या हरघडीच्या जीवनात माझ्या काळज्या कमी झालेल्या आहेत. मी प्रश्न कधीच प्रतिष्ठेचा करत नाही. माझा छोटा मुलगा जरी मला म्हणाला की, बाबा तुमचे चुकले. तर मी त्याला थप्पड देत नाही. जर त्याची हिंमत होते माझी चूक काढायला तर मी नक्कीच चुकलो असेन. आणि गंमत म्हणजे मी चुकलेलाच असतो.

## व्यवसाय

बालपणात गमतीनं मुलाला जर विचारलं की, 'तू कोण होणार पुढे ?' तर तो हमखास उत्तर देतो, 'बाबा. मी ड्रायव्हर होणार.' काही मुलं म्हणतात, 'बाबा, मी कंडक्टर होणार. मी पोलीस होणार...'

बालवयात मुलाला व्यवसायाबद्दलचं कसलंही ज्ञान असणं शक्यच नाही. त्यामुळे त्याला ड्रायव्हर, कंडक्टर व्हावं वाटणं हे आपण फारसं मनावर घेत नाही. पण गंमत अशी की, खूपशी माणसं मोठेपणीही आपण कोण होणार या प्रश्नाबद्दल फारशी जागरूकतेनं विचार करताना दिसत नाहीत.

माणसाच्या जीवनात त्याचा व्यवसाय बहुतांशी त्याचं सुख, दुःख, काळजी, त्रास वगैरे गोष्टी ठरवत असतो. आपल्या आवडीचा व्यवसाय मिळणं हे फारच महत्त्वाचं असतं. पण असं सर्वांच्याच बाबतीत कसं होईल? मी तर म्हणतो हे फार थोड्यांच्या वाट्याला येईल, बहुतेकांच्या वाट्याला मनाजोगता व्यवसाय येणारसुद्धा नाही.

हा मजकूर नोकरी, धंद्यात पदार्पण करू इच्छिणारे तरुण तरुणी ज्याप्रमाणे वाचतील त्याचप्रमाणे अगोदरच व्यवसायात असणारे लोकही वाचतील. दोघांच्याही दृष्टिकोनातून कष्ही महत्वाचे विचार लिहिण्याचा उद्देश आहे. व्यवसायातल्या यशापयशावर जीवनातलं सुख अवलंबून असतं. सततच अपयश यायला लागलं की जीवन दुःखी होतं. अनंत काळज्यांनी स्वास्थ्य पोखरलं जातं.

नोकरी किंवा व्यवसाय कुठला निवडायचा ह्याची रुपरेखा शिक्षणक्रम निवडल्यानंतरच पक्की होऊ लागते. उदाहरणार्थ एखाद्यानं जर वैद्यकीय बाजूचा शिक्षणक्रम घेतला तर तो पुढे काही बँकेत नोकरीचा विचारच करू शकणार नसतो. त्याचप्रमाणे एकदा एखाद्या मुलाने मशिनिस्टचा कोर्स घेतल्यानंतर तो काही ड्राफ्टस्मन होऊ शकणार नाही. तेव्हा शिक्षणक्रमाची निवड ही फारच महत्त्वाची असते.

आपला कल कुणीकडे आहे हे कित्येकांना बिलकुल समजत नाही. आईबाप नावाची संघटना आपल्या मुले या गुलामसंघटनेला, वाटेल तसे निर्णय घेऊन कोणत्याही कोर्सच्या दावणीला बांधत असते. त्या वयात मुलांना निर्णय घेण्याचा हक्कही नसतो आणि बुद्धीची परिपक्वताही नसते. त्यामुळे ज्याप्रमाणे लग्न ही एक लॉटरी असते. त्याप्रमाणे व्यवसाय हीदेखील एक लॉटरीच असते. म्हणून प्रत्येक पालकाने, मुलाने शक्य तितक्या काळजीने शिक्षणक्रम निवडावा. पालकांनी मुलावर कोणताही शिक्षणक्रम लादू नये.

'साल, मला जमलं नाही, पण पोराला इंजिनिअर करणार' अशा माणसाचा मुलगा इंजिनिअरिंगची आवड नसली की बापाच्या हेक्यापुढे नतमस्तक होऊन इंजिनिअरिंगला (जर प्रवेश मिळाला तर) आपट्या खातो, आणि रडत रडत पास झाला की कुठल्यातरी नोकरीत आयुष्य टाइमपास करीत घालवतो.

गल्या पंधरा-वीस वर्षात इंजिनिअरिंग आणि मेडिकल या व्यवसायांना भलताच भाव आलेला आहे. जो उठतो तो इंजिनिअर किंवा डॉक्टर होतो. त्यापैकी किती जणांना त्या क्षत्राची खरी आवड असते ? तशी तपासणी करण्याची काही टेक्निक्स आहेत का ? ती कितपत विश्वासार्ह असतात?

केवळ या दोन व्यवसायात पैसा भरपूर मिळतो म्हणून तिकडेच गर्दी खेचली जात आहे. प्रत्यक्षात असं दिसतं की कितीतरी जणांना या दोन्ही व्यवसायांची बिलकुल आवड असत नाही. त्यामुळे ही माणसे त्या त्या क्षेत्रांची प्रगती करण्याऐवजी तिथं नुसती कुजत राहतात. देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने ही फारच हानिकाक गोष्ट नाही काय ?

अगदी उदाहरणानंच सिद्ध करतो. एखाद्या माणसाची खरी आवड आहे पत्रकार व्हायची. तो लोटला गेलाय आर्किटेक्चर या धंद्यात त्याचा परिणाम असा होतो की ती आपल्या व्यवसायाशी तद्रुप होत नाही. त्या विषयाचं मूलभूत ज्ञान मिळविण्याच्या भानगडीतच तो पडत नाही. त्या क्षेत्रातले नवे प्रवाह, नवे विचार तो माहीसुद्धा करून घेत नाही. त्यामुळे होते काय की, त्याचे स्पर्धक इमारतींची नवी नवी डिझाइन्स देऊन त्याची प्रॅक्टिस मारून टाकतात, मग याची काळजीला सुरुवात होते. हेच जर तो पत्रकाराच्या व्यवसायात शिरला असता तर अहोरात्र धडपड करून तो त्या क्षेत्रात पुढे आला असता. पण त्याची लाईन चुकली.

असे लाईन चुकलेले शेकडो लोक मी आजवर पाहिलेले आहेत. जे धंद्यात आहेत ते कशीबशी उपजीविका करत आहेत. जे नोकरीत आहेत ते पाटच्या टाकण्याचे काम करीत आहेत. थोडक्यात, नोकरीतली जागा अडवत आहेत !

फर्निचरच्या धंद्यात ' पडलेला ' माझा एक मित्र पाहा. त्याला बिलकुल आवड नाही त्या धंद्याची. आज त्या क्षेत्रात इतकी नवीन नवीन डिझाइन्स निघत आहेत, की चोखंदळ गिऱ्हाईक निश्चितच खूष होईल. धंद्यामध्ये जर तुम्ही बदलायचं नाही असं ठरवलंत तर तुम्ही फेकले जाल. हा आपला ठोकळा टाइप जुन्या खुर्च्या आणि टेबलांशिवाय काहीही नवीन करायच्या भानगडीत पडत नाही. नवीन फर्निचर बनविणारे कारागीर मिळत नाहीत, मटेरियल महाग आहे अशा याच्या रडकथा असतात. दुकानात सर्वत्र गैर-

व्यवस्था असते. दाखवायचं फर्निचर नीट पुसलेलंसुद्धा नसतं. मग इथे गिऱ्हाईक कसं येणार ? परिणामी हा आपला रिकामा बसलेला असतो. मला म्हणतो, ' फसलो यार या धंद्यात पडून. ' त्याच्या घरी सतत पैशाची टंचाई असते. आज सनमायकाचं आणि कारखान्यात तयार केलेल्या फळ्यांचं ( उदा. पार्टिकल बोर्ड, प्लायवुड ) युग आहे. इथं याच्या जुन्या डिझाइनच्या खुर्च्या घेणार कोण ?

तेव्हा ' कल ' हा सर्वात महत्त्वाचा आहे. मुलांमध्येसुद्धा एखाद्याला गणित फार आवडत असतं. दुसऱ्याला चित्रकला फार आवडते. चित्र काढण्यात दिवसच्या दिवस जरी त्यानं घालविला तरी तो दमत नाही. अशा मुलाला हमखास कमर्शियल आर्टस्कडे यश मिळू शकतं. पैसा मिळेल किंवा नाही हे निश्चित सांगता येणार नाही. कारण ती गोष्ट व्यवहारात तो किती चोख राहतो, जागृत राहतो, यावर अवलंबून असते. पण एक गोष्ट निश्चित, त्याला जॉब सॅटिस्फॅक्शन हमखास मिळतं. त्याला फसलो असं कधीच वाटत नाही.

आजकाल यशाचं गमक म्हणजे पैसा हे आहे. त्याला काही इलाज नाही. पण पैसा जर नशिबानं फार मिळू शकला नाही तर मनाला समाधान तरी मिळते की माझा वेळ उत्तम जातो. मला नित्याचा व्यवसाय म्हणजे डोक्यावर लादलेली गोणी असं वाटत नाही. हे फार महत्त्वाचं आहे. याचा प्रकृतिस्वास्थ्याशी संबंध आहे, दीर्घायुष्याशी संबंध आहे.

व्यवसायात, नोकरीत किंवा कलेत तुमचा गौरव झाला तर तुम्हाला आयुष्याचं सार्थक झालं असं नाही वाटणार ? जगतात सगळीच माणसं, पण ज्याच्या जीवनाला काही ध्येय आहे, ज्यानं त्या ध्येयाला वाहून घेतलं आहे त्याचं जीवन सार्थकी लागलं असं मला वाटतं.

तुम्ही म्हणाल, ' मी एक कारकून आहे, मला काय ध्येय ! माझं जीवन कसं सार्थकी लागणार ? संसारातल्या गरजा भागवता भागवता मी मेटाकुटीला येतो. मला या तुमच्या तत्त्वज्ञानाशी काहीही कर्तव्य नाही ! ' मी कारकुनांचं जीवनही जवळून पाहिलेलं आहे. तुमच्या नशिबाला कारकुनी आली, तुमचा दोष नाही. तुम्ही धडपड करून वेगळं काहीतरी करून दाखवा. जर ते नाही जमलं तर कारकुनी तरी चांगली करा. तिथं चेहऱ्या-

वर हास्य आणून लोकांची चार कामं भराभर करा. समोर आलेल्या माणसाला असं दाखवून द्या की, क्लार्क असून, पुढे कसलंही भवितव्य नसतानासुद्धा मी सुहास्य वदनानं लोकांची कामं करतो आहे ! असे किती लोक वागतात ? कुठं कचेरीत गेल्यावर एखाद्या कारकुनानं खुर्ची देऊन 'बसा' म्हटलं की, बरं वाटतं. आपल्याला अर्धा कोरा कागद किंवा टाचणी हवी असली आणि त्या माणसानं दिली की वाटतं याच्याजवळ आहे माणुसकी.

पुण्याच्या पॉलिटेकनिकच्या पोस्टातले पोस्टमास्तर आपल्या छोट्या पोस्टाविषयी किती जागृत आहेत पाहा. त्यांनी पोस्टात पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. आपण एखादे पाकीट चिकटवू लागलो आणि त्याला अंगचा डिंक चांगला नसला की लगेच ते आतून आपल्याजवळची डिंकाची बाटली पुढे करतात. समोरच्या माणसाला वाटतं की खरोखरच या माणसाला सहृदयता निश्चित आहे. हे पोस्टमास्तर कधीही रागावत नाहीत, खेकसत नाहीत. त्यांना काय अशा चांगल्या वागण्यानं एकदम फार वरची जागा मिळणार आहे ? पण मध्यंतरी 'सकाळ'मध्ये एका विद्यार्थ्यानं त्यांच्याविषयी गौरवोद्‌गार काढले होते :

कदाचित असंही असेल की या गृहस्थांना स्वतःच्या आवडीची नोकरी मिळाली आहे म्हणून ते असं वागत असतील. तसं असेल तर उत्तमच. पण जर उलट असेल तर ?

## आवडीचे काम

तर मात्र आवडीविरुद्ध जॉब मिळाला तरीसुद्धा माणूस सिन्सिअर आहे हे पाहून बरे वाटते. स्वतःच्या आवडीची नोकरी मिळाली नाही किंवा नोकरीत वरची जागा मिळाली नाही की कित्येक माणसं इतरांच्यावर सारखी खेकसत असतात. तुमच्या असमाधानीपणाचा राग दुसऱ्यावर का काढता ?

प्रश्न असा पडतो की आपल्या आवडीचा जॉब कोणता हे कसे हुडकून काढायचे ? त्यासाठी परदेशात मोठ्या प्रमाणावर 'ॲप्टिट्यूड टेस्ट'

नावाच्या चाचण्या घेतात. आपल्याकडेही हल्ली घेऊ लागले आहेत. पण या चाचण्यावर फार भरंवसा ठेवणं धोक्याचं आहे असं तज्ज्ञ म्हणतात. शेवटी चारचौघांचा सल्ला घेऊन, आपली सांपत्तिक स्थिती, भोवतालची परिस्थिती आणि त्या विशिष्ट व्यवसायातली स्पर्धा लक्षात घेऊनच माणसानं विशिष्ट क्षेत्र निवडावे.

एखाद्या मुलाचं सदैव लक्ष सायकली, मोटार सायकली, स्कूटर दुरुस्त करणं अशा गोष्टीकडे लागत असेल आणि संधी मिळाली की तो अशी यंत्रे दुरुस्त करण्यासाठी धडपडत असेल किंवा अशा दुरुस्त्या तो तास न् तास पाहत असेल तर त्यानं सरळ त्या व्यवसायाकडे वळावं. यांत्रिक शिक्षण घ्यावं. चिकाटी न सोडता तोच धंदा करावा. पण काय होते, अशा मुलाचे वडील असतात बँकेत ऑफिसर. त्यांना वाटते, आपल्या मुलाने फिटर किंवा मेकॅनिक न होता बँकेत ऑफिसर व्हावे, म्हणून ते त्याला सतत परावृत्त करत असतात. यदाकदाचित त्या मुलाने तांत्रिक शिक्षण घेतले तर त्याला व्यवसायात पडण्यापासून परावृत्त करून नोकरीस चिकटवून देऊन त्याची धंदा करायची वृत्ती कुजवतात.

स्वतंत्र वृत्तीच्या माणसाने सहसा नोकरीत पडू नय असे मला वाटते. शिरायचेच असेल तर, जिथे आपल्या अंगच्या कलेचे किंवा कामाचे वरची जागा मिळून चीज होणार असेल तिथे शिरावे. नोकरीतसुद्धा अशी काही क्षेत्रे आहेत की तुम्ही कामाची चुणूक, हुशारी, चिकाटी दाखवलीत तर लगेच तुम्हास वरची जागा किंवा जास्त पगार मिळू शकतो. पण जिथे सब घोडे बारा टक्के अशी परिस्थिती असते तिथे तर कुवत असलेल्या माणसाने चुकूनसुद्धा जाऊ नये. धंदा करणे हे सर्वश्रेष्ठच ! माणूस स्वतःचा राजा असतो, आयुष्यातले चढउतार पहातो, पण त्यातच खरं जीवन आहे. पण त्यांना संथ जीवन हवं आहे त्यांनी धोका न पत्करता नोकरी करावी. मग त्याची कमी-अधिक फळं मिळाली तर ती आंबट तोंडे करत चाखू नयेत. प्रत्येक नोकरीत गुणाचे चीज होतेच असे नाही. काही ठिकाणी माणसं राजकारण खेळून गुणवत्ता असलेल्यांना मागे टाकतात तेव्हा सद्गुणी माणसं फसलो म्हणून कपाळाला हात लावून उरलेलं जीवन दुःखात घालवतात. एकदा नोकरी पत्करली ना ? मग हे वाटचाला येण्याची

शक्यता न नाकारता माणसानं नोकरी करावी.

कधी कधी असं उघड दिसत असतं की कंपनीचा मालक सतत धोशा लावून काम जास्त करून घेत असतो. त्यामुळे त्याला फायदा होणार असतो. तुम्हाला पगारवाढ मिळणारच असे निश्चित असतेच असे नाही. हे उघड दिसत असूनही मी म्हणेन भरपूर काम करा. त्यामुळे त्या मालकाला फायदा होईल हे विचारातसुद्धा आणू नका. यावर वाचक मला मूर्खात काढतील. पण माझे म्हणणे मी नीट विचारपूर्वक मांडले आहे. उदाहरण देतो, एका कारखान्यात पन्नास माणसे आहेत. तिथे काही माणसे राजकारण खेळणारी आहेत. इथे राजकारण्यांचं म्हणणं मालकच सगळा फायदा उपटतो. या लोकांची संप करून मालकाला वठणीवर आणायची कुवत नाही. काम करणाऱ्या माणसांना मालक त्रास देत नाही. हे जे राजकारणी आहेत ते कामचुकारपणा करतात. इकडे तिकडे टिवल्याबावल्या करायच्या, मालक पहातो काय याची सतत काळजी करायची यातच वेळ जातो. असे लक्षात येते की त्यांची आणि मालकांची सतत हुज्जत चालू असते. मग त्यांना नोकरी जाण्याची भीती वाटते. त्यांच्यापेक्षा काम करणारे सुखी असतात. काम करून त्यांना जितका थकवा येत नाही तितका थकवा या चुकारांना येतो. माणूस कामात मन लावून राबत असला की तो कधी थकत नाही. संशोधक माणसं दिवसच्या दिवस एखाद्या प्रयोगात रमलेली असतात. त्यांना जेवणाचीही शुद्ध नसते. ही गोष्ट काय दाखवते ? आवडीचं काम असलं की माणूस थकत नाही.

समजा आवडीचं काम नाही मिळालं तर ज दिलेलं काम असेल ते टाळण्यात माणूस जास्त थकतो– अर्थात मानसिक दृष्टीनं ! त्यापेक्षा ते काम पटापट करणं हे जास्त सुखावह असतं.

## नोकरीतील पथ्य

कित्येक वेळा असं लक्षात यतं की नोकरीत नवीन काही काम साहेब द्यायला लागला की कनिष्ठ ते टाळण्याचा प्रयत्न करू लागतो. कनिष्ठ माणसानं हे नेहमी लक्षात ठेवावं की, नवीन काम जरी सुरुवातीला त्रास-

दायक असलं तरी त्यातून त्याला निश्चित काहीतरी शिकता येतं. असं करता करता एखाद्या ऑफिसातील सारी टेबलं फिरून झाली की त्याला एकतऱ्हेचं समाधान वाटतं, आत्मविश्वास वाटतो आणि अशातूनच त्याला कदाचित वरची जागा मिळू शकते. नुसतं वर्षानुवर्षे एकच टेबल हाताळायचं म्हणजे साहेबसुद्धा विचार करतो, हा प्रमोशनला योग्य नाही.

वर मी त्या पन्नास माणसे काम करत असणाऱ्या कारखान्याबद्दल लिहिलं आहे. तिथं मला असं बिलकुल सुचवायचं नाही की वेठबिगार सहन करा. पण मला निश्चित असे वाटते की सामान्य माणसाने न उचलणारी तलवार कधी पेलायच्या भानगडीत पडू नये. आपण बरे आणि आपले काम बरे ही पद्धत ठेवली की डोक्याला त्रास होत नाही, काळजी लागत नाही. हिंमत असेल तर शोषण होते तिथे मालकाला वठणीवर आणावे, नाहीतर तिथली नोकरी सोडून दुसरीकडे जावे ! ती होत नसेल तर आहे तिथेच आनंदाने राहावे. आपल्या गरजा भागत नसतील तर चिकाटी धरून मालकांकडून पैसे वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. नाही मिळाले तर आपल्या कामात रस घेऊन मन तरी आनंदी ठेवावे. डोक्याला उगीच त्रास करून घेऊ नये.

ज्यांना टेबलवर्क असते किंवा कामाचे प्रेशर फार असते अशा माणसांनी काम करताना काही सूत्रे पाळावीत. ज्यांना कामासाठी भेटणारे फार असतील त्यांनी एकाचवेळी सर्वांना आत न घेता एकावेळी फक्त एकाच माणसाला आत बोलावून घ्यावे. त्याच्या कामाची तड लावावी व मगच दुसऱ्यास बोलवावे. न पेक्षा एकाचवेळी समोर चार-पाच माणसे बसलेली असली की एकदा एकाशी बोलायचे, मग दुसऱ्याशी बोलायचे पण निश्चित काम कुणाचेच व्हायचे नाही असे होते. कागदपत्रांना उत्तरे देताना प्रत्येक कर्मचाऱ्याने कामाची प्रायॉरिटी, महत्त्व ठरवावे. महत्वाचे काम प्रथम, त्यानंतर कमी महत्त्वाचे असा क्रम ठरवावा. पण कोणत्याही वेळी एकावेळी एकच काम हा नियम ठेवाव. हवी तर कामांची यादी करून त्याप्रमाणे एकेका प्रकरणाचा फडशा पाडावा. फडतूस प्रकरणात लक्ष घालून, घरी गेल्यावर महत्त्वाच्या प्रकरणाला उत्तर द्यायचे राहिले म्हणून रात्री झोपेतून मध्येच जागे होणारे लोकही मी पाहिले आहेत ! साहेब रागावणार म्हणून

ते उरलेली रात्र चिंतेत घालवून दुसऱ्या दिवशी घावऱ्याघावऱ्या ऑफिसात येऊन साहेबाच्या फायरिंगची वाट पहात बारका चेहेरा करून बसतात! पद्धतशीर काम केले की असे होत नाही. टेबलावरचे कागद नीट ठेवणे, कपाटातील केसेस व्यवस्थित ठेवणे हे फार महत्वाचे असते. टापटीप ही काळजी टाळण्याच्या दृष्टीने फारच महत्त्वाची गोष्ट असते.

आपण सारे सामान्य लोक आहोत. नोकरीधंद्यात मन लावून, जीव ओतून काम केले की आपल्याला वरची जागा, जास्त पगार, किंवा जास्त फायदा व्हावा असे वाटणे स्वाभाविक आहे. आपण काही साधुसंत नाही आहोत. वर्षानुवर्षे ज्या संघटनेत आपण जीव तोडून काम करतो त्या संघटनेने आपली परिस्थिती सुधारावी असं वाटणं सहाजिकच आहे. वर्षानुवर्षे ज्या धंद्यासाठी आपण राबलो. त्या धंद्यानं आपल्याला चार पैसे मिळवून द्यावेत असं वाटणं यात गैर काहीच नाही.

पण असं नेहमीच होईल असं सांगता येत नाही. कित्येक वेळा आपल्यापेक्षा कमी दर्जाच्या माणसाला वरची जागा मिळते. चुकार माणसाचा पगार वाढतो. भेसळ करणाऱ्या व्यापाऱ्याच्या खिशात पैसा खुळखुळू लागतो.

असं झालं की दुःख व्हायला लागतं. माणसाचं नीतिधैर्य खचू लागतं. त्याला नैराश्य येतं. स्वतःच्या नशिबाला बोल लावत नोकरी ही सक्तमजुरी आहे अशा विचारानं तो आदळ-आपट करीत काम करू लागतो. हे प्रसंग कमी-अधिक प्रमाणात प्रत्येकाच्या वाट्याला येतात. आपण फसलो, आपल्या गुणांचं चीज झालं नाही असं वाटू लागतं.

वाट्याला येणारी परिस्थिती जर आपण बदलू शकत नसलो तर आपण आपलं लक्ष इतर कुठल्यातरी धंद्यात रमवावं, मुलां-बाळांत जास्त लक्ष घालावं. पण धीर सोडू नये. उशिरा का होईना, माणसाला परमेश्वर न्याय देतो असा माझा विश्वास आहे. समजा, नाहीच न्याय मिळाला, तर निदान आनंदी वृत्ती तरी सोडू नये. यापेक्षा आपण जास्त काय करणार आहोत!

# लग्न आणि कुटुंबपद्धती

लग्न हा आयुष्यातला जुगार प्रत्येक माणसाला एकदा तरी बहुधा खेळावाच लागतो. त्या जुगारात कुणी हरतो, कुणी जिंकतो. यातून काळजीचे प्रसंग निर्माण होत असतात. या संदर्भात प्रत्येकाचे वेगळे-वेगळे विचार असतात. आज-काल मुला-मुलींना आपला जोडीदार निवडण्याचे बाबतीत फक्त एखाद-दुसऱ्या गोष्टीतच स्वातंत्र्य असते. ती म्हणजे जोडीदाराचे शिक्षण आणि रूप. मुलगा किंवा मुलगी आलेलं स्थळ त्या कारणावरून नापास करू शकते, परंतु जर या गोष्टी मान्य झाल्या तर पुढच्या गोष्टी या दोघांच्याही हातात नसतात. माणसं कितीही शिकली आणि कितीही पैसेवाली असली, तरी लग्नात पैसे काढणे हे एक त्यांचे परमकर्तव्य असते. यात वरपक्षाकडचे लोक सहजासहजी यशस्वी झाले तर मग वधूपक्षाकडचे लोक चांगले ठरतात. मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर मुलीचा छळ सुरू होतो. मधुचंद्राची लाली ओसरली की भांडणे सुरू होतात. नवरा आपले प्रेस्टीज सतत सांभाळत असतो. बायकोने जरा सासरच्या लोकांची चूक काढली किंवा माहेरची बाजू घेतली तर तिची खरड काढली जाते. सर्व चुका बायकोकडच्या लोकांनीच केलेल्या असतात, असा वरपक्षाचा दावा असतो. वरपक्षाचा कुठलाही फडतूस माणूस हा अतिशय सन्माननीय असतो. वधूने त्याला मान दिलाच पाहिजे असा तिच्यावर दबाव असतो. नवरा आपल्या आई वडिलांच्या नादाने वागू लागला तर बायकोचा छळ होऊ लागतो. नवीन नाती एकमेकांच्या भरभराटीसाठी निर्माण होण्याऐवजी त्यातून कटुता निर्माण होते. कोणीही कोणाच्या चुका विसरायला तयार असतो. सारे जीवन करपून जाते. जर नवऱ्याने घरच्या लोकांच्या मता-प्रमाणे ऐकायचे नाही असे ठरवले तर त्याला घरापासून वेगळे काढले जाते. आणि मग वडिलांकडून मिळणारे फायदे त्याला मिळणे बंद होते. वडील कदाचित त्याला वाटणी देत नाहीत. कधी कधी मुलीकडचे चमत्कारिक-पणाने वागू लागतात. कधी त्यांचे बरोबरही असते म्हणा. सतत अपमान होऊ लागले म्हणजे ते तरी काय करणार ?

वडिलधाऱ्यांनी समंजसपणाने वागायचे ठरवले तर हे सारे टळेल. पण

तसे फार थोड्या बाबतीत होते. काही ना काही कुरबुरी पहिली काही वर्षे चालू असतात.

सासू-सासरे आपल्या मुलींना एक नियम आणि आपल्या सुनेला दुसरा नियम असे दुटप्पी वागतात.

मुलीचं कोडकौतुक आणि सुनेवर बारीक लक्ष असा प्रकार असतो. सुनेचं कौतुक केलं तर ती डोक्यावर बसेल असा त्यांनी ग्रहच करून ठेवलेला असतो. अशी ॲक्शन असल्यावर मग त्याला रिॲक्शन नाही मिळाली तरच नवल.

नवरा-बायकोचा प्रेमविवाह असेल तर या प्रकारात भरच पडते. अशी बायको ही सर्वांना नकोशी व्यक्ती असते. ती घरातली एक अडगळ असते. प्रेमविवाहामुळे मानपान, करणी, हुंडा, मनासारखे झालेले नसते. त्यामुळे संताप होतो, काळजीचे वातावरण सर्वत्र पसरलेले असते.

जिथे हे प्रकार घडत नाहीत, तिथे आनंदी वातावरण असते हे सांगणे नकोच. परंतु अशी घरे फार थोडी असतात. मुलाने प्रेमविवाह ठरवला तर आई-बाप लगेच त्याचे ऐकतात असे कधी फार ठिकाणी घडते का ? नाही.

प्रेमविवाहाच्याबाबतीत प्रामुख्यानं काही गोष्टी आढळतात. मुलगा-मुलगी दोघेही वयानं अगदी लहान असतात. शारीरिक आकर्षण हाच बहुधा प्रेमाचा पाया असतो. त्यात चूक काहीच नाही. पण अशा प्रेमाची परिणती सुखी विवाहात व्हायला काही गोष्टींची जरूरी असते, दोघांची मने एकमेकांस जुळणारी असावी लागतात. लग्नाआधी तो तिच्या भावनांची जपणूक करीत असतो. लग्नानंतर तिच्यावर मालकी हक्क निर्माण झाल्यामुळे त्याला आता भावनांत फारसा रस वाटत नाही. वय लहान असले तर विचार पक्व असूच शकत नाहीत. लग्नानंतर एकमेकांचे दोष प्रकर्षानं दिसू लागतात. त्यांचा त्रास व्हायला लागतो.

प्रेमविवाहानंतर मुलाचे आई-वडील समंजसपणाने वागून सुनेला आपली म्हणायला तयार असले तर बराचसा प्रश्न मिटतो. परक्या मुलीनं त्यांना जीव लावला, चुटपुटीतपणानं वागायला सुरुवात केली की तिच्याविषयी सर्वांना प्रेम वाटू लागते. पण हे असे होतेच असे नाही. आई-वडील तिला सामावून घेऊ इच्छित नाहीत. त्यामुळे (किंवा मूळ स्वभावामुळे) सून

शेफारल्यासारखी वागू लागते, काम न करणे, खूप उशिरापर्यंत झोपणे घरात दुरुत्तरे करणे असला मार्ग तिने अवलंबला तर वाद सुरू होतात. मला असे वाटते की सासू-सासरे वयाने मोठे असल्यामुळे अनुभवाचा शहाणपणा, पोक्तपणा त्यांचेजवळ असतो. त्यांनी सुनेला समजून घेऊन वागवायला हवं. पण सुनेचं काही चुकलं की तिला गोड भाषेत सांगायचं मानसशास्त्र आमच्या जुन्या पिढीत दुर्दैवाने नाही. त्यांना कुणी सांगायला गेलं तर ही माणसं ऐकायच्या मन:स्थितीत नसतात. सुनेला फटाफट बोलायला सुरुवात होते. मुलाकडं तिच्या कागाळ्या सुरू होतात.

मला सुनेची कड बिलकुल घ्यायची नाही. एखादी उद्दाम सून असेल तर तिच्यावर काहीही औषध नाही. मला एवढंच म्हणायचं आहे की परक्या घरातल्या मुलीला आपल्या रुळण्यासाठी चांगले वातावरण तयार व्हायला नको का ?

अती होत नसेल तर तिच्या चुकांकडे कानाडोळा करणेच श्रेयस्कर. शब्द तर फार जपून वापरावेत. कारण बहुतेक वेळी नवरा-बायको एक होतात. आणि सासू-सासऱ्यांचे शब्दच उरतात. आई-वडिलांची कटकट मागे लागली की मुलगा वेगळं होऊ पहातो. त्यात वावगं असं काहीच नाही. मुलाला वाटत आई-वडील, बहीण-भावंडे यांनी बायकोला सांभाळून घ्यावं. तस झालं नाही की त्याला वाटतं कसलं आलंय माझं घर, माझे आई-वडील ? चला, वेगळंच व्हा !

तेव्हा प्रश्न निर्माण होतो की एकत्र कुटुंब पद्धतीत रहावं की वेगळं रहावं ? यां विषयावर आजवर खूप लिहून झालेलं आहे. मला असे वाटते की, भांडणे होऊन वेगळं निघण्यापेक्षा मुलाचं लग्न झाल्यावर स्वत: आई-वडीलांनीच त्याला वेगळं बिऱ्हाड थाटून द्यावं. एकाच इमारतीत सर्व रहात असतील तर वडीलांनी प्रत्येक मुलाला वेगळा संसार थाटुन द्यावा. याचा फायदा असा होतो की प्रत्येक आपल्या आवडीचा पदार्थ करून खाऊ शकतो. विचार करा, एकत्र कुटूंबपद्धतीतल्या नवीन लग्न झालेल्या एखाद्या जोडप्याला वाटले अमूक एक पदार्थ करून खावा तर त्यांना तो किलोच्या हिशोबावर करावा लागेल, तेव्हाच सर्वांना थोडा थोडा मिळू शकेल.

दुसरी गोष्ट अशी की, प्रत्येक विवाहित जोडप्याला आपल्या स्वत:च्या

विचाराने वागायचे स्वातंत्र्य मिळू शकते. आपणहूनच सर्वजन वेगळे काढलेले असतात. त्यामुळें शेवटपर्यंत गोडी रहाते. अडचणीच्यावेळीं एकमेक एकमेकांच्या मदतीला येऊ शकतात. ते नियंत्रण आई-वडिलांनी ठेवावे. या पद्धतीमुळे एकत्र कुटुंबपद्धती यांचा मिलाफ साधला जातो. हे मी काही तत्त्व मांडत नसून प्रत्यक्षात अशी कुटुंबे मी पाहिली आहेत. ती अत्यंत सुखाने संसार करीत आहेत.

याला मी एक समान उदाहरण देतो. माझ्या घरी मी एकाच गुलाबाच्या झाडावर दोन वेगवेगळे असे डोळे भरले होते. प्रत्येक बाबतीत मला असे दिसून आले की, एखाद्या जातीच्या डोळ्याची वाढ सपाटून होते. दुसरा डोळा फारसा जीव धरत नाही. अशा सात-आठ झाडांत फक्त एकाच झाडावरचे दोन्हीही डोळे त्याच जोमाने वाढलेलेले आहेत. मग मी इतर झाडांची चिरफाड केली. मुळाच्या जागी मी झाड उभे कापले. एका डोळ्याला काही मुळे राहतील आणि दुसऱ्याला उरलेली राहतील असे मी झाड कापले. व ती दोन झाडे वेगवेगळ्या कुंड्यात लावली. ती दोन्हीही झपाट्यांने वाढली. एकत्र कुटुंबपद्धतीने एकाच झाडावर भरलेल्या दोन डोळ्यासारखेच नसते कां ?

अशी कितीतरी घरे मी पाहिली आहेत की, सुरुवातीला एकोप्याने राहणारे आई-वडील, मुले, नंतर एकमेकांची तोंडेसुद्धा पाहू इच्छित नाहीत. गळ्यात गळे घालणारे भाऊ एकमेकांचे शत्रू बनतात. पैशावरून भांडणे होतात, बायका-बायकाचे पटत नाही. त्या सर्व भांडणामुळे एकत्र कुटुंब पद्धतीतले थोडेफार फायदे नको वाटू लागतात.

मुलांची लग्ने झाली की चार घरच्या चार मुली, ज्या वेगवेगळ्या वातावरणांत वाढलेल्या असतात, त्या सर्वांची व घरच्यांची एकवाक्यता झाली तर आनंदाचीच गोष्ट आहे. पण बहुतेक ठिकाणी ती होत नाही. मग एकत्र कुटुंबाचा अट्टाहास आई-वडिलांनी धरावाच कशाला ?

माझे हे विचार कदाचित कुणाला पटणारसुद्धा नाहीत. चांगलं चाललेलं, असताना लग्न झाल्यावर लगेच मुलाला वेगळं काढावं असं म्हणणं वेडगळपणाचंच वाटेल. आपणहून त्याना स्वैराचारानं वागायचं स्वातंत्र्य देणं कित्येकांना रुचणार नाही, किंवा कित्येकांना भावनेच्या बंधनामुळे ही

नुसती कल्पनासुद्धा सहन होणार नाही. काहींना असे वाटेल की, आपणच मुलांना दूर केलं तर त्यांच्या मनात आपल्याविषयी ओढ, आदर, प्रेम बिलकुलच राहणार नाही.

मी विचारतो, एकत्र कुटुंब पद्धतीत ते प्रेम, तो आदर असतो असं तुम्हाला म्हणायचं आहे का ? जिथे एकमेकांची मने जुळू शकत नाहीत तिथे कसला आलाय दगडाचा आदर ?

सुनेचं बेताल वागणं, त्याला मुलाची सक्रीय फूस यामुळे ब्लड प्रेशर वाढवून सासू-सासऱ्यांनी दिवस का एकत्र काढावेत ? किंवा सुनांनी तरी सतत आई-वडिलांच्या दबावाला, मनं मारून का बळी पडावं ?

ज्यांना हे आपणाहून वेगळं काढायचे धाडसी विचार मानवत नसतील त्यांना माझा एक सल्ला आहे. त्यांनी एकत्र कुटुंबपद्धती राबवून पहावी. नसेल जमत तर मग निदान कटुता न येता स्वतः पुढाकार घेऊन मुलांना वेगळं करून द्यावं.

त्याचबरोबर मुलांच्यावर आई-वडिलांशी प्रेमानं वागायची तसेच त्यांच्या अडचणीला धावून जायची जबाबदारीही पडते हे तितकेच महत्त्वाचे आहे हे तरुण पिढीनेही समजून घेतले पाहिजे.

माणसाला निरनिराळ्या वयात निरनिराळ्या तऱ्हेच्या काळज्या असतात. मुलं लहान असताना त्यांच्या आजारणाच्या, शिक्षणाच्या काळज्या. ती मोठी झाल्यावर त्यांच्या लग्नाच्या आणि लग्नानंतर येणाऱ्या तणातणीच्या काळज्या ; अशा अनंत काळज्यांचे घाव सोसत सोसत त्याचं हृदय कमकुमत होऊ लागतं. जे या काळज्यांना टिकू शकत नाहीत ते अल्पवयात मरतात आणि आपल्या कच्च्याबच्च्यांपुढे त्यांच्या अल्पवयात काळज्यांचे डोंगर उभे करून ठेवतात.

माणसं तरुणपणी ऐन उमेदीत घराचा, धंद्याचा व्याप भरपूर वाढवून ठेवतात. जीवनाच्या दिवसाचा सूर्य जसा जसा कलू लागतो तसं माणसानं भानावर येऊन आपल्या व्यापांना हळूहळू आवर घालायला हवा. साठीकडे माणूस चालला की त्याने मनाशी खूणगाठ बांधावी की आता यानंतरचं आपलं जीवन अगदी बेभरंवशाचं आहे. त्यामुळे त्याने नवीननवीन धाडसं करू नयेत. ज्यांना आपल्या मृत्यूनंतर आपली जागा घ्यायला कर्तबगार व

लायक मुले आहेत अशांच्या बाबतीत हे मी म्हणत नाही. कारण सैन्यात ज्याप्रमाणे सेनापती पडला की त्याची धुरा लगेच दुसरा हातात घेतो तशी ही मुलं पुढे येऊ शकतात. पण ती प्रथमपासून आपल्या वडलांबरोबर असतील तर ! तसे घडले नाही तर सारी वाताहात होते.

मुलांची लग्नकार्ये करून दिली की आई-वडिलांनी त्यांच्यांतून लक्ष काढून घ्यावं. त्यांचं त्यांना जगू द्यावं, मागितला तर सल्ला द्यावा. अगदीच चुकत असतील तर मुलांना धोक्याचा कंदील आपणाकडून दाखवून द्यावा. पण हरघडी त्यांचे बाबतीत लुडबुड केली की ती अपमान करतात. मग आई-बाप चिंता करू लागतात. म्हणून मुलीचं लग्न करून दिलं की आईनं एक जबाबदारी कमी झाली असं समजून इतर राहिलेल्या जबाबदाऱ्यांवर लक्ष केंद्रित करावं पण तसं सर्वत्र होतं असं नाही. काही बायकांना आपल्या लग्न करून दिलेल्या मुलींच्याबद्दल वावगी काळजी इतकी असते की त्यामुळे त्या खंगून जाऊन लवकर मरतात.

मुलींची लग्ने करून दिलेली असतात पण प्रत्येक मुलीचं सासरी चांगलं चालतंच असं नाही. मग तिचं कसं होईल म्हणून आई काळजीत असते. एखाद्या मुलीची सासू तिला छळत असते. एखाद्या मुलीचा नवरा तिला छळत असतो. कधी मुलीची मुलं जगत नाहीत. कधी मुलीची प्रकृती नादुरुस्त रहात असते. आई आपली सतत काळजी करत असते. याबाबत मला वाटते प्रत्येक आईनं मनाशी विचार करावा आपण काही करू शकतो का ? करू शकत असू तर लगेच उपाय अंमलात आणावेत व मग स्वस्थ बसावं. काही उपायच नसेल तर तिकडे चक्क कानाडोळा करावा ! ज्यानं त्यानं आपापल्या काळज्या उपसाव्यात. आईनं सर्वांच्या काळज्या अमर्यादपणानं उपसून मरू नये. त्याचा इतरांना त्रास होतो. काळजी करून जर अडचणी सुटत असल्या तर मग जरूर काळज्या कराव्यात. मुलीचा नवरा तिला छळतो यावर त्याला गोडीगुलाबीने समजावून सांगणे हा एक मार्ग असतो. तो ऐकण्यातला जर नसेल तर मुलीला पडतं घ्यायला सांगणं हा एक मार्ग असतो. मार्ग त्या दोघांनीच खरा काढायचा. जर ती सतत भांडणं करायला लागली तर त्यातून आई न् वडलानं अंग काढून घ्यावं. पण तसं होत नाही. माझ्या मुलीचं कसं होईल म्हणून आई-वडील सतत काळजी

करत असतात. हे थांबबावं. बोलणं सोपं आहे ! माणसाचा मेंदू हा यंत्रा-सारखा बंद करता येत नाही. पण प्रयत्नशील असावं. मार्ग काढण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. मग स्वस्थ रहावं. आपलं मन इतरत्र गुंतवावं.

मुलींच्या काळज्या करत वयाच्या पन्नासाव्या वर्षी वारलेली एक आई मी जवळून पाहिलेली आहे. त्यात पुन्हा तिचं दुर्दैव असं होतं की नवऱ्याच्या प्रचंड मोठ्या व्यवसायामुळे त्याचं घरात फारसं लक्ष नसायचं. त्यामुळं त्या दोघांत नेहमी खटके उडून काळजीत भर पडत असे !

## निवृत्ती

उतारवयात माणसानं आपल्या इस्टेटीच्या बाबतीत मुलांना विश्वासात घेऊन सर्व कारभार त्यांच्या हाती हळूहळू सोपवावा. घरातल्या सर्व महत्त्वाच्या गोष्टी मोठ्या मुलांना सांगून ठेवाव्यात. शेअर्स, ठेवी, कर्जाऊ दिलेल्या रकमा यांचा तपशील मुलांना सांगून ठेवावा. जे जे महत्त्वाचे व्यवहार होत असतील त्या वेळी मुलांना बरोबर असू द्यावेत. पण असे होत नाही. आपल्या वडलांनी कुठे कुठे पैसे गुंतवलेले आहेत याचे कागदपत्र जर व्यवस्थित ठेवलेले नसतील तर मुलांना कशाचाच पत्ता लागत नाही. पर्यायाने नुकसान होते. माझ्या माहितीचे गृहस्थ हार्ट-अॅटॅक आल्यामुळे अचानक दवाखान्यात दाखल झाले. रीतिप्रमाणे मी त्यांना भेटायला गेलो. दवाखान्यातलं वातावरण अगदी गंभीर होतं. मी तिथे गेलो तेव्हा ते आपल्या मुलाशी हळू आवाजात काय बोलत होते ? प्रकृतीचं काही नव्हतं. वास्तविक तिथं प्रकृतीविषयक बोलणं हवं, पण पैशाअडक्याचं सारं मुलाला सांगत होते. वास्तविक त्यांना हे वेळच्या वेळी मुलाला आधीच सांगता आले नसते का ?

एका गृहस्थांनी बँकेतील आपल्या ठेवीवर कर्ज काढलेली होती. पैसे जमले की ते गृहस्थ कर्जफेड करीत. बँकेने त्यांना एक मर्यादा घालून दिलेली होती. तिथपर्यंत ते कर्ज काढू शकत होते. त्यांचे दोन-तीन करंट अकाऊंट होते. त्यात एफ. डी.चे व्याज आपोआप येण्याची व्यवस्था होती. कालांतराने त्यांनी सर्व कर्ज फेडली. वास्तविक तेव्हाच ठेवी सोडवन

आणायला हव्या होत्या. म्हणजे त्यांचे व्याज सर्वच्या सर्व मिळत गेले असते. पण मध्ये तब्बल चार वर्षे गेली. त्यांनी धंदा बंद करून टाकला होता आणि ते हवा पालटायला म्हणून परगावी गेले. इकडे बँकेची सारखी पत्रे यायची की तुमच्या खात्यावर अमुक रक्कम टाकली आहे. वडलांच्या पश्चात मुलांना कसला पत्ताच लागेना. बँक इतरांना काही सांगायला नकार देत होती.

ते गृहस्थ आजारी पडल्यावर मुलांची धावपळ सुरू झाली. वडलाना काही आठवत नव्हते. त्यांना त्या आजारी अवस्थेत बँकेत न्यावे लागायचे. तिथे असे लक्षात आले की ठेवीवरील मिळणाऱ्या व्याजातून (कर्जाची सोय करून ठेवली होती म्हणून) बँक पुष्कळ रक्कम काढून घेत होती. तिथं असंही लक्षात आलं की एका फिक्स्ड डिपॉझिटची पावती बँकेकडे होती. पण त्याचे व्याज खात्यावर भरा म्हणून इन्स्ट्रक्शन्स द्यायच्याच राहून गेल्यामुळे त्या ठेवीचे ३ वर्षांचे व्याज उगीचच बँकेत पडून होते.

म्हणून पैसे येणे देणे वगैरे सर्व गोष्टी नीट काळजीपूर्वक मुलांना सांगून ठेवाव्यात. नाहीतर येणे माहीत नसल्यामुळं हमखास बुडते. देणे टळत नाही.

खरं म्हणजे ठेवी, शेअर्स वगैरे जॉईंट नावावर करून ठेवाव्यात. म्हणजे पहिला माफ़क मेला की मृत्यूचा दाखला दिल्यावर ठेवी दुसऱ्या नावाच्या माणसाला मिळू शकतात.

मी अशी कित्येक घरं पाहिली आहेत की या उलाढाली फक्त नवऱ्याला माहीत असतात. बायको सांगूनही त्यावर लक्ष घालत नाही. पर्यायानं नवऱ्याच्या मृत्यनंतर तिला कुणीही फसवू शकतो. हे सर्व टाळण्यासाठी उत्तम उपाय म्हणजे प्रत्येक महत्त्वाच्या व्यवहाराची वेगळी फाईल करून ठेवणं. त्यात व्यवहाराची, तो कसा केला, पुढे काय करायचं वगैरेची टाचणे ठेवावीत.

म्हातारवयातल्या माणसांचे दोन प्रकार असतात. एक प्रकारातली माणसे अशा मताची असतात की मरेपावेतो कुणालाही काहीही देऊ नये. सर्व आपल्याच नावावर ठेवावे. त्यांना एक भीती वाटत असते की आपल्या जवळचे पैसे एकदा का दुसऱ्याला दिले की आपली कोणीही किंमत ठेवणार

नाही. म्हणून एका नाटकात म्हटलंय, ' ताट द्यावे, पण पाट देऊ नये.' ही माणसे जिवंतपणीच ठरवत नाहीत की कुणाला काय द्यायचे नाही. अर्थात हे मी स्वकष्टार्जित मिळकतीबाबत म्हणतो आहे, वडिलार्जित इस्टेटीचे-बाबत म्हणत नाही. कारण तिथे कुणाच्या मर्जीवर काहीं नसते. सर्व कायद्या-प्रमाणे होत असते. सर्वांना सारखा वाटा मिळू शकतो.

उतारवयात त्या माणसाचं मन हळुवार झालेलं असतं. त्याला कुणी दुखावलं किंवा त्याच्या मनासारखं झालं नाही की लगेच त्याच्या मनात विचार येतो. दुखावणाऱ्याला काहीही देऊ नये ! इथे विचार बाजूला राहातो आणि भावनांचा वरचष्मा होऊ शकतो.

वडिलांनी मृत्युपत्र केले नाही की पुढे भांडणं होऊ शकतात. म्हणून वेळीच मृत्युपत्र करून ठेवावे.

या उलट दुसरा प्रकार असा की, त्यातली वृद्ध माणसे म्हणतात, मी माझ्या देखत इस्टेटीचे सर्व वाटप करून टाकणार ! तसे केले तर माझे-विषयीचा आदर मुलांत वाढेल. अर्थात टॅक्स भरण्याच्या अडचणीमुळे कदाचित प्रत्यक्ष त्याच्या हयातीत मुलांच्या नावावर इस्टेट जरी चढली नाही. तरी वडिलांचे विचार काय आहेत हे मृत्युपत्राद्वारे लक्षात येते.

वरील दोन्ही गटातले लोक काही प्रमाणात बरोबर आहेत, हे त्या त्या परिस्थितीप्रमाणे, त्या त्या विचाराच्या लोकांच्या संदर्भात खरे ठरते.

मुले चांगली असतील तर वडिलांनी सर्व पैसे देऊन टाकल्यावरही त्यांच्याशी कृतज्ञ राहतील. न पेक्षा ' सर्व पैसे कायम जवळ बाळगून आहे. मरेतो कुणाला देणार नाही.' म्हणून हयातीतच त्याच्याशी भांडत राहतील.

मुले वाईट असतील तर पैसे हातात पडल्यावर वडिलांना रस्ता दाखवायला कमी करणार नाहीत. अशा परिस्थितीत काही लोक जे म्हणतात की, ' जोवर माझ्याकडे पैसा आहे तोवर तुम्ही मला मान द्याल.' हे अगदी बरोबर आहे. पण मुले जर चांगली वागणारी आणि विचाराने पक्व असतील आणि जर म्हणत असतील की, ' तुमच्या हयातीत तुम्ही सर्व ठरवून जा.' तर तेही काही चूक नाही. जिथे इस्टेट मोठी असते तिथे कटकटी घडूही शकतात. म्हणून प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा नीट अभ्यास करून योग्य ती पावलं उचलावीत.

ज्याप्रमाणं वडिलांचा पैसा काढून घेतल्यावर त्यांना रस्ता दाखवणारे लोक या जगात आहे, त्याचप्रमाणं हयातीत वडिलांनी निःस्वार्थीपणानं मुलांना सर्व देऊन टाकलं म्हणून कृतज्ञतेनं वागणारी मुलंही या जगास आहेत.

या साऱ्या समस्यांवर गणिताप्रमाणं तोडगा काढता येत नाही हे जरी खरं असलं तरी पुढच्या काळज्या वाचवण्यासाठी, सर्व गोष्टींसाठी मृत्युपत्र करणं हे फार हितावह आहे असं मला वाटतं.

नवरा-बायको, मुले-सुना, यांच्यात समन्वय साधलेली कित्येक घरं मी पाहिली आहेत. नशिबाचा इथे भाग आहे हे खरंच, पण कुटुंबातल्या प्रत्येक घटकाची अॅडजस्टमेंट करण्याची किती तयारी आहे यावरही खूपसं अवलंबून आहे. निरनिराळ्या वातावरणात वाढलेली माणसं एकत्र आली की, तंटे सुरू होतात. लग्नाआधी एकजिवानं वागणारी भावंडं लग्नानंतर भांडू लागतात. त्याला बाहेरून सुना म्हणून आणलेल्या मुलीसुद्धा खूपदा कारणीभूत होतात. हे टाळणे फार कठीण आहे. पण प्रयत्न जरूर करावा. घरात निर्माण होणारे गैरसमज वेळच्यावेळी, चर्चा करून टाळावेत. कुठलाही प्रश्न प्रतिष्ठेचा करू नये. त्यागाची शिकवण आपणच आपल्या वागण्याने मुलांच्या मनात रुजवावी.

उतारवयातला चिडखोरपणा जितका टाळता येईल तितका टाळावा. रिटायर झाल्यावर पैसे कमी मिळू लागले की ओघानेच घरातली सत्ता कमी होऊ लागते. तरुण मुले समंजस असतातच असं नाही. पण त्यामुळे रागावून जाऊ नये, रुसू नये. कारण मग त्या वयात कुठे थारा मिळत नाही. चिडखोर स्वभावामुळं कुठं पटत नाही. मग ज्या मुलाचा राग येतो तिथून मुक्काम हलवून दुसऱ्या मुलाकडे जावं लागतं. तिथंही तोच प्रकार घडतो मग मुलीकडे जावे लागते. तिथे जावयाचे ऐकावे लागते, त्यापेक्षा कुठंही आग्रही भूमिका न धरता वृद्धापकाळात आनंदानं दिवस काढावेत.

या जगाचा नियम आहे, ज्याची उपयुक्तता संपली त्याचा कचरा म्हणून निकाल लावला जातो. तेव्हा उगीच कुणावर राग धरत बसू नये. आपला उपयोग तरुण पिढीला जितका होईल तितका जरूर करून द्यावा. मरेपर्यंत कष्ट कुणाला चुकत नाहीत. कष्ट करण्यातही समाधान मानून घ्यावं.

नातवंडं सांभाळावीत. त्यांच्यात रमावं. सर्वांना वृद्धापकाळीसुद्धा आपलंसं करून घ्यावं. नवीन पिढीशी जुळवून घेणं अवघड असतं हे खरं आहे. पण त्याला इलाज काय ?

आई-वडिलांनी सतत असं मनाशी म्हणावं, करताहेत ना मुलं संसार धडपणे ? मग कशाला त्यांची काळजी करा ? कशाला त्यांना नको असलेला सल्ला द्या ?

हा शेवटचा लेख वृद्धांच्या संदर्भातच लिहिलेला असल्यामुळे इथे फक्त वृद्धांनीच कसं वागावं म्हणजे काळज्या कमी होतील याचा विचार केलेला आहे.

माझा एक लेख वाचून एक वृद्ध गृहस्थ माझ्याकडे आले. मला म्हणाले, 'तुमचा लेख आवडला.' मी त्यांच्याशी वृद्धापकाळच्या अॅडजस्ट-मेंटवर चर्चा केली. ते म्हणाले, 'मी उतारवयात मुलांला अडचणीत टाकायचं नाही असं ठरवलं. मुलांचा व्यवसाय भिन्न होता. त्यामुळं मी माझा व्यवसाय हळूहळू बंद केला. स्वेच्छेनं रिटायर झालो. आम्हाला दोघांना क्रिकेटचा शौक. पण मॅच पाहताना मी मुलाचं तिकीट खूप मागे काढतो. कारण मी निर्व्यसनी आहे, पण तो सहा तास सिगारेटशिवाय कसा बसेल ? तो मला मानतो. माझ्यादेखत सिगारेट ओढत नाही. मी त्याला वेगळ्या तऱ्हेनं स्वातंत्र्य देतो.' अशा माणसाला त्याच्या कुटुंबात मानाचं स्थान नसेल तरच नवल !

REFBK-0022689